# याला जीवन ऐसे नाव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम १०४८३ वि: ४९-सवल्य
क्रमांक ३५८ नों दि: २०।५।६२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
डा. अनन्तराव पाटील
१५०४३
ग्रंथ ... स्थळ प्रत

REFBK-0015043

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, टिळक रस्ता, पुणे ९.

REFBK-0015043

# प्रस्तावना

★

भारताबाहेर पंधरावर वर्षे घालविल्यानंतर मी पुण्यास स्थायिक झाल्यावर मराठी वृत्तपत्रांवर आधाशासारखा तुटून पडलो. काही वृत्तपत्रांचे संपादक स्नेही होते, कांही परिचित होते, कांही मी भारत सोडतांना लहान होते, ते 'मोठे' झाले होते. बहुतेकांच्या लिखाणामध्ये बऱ्याच अंशी पूर्वीचेच सूर वहात आहेत असे दिसून आले. वृत्तपत्रांतील विषयांमध्येही फारसा फरक दिसला नाही, संपादकीय विषय त्याच धर्तीवर, सरकारविरुद्ध. पत्रव्यवहारातही त्याच त्याच तक्रारी. रस्ते खराब, दवाखाने भिकार, सरकारी नोकरवर्ग बेफिकीर, पुढारी चारित्र्यहीन. देश स्वतंत्र झाला म्हणून जीवनात काही आनंद आला किंवा वृत्तींत अभिमान दिसला असे वाटण्याजोगे लिखाण वृत्तपत्रांमध्ये क्वचित् दिसले.

—पण जे क्वचित् दिसले ते मात्र आशादायक वाटले. देशीय व परदेशीय अर्थकारण व राजकारण याचा अभ्यास करणारे, स्वबांधवांबद्दल अमाप सहानुभूती, दलितांबद्दल उदार, करुणा व अन्यायाबद्दल, आळसाबद्दल, बेफिकिरीबद्दल तीव्र संताप व्यक्त करणारे लिखाणही आढळले व त्यामुळे वृत्तपत्रे वाचताना येणारे औदासिन्य दूर होऊन आशा वाटू लागली.

अर्थात् अशा तऱ्हेचे लिखाण बहुतांशी ज्यांनी स्वातंत्र्ययुद्धात थोडाबहुत भाग घेतला आहे व ज्यांची शरीरे व मने अद्याप तरुण व संवेदनाक्षम राहिली आहेत अशा लेखकांनीच केलेले आहे आणि त्यामध्ये मी माझे मित्र श्री. अनंतराव पाटील यांची गणना करतो.

प्रकाशक :

**सु. दे. जोशी व म. द. लोखंडे**

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,

सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ९.

प्रथमावृत्ती

प्रकाशन : ३० ऑगस्ट १९६५

(गणेशचतुर्थी)

© प्रकाशकाधीन

किंमत पाच रुपये

मुद्रक :

**प्र. भा. काळे**

प्रतिभा मुद्रणालय,

२०११ सदाशिव पेठ, टिळक रस्ता,

पुणे ९.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्र
अनुक्रम ........................ दि.
क्रमांक ........................

REFBK-0015043

# प्रस्तावना

★

भारताबाहेर पंधरावर वर्षे घालविल्यानंतर मी पुण्यास स्थायिक झाल्यावर मराठी वृत्तपत्रांवर आधाशासारखा तुटून पडलो. काही वृत्तपत्रांचे संपादक स्नेही होते, कांही परिचित होते, कांही मी भारत सोडतांना लहान होते, ते 'मोठे' झाले होते. बहुतेकांच्या लिखाणामध्ये बऱ्याच्च अंशी पूर्वीचेच सूर वहात आहेत असे दिसून आले. वृत्तपत्रांतील विषयांमध्येही फारसा फरक दिसला नाही, संपादकीय विषय त्याच धर्तीवर, सरकारविरुद्ध. पत्रव्यवहारातही त्याच त्याच तक्रारी. रस्ते खराब, दवाखाने भिकार, सरकारी नोकरवर्ग बेफिकीर, पुढारी चारित्र्यहीन. देश स्वतंत्र झाला म्हणून जीवनात काही आनंद आला किंवा वृत्तींत अभिमान दिसला असे वाटण्याजोगे लिखाण वृत्तपत्रांमध्ये क्वचित् दिसले.

—पण जे क्वचित् दिसले ते मात्र आशादायक वाटले. देशीय व परदेशीय अर्थकारण व राजकारण याचा अभ्यास करणारे, स्वबांधवांबद्दल अमाप सहानुभूती, दलितांबद्दल उदार, करुणा व अन्यायाबद्दल, आळसाबद्दल, बेफिकिरीबद्दल तीव्र संताप व्यक्त करणारे लिखाणही आढळले व त्यामुळे वृत्तपत्रे वाचतांना येणारे औदासिन्य दूर होऊन आशा वाटू लागली.

अर्थात् अशा तऱ्हेचे लिखाण बहुतांशी ज्यांनी स्वातंत्र्ययुद्धात थोडाबहुत भाग घेतला आहे व ज्यांची शरीरे व मने अद्याप तरुण व संवेदनाक्षम राहिली आहेत अशा लेखकांनीच केलेले आहे आणि त्यामध्ये मी माझे मित्र श्री. अनंतराव पाटील यांची गणना करतो.

विशाल सह्याद्रीतील " याला जीवन ऐसे नाव " हे सदर मी प्रथम वाचले तेव्हा माझी समजूत झाली की हा लेखक तीस-बत्तिशीच्या पुढे गेलेला नसावा. कारण दर आठवड्याला त्यात व्यक्त होणारे मन हे भावनाशील, संवेदनाक्षम अशा तरुणाचे मन आहे. अनंतरावांची प्रत्यक्ष भेट झाल्यावरही माझी तीच समजूत बरेच दिवस कायम होती, आणि जळगावच्या पत्रपरिषदेत त्यांच्या नावाचा विचार पुढील वर्षीच्या अध्यक्षपदाकरिता आम्ही करू लागलो तेव्हा मी सहज म्हटले की गृहस्थ थोडे तरुण आहेत. जेव्हा मला सांगण्यात आले की त्यांची चाळिशी उलटलेली आहे तेव्हा माझा त्यावर काहीकाळ विश्वासच बसला नाही.

" याला जीवन ऐसे नाव " यातील लेख मी जसजसे वाचू लागलो तसतसे ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध व्हावेत असे मला अधिकाधिक वाटू लागले. प्रचलित परिस्थितीबद्दल साप्ताहिक विवरण केवळ राजकीय दृष्ट्या करणारे पुष्कळ वृत्तपत्रीय लेख आढळतात. परंतु राष्ट्रीय जीवनातील निरनिराळ्या अंगप्रत्यंगांवर, घरगुती प्रसंगांवर, परिस्थितीवर, सुसंस्कृत, विचारी व संवेदनाक्षम मनातील तरंग तितकेसे आपल्या वृत्तपत्रात नियमित प्रसिद्ध होत नाहीत. पाश्चात्य वृत्तपत्रांतून असे लेख बरेच येतात आणि कित्येक लेखकांनी आपला एक स्वतंत्र वाचकवर्गच निर्माण केला आहे. अनंतरावांनाही असा एक विचारवंत वाचकवर्ग कायमचा मिळाला असेल यात मला शंका नाही.

अशा लेखांमध्ये जो प्रमुख गुण हवा तो म्हणजे निर्भीडता. आपल्या प्रामाणिक विचारांना पत वा पैसा यांच्या दडपणाने मुरड पडू न देणे हे मोठे धैर्याचे काम आहे आणि मला अनंतरावांच्या लेखांत सर्वांत मोठा गुण जर कोणता आढळला असेल तर तो हाच होय. ज्या निर्भीडपणे ते पुण्याच्या पश्चिम भागातील 'सुखी व बेछूट' जीवनावर तुटून पडतात, तितक्याच परखडतेने ते आपल्या पक्षातील 'संपत्तिपिपासू' पुढाऱ्यांवर अधिकाराचा दुरुपयोग करून स्वतःची तुंबडी भरल्याबद्दल हल्ला चढवतात.

स्वातंत्र्य-युद्धातील तुरुंगवास, त्या लढ्यामुळे आलेले अनेक अनुभव, झालेल्या ओळखी व सहवास यांचा हृद्य ठसा ह्या लेखात आढळतो. त्याचप्रमाणे बालवयात परंतु देशसेवेच्या स्फूर्तीने झालेल्या तुरुंगवासातील रम्य आठवणीही वाचावयास मिळतात. एका मोठ्या डब्यातून किंवा फुलातून एकामागून एक डबे वा फुले निघावीत असा एक जपानी खेळ आहे, त्याप्रमाणे एका प्रसंगातून अनेक स्मृतींची गुंफण अनंतराव करतात. पण ती गुंफण हेतुशून्य किंवा केवळ लहर म्हणून नाही. तर त्या प्रत्येकात काही तत्त्व-बोध आहे. मग ते विचार

मुंबईतील ट्रॅम्स नष्ट झाल्याने स्फुरलेले असोत की पांडू खाडेला 'भाग्यश्री'ने दिलेल्या दग्यामुळे सुचलेले असोत. अशा तऱ्हेच्या लिखाणासाठी आवश्यक ते विविध अनुभव, समाजातील निरनिराळ्या थरांशी परिचय, चिंतनाची बैठक या लेखकाला आहे याबद्दल हे पुस्तक वाचून शंका राहणार नाही.

अनंतरावांच्या चिंतनास निमित्तमात्र होण्यास कोणताही विषय चालतो. शिवाजीनगर स्टेशनवर पांढरपेशा प्रवाशांची गैरसोय करणारा व रेल्वे अधिकारी समजून लाच देऊ करणारा भय्या, येरवड्याच्या तुरुंगातील दरोडेखोर कल्ल्या किंवा ससूनमधील ॲंग्लोइंडियन नर्सेस वा सहप्रवासी डॉ. वसू सर्वांपासून लेखक काहीतरी शिकतो आहे. 'ज्ञान आणि नीति' यांची किंमत अनंतरावांच्या मते जगात भराभर उतरत असून उथळपणा व नाचरेपणा यांचा भाव वधारला आहे. परंतु त्यांच्या जीवनात मात्र योग्य त्या गुणासच भाव आहे हे या पुस्तकात स्पष्ट दिसते.

परदेशपर्यटन व स्वदेशयात्रा यांनी बहुश्रुतता पावलेले दयार्द्र मन पुन्हा पुन्हा आपल्यातील 'नाही रे' च्या परिस्थितीची सारखी आठवण ठेवते. आपल्या घरचा खर्च पाहून 'धुणे-भांडी करणारी मोलकरीण, वाडा झाडून स्वच्छ करायला येणारी महारीण, रद्दीसाठी दारोदार हिंडणारा रद्दीवाला, भीक मागायला येणारा वासुदेव, कचेरीत टाईप जुळविणारा कंपॉझिटर, घंटीबरोबर आतबाहेर करणारा ऑफिसचा शिपाई, सकाळी वृत्तपत्र विकणारा माणूस' यांचे त्यांच्या प्राप्तीत कसे भागत असेल हा विचार लेखकाला चैन पडू देत नाही.

एका दैनिकाचे संपादन म्हणजे "काम दे नाहीतर खातो" म्हणणाऱ्या राक्षसाची गोष्ट. त्यास काम पुरविण्याच्या आटापिट्यात संपादकास वाचनास, चिंतनास, प्रवासास वेळ मिळणे कठीण. अशा परिस्थितीत भोवतालचे जीवन हाच एक ग्रंथ समजून प्रत्येक अनुभवाचे पान काळजीपूर्वक अभ्यासणे हाही एक स्वतःचे ज्ञान व मन सतत ताजे ठेवण्याचा मार्ग आहे. पण त्याकरता मन जिवंत हवे. तसे मन अनंतरावांजवळ आहे, याची साक्ष या पुस्तकातील पानापानावर मिळते. उच्चभ्रू शिष्टांबद्दल घृणा व दलितांबद्दल स्नेहाळ अनुकंपा हे ते संपादित असलेल्या 'विशाल–सह्याद्री'चे प्रमुख गुण याही लेखसंग्रहात वाचकांच्या प्रत्ययास येतील.

निरनिराळ्या प्रसंगांनी उद्भवलेले सर्वच विचारतरंग कायम स्वरूपात ग्रथित करण्यायोग्य नसतात, त्यातूनही वृत्तपत्रातील प्रासंगिक लिखाण बहुतांश अल्पजीवी असते. तथापि काही निवडक लेख त्या त्या वेळच्या समाजजीवनाचा

इतिहास व त्यावरील प्रतिक्रियेचा आरसा म्हणून अभ्यासकास उपयुक्त ठरतात. हे पुस्तक त्या दृष्टीनेही स्वागतार्ह आहे.

हा लेखसंग्रह वाचून दुसराही एक मनात विचार येतो. काँग्रेस पक्षावर आतापर्यंत नानातऱ्हेचे आरोप झालेले आहेत. परंतु पक्षातीलच एकाने त्यातील गुणदोषांची केलेली चर्चा वाचून मला एक प्रकारचे समाधान वाटले. समाधान एवढ्याकरता की, असे परखड मत व्यक्त करणारी व्यक्ती पक्षाच्या मुखपत्राच्या संपादकीय खुर्चीवर सन्मानाने टिकू शकते याचा अर्थ त्या पक्षाची लोकशाहीवरील निष्ठा अद्याप भक्कम आहे असा मी करतो. हे एक आरोग्याचे लक्षण आहे. काँग्रेसने केलेल्या चुका, स्वतःचीच वंचना होईल असे प्रयोग, प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनेने उभी केलेली मुंबईच्या सचिवालयासारखी धुडे, मंत्र्यांच्या पुढे लांगूलचालन करणारे लाचार लोक व ती करून घेणारे मंत्री, कारभारातील दिरंगाई व भोंगळपणा यांवर निर्भय प्रहार करण्यास अनंतराव चुकले नाहीत. ज्ञान व वय याबद्दल योग्य आदर ठेवून होणारी अशी टीका जोपर्यंत पक्षश्रेष्ठी सहन करतात व ती करणाऱ्याचा आदर राखतात, तोपर्यंत त्या पक्षाच्या हातातील आपल्या लोकशाहीच्या भवितव्याबद्दल चिंता वाटण्याचे कारण नाही.

३०-८-६५ मो. ज्ञा. शहाणे

# दोन शब्द !

★

'वार्ताविहार' आणि 'माझा अमेरिकेचा प्रवास' ही माझी दोन पुस्तके ज्या ज्या मित्रांनी आणि हितचिंतकांनी वाचली, त्यांनी मला सुचविले की, "आठवड्यातून एकदा तरी–शक्यतो रविवारी–थोडे वेगळे आणि आगळे काही तरी लिहित चला." या सूचनेमागील हेतू हा की, 'दिसामाजी काही तरी लिहावे' या धर्तीवर मी आठवड्यामाजी काही तरी लिहावे आणि ते माझ्या मित्रांना–चाहत्यांना वाचायला मिळावे. त्यांचा हेतू स्तुत्य व इच्छा चांगली. पण ती फलद्रूप होणार कशी? कारण दैनिक वृत्तपत्राच्या रोजच्या खटाटोपातून ललित लेखनाला वेळ मी कसा काढू शकणार! कचेरीत आठ-दहा तास खुर्चीवर ताठ बसून राहिल्यावर आणि कंटाळा–थकवा येईपर्यंत वाचून–लिहून झाल्यावर घरी पुन्हा मांडी कशी घालता येणार? म्हणून मी काही दिवस यशस्वीपणे टाळाटाळ केली. पण 'भाग्यश्री'ने पांडूला जसा दगा दिला, तसा मलाही दिला. 'डेक्कनक्वीन' आणि 'जनता एक्सप्रेस' यांनीही मला फसविले. 'भोसरीच्या भोळ्या भावाने' मी भारून गेलो आणि 'ज्ञानदेवे डोळा' पाहून माझी दृष्टी विशाल झाली. 'चर्चगेटचा चौफेर चमत्कार' पाहून मी हतबुद्ध झालो आणि कळत न कळत ललित लेखनाच्या चक्रात गुरफटलो गेलो.

डेक्कनक्वीनने प्रवास करताना लोणावळ्याचे डॉ. देसाई न चुकता भेटतात. दोन शब्द बोलल्याखेरीज डॉक्टर कधी पुढे जात नाहीत. डॉ. देसाईंच्या कंपार्टमेंटमध्ये बसलो असता एकदा सहज डॉक्टरांना विचारले, "डॉक्टर, कसं काय चाललं आहे?" त्यावर डॉक्टरांनी जे काही सुनावलं त्यातून झालेल्या साक्षात्काराने मी रविवारची साप्ताहिक लेखणी हाती धरली व वर्षभर अखंडपणे चालविली. डॉक्टरांच्या बोलण्यातूनच "याला जीवन ऐसे नाव" हे शीर्षक मला सुचले आणि या सदराने एक स्वतंत्र असा वाचकवर्ग निर्माण केला. मी एखाद्या आठवड्यात पुण्यात नसलो आणि रविवारच्या विशाल सह्याद्रीत 'याला जीवन ऐसे नाव' सदर प्रसिद्ध झाले नाही तर कित्येक वाचकांची पृच्छा करणारी पत्रे येत. सोमवारी भेटणारे किती तरी वाचक मला पुढची विसार-पावती देण्यास चुकत नसत. पुण्यातील महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्यापासून तो मुंबईच्या सचिवालयात प्रसिद्धी संचालनालयातील कारकुनापर्यंत आणि जळगावच्या जिल्हा पत्राच्या संपादकापासून तो पणजीच्या पत्रपंडितापर्यंत सारेजण सांगत की, "अनंतराव, तुमचे लेख फारच छान असतात. तुम्ही

तुमचा एक वाचकवर्ग निर्माण केला आहे. हे लिखाण तात्पुरते न रहाता, पुढच्या पिढीला वाचायला मिळावे म्हणून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून घ्या. तुमची शैली चांगली आहे, तुमची भाषा मनाला भिडणारी आहे. गंभीर विषय, गंभीर प्रश्न तुम्ही सहजतेने मांडता, समाजातील, राजकारणातील, सत्तेतील दोषांवर प्रहार करून त्यांची झोपमोड करता हे एक उपयुक्त कार्य आहे. वृत्तपत्रातील तुमचे हे लिखाण प्रासंगिक असले तरी ते अभ्यासकास उपयुक्त ठरल्याशिवाय रहाणार नाही.''

पुस्तकाचा आग्रह धरणाऱ्यात शाहू कॉलेजचे प्राचार्य माणिकराव मंगूडकर, पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रीय शिक्षणक्रमाचे संचालक श्री. मो. ज्ञा. शहाणे, ॲड. शंकरराव खरात हे आघाडीवर होते. माझे मित्र श्री. दिनकरराव लोखंडे यांना जेव्हा हे समजले तेव्हा त्यांनी 'विशाल सह्याद्री'तील कात्रणे गोळा करून त्यांची व्यवस्थित आखणी व मांडणी करून चिरंजीव ग्रंथ प्रकाशनातर्फे पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय मला कळविला. नकार दर्शविण्याची सोयच नव्हती. प्रुफे वाचायला येऊ लागली आणि मी वाचून दिली. आंतील मजकुराची छपाई संपल्यावर मग श्री. सालकरांकडून कव्हर तयार करवून घेतले आणि नंतर श्री. मोहनराव शहाणे यांना प्रस्तावनेची विनंती केली. त्यांनी वेळात वेळ काढून मोठ्या अगत्याने आणि आनंदाने ती लिहून दिली. शेवटी बाकी राहिली लेखकाच्या निवेदनाची. काय निवेदन देणार ! हा ग्रंथ कांही विषय अगोदर ठरवून, मांडी ठोकून किंवा मुद्दाम परगावी एकांतात जाऊन लिहिलेला नाही. मोहनरावांनी म्हटल्याप्रमाणे सभोवताली डोळे उघडे ठेवून, कान तीक्ष्ण ठेवून जे जे पाहिले, आणि ऐकले ते मनात टिपून ठेवले आणि वेळ येताच कागदावर लिहून काढले. प्रवास–कार्यक्रम–समारंभ या साऱ्यांचे दर्शन, प्रतिबिंब या लेखातून उमटले आहे. निवांत वेळ मिळायची मारामार म्हणून शुक्रवारी रात्री दोन–तीन तास जागून लेख लिहून कंपोजला दिले आहेत. तथापि ते हृद्य झालेले आहेत. मला जे काय दिसले व वाटले, माझी प्रतिक्रिया झाली ती मोकळेपणाने लेखणीतून उतरविलेली आहे. म्हणूनच लिखाणाला सहजता आणि विशिष्ट शैली प्राप्त झाल्याचे म्हटले जाते, असा माझा कयास आहे. सर्वांच्या प्रेमाने–प्रोत्साहनानेच मी १९६३, १९६४ व १९६५ अशा तीन वर्षी तीन पुस्तके प्रसिद्ध करू शकलो आहे. सारे मित्र असाच लोभ पुढेही ठेवतील तर मराठी साहित्याची आणखी काही सेवा हातून घडेल अशी उमेद वाटते.

गणेशचतुर्थी
ता. ३०/८/१९६५

अनंतराव पाटील

जिने आईपेक्षा अधिक माया केली

ती माझी दिवंगत आत्या

ती. स्व. बाई

हिचे चरणी सादर अर्पण.

अनंतराव पाटील यांची

इतर पुस्तके.

*

1. गौतम बुद्ध
2. माझा अमेरिकेचा प्रवास
3. वार्ताविहार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम............ वि: ............
............
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९५०८३

— १ —

# १५ ऑगस्टचे ५ तास :१:

१५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन उजाडला होता. स्वतंत्र देशाच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस—सोन्याचा दिवस. म्हणून सकाळी लवकर उठून मी तळ्यातल्या गणपतीच्या दर्शनाला गेलो आणि परत आल्यावर झेंडावंदनाच्या कार्यक्रमासाठी बाहेर पडलो. साडेसात वाजले असतील त्या वेळी. पण आमच्या टिळकरोडला आणि सदाशिव पेठेतल्या पेरूगेट आदी भागाला १५ ऑगस्टचे काहीच सोयरसुतक नसल्याचे पाहावयास मिळाले. लोकांचे नित्याचे व्यवहार शांतपणे आळसात चालू होते आणि त्यांच्या चेहऱ्यावर ती नेहमीची उदासवाणी छटा दिसत होती. मी मनात म्हटले, कसले हे लोक आणि कसली ही त्यांची जीवनाकडे बघण्याची सुतकी वृत्ती! ना कोणाच्या घरावर राष्ट्रध्वज लावलेला, ना कोणाच्या घरापुढे सडासंमार्जन करून रांगोळ्या काढलेल्या, ना कोठे आनंदी वातावरण, ना कोठे गडबड, धावपळ. सारे कसे उदास आणि भकास. जणू काही कर्ती माणसे कोठे देशोधडीला गेलेली. पर्वतीच्या बाजूने परतताना पेन्शनरांचा रोज सकाळी भेटणारा तांडा आणि त्यातील एकेकाचे वक्तव्य पाहिल्यावर कशी बरे ही माणसे जगत असतील याचे कोडे वाटते. या मंडळींना कशातच चांगले दिसत नाही, आणि कशातच स्वारस्य वाटत नाही. सरकार गाढव आणि आपण शहाणे, सरकारातील लोक निर्बुद्ध आणि आपण बृहस्पती अशीच यांची धारणा असलेली. उपहास, निंदा याखेरीज यांच्याजवळ दुसरे भांडवल शिल्लक नाही. गावाच्या उचापत्या आणि शेजाऱ्यांच्या कुटाळक्या

यांतच यांचे उर्वरित आयुष्य जाणार. यांना संकटादिन सारखा आणि स्वातंत्र्य-दिनही सारखा. बारसे आणि बारावे सारखेच मानणाऱ्यात यांची प्रामुख्याने गणना. विचाराने जग कुठे चालले आहे आणि ही मंडळी विचाराने कोठे राहिली आहेत हे पाहिले की कीव वाटू लागते.

देशाला स्वातंत्र्य मिळून अवघी १७ वर्षे झाली आणि या १७ वर्षांत या पुणेकर मंडळींना स्वातंत्र्याचे मोल वाटेनासे झाले. "साहेबच बरा होता" असे म्हणण्यापर्यंत कित्येकांची मजल गेली आहे. साहेबाची ती नोकरी, ती पेन्शन यांत त्यांना अजूनही रस वाटत आहे. कारण ऑफिसात आणि नोकरीत यांचा वरचष्मा. पारतंत्र्यात श्रेष्ठ-कनिष्ठ भावनांची जोपासना होत असल्याने यांच्या शेजारी कोणाला बसण्याची भीती वाटत असे. बौद्धिक वरचष्म्याबरोबर अधिकाराचाही वरचष्मा राही. पण आता सारेच सारखे. हरिजन ऑफिसरच्या हाताखाली काम करण्याची कल्पना या मंडळींना कशी सहन होणार! पुणेरी सारेच निराळे. ती पगडी लोप पावत चालली असली तरी पगडीखालचे डोके काही बदलण्याचे फारसे चिन्ह दिसत नाही. पुण्याचे सामाजिक–राजकीय–शैक्षणिक पुढारपण दुसरीकडे गेले तरी तो पीळ कायम आहेच. पुण्यात विद्वान् जन्माला आले, राजकारणी चमकले, देशाने त्यांना मानले पण सारे पुणे काही त्यांच्या मागे नाही गेले. कारण येथे विद्वानांचे पीक निघत असे आणि त्या पिकाला चांगला भाव मिळणे कठीण झाले, की त्या पिकाचा त्रास तणासारखा सुरू व्हायचा. पुण्याचा भौगोलिक विस्तार वाढला पण मनाचा आकुंचितपणा नाहीसा नाही झाला. स्वतंत्र देश, शहाणा समाज व सार्वभौम स्वातंत्र्य या कल्पनांत पुणे अजूनही रममाण नाही होऊ शकले. अमूक एक पक्ष अधिकारारूढ आहे म्हणून, त्याने खंडित स्वातंत्र्य मिळविले म्हणून या मंडळींच्या मनातील राग-द्वेषाची जळमटे अजूनही कुठेतरी एका कप्प्यात चिकटून बसली आहेत आणि म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा निर्भेळ आनंद ते नाही उपभोगू शकत.

अमेरिकेत स्वातंत्र्यदिन कसा साजरा केला जातो याच्याशी आपल्याकडील तुलना केली, की आम्ही किती नतद्रष्ट आहोत याची कल्पना येऊ शकते. ४ जुलैला सारी अमेरिका हसते–नाचते–बागडते. स्वातंत्र्यदिनाचा तो दिवस आनंदात–मजेत घालवते. देशाच्या स्वातंत्र्याला बळकटी आणण्याची प्रतिज्ञा करताना, देशाला मोठा करताना स्वतःही मोठे होण्याची ईर्ष्या मनात बाळगली जाते. घरोघर आनंद; रस्त्यावर आनंद; रेल्वे, बोटी, विमाने, मोटारीत आनंदच आनंद; विहार आणि आहारातही आनंदच आनंद. या आनंदात पक्ष नाही की पक्षीय राजकारण नाही. नित्याचे प्रश्न नाहीत, की अडीअडचणींचा

अडसर नाही. मित्र–नातेवाईकांसमवेत सणासारखा दिवस मजेत घालवायचा हीच कल्पना आणि तिची अंमलबजावणी. तलाव, डोंगर, नदी–नाले, हिरवीगार मैदाने लोकांनी नुसती फुलून गेलेली दिसतील. शहरेच्या शहरे सुट्टी मजेत घालविण्यासाठी बाहेर पडलेली दिसतील. वॉशिंग्टन राजधानीत ४ जुलै १९६२ मध्ये मी पाहिलेले दृश्य अजूनही डोळ्यांपुढे उभे राहते आणि मग आमच्या पुणेरी वृत्तीचा उबग वाटू लागतो. येथे घरोघर झेंडा नाही आणि वंदनही नाही आणि मग घरात आनंद कोठून वास करणार? सुट्टी मिळून ऑफिस टळेल एवढेच मनात समाधान. त्यापलीकडे कसलाही व्यापक विचार नाही आणि आल्हाददायी आचार नाही.

कौन्सिलहॉलवरील झेंडावंदनावरून मी परतत असता स्टेशनवरून सुटलेली नं. ३ ची बस इन्कमटॅक्स ऑफिसजवळ मी कशीबशी गाठली व आत स्थानापन्न झालो. माझ्याबरोबर दोन मुलीही बसमध्ये शिरल्या. त्या बहुतेक टेलिफोन एक्स्चेंजमध्ये नोकरीला असाव्यात असे त्यांच्या बोलण्यावरून समजले. दोघी बहुधा रात्रपाळी करून परत चाललेल्या असाव्यात. कारण त्या सरकारचे अन्न खाऊन सरकारच्या आणि सरकारी नोकरीच्या नावाने ओरडत होत्या. "अगं, आपल्याला कसला आला आहे १५ ऑगस्ट! येथून पुढे घरी जाऊन सकाळची कामे केव्हा आटपायची आणि मग स्वातंत्र्यदिन समारंभात कसा भाग घ्यायचा. सुट्टीच्या आदल्या दिवशी नेमकी रात्रपाळी आली, की सुट्टी फुकट जाते." एक दुसरीला म्हणत होती आणि दुसरी होकार देत होती. तेवढ्यात बस मंगळवार गाडीतळाजवळ आली. या स्टॉपवर दोन-तीन स्त्रिया बसमध्ये चढल्या. त्यांना शिवाजीनगरस्टेशनजवळ उतरायचे होते. बस भरलेली होती. त्या दोन मुलींजवळ मात्र तिसरी जागा होती. पण आत शिरलेल्या बाया गरीब, अशिक्षित, फाटकी लुगडी नेसलेल्या असल्यामुळे त्यांच्यापैकी एकीला आपल्याजवळ बसवून घेण्याची त्या दोन मुलींना लाज वाटत होती. त्या बायाही बिचाऱ्या मुकाट्याने उभ्या राहून प्रवास करू लागल्या. कंडक्टरही त्या नोकरी करणाऱ्या फॅशनेबल मुलींकडे पाहून गप्प बसला. एरव्ही त्याने दुसरे कोणी असते तर त्या मुलींना सरकायला सांगून त्या गरीब बाईला जागा करून दिली असती. पण त्या मुलींची त्याची नेहमीची भेट आणि त्यांचा तो नेहमीचा हसरा कटाक्ष यांमुळे तो गप्पच उभा राहिला. शेवटी त्या बायांपैकी एका म्हातारीला जागा करून देऊन मी उभा राहिलो. त्या मुलींनी माझ्याकडे पाहिले आणि "काय हा वेडा माणूस" असे मनात म्हणत एकमेकींकडे पाहून त्या गालात हसू लागल्या. त्या हसण्यातील गर्भितार्थ एवढाच होता की, "जागा

करून द्यायची तर एखाद्या चांगल्या उतारूला. पण हा खादीवाला अगदीच गांवढळ. त्याने फाटक्या म्हातारीला जागा देऊन स्वतः उभा राहिला आहे."

बसमध्ये बसणाऱ्या प्रवाशांकडे पहाण्याची आणि त्यांना वागविण्याची काही उतारूंची आणि कंडक्टरची वृत्ती पाहिली, की वाईट वाटते. "ओ पाव्हणे, बसून घ्या" असे म्हणणारा उद्धट कंडक्टर आणि खेड्यातील स्त्री-पुरुषांना अगदी अस्पृश्यासारखे वागविणारे सुशिक्षित तरुण-तरुणी पाहिल्या, की हेच का आमच्या शिक्षणाचे संस्कार असे वाटू लागते. एखादी बरी दिसणारी मुलगी बसमध्ये चढली आणि तिला गर्दीमुळे बसायला जागा नाही मिळाली म्हणजे स्वतः चटकन् उभे राहून तिला जागा करून देणारे तरुण जेव्हा खेड्यातील एखाद्या वृद्ध स्त्री किंवा पुरुष उतारूच्या जवळ बसायला किंवा उभे रहायलाही नाखूष होतात तेव्हा आम्ही कोणत्या शतकाच्या, कोणत्या दशकात आहोत याची चिंता वाटू लागते. अजूनही उच्च–नीचतेच्या कल्पनांचा पगडा कायम ठेवून दैनंदिन जीवनात त्याचे जाहीर प्रदर्शन केले जाते याबद्दल खेद वाटतो.

संभाजीपार्कजवळ बस थांबली. काही उतारू उतरले आणि काही नवे उतारू चढले. त्यात काही मुले-मुली होती. सदाशिव पेठ–जिमखाना भागात राहणारी ही मुले–मुली जणू काय आपण अजून न्यूयॉर्कमध्येच आहोत अशा थाटात बोलत–वागत होती. अमेरिकेत एक वर्षभर राहून आल्यानंतर त्यांना पुणे, महाराष्ट्र आणि भारत भिकार वाटू लागला होता. कारण येथे 'गर्ल' किंवा 'बॉय' फ्रेंडची आणि 'डेटिंग'ची सोय नव्हती. १७-१८ वर्षे वयाची ही मुले जे बोलत होती, ते बोलणे त्यांच्यावर पाश्चात्य शिक्षणाचा चांगला संस्कार झाल्याचे लक्षण दाखवीत नव्हते. या मुला-मुलींना १५ ऑगस्टानिमित्त कोणीतरी चहाला बोलाविले होते आणि हा चहापाण्याचा कार्यक्रम संपवून ती परत चालली होती. यजमानांच्या आदरातिथ्याबद्दल चांगले उद्गार काढण्याऐवजी त्यांच्या घरातील कमतरतेची, वैगुण्याची चर्चा ते जाहीरपणे बसमध्ये करीत होते. वडील-माणसाबद्दल आदर-श्रद्धा भावनेचा या शिक्षित तरुण मंडळींत पूर्ण अभाव दिसत होता. त्यांचे कपडे व भाषा ते अजूनही अमेरिकेतच वावरत असल्याचे दर्शवीत होते. मला त्यांची कीव वाटली. परदेशातून येथे येणारी मुले इकडच्या-सारखे राहाण्याचा–वागण्याचा प्रयत्न कसा करतात, आपले स्वरूप-सवयी तात्पुरत्या बदलण्याची कोशीस कशी करतात हे पाहिल्यावर 'अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या' आमच्या विद्यार्थ्यांबद्दल कीव वाटू लागते. सोळा वर्षे मराठी बोलणारी मुलगी एक वर्ष अमेरिकेत राहिल्याबरोबर आपण मराठी

विसरलो, आपल्याला मराठीत बोलायची अडचण वाटते असे जेव्हा सांगू लागते, तेव्हा त्या शिष्टपणाला काय म्हणावे याची पंचाईत पडते. मुला-मुलींचा ताफा डेक्कन जिमखान्यावर उतरला आणि मी साहित्य परिषदेजवळ उतरून नजीकच्या वसतीगृहात प्रवेश करता झालो.

टिळक रोडवरील विद्याविकास वसतीगृहाने स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता आणि त्याचे प्रमुख पाहुणे म्हणून मला बोलावले होते. वसतीगृहातील ती १० ते १७ वर्षांपर्यंतची सर्व जाती-जमातींची मुले एकत्र पाहिल्यावर किती बरे वाटले. अगदी गरिबांची-दलितांची, मागासलेल्या भटक्या जातींची ती मुले शिक्षणाची जिद्द मनात बाळगून हालअपेष्टांना तोंड देऊन एकएक यत्ता पुढे पुढे जात होती आणि मोठे व्हायचे स्वप्न साकार करीत होती. त्यांची देवावर जशी श्रद्धा तशी स्वतःच्या बुद्धीवर आणि कर्तृत्वावरही निष्ठा होती. कोण कुठला आणि कोण कुठला पण एका कुटुंबासारखे राहात आणि भेदभाव विसरून एकमेकाला मदत करीत. शिक्षण आणि ज्ञान यांच्याबरोबर शिस्त आणि वळण यांकडेही लक्ष दिले जात असल्यामुळे त्या मुलांच्यात वैशिष्ट्य दिसत होते. त्यातील एक चांभाराचा, तर दुसरा मांगाचा, तिसरा मांगगारुड्याचा, चौथा ठाकराचा आणि पाचवा ब्राह्मणाचा. मुले हुशार वाटली. चलाख भासली. त्यांनी गाणी म्हटली आणि संचालकांनी व व्यवस्थापकांनी माहिती निवेदन केली. ते सारे ऐकल्यावर समाज कसा झपाट्याने बदलत आहे आणि मागे पडलेले, पायदळी तुडविलेले, अज्ञानात आणि दारिद्र्यात पिचलेले पुढे पुढे जाण्यासाठी कसे धडपडत आहेत हे पाहून मनाला समाधान वाटले. शिक्षणासारखे पवित्र कार्य दुसरे नाही. त्याचबरोबर वसतीगृह चालविण्याचे पुण्य कमी नाही. एका सबंध पिढीचा दुवा म्हणजे काय साधी गोष्ट? या मुलांना स्वातंत्र्याची आणि स्वातंत्र्यदिनाची केवढी आस्था आणि ओढ. या मुलांकडे पाहिल्यावर त्या बसमधील मुला-मुलींची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. मुलांना शाबासकी देत व चालकांना धन्यवाद देत मी वसतीगृहातून बाहेर पडलो.

सकाळचे ११॥ वाजले होते. जेवायला जायला तासभर अवकाश होता म्हणून मी बऱ्याच दिवसांनी सहज क्लबांत डोकावले तो तेथील सारी टेबले भरलेली. सुट्टी असल्यामुळे सकाळपासूनच मेंबर्स ठाण मांडून बसले होते. त्यांत वृद्ध होते, तरुण होते, पेन्शनर होते, नोकरदार होते, डॉक्टर होते, वकील होते, व्यापारी होते. १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन या मंडळींच्या गावीही नव्हता. सुट्टी मिळाल्याचा आनंद ते पत्ते खेळण्यात उपभोगीत होते. पत्त्यांचा खेळ चालू असतानाच रेसच्या घोड्यांची चर्चा आणि पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींच्या

लालकिल्ल्यावरील भाषणावरील टीका चालूच होती. ज्यांनी कधी राजकारणात चुकून भाग घेतला नाही, की त्याग केला नाही ते 'खायला मिळायची पंचाईत आणि स्वातंत्र्यदिन साजरा करताहेत' असे उपहासाने बोलत होते आणि त्याच वेळी 'मसाला धावन' वर ताव मारीत होते. "काय करावे, साखर पुरेशी नाही, गहू महाग झालाय" असे सांगता सांगता नाटकाची ७ रु. दराची ५ तिकिटे काढल्याचे एकजण ऐटीत सांगत होता. दुसरा 'प्रेसिडेंट' घोड्यावर ५०० रुपये लावण्याची भाषा बोलत होता, तर तिसरा ॲम्बॅसडर गाडीची चौथी ऑर्डर नोंदविल्याचे सांगत होता. हे सुखी आणि बेछूट जीवन जगणाऱ्यांनीच अन्नधान्याबाबत किंवा पाण्याबाबत किंवा मद्याबाबत तक्रार करावी याचे आश्चर्य वाटले. एक कप चहा पिऊन आणि चार डाव प्रेक्षक बनून मी जिमखान्यावरून बाहेर पडलो आणि घराचा रस्ता पायी धरला. पर्वती आणि पेन्शनर, बस आणि त्या मुली, वसतिगृह आणि ती मुले व क्लब आणि ते मेंबर्स या साऱ्यांचे अवघ्या पांच तासातील (६॥ ते ११॥) चित्र एकामागून एक डोळ्यांपुढे उभे राहिल्यावर सहज तोंडातून उद्‌गार बाहेर पडले, "याला जीवन ऐसे नाव!"—

● ● ●

## जरा याद करो क़ुर्बानी

: २ :

चीनच्या आक्रमणाला दोन वर्षे लोटून गेली होती. या अचानक आक्रमणाने देशाला धक्का दिला आणि नेत्यांबरोबर सर्वसामान्य जनताही विचारात पडली. देशाच्या संरक्षणाला आपोआप प्राधान्य मिळाले. महाराष्ट्राचा 'सह्याद्री' हिमालयाच्या रक्षणार्थ धावून जाताच महाराष्ट्रात एक नवे वातावरण तयार झाले. सैन्यभरतीबरोबरच संरक्षणात्मक प्रचार निरनिराळ्या साधनांमार्फत धुमधडाक्याने सुरू झाला. कवी, लेखक, पत्रकार यांच्या लेखण्या सरसावल्या जाऊन राष्ट्रभक्तीपर लेख, कविता, गीते तयार होऊ लागली आणि रेडिओवरून त्यांचा प्रसार होऊ लागला. 'समरगीता' ला रोजच्या कार्यक्रमात स्थान लाभले. बरीच गीते लिहिली गेली आणि गायली गेली. पण एक गीत असे अमर राहिले की, अजूनही ते रेडियोवर लागले की क्षणभर डोळ्यात अश्रू तरळतात आणि बाहू स्फुरण पावून मराठ्यांचे क्षात्रतेज अंगात संचारू लागते.

गीत सुरू झाल्यापासून संपेपर्यंत मनुष्य जागेवर खिळून राहातो, कानात सारे बळ एकवटून प्रत्येकजण ऐकतो आणि गीत संपल्यावर म्हणतो, " धन्य तो गीतकार आणि धन्य ती गायिका ! दोघांनी मिळून गीत अमर केले आणि आमच्या जवानांच्या बलिदानाची स्मृती पण अमर केली. "

या राष्ट्रभक्तीपर गाण्याच्या पहिल्या ओळीतील पहिलाच शब्द कानावर पडला की दिल्लीतील तो प्रसंग आठवल्याशिवाय रहात नाही. भाई म्हणून मानलेल्या आणि संपूर्ण विश्वास टाकलेल्या चीनने भारतावर स्वारी केल्यावर सर्वांत अधिक कष्टी कोण झाले असतील तर स्वर्गीय पंतप्रधान पंडित जवाहरलालजी. त्यांना एक मोठा धक्का बसला आणि चिंतेने त्यांचे मन व्यापून टाकले. धैर्याचा तो मेरुमणी थोडा खचला. पण त्याचे प्रतिबिंब कोठेही दिसू नये याची संपूर्ण काळजी घेत त्यांनी संरक्षणासाठी आवश्यक असे सारे प्रयत्न सुरू केले आणि रात्रंदिवस त्यात ते मग्न राहिले. अशाच एका सायंकाळी त्यांना भारतीय शूर जवानांच्या पराक्रमाची आणि बलिदानाची महती गाणारे एक गीत ऐकण्याची विनंती केली गेली आणि त्यांनी ती चटकन् मान्यही केली. गीतकार होते कवी प्रदीप आणि गायिका होती लता मंगेशकर. दोघांनाही पंडितजी ओळखणारे, त्यांचे मोल-महत्त्व जाणणारे. लताबाईंनी गाण्याचे पहिलेच चरण अशा काही सुरात म्हटले की, उपस्थितांना आपले अश्रू आवरून धरणे कठीण जाऊ लागले. " ए मेरे वतनके लोगो, जरा आँखोंमें भरलो पानी, जो शहीद हुए हैं उनकी, जरा याद करो कुर्बानी ! " गाण्याच्या ध्वनीने सभागृह भारून गेले आणि श्रोते भारावून गेले. एक एक ओळ पुढे म्हटली जाऊ लागली तसतशा डोळ्यातील अश्रूधारा वाढू लागल्या.

पंडितजींच्या डोळ्यांच्या पापण्या ओलावल्या आणि ते थेंब आवरून धरणे त्यांनाही कठीण गेले. गाणे संपले. वातावरण गंभीर झाले. पंडितजी उठले आणि लताबाईंच्या पाठीवरून हात फिरवून त्यांनी तिला शाबासकी दिली. ' याला म्हणतात गीत आणि याला म्हणतात गीतगायन ' त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले, आणि भारतावरील संकटाच्या नाशाची त्यांना खात्री वाटून डोळ्यात एक प्रकारचे तेज चमकू लागले. देशात दिवाळी साजरी होत असताना सरहद्दीवर सैनिक गोळ्यांच्या वर्षावाची ' होळी ' साजरी करीत होते. संकटात सापडलेल्या हिमालयाला वाचविण्यासाठी आपल्या रक्ताचा सडा घालीत होते. या जवानांची, या हुतात्म्यांची, त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवा असे सांगताना कवी प्रदीप यांनी प्रत्येक भारतीयाच्या हृदयाला हात घातला आहे.

जब घायल हुआ हिमालय खतरेमें पडी आझादी ।
जबतक थी सांस लडे वो फिर अपनी लाश बिछादी ।
होगए वतन पे निछावर वो वीर थे कितने गुमानी ।
जो शहीद हुए है उनकी जरा याद करो कुर्बानी ।
जब देश मे थी दिवाली वो खेल रहे थे होली ।
जब हम बैठे थे घरो मे वो झेल रहे थे गोली ।
ये धन्य जवान वो अपने थी धन्य वो उनकी जवानी ।
जो शहीद हुइ है उनकी जरा याद करो कुर्बानी ।
कोई सींख कोई जाट मराठा कोई गोरखा कोई मद्रासी ।
सरहद पर मरनेवाला हर वीर था भारतवासी ।
जो खून गिरा पर्वतपर वो खून था हिंदुस्तानी ।
जो शदीद हुए है उनकी जरा याद करो कुर्बानी ।

यापेक्षा अधिक राष्ट्रभक्तीपर स्फूर्तिप्रद दुसरे कोणते पद असू शकेल ! लताच्या गळयातून पद ऐकताना का बरे बाहू स्फुरणार नाहीत ?

एका शनिवारी हे ' गीत ' ऐकण्याची पुणे आकाशवाणीने संधी दिली आणि त्याच दिवशी संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस भवन-वरील भाषणात देशाच्या संरक्षणाच्या संदर्भात भारतीयांवरील जबाबदारीची जाणीव करून दिली. एवढा मोठा चाळीस कोटींचा देश पण त्याला अन्ना-साठी आणि अस्त्रासाठी परदेशाकडे भीक मागावी लागते. संरक्षणमंत्री देशोदेशी भिक्षेची झोळी घेऊन हिंडत आहेत याचा कितीजणांना खेद वा खंत वाटते हे पाहिले, की पदरी निराशा पडते. करील सरकार तयारी आणि लढतील जवान लढाई. ' मला काय त्याचे ' अशी जी वृत्ती दिसून येते ती तिरस्करणीय आहे. देशाभिमानाशी विसंगत आहे. ज्यांनी देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केले त्यांच्या विस्मरणाबरोबर स्वातंत्र्यरक्षणार्थ बलिदान केलेल्यांचेही एवढ्या लवकर विस्मरण व्हावे ही दुःखाची गोष्ट होय. एक पिढी गेल्यावर लगेच दुसऱ्या पिढीने तिचे ऋण विसरून जावे याला निव्वळ कृतघ्नता म्हणून भागणार नाही तर ही स्वतःच्या हिताबद्दलची बेपर्वाईही म्हणावी लागेल. देश केवळ भूगोलाने मोठा होत नाही तर तो इतिहासाने मोठा होत असतो आणि हा इतिहास सर्व क्षेत्रांत, नागरिकांनी आपल्या बुद्धीने, कर्तृत्वाने, त्यागाने, चारित्र्याने आणि निष्ठेने घडवावयाचा असतो. भारतात असा इतिहास घडविला

गेला आहे, पण अलीकडे त्याची आठवण बुजत चालल्याचा अनुभव येऊ लागला आहे.

भगतसिंग, राजगुरू आदी फांसावर चढले आणि बंगाल, पंजाब, महाराष्ट्राचे कित्येक क्रांतिकारकांनी हसत हसत मृत्यूला कवटाळले ! सोलापूरच्या मल्लाप्पा धनशेट्टीने, महाळुंग्याच्या बाबू गेनूने, कुलाबा जिल्ह्यात कोतवालने, महाडला दातेने आणि नंदुरबारला केतकरने देशाच्या स्वातंत्र्यासाठी अगदी अलीकडे पहाता पहाता कुर्बानी केली. १९४२ च्या स्वातंत्र्यलढयात तर कित्येक अप्रसिद्ध देशभक्तांनी प्राणाची पर्वा न करता रक्ताची कारंजी उडवून राजकीय स्वातंत्र्याला जवळ आणले. कोठे आहे त्यांची स्मृती शिल्लक आणि कोठे आहे त्यांच्या कार्याचे कौतुक ? राजकीय स्वातंत्र्याच्या पंधरा-सोळा वर्षात विसर पडत चालला आहे या साऱ्या बलिदानाचा. पायाचे दगड बनून ज्यांनी स्वातंत्र्याची शानदार इमारत बांधण्यास मदत केली, सर्वस्व दिले त्या इमारतीत वावरणाऱ्यांनी, तिचा उपभोग घेणाऱ्यांनी नको का त्या पायातल्या दगडांची आठवण ठेवायला ?

मराठ्यांच्या उज्ज्वल इतिहासाचे गुणगान आम्ही करतो, त्या इतिहासातील पराक्रमाची बढाई मारून तेवढ्या भांडवलावर जगण्याचा प्रयत्न करतो. पण हा जुना इतिहास किती दिवस पुरणार ? जग झपाट्याने पुढे चालले आहे. जगाचा इतिहास आणि भूगोल सारखा बदलत आहे. अशा स्थितीत आम्ही जागेवर राहून आमचा प्राचीन इतिहास–भूगोल कायम ठेवू शकणार आहोत का ? आमच्या परंपरा आणि पराक्रम आम्ही चालू नवयुगात कारणी लावला पाहिजे, आणि नवा इतिहास निर्मिला पाहिजे. राणाप्रताप आणि शिवाजी महाराज यांची भिंतीला चित्रे लावून किंवा पुतळे उभारून आम्हांला नाही मोठे होता येणार ! देशाचे स्वातंत्र्य टिकविण्यास, त्याचे संवर्धन करण्यास आम्हांला पराक्रमासाठी, त्यागासाठी, बलिदानासाठी तयार झाले पाहिजे. शीख, मराठे, मद्रासी, गुरखे साऱ्यांनी मिळून नवा भारत घडवायचा आहे. गतकालातील बलिदानाचे चीज करायचे आहे. जवानांनी आपल्या पराक्रमाने उदाहरण घालून दिले आहे आणि प्रदीपलताने या बलिदानाला शब्दात कायमचे कोरून ठेवले आहे. " जो शहीद हुए है उनकी, जरा याद करो कुर्बानी " " जयहिंद–जयहिंद " जयहिंद हे शब्द ऐकताना बाहू स्फुरले पाहिजेत, अंगातील रक्त उसळले पाहिजे. देशाचे स्वातंत्र्य सुरक्षित तर आम्ही सुरक्षित. नाहीतर आमच्या जगण्याचा काय उपयोग ? काय करतो आहोत आम्ही रोज देशासाठी–समाजासाठी ? आम्ही आमची बुद्धी–शक्ती- युक्ती किती देत आहोत देशासाठी ? काय करीत आहेत

आमचे साहित्यिक, लेखक, कवी, चित्रकार, कलाकार ! चीनच्या आक्रमणानंतर देशभक्तीपर किती साहित्यनिर्मिती झाली ! किती चित्रपट तयार झाले, की त्यांतून देशाच्या रक्षणासाठी तरुणांना–वृद्धांना स्फूर्ती मिळू शकली. सारे काही थंड आहे, शांत आहे. प्रत्येकजण सुस्तावल्याप्रमाणे आपल्या उद्योगात–संसारात–आरामात दंग आहे.

कोठे गेली आमची देशभक्ती आणि देशप्रेम ? काय केले आम्ही १७ वर्षांत देशाला पुढे नेण्यासाठी ? जपान, जर्मनी आदी देशांचे उदाहरण का बरे आमच्या डोळ्यांपुढे उभे रहात नाही ! भारताच्या मानाने हे केवढे छोटे देश आहेत बरे ? पण ते आज कोठे आहेत ? दोन महायुद्धांचा जबर तडाखा बसून जमीनदोस्त झालेले हे देश राखेतून पुन्हा उभे राहून आज अमेरिका–रशिया-सारख्या बलाढ्य राष्ट्रांना चिंतेत टाकीत आहेत. हे कशाच्या जोरावर ? निव्वळ वाचाळपणाच्या किंवा टीका–निंदा–नालस्तीच्या जोरावर नव्हे. तर कर्तृत्वाच्या–जिद्दीच्या–महत्त्वाकांक्षेच्या–उत्कट देशप्रेमाच्या जोरावर. माझा देश आणि त्याचे पुढारपण हाच एक ध्यास मनी ठेवून गेली १५–२० वर्षें हे देश खपत आहेत, झटत आहेत, पुढे जात आहेत. देशासाठी लढलेल्यांची, बलिदान केलेल्यांची स्मृती हृदयांत कायमची कोरून ते त्यांच्या ऋणांतून मुक्त होत आहेत, देशाची शान वाढवीत आहेत.

आम्ही मात्र रोज वाचाळतेत, एकमेकांना शिव्या देण्यात, सरकारची बेअब्रू करण्यात वेळ घालवून, शक्ती खर्च करून देश दुर्बळ करीत आहोत. आम्हांला नेत्यांच्या–देशभक्तांच्या–जवानांच्या कुरबानीची आठवण नाही की त्यांच्या बलिदानाची पर्वा नाही. आमचे साहित्य, आमचे काव्य, आमच्या कला या देश आणि समाजाच्या उत्थापनापासून शेकडो योजने दूर आहेत. कवी प्रदीप यांच्यासारख्या कवीची, लताबाईसारख्या गायिकेची आणि पंडितजी-सारख्या श्रोत्याची आज गरज आहे. सारा देश घुसळून निघाला पाहिजे, सारे नागरिक आळस झटकून, बेपर्वाई टाकून कार्यसिद्ध झाले पाहिजेत. तरच चीनसारख्यांची आक्रमणे पुन्हा होणार नाहीत आणि देशाच्या विकासात अडथळा येणार नाही.

● ● ●

## देवा, देशाला वाचव !



दिवाळीच्या सुट्टीत रेल्वेने प्रवास करणे म्हणजे एक दिव्यच. त्या दिव्यातून परवा पार पडून एकदाचे पुणे गाठले तेव्हा जीव भांड्यात पडला. सणाच्या सुट्टीवाल्यांची गाडीला गर्दी असणार, ही कल्पना असूनही दिवाळीसाठी दिल्ली नाईलाजाने लवकर सोडावी लागली आणि गाडीत अक्षरक्षः दिवसा उभे राहून आणि रात्री बसून प्रवास करावा लागला. रिझर्व्हेशन नसल्यावर इतरांचा तरी काय दोष ? डब्यात बसल्यावर बाहेरच्या उन्हाची तिरीप लागली व इंजिनच्या धुराच्या राखेने स्नान घडले तरी तक्रार कोणाकडे करणार ? तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल पाहिले, की भारतीयांच्या सहनशीलतेचे आणि सोशिकपणाचे कौतुक वाटू लागते. दोन रात्री आणि एक दिवसाचा तो कंटाळवाणा प्रवास संपवून जेव्हा मी डेक्कन एक्स्प्रेसमध्ये शिरलो तेव्हा अंमळ बरे वाटले. पण त्या गाडीत तरी काय, जागेपेक्षा दीडपट संख्येने उतारू बसलेले. पहिल्या वर्गात अक्षरशः वीस-पंचवीस उतारू उभे. त्यांच्यात मी सव्वीसावा सामील झालो आणि खंडाळ्यापर्यंत उभे राहून प्रवासाची सवय केली. गाडी शिवाजीनगरला उभी राहिल्यावर पुण्याचे पुण्यभूमीवर जेव्हा पाऊल ठेवले तेव्हा मनाशी निश्चय केला की, दिल्लीचा प्रवास यापुढे 'डी-लक्स' चेच रिझर्व्हेशन मिळाले तर करावयाचा, एरव्ही नाही. त्या दिवशी घरी पोहोचल्यावर स्नान वगैरे उरकून दोन घास खाल्ले आणि आंबून गेलेले अंग कॉटवर झोकून दिले. दुपारी ऑफिसमध्ये काम पाहून सायंकाळी मुळा–मुठेच्या काठी जाऊन स्वस्थ पहुडलो.

दिल्लीत चार–पाच दिवसांत जे पाहिले होते आणि ऐकले होते त्याने मन उद्विग्न झाले होते. हा देश कुठे चालला आहे, राज्यकर्ते आणि राजकीय पक्ष देशाला कुठे नेत आहेत याचा विचार मनात येऊन निराशेची घनदाट छाया पसरू लागली होती. नदीपलीकडे पाहिल्यावर पर्णकुटी दिसली आणि तिने महात्माजींची आणि महात्माजींच्या काँग्रेसची तसेच नेहरू-पटेल-आझाद आदी थोर थोर नेत्यांची आठवण करून दिली. बंडच्यामागे मुळामुठेचे पाणी संथपणे वहात होते आणि अंधाऱ्या रात्रीत विजेच्या दिव्यांच्या पडलेल्या प्रकाशामुळे काही ठिकाणी ते चकाकत पण होते. पर्णकुटीशेजारील रस्त्यावरून रहदारी थोडी–फार चालू होती आणि मोटारच्या हॉर्नमुळे शांततेला अधूनमधून बाध

येत होता. बाबाजान वसत असलेले ते झाड दुरून अस्पष्ट दिसत होते आणि मेहेरबाबांची डेक्कन कॉलेजकडे सायकल वरून जाणारी मूर्ती आणि बाबाजान यांचा त्यांना मिळालेला प्रसाद आन्तरमनाला जाणवत होता. ज्या स्नेह्याने मला या रम्य ठिकाणी आणले होते त्याचे मी आभार मानले आणि त्याला बोटक्लब-वरील त्याच्या खेळात थोडा वेळ रममाण होण्याची विनंती करून मी नदीच्या पाण्यालगत वसून चिंतन करू लागलो. त्या रम्य आणि प्रसन्न वातावरणाने प्रवासाचा माझा शीण नाहीसा झाला होता. पण मेंदूवरील विचाराचा ताण काही कमी झाला नव्हता. हे असे का आणि पुढे कसे होणार हाच विचार पुन्हा-पुन्हा मनात घोळू लागला. दिल्लीतील माझे वास्तव्य डोळ्यापुढे उभे राहिले आणि त्या अनुरोधाने मी साऱ्या भारताची यात्रा करून साऱ्या राजकीय पक्षांचे जवळून दर्शन घेतले.

दिल्लीत पाऊल ठेवताच मी पहिली बातमी ऐकली असेल तर ती ओरिसा-तील दंगलीची, जाळपोळीची, गोळीबाराची. विद्यार्थी-निदर्शनांना प्राप्त झालेले उग्र स्वरूप व त्यांतून शांतता–सुव्यवस्थेला पोहोचलेला धोका शासन-कर्त्यांना धक्का देणारा ठरला. परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ लागताच लष्कर मदतीसाठी बोलावण्याची पाळी आली. ही स्थिती लाजिरवाणी म्हटली पाहिजे. लष्कराने देशाच्या संरक्षणाची डोळ्यात तेल घालून राखण करायची की विद्या-र्थ्यांना आणि कामगारांना आवरण्यासाठी रस्त्यात गस्त घालायची याची राज्यकर्त्यांनी आणि राजकीय पक्षांनी १७ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही गंभीरपणे दखल घेऊ नये हे दुर्दैव म्हटले पाहिजे. शिक्षणसंस्थांनी, विद्यापीठांनी आणि राजकीय पक्षोपपक्षाच्या पुढाऱ्यांनी आमच्या विद्यार्थ्यांना गेली पंधरा–सोळा वर्षे बेशिस्त, नियमभंग, निदर्शनांचेच शिक्षण दिले आहे की काय ? यात दोष सर्वस्वी विद्यार्थ्यांचाच आहे की संस्थाचालकांचा आणि सरकारी अधिकाऱ्यांचाही आहे हे तपासून पाहण्याची वेळ आली आहे. विद्यार्थी–नेत्यांवर किंवा विरोधकांवर दोषांचे खापर फोडून विद्यार्थी–प्रश्न सुटणे शक्य नाही. ओरिसातील राजकीय स्थिती एवढ्या खालच्या थराला गेली आहे की, तरुण वर्गापुढे, विद्यार्थ्यांपुढे काही चांगले आदर्शच दिसेनासे झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. बिरेन मित्रा यांचे हात एवढे बरबटलेले आहेत, त्यांचे राजकीय किंवा सार्वजनिक जीवन एवढे कलंकित झालेले आहे की, विद्यार्थ्यांना ते कोणत्या तोंडाने शिस्त-चारित्र्याचा उपदेश करणार ? लोकांना ते नको असताना, काँग्रेसपक्षाला ते नको असताना काँग्रेसश्रेष्ठींनी त्यांनाच राज्याचे नेते म्हणून लादण्यात केलेली चूक विद्यार्थ्यांनी आपल्या प्रक्षोभक कृत्यांनी उजेडात आणली, तर दंगलीचा सर्व दोष त्यांच्यावर लादण्यात काय हशील ? तरुणवर्ग यापुढे मोठ्यांच्या चुका किंवा दडपेगिरी

निमूटपणे सहन करणे अशक्य आहे. विद्यार्थी-चळवळीला योग्य वळण द्यावयाचे असेल तर शासनकर्त्यांनी, शिक्षणसंस्थांच्या चालकांनी, विद्यापीठांनी, प्राध्यापक-वर्गांनी आपले आदर्श त्यांच्यापुढे ठेवले पाहिजेत. नाहीतर विद्यार्थी-निदर्शने आणि त्यांचा लष्कराकडून बंदोबस्त असे प्रकार वरच्यावर घडत राहावयाचे.

दिल्लीत दुसरे दिवशी भारत-सिलोन कराराची मोठी जाहिरात वृत्तपत्रा-तून वाचायला मिळाली. एवढेच नव्हे तर जे पं. नेहरूंना साधू शकले नाही ते शास्त्रींनी साधले म्हणून त्यांच्या गौरवपर चौकटी व अग्रलेख वाचावयास मिळाले. तथापि फार थोड्यांनी शांतपणे विचार करून कराराची नीट चिकित्सा केली. ज्या हिंदींनी सिलोनचे आर्थिक भवितव्य घडविले, सिलोनला व्यापार-उद्योग शिकविला, त्या पाच लक्ष हिंदींना निर्वासित म्हणून सिलोन घालवून देणार आणि भारत त्यांचा स्वीकार करून त्यांचे पुनर्वसन करणार ! यात आम्ही काय मिळविले ? सिलोनने फक्त ३ लक्ष लोक सामावून घेण्यास संमती दर्शविली. हा सिलोनचा जय की भारताचा ? हे पं. नेहरूंना करता येणे शक्य नव्हते का ? या करारामागे कोणती तात्त्विक व व्यवहारी बैठक आहे हे समजत नाही. बाईंनी धाक दाखवून आमच्या गळयात ३ ऐवजी ५ लक्ष लोक घातले व आम्ही आतिथ्यशीलतेचा आदर्श पुढे ठेवून आमच्या त्या बांधवांना निर्धन स्थितीत परत घ्यायला तयार झालो. आता पंतप्रधान त्यांची कोठे व कशी व्यवस्था लावणार ? मद्रासने तर अगोदरच आरोळी मारून ठेवली आणि पंतप्रधानांनी लगेच त्यांना आर्थिक मदतीचे आश्वासन दिले. पुनर्वसनात आम्ही किती वर्षे किती कोट रुपये खर्च करणार आहोत कोणास ठाऊक ? पाकमधील स्थलांतरित गेली सोळा वर्षे अव्याहतपणे येतच आहेत. आता त्यात सिलोन, ब्रह्मदेश, मलाया, इंडोनेशिया, आफ्रिका आदी देशांतील हिंदी स्थलांतरितांची भर पडणार आणि मग एका दंडकारण्याचे जोडीला चार दंडकारण्यांची तरतूद करावी लागणार. ज्या 'तडजोडवादाचे' तुणतुणे वाजविले जाते तो हा 'तडजोडवाद' असा गळ्याशी येणारा आहे. सेनानायके, बंदरनायके यांच्यापेक्षा सिरिमाओबाई हुशार ठरल्या हे खरे. तथापि नेहरूंच्यापेक्षा शास्त्री किती हुशार, धोरणी ठरले हे काळच ठरवील. ही प्रथा काही चांगली पाडली गेली नाही एवढे निश्चित.

दिल्लीत तिसरे दिवशी बक्षींच्या पंचकोटीच्या प्रॉपर्टीची चर्चा ऐकायला मिळाली. थ्री 'बी' आणि त्यांचे 'स्कॅंडल' हा राजधानीत चर्चेचा विषय होऊन बसला आहे. बक्षी गुलाम महंमद, बिजू पटनाईक आणि बिरेन मित्रा या तीन 'ब' मंडळींनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून मिळविलेल्या

लाखो रुपयांचा एवढा बभ्रा झाला आहे की, नंदाजींच्या सदाचार समितीला अल्पावधीत हात टेकण्याची पाळी आली आहे. सत्तेचा वापर स्वतःच्या तुंबड्या भरण्यासाठी करणाऱ्या या संपत्तिपिपासू मंडळींचे काँग्रेसश्रेष्ठींनी एवढे लाड कसे केले आणि त्यांच्या दुष्कृत्याकडे डोळेझाक कशी केली हे कोडे सर्वसामान्य माणसाला काही सुटू शकत नाही. एकीकडे लाखोंच्या दारिद्र्य-बेकारीचे चित्र, दुसरीकडे दहापाच नवकोट नारायणांच्या अगणित धनसंचयाचे चित्र आणि तिसरीकडे जनतेच्या जिवावर या तीन मुख्यमंत्र्यांच्या सुखी-विलासी जीवनाचे चित्र पाहिल्यावर हा देश कोठून कोठे चालला आहे, याचा खेद वाटू लागतो. अशा मंडळींना शासन न होता त्यांचे कोडकौतुक होते, काँग्रेसश्रेष्ठींच्या आसपास त्यांना मानमरातबाने वागविले जाते, हे पाहिल्यावर राष्ट्रीय जीवनाची सारी मूल्येच बदलली की काय असे वाटू लागते. देश दूर राहून व्यक्तीचा मोठेपणा, सत्ता, संपत्ती यांची जवळीक एवढी महत्त्वाची झाली आहे की, राष्ट्रीय चारित्र्य, राष्ट्रीय शिस्त, राष्ट्रीय स्वाभिमान पार लोप पावल्याचे दिसत आहे. दिल्लीत वशिला आणि पैसा यांशिवाय तर पान हलत नाहीच, पण त्याचबरोबर मंत्र्यांच्या आणि काँग्रेसश्रेष्ठांच्या भोवती पिंगा घालण्याची प्रवृत्ती आणि त्यांचे कान फुंकण्याची वृत्ती दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येते. बड्या भांडवलदारांनी दिल्लीच्या राजकीय गोटात एवढा पैसा पेरून ठेवला आहे, परदेशी वकिलातींनी मदिरा–मदिराक्षीच्या जोरावर सरकारी वरिष्ठ अधिकारी एवढे भारून टाकले आहेत की, एखादे दिवशी काहीतरी भयंकर घडणार अशी सच्छील, सत्प्रवृत्त माणसाला भीती वाटल्यावाचून राहात नाही. परदेशी प्रवासासाठी काही खासदार मंडळी एवढी लाचार बनलेली आहेत की, त्यासाठी ते आपल्या देशाच्या धोरणाची, सरकारच्या कर्तृत्वाची परकीयांच्या चारचौघांत नाचक्की करीत असतात व रशिया–अमेरिका–इंग्लंडचे गुणगायन गात असतात. हिंदी जनतेच्या या प्रतिनिधींचा हा देशाभिमान व ही बौद्धिक उंची पाहून त्या परकीयांना काय वाटत असेल कोणास ठाऊक !

दिल्लीत चौथ्या दिवशी तेथील काही पत्रकार स्नेह्यांबरोबर पार्लमेंट हाऊसमध्ये जेवण घेत असता तास-दीडतास खूपच चर्चा करायला मिळाली. दिल्लीत काम करणारे पत्रकार केंद्र सरकारच्या कामाशी, मंत्र्यांच्या हालचालींशी आणि काँग्रेसच्या कार्यक्रमांशी अधिक जवळून परिचित असल्याने पुण्या-मुंबईच्या पत्रकारांपेक्षा राजकीयदृष्ट्या अधिक माहितगार असतात. अशा एका ज्येष्ठ बिगरमहाराष्ट्रीय पत्रकाराला "पंतप्रधान शास्त्रींचे पहिले १५० दिवस (पाच महिने) कसे गेले" असे विचारता त्याने जे उत्तर दिले ते मोठे सूचक होते. तो म्हणाला, "वास्तविक पहिले १०० दिवस झाल्यावर शास्त्रींच्या

कारकीर्दीचे वृत्तपत्रांनी मूल्यमापन करणे आवश्यक होते. तथापि दिल्लीबाहेरच्या संपादकांना शास्त्रीजी अजूनही पूर्णपणे कळले नसावेत असे वाटते. एक साधा माणूस, भला माणूस, कळकळीचा कार्यकर्ता व नेता म्हणून सारे त्यांना ओळखतात हे खरे; तथापि प्रधानमंत्र्यांच्या अंगी एवढे गुण पुरेसे आहेत का, देशापुढील विविध अडचणींतून देशाला ते सुरक्षितपणे बाहेर काढू शकतील का हा विचार व्हायला हवा." त्यावर मी म्हटले की, "प्रधानमंत्र्यांचे खरे मूल्य-मापन करायला त्यांना किमान एक वर्षाचा तरी अवधी द्यायला हवा. नाहीतर त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. ते घडी ठाकठीक बसवीत आहेत ( He is shaping very well ) असे वाटते. पंडितजींच्या निधनानंतर त्यांनी या देशात शांतता–स्थैर्य टिकू दिले आणि काही प्रश्नांनाही यशस्वीपणे तोंड दिले. पंडितजींचे व्यक्तिमत्व, पंडितजींचे बुद्धिचातुर्य, पंडितजींची आंतरराष्ट्रीय ख्याती शास्त्रींच्या पाठीशी नसल्याने एक सर्वसामान्य भारतीय नागरिक या दृष्टीनेच त्यांच्याकडे पहाणे जरूर आहे. ते जगन्नाथाचा रथ नीटनेटका हाकू शकतील असे वाटते."

माझ्या या विधानाला काही पत्रकार-मित्र हसले. एक बंगाली पत्रकार म्हणाला, "तुमच्या सदिच्छा ठीक आहेत पण राज्ये काही सदिच्छेवर आणि साधेपणावर चालत नसतात. मुत्सद्दीपणा, धूर्तपणा, खंबीरपणा आणि कठोरपणा ही चतुःसूत्री नसेल तर शास्त्रीजी लवकरच घाईला येतील. दिल्लीत त्यांच्याभोवती असलेला घोळका, मंत्रिमंडळातील एका गटाच्या चालू असलेल्या विरोधी कारवाया, मंत्रिमंडळाची मारुतीच्या शेपटाप्रमाणे चालू असलेली वाढ, काश्मीर-मध्ये हळूहळू बनत चाललेली स्फोटक परिस्थिती, ओरिसात सरकारी यंत्रणेची झालेली खिळखिळी स्थिती, धान्यटंचाई, महागाई, काळाबाजार, लांचलुचपत, काळा पैसा यांनी आर्थिक व्यवस्थेचा उडत चाललेला बोजवारा यांवर शास्त्रीजी कोणती उपाययोजना करणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. रशियात क्रुश्चेव्ह यांचे उच्चाटन आणि चीनच्या अणुबाँबचा स्फोट यांमुळे बदललेल्या जागतिक स्थितीत भारत आपल्या संरक्षणाबाबत किती स्वावलंबी आणि खंबीर रहाणार याचा पंतप्रधानांना विचार करावा लागणार आहे. 'कै. नेहरूंचे धोरण पुढे चालवीत आहे' एवढे म्हटल्याने लोकांचे समाधान होऊ शकत नाही. कैरोला जाऊन आल्याने किंवा श्रीमती बंदरनायके यांच्याशी करार केल्याने भारताच्या पदरी काहीही पडलेले नाही. नागालँड, सिक्किम, भूतान आणि लडाख या आघाड्या खंबीरपणे सांभाळण्याची जिम्मेदारी वाढत आहे. अशा स्थितीत केंद्र व राज्य सरकार कार्यक्षम आणि भक्कम होण्याऐवजी अंतर्गत हेव्यादाव्याने दुर्बल होऊ लागली, तर देशाचे रक्षण कसे होणार आणि लोकशाही जागेवर कशी रहाणार!

समाजवाद नुसता घोषणेतच दिसतो. तथापि आर्थिक धोरण मात्र थैलीशहांना पोषक ठरेल असेच आखले जाते. श्रीमंत अधिक श्रीमंत बनून गरीब अधिक गरीब होण्याची प्रक्रिया अजूनही थांबू शकत नाही. काँग्रेस संघटनेची उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, केरळमधील लक्तरे पाहिल्यावर या राज्यात १९६७ मध्ये काय होईल याची चिंता वाटू लागली आहे. म्हणूनच शास्त्रीजींची कारकीर्द अधिक बिकट होऊ पहात आहे. शास्त्री हे एका गटाला दबकून काम करीत आहेत आणि हा गट स्वार्थाने—सत्तेच्या लोभाने लडबडलेला आहे. १५० दिवस आम्हांला तरी फारसे आशादायक दिसू शकले नाहीत."

हे वक्तव्य ऐकल्यावर मी अस्वस्थ झालो. असे असेल तर या देशाचे कसे होणार ! आजची काँग्रेस या देशाला वाचवू शकेल का असे अनेक विचार मनात येऊन गेले. मंत्री-सरकार आणि राजकीय पक्ष यांची स्थिती व धोरण पाहिल्यावर या देशाचा कोणी गंभीरपणे विचार करू नये, व्यक्ती आणि पक्ष यांच्या प्रतिष्ठेतच मश्गूल रहावे याचे वाईट वाटले. 'देशाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या रक्षणार्थ, देवा, या लोकांना सुबुद्धी देऊन या देशाला वाचव.' अशी मनात प्रार्थना करून मी त्या मित्राचा निरोप घेतला. दिल्ली सोडल्यापासून पुण्याला पोहोचेपर्यन्त माझ्या मनात हेच विचार घोळत होते. बोटक्लबच्या टोकाला हिरवळीवर पडल्यापडल्या मी जेव्हा निरभ्र आकाशाकडे पाहू लागलो आणि एखाद-दुसरी चांदणी किंवा तारा दिसू लागला तेव्हा मी त्या ताऱ्याला उद्देशून म्हटले, "चुका, अपराध, अनाचार यांमुळे देशाची स्थिती खालावत चालली आहे यात शंका नाही. पण हे सारे सुधारून हा देश मोठा करण्याची जिम्मेदारी तुम्ही चंद्रतारे आकाशात लुकलुकत आहात तोवर आमची प्रत्येकाची आहे याची जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण करा आणि हा देश सुजलाम्, सुफलाम्, बलवान् बनवा." दुरून दहाचे टोल ऐकू आले आणि मी त्या जागेवरून उठून मोटारीत येऊन बसलो. हॉर्न वाजविताच मित्र मागून आला आणि आम्ही आपापल्या घरी परतलो.

• • •

# हिंदी लोकशाहीस आव्हान : ४ :

संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. एस्. एम्. जोशी यांचे अहमदाबादेतील वक्तव्य वाचल्यावर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. पी. एस्. पी. आणि एस्. पी. एकत्र येऊन एस्. एस्. पी. बनताच विचारांची दिशा एकदम बदलावी, मूलभूत तत्त्वांना मुरड घातली जावी हे कशाचे लक्षण आहे असा सवाल अनेकांनी विचारला. काहींनी आपली भीती खरी ठरल्याचे छातीठोकपणे सांगून पी. एस्. पी. ला एस्. पी. खाऊन टाकणार असे भाकीतही वर्तवून टाकले. लोहिया आणि त्यांचे चेले हे एस्. एम्. आणि त्यांच्या शिष्यांना व एस्. एम्. विचारसरणीला केव्हाच पचनी पाडणार नाही असे 'प्रसोप'च्या कित्येक जुन्या कार्यकर्त्यांनी बोलून दाखविले. मधू लिमये हे 'संसप'ला कबजात घेणार आणि काँग्रेसला नामशेष करण्याची लोहिया-गर्जना निनादली जाणार हे आता स्पष्ट दिसू लागले असून एस्. एम्. आणि त्यांच्या अनुयायांची स्थिती मोठी केविलवाणी होणार. एस्. एम्. म्हणतात की, काँग्रेसला आता सत्तेवरून खाली ओढले पाहिजे, तर मधू लिमये म्हणतात की, काँग्रेसला नामशेष केले पाहिजे. सत्तेवर बसलेला काँग्रेसरूपी साप ठेचून काढला तरच तो तेथून बाजूला होईल असे लोहियांच्या एस्. पी. चे निदान आहे. आता या दोहोंचा मेळ कसा बसणार आणि एस्. एम्. या दोन विचारसरणींचा मध्य कसा गाठणार ! सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन काँग्रेसला निवडणुकीत पराभूत करावे ही एस्. एम्. यांची अपेक्षा आणि इच्छा रास्त असू शकेल. तथापि एस्. एम्. जोशी या कामी कम्युनिस्ट आणि जनसंघ यांचीही मदत घेऊ इच्छित आहेत का ? काँग्रेसच्या पारिपत्यासाठी ते लोकशाहीविरोधी कम्युनिस्ट आणि समाजवाद-विरोधी जनसंघ यांचे साहाय्य घेणार आहेत का ? असा प्रश्न अनेकजण विचारीत असून त्याचे उत्तर एस्. एम्. यांनी दिलेले नाही. डाव्यांची ही विकल अवस्था पाहिली, की कम्युनिस्ट आणि उजवे तर प्रबळ होणार नाहीत ना, लोकशाही व समाजवाद तर धोक्यात येणार नाही ना अशी शंका वाटल्यावाचून रहात नाही.

भारतातील डाव्या पक्षोपपक्षांकडे नजर टाकली तर गेल्या चार-सहा महिन्यांत त्यांच्यात बरीच फाटाफूट झाल्याचे व काही पक्ष मोडकळीला येऊन त्यांनी नवा आधार शोधल्याचे दिसून येईल. लोकशाहीवर श्रद्धा असलेले डावे

आणि लोकशाहीवर श्रद्धा नसलेले अतिडावे या साऱ्यांचीच परिस्थिती मोठी चमत्कारिक झाली आहे. प्रत्येकाला आपल्या भवितव्याबाबत चिंता वाटत आहे. तथापि काँग्रेसचीही अवस्था किंवा प्रकृती पूर्वीसारखी ठणठणीत राहिली नसल्याने ते त्यात समाधान मानून घेत आहेत. काँग्रेस आतून दुर्बल होणे म्हणजे अप्रत्यक्षपणे आपण बलवान होणे असे विरोधकांचे समीकरण आहे. कारण हे पक्ष स्वतःच्या कर्तृत्वावर किंवा हिंमतीवर कधीच बलवान् होऊ शकलेले नाहीत. कम्युनिस्टांचा आधार घेऊन बलवान होण्याचा जेथे जेथे त्यांनी प्रयत्न केला तेथे कम्युनिस्ट बलवान् होऊन ही चिल्लर मंडळी मोडीत निघाली. आतासुद्धा कम्युनिस्टात दोन फळ्या पडल्या असताना देखील कम्युनिस्ट अधिक बलवान् ठरत आहेत आणि चळवळीच्या राजकारणाचे नेतृत्व आपल्याकडे घेत आहेत. ही स्थिती या लोकशाहीवादी राष्ट्रनिष्ठ डाव्या विरोधी पक्षांच्या भवितव्याच्या दृष्टीने बरी आहे काय, याचा विचार गंभीरपणे होणे जरूर आहे.

अशोक मेहता यांनी नियोजन मंडळाचे सदस्यत्व स्वीकारताच प्रजा-समाजवादी पक्षाच्या अध्वर्यूंनी मेहतांकडून मोठे पाप घडले असे मानून त्या पापक्षालनाची मागणी केली. तथापि मेहतांचा मूलतःच दृष्टिकोन वेगळा असल्याने त्यांनी कोल्हेकुईकडे दुर्लक्ष केले व काँग्रेसला सहकार्याचे कार्य पुढे चालू ठेवले. त्यांचे म्हणणे असे की, लोकशाही आणि समाजवादावर निष्ठा असणारे काँग्रेस व प्रजासमाजवादी पक्ष जवळ आले नाहीत तर देशाला धोका आहे. नियोजनाद्वारे देशाची प्रगती करण्यासाठी या दोन समाजवादी शक्तींचे एकीकरण जरूर आहे. तथापि काँग्रेसला सत्तेवरून खाली ओढण्यास आतुर झालेल्या एस्. एम्. आणि मंडळींना मेहतांचा पवित्रा कसा मान्य होणार? त्यांनी या राजकीय भ्रष्टाचाराविरुद्ध एकीकडे हाकाटी सुरू केली व तिकडे डॉ. लोहियांशी मीलनाची आतुरता प्रकट केली. प्रसोप आणि सप एकत्र आले तर काँग्रेसला एक प्रबळ विरोधी पक्ष निर्माण होईल अशी समजूत त्यांनी करून घेतली. समाजवादी पक्षाला हेच हवे होते. एकदा प्रजासमाजवादी आपल्यात आले, की त्यांना पचवून आपले चळवळीचे राजकारण पुढे ढकलायला त्यांना चांगलेच बळ येणार होते. मधू लिमये—जॉर्ज फर्नांडिस आदी मंडळी या मधु-मीलनाची वाटच पहात होती. तथापि या युतीतून फाटाफुटीला सुरुवात झाली आणि प्रजासमाजवाद्यांतील एका प्रबळ गटाने बाहेर पडण्याचा आणि काँग्रेस-प्रवेशाचा निर्णय घेतला. महाराष्ट्र व गुजरात शाखांनी प्रसोप नेत्यांना स्पष्ट बजावले की, काँग्रेसपेक्षा समाजवादी तुम्हांला अधिक जवळ व हितकारक वाटत असतील तर त्यात पक्षाला धोका आणि देशाला धक्का आहे. तथापि काँग्रेसला नामशेष करणाऱ्या समाजवाद्यांच्या भडक भाषेत आपला काँग्रेसला सत्ताभ्रष्ट

करण्याचा मृदू आवाज मिळविण्याचे एस्. एम्. आणि मंडळींनी पक्के केले आणि या एकीकरणाच्या प्रक्रियेत प्रजासमाजवाद्यांचा एक मोठा गट फुटून त्याने काँग्रेसमध्ये सामील होण्याचे जाहीर केले.

काँग्रेस अकार्यक्षम झाली असेल, तिच्यात कित्येक दोष वा उणीवा निर्माण झाल्या असतील. तथापि स्वातंत्र्य, लोकशाही व समाजवाद यांवर संपूर्ण निष्ठा असलेली ती एक जुनी व प्रबळ अशी संघटना असल्याने देशाला वाचविण्यास आणि वाढविण्यास काँग्रेसचाच उपयोग होईल असे मानणारे कित्येक डावे गेल्या काही महिन्यांत काँग्रेसमध्ये आले. यात प्रजासमाजवादी तर आहेतच, पण शेतकरी कामगार पक्ष व रिपब्लिकनामधील काही कार्यकर्तेही आहेत. ही गळती थांबावी म्हणून म्हणा, की इतर काही कारणामुळे म्हणा, शेका.प. व रिपब्लिकनांचा एक गट नव्या संयुक्त समाजवादी पक्षात सामील होण्याच्या दृष्टीने संसपने हालचाली सुरू केल्या. महाराष्ट्रात जर शे. का. प. व रिपब्लिकन आपल्यात आले तर आपण काँग्रेसला प्रभावी विरोध करू शकू, अशी संयुक्त समाजवाद्यांना खात्री वाटू लागली व त्या दृष्टीने त्यांनी हालचाली सुरू केल्या. हा नवा राजकीय बनाव शे. का. पक्षाला आकर्षक वाटू लागला. पण रिपब्लिकांनी 'थांबा आणि पाहा' हे धोरण अवलंबिले. काँग्रेसला पराभूत करण्याची ही चांगली संधी आहे असे प्रत्येक डाव्या पक्षाला मनोमन वाटू लागले आणि त्या अनुरोधाने निवडणूकगट्टीचे विचार जोराने वाहू लागले. काँग्रेसला सत्तेवरून खाली ओढायचे हाच धोशा सुरू झाला व त्यासाठी निवडणुकीत जनसंघ व कम्युनिस्ट यांचीही मदत घेता आली तर जरूर घ्यावी येथपर्यंत विचारांची मजल जाऊ लागली. त्यामुळे मूलभूत तत्त्वे, तत्त्वावर आधारित कार्यक्रम बाजूला पडून चळवळीला अधिष्ठान मिळू लागले व त्याचे पर्यवसान कम्युनिस्टांना चांगलाच वाव मिळण्यात झाले.

कम्युनिस्टांना नेमके हेच हवे होते. समाजवादी, प्रजासमाजवादी, शे. का. प. व रिपब्लिकन या वेगवेगळ्या दुर्बळ मंडळींची आवळ्यांची मोट बांधली जाऊन एक आघाडी निर्माण झाली तर तिचा आपल्याला नेमका उपयोग करून घेता येईल. कारण या आघाडीतील चळवळ्या मंडळींना हाताशी धरून अशांतता माजविणे व हिंसक प्रकार घडवून आणणे अवघड नाही. 'गुजरात बंद', 'महाराष्ट्र बंद', 'देश बंद' आदी घोषणा देऊन चळवळींना, निदर्शनांना प्रवृत्त करणे अवघड नाही, हा कम्युनिस्टांचा अनुभव त्यांना उपयोगी पडू लागला आणि संयुक्त समाजवादी कम्युनिस्टांच्या आहारी जाऊ लागले. म्हणजे पर्यायाने कम्युनिस्टांचे बळ वाढू लागले. डाव्यांच्या एकीकरणाच्या

नावाखाली कम्युनिस्टांचे बळ वाढत असता काँग्रेस पक्ष अंतर्गत मतभेद-गट, भांडणे यांमुळे दुर्बळ होत असल्याची जाणीव काँग्रेसमधील जबाबदार मंडळींना होऊनही त्यांना त्यावर इलाज करणे अवघड जावे हे दुर्दैव म्हटले पाहिजे.

गेल्या काही महिन्यांतील देशातील राजकीय स्थिती पाहिली, तर जनसंघ आणि स्वतंत्र या दोन उजव्या पक्षांखेरीज बाकी सर्व पक्षांत फाटाफूट चालू असल्याचे व या पक्षांची शक्ती कमी कमी होत असल्याचे आढळून येते. अति-जहाल कम्युनिस्टांपासून तो मवाळ काँग्रेसपर्यंत पडझड चालू आहे. या पडझडीच्या फेऱ्यात लोकशाहीवादी आणि लोकशाहीविरोधी असे सर्वजण सापडलेले आहेत. प्रजासमाजवाद्यांप्रमाणे समाजवादी तर झपाटले गेले आहेतच, पण शे. का. प. आणि रिपब्लिकनही यातून सुद्धा शकलेले नाहीत. कोणी काँग्रेस-मध्ये सामील झाले आहेत, तर कोणी स्वतंत्रांत, कोणी कम्युनिस्टांत तर कोणी कम्युनिस्टांतील डाव्यांत. ही जी फोडझोड व फेरघडण चालू आहे तिने जनसंघ व स्वतंत्रांना स्पर्श केलेला नाही. या दोन्ही पक्षांचे काम शांतपणे चालू असून ते आपले बळ गाजावाजा न करता वाढवीत आहेत. समाजवादाला विरोध दर्शवून ते या देशात बड्यांचे प्रस्थ वाढवीत आहेत. नशीब एवढेच की, लोक-शाहीला ते अद्याप मानीत आहेत. संयुक्त समाजवादी काँग्रेसचा पाडाव करण्याची भाषा जेव्हा बोलतात तेव्हा त्यांच्या डोळ्यांपुढे जनसंघ आणि स्वतंत्र यांच्यासह निवडणूक आघाडीचे चित्र असते. कम्युनिस्टांसह निवडणूक करार ( Electoral Alliance ) चालू शकेल येथपर्यंत काही संयुक्त समाजवाद्यांची तयारी गेली आहे. पण अद्याप एस्. एम्. प्रभृती कम्युनिस्ट व जनसंघ यांना जवळ करण्यास तयार नाहीत.

नानासाहेब गोरे यांना मात्र काँग्रेसला पदच्युत करण्याची घाई झाली असल्याने ते काँग्रेसच्या अंत्यसंस्कारासाठी आतापासूनच जागा शोधू लागले आहेत. काँग्रेसचा पाडाव निवडणुकीतील मताने होणे जरा अवघड असल्याने ते रस्त्यावर काँग्रेसला पराभूत करून तेथेच तिला गाडण्याची सुखस्वप्ने रंगवीत आहेत. ज्याला विचारी नेतृत्व म्हणता येईल ते पायापुरते पाहणार नाही. सदर नेतृत्व समाजाचा, लोकशाहीचा, देशहिताचा विचार करून संयमाने बोलेल-वागेल. तथापि समाजवाद्यांच्या संगतीत मवाळ भाषा म्हणजे दुबळे नेतृत्व असे वाटू नये म्हणून नानासाहेब गोरे यांनी परवा पुण्यात भीमगर्जना करून काँग्रेसच्या गादीवर जणू काय आपण लवकरच विराजमान होणार, असा थाट मांडला हे विशेष होय. ही गादी संयुक्त समाजवाद्यांच्या हाती पडेपर्यंत एकी-कडून कम्युनिस्ट आणि दुसरीकडून प्रतिगामी, स्वतंत्र व जनसंघीय काय काय

करतील याचा नानासाहेबांनी शांतपणे विचार करून पहावा. लोकशाही समाजवादाचे कंकण हाती बांधून प्रजासमाजवादी गेली पंधरा वर्षे या देशात मिरविले, काँग्रेसचा समाजवाद बेगडी म्हणून त्यांनी आपली जाहिरात करून घेतली, काँग्रेस लोकांच्या मनातून उतरली असल्याचे सांगून निवडणुका लढवून पाहिल्या. तथापि प्रजासमाजवाद्यांच्या लोकप्रियतेचा आणि बलसंवर्धनाचा आलेख (Graph) पाहिला तर तो शून्यापर्यंत पोहोचल्याचे दिसून येईल. याउलट जनसंघाने आणि स्वतंत्रांनी आपल्या आलेखावरील आकडा वर नेल्याचे आढळून येईल. महाराष्ट्रात तर प्रजासमाजवाद्यांना दुसऱ्याच्या कुबडीशिवाय आपले स्वतःचे राजकारण कधीच धडाडीने करता आले नाही. आणि शेवटी 'अग अग म्हशी' करीत समाजवाद्यांचे शेपूट पकडावे लागले. तथापि, ही नवी युती होताच ते बालहनुमानाप्रमाणे एकदम सूर्यावर झेप घेऊ पाहात आहेत. त्याखेरीज ते लोहियांचे चेले किंवा साथी कसे शोभून दिसणार ?

शेकाप आणि रिपब्लिकन या दोन्ही पक्षांना ग्रामीण भागात बरा पाठिंबा असल्याने त्यांना आपल्यात ओढून आपले बळ वाढविण्याचा एस्. पी. चा विचार आहे. शेकापही काँग्रेसविरोधासाठी त्या मार्गाने जाण्याची शक्यता आहे. नेत्यांतील भांडणाला कार्यकर्ते विटले असून काहींचा कल कम्युनिस्टांकडे, काहींचा संयुक्त समाजवाद्यांकडे आणि काहींचा काँग्रेसकडे झुकत आहे. या पक्षाचे असे तीन तुकडे झाले तर त्या पक्षाची नव्हे तर त्या समाजाची मोठी हानी होणार आहे. बुद्धवासी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लिकन पक्ष हा दलितांचा खरा उद्धारक ठरेल, नवबौद्धांना तो महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देईल, ग्रामीण जनतेचे आशास्थान बनेल असे बोलून दाखविले होते. तथापि त्यांच्या देहावसानानंतर दहा वर्षांत पक्षाची छकले पडण्याची पाळी यावी हा दैवदुर्विलास म्हणायचा ! सं. म. समितीच्या चळवळीत रिपब्लिकनांना गौण स्थान मिळाले आणि आता संयुक्त समाजवादी पक्षातही तीच अवस्था होण्याची शक्यता आहे. केवळ पुढाऱ्यांच्या मोठेपणासाठी आणि स्वार्थासाठी पक्ष राबविला गेला, की ही अवस्था अपरिहार्य होते असा आतापर्यंतचा अनुभव आहे. शेतकरी कामगार पक्ष आणि रिपब्लिकनांचे ग्रामीण भागात जे वजन आहे त्याचा फायदा शहरवासीय संयुक्त समाजवाद्यांना हवा आहे आणि म्हणूनच ते या दोन पक्षांना आत ओढण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. या प्रक्रियेत जर रिपब्लिकनांचे तीन तुकडे झाले तर ती दलितांचे दृष्टीने मोठी हानी ठरणार आहे.

या साऱ्या गोंधळाच्या अवस्थेत काँग्रेस शाबूत राहिली आहे असे नव्हे. तिचेही टवके उडत आहेत. अंतर्गत गटबाजीमुळे कित्येक राज्यांतून काँग्रेस

खिळखिळी झाली आहे. केरळमध्ये तर कम्युनिस्टांनी आर्. एस्. पी. आणि एस्. एस्. पी. च्या सहकार्याने काँग्रेसला पराभूत करण्याचा विडाच उचलला आहे. जेथे जेथे निवडणूक-सख्य ( Electoral Alliance ) करता येईल तेथे तेथे तसे प्रयत्न चालू झाले आहेत. त्यांत पक्षोपपक्षांचे ध्येय-धोरण, कार्यक्रम विचारात घेण्याची जरूरी वाटेनाशी झाली आहे. जनसंघ आणि कम्युनिस्ट, स्वतंत्र आणि कम्युनिस्ट, संयुक्त समाजवादी आणि कम्युनिस्ट, समाजवादी आणि जनसंघ यांच्यात तत्त्वतः कोठेहि, साम्य नसले तरी काँग्रेसला पाडण्यासाठी एकमेकांना मिठ्या मारून ही विरोधी मंडळी शड्डू ठोकू लागली आहेत. हे दृश्य या देशातील लोकशाहीच्या वाढीसाठी समाजवादाचे ध्येय साकार करण्यासाठी उपयोगी पडेल का याचा विचार सर्वांनीच करावयाचा आहे. काँग्रेसच्या पाडावाने पछाडलेली ही मंडळी देशाला एकतर हुकूमशाहीकडे किंवा कम्युनिझमकडे नेत आहेत यात शंका नाही. भारताच्या सभोवारचे दृश्य पाहिले, की भवितव्याबाबत चिंता वाटू लागते. ब्रह्मदेश, सिलोन, इंडोनेशिया आदी ठिकाणी काय घडले, पाकमध्ये कोणती अवस्था आहे, याचा विचार केला, की भारतातील विरोधी पक्ष या देशांच्या पावलावर तर पाऊल टाकीत नाही ना अशी शंका वाटल्यावाचून रहात नाही. काँग्रेससह सर्व लोकशाहीप्रेमी राष्ट्रनिष्ठ डाव्या पक्षांना काळाचे हे आव्हान असून त्याचा स्वीकार हे पक्ष कसा करणार यावर भारताचे भवितव्य अवलंबून आहे हे खास !

● ● ●

— २ —

# भाग्यश्रीने दगा दिला : १ :

त्या दिवशी डेक्कन जिमखाना क्लबवर पत्ते खेळता खेळता दोघांचे टेबलवर एकाएकी कडाक्याचे भांडण सुरू झाले. एकाच्या हातात रेसचे ' वधारो ' पुस्तक होते व तो पुस्तक वाचता वाचता पाने घेत होता, टाकीत होता. सहाजिकच त्याच्या खेळाला उशीर होत होता. खालच्या माणसाला ते सहन न होऊन तो एकदम म्हणाला, 'अहो पांडोबा, येथे कशाला तुमची ती महालक्ष्मी ' उद्या जागेवर काय दिवे लावायचे ते लावा. गेल्या खेपेला ' मोगल एम्परर ! घोडा लावला तेवढा पुरे नाही का झाला ? ' त्यावर ते रेसशौकिन जे बिघडले ते त्यांनी घोड्याच्या वंशावळीप्रमाणे त्या खेळाडूची वंशावळ काढली व पत्ते टाकून देऊन उठण्याची तयारी दर्शविली. तेवढ्यात तिसरा म्हणाला, " परवा पांडूला मारण्याची जी दंगल महालक्ष्मीवर झाली, तिच्यात यांचा पुढाकार असला पाहिजे. नाहीतर ' मोगल एम्परर 'चे नाव काढल्याबरोबर यांना एवढे खवळायला काय झाले ? " चौथा म्हणाला की, 'त्या दिवशी भाग्य होते म्हणून भाग्यश्री लागली आणि एम्परर उताणा पडला !' आणि मग पत्त्यांचा खेळ बाजूला राहून रेसेसवर चर्वितचर्वण सुरू झाले. ' रमी ', ' सांभा ', ' प्राईस ', ' ब्रिज ' आदी सारे खेळ थोडा वेळ बंद पडले आणि क्लबला टर्फ क्लबचे स्वरूप प्राप्त झाले. मी आपला तेथून मुकाट्याने उठलो व बाहेर वाळूवर खुर्ची टाकून

अप्पाचा गरम चहा फुंकत फुंकत पीत बसलो. पाच-सहा दिवस त्या मोगल एम्परने क्लबचे सारे वातावरण बिघडून टाकले होते. मंडळी पत्ते खेळायला बसली, की कोणीतरी हळूच 'भाग्यश्री'चे नाव काढून चावटपणा करायचा आणि मग 'मोगल एम्पररचे' अभिमानी खवळून उठायचे. जणू काय तेच पांडूच्याऐवजी त्या घोड्यावर बसले होते.

पत्त्यात मला तेवढेसे गम्य नसले आणि ज्याला 'कार्डलक' म्हणतात ते 'लकही' नसले तरी क्लबचा मेंबर या नात्याने मी कधी आठ-पंधरा दिवसांनी सायंकाळी क्लबवर जाऊन मित्रांच्या आग्रहास्तव चार डाव खेळत असतो. आठवडा-पंधरवड्यातून एकदा किंवा दोनदा सायंकाळी ७ ते ८ पर्यंत माझी हजेरी लागत असते. मिळाले खेळायला तर ठीक, नाहीतर अप्पाचा चहा घ्यायचा आणि चार गोष्टी करून परत यायचे. डॉक्टरच्या सांगण्याप्रमाणे तेवढेच मैल-दोन मैल पायी चालून होते आणि पोट कमी होत असल्याचे समाधान वाटते. सकाळी लवकर उठून पर्वतीला जाण्याचा निर्धार कधीच पार पडू शकत नसल्याने किमान जिमखाना तरी गाठण्याचा प्रयत्न मी करतो. शरीराला व्यायामाची गरज आहे हे पटत असूनही वेळेच्या अभावी मैदानी आणि मर्दानी खेळ खेळण्यापासून अलीकडे वंचित रहावे लागते. शाळा-कॉलेजमध्ये असताना हॉकी, टेनिस खूप खेळलो. पावसाळा सोडून पाण्यात मनसुराद पोहलो, पण अलीकडे दहा-पंधरा वर्षांत सारे-सारे काही बंद करावे लागले आणि पेन्शनरांचे पत्ते हाती आले. बरे, आता पत्ते खेळायचे म्हटले तर कोणी ब्रिज खेळायला सहसा तयार होत नाही. 'रमी' किंवा 'पोकर'वर उड्या फार. कारण 'स्टेक्स' शिवाय वेळ खर्च करण्याची कोणाची तयारी नाही! 'रमी' खेळायची म्हटले तर 'हुषारी' हवी आणि लकही हवे. यांपैकी एकाचीही माझ्यावर मेहेरनजर नसल्याने मी बहुधा बकरा बनण्याचीच कामगिरी पार पाडतो. म्हणूनच मी एखाद्या आठवड्यात क्लबवर गेलो नाही, की तेथील मित्रांना चुकल्या चुकल्यासारखे वाटते, कारण त्यांची हमखास कमाई बुडते. त्या दिवशी त्यांचे 'ड्यूज' देऊन मी बाहेर पडलो व खुर्चीवर चहा पीत बसल्या-बसल्या 'भाग्यश्री'चा विचार करू लागलो.

तसे पाहिले तर पत्त्यापेक्षा रेसच्या घोड्यांचा आणि माझा फार लवकर संबंध आलेला. वयाच्या चोविसाव्या वर्षी मी रेसमध्ये तज्ज्ञ बनून गेलो होतो. लोक मला 'टिप्स' विचारायला येत. माझे अंदाज बरोबर ठरल्याबद्दल माझे अभिनंदन करीत. टॅक्सीतून रेसकोर्सवर जाऊन जेव्हा मी पहिल्या वर्गाच्या आवारात ऐटीत वावरत असे आणि हातात रेसचे पुस्तक घेऊन त्यावर पेन्सिलने

खुणा करीत असे, तेव्हा बडयाबडयांना माझा हेवा वाटत असे. हे एवढेसे 'पोर' रेसेसचे एवढे दर्दी कसे बनले, याचे त्यांना आश्चर्य वाटत असे. ओनर्सचा आणि माझा परिचय, जॉकीचा आणि माझा परिचय, बुकीचा आणि माझा परिचय अनेकांना विस्मयजनक वाटे. एकदा तर एक मोठा 'पंटर' माझ्याजवळ येऊन मला विचारू लागला की, 'तिसऱ्या रेसमध्ये ट्रिबल इव्हेन्ट पूलसाठी कोणता 'विन' घ्यावा?' मी त्याला छातीठोकपणे सांगितले की, 'लालाजी' घ्या. घोडयाची तयारी चांगली आहे आणि 'शिवा' जॉकी पण हुषार आहे. त्यावर त्याने विचारले की, 'तुम्ही किती खेळणार?' मी म्हटले, "माझे ज्योतिषासारखे आहे. दुसऱ्यांचे भविष्य सांगून त्यांना फायदा करून द्यायचा. स्वतःचे भविष्य मात्र घडविण्याची ताकद नाही. 'लालाजी'वर हवे तेवढे पैसे मिळू शकतील. पण त्यावर लावायला माझ्याजवळ दहा रुपयेही नाहीत. मी रेस खेळण्यासाठी नाही येत, तर पहाण्यासाठी येतो. येथे आल्यावर चांगले घोडे पहायला मिळतात, चांगली माणसे पहायला मिळतात आणि चंचल लक्ष्मीच्या महाप्रतापाने धनिकांचे गरीब झालेले डोळयाला दिसू शकतात."

माझे हे जीवनविषयक तत्त्वज्ञान ऐकायला त्याला कोठे वेळ होता? तो 'वाळवेकर' बुकीकडे गेला आणि त्याने ५०० रु. 'लालाजी'वर लावले. त्या दिवशी लालाजी जिंकला आणि त्या गृहस्थाला १५०० रुपये मिळाले. कारण लालाजी १ : ३ चालला होता. महालक्ष्मी रेसकोर्सवर तर या घोडयाने १० रुपयांना १२० रुपये दिले होते. त्या वेळी सहज कुतूहल आणि लालाजीबद्दलचे आकर्षण म्हणून मी भागीत २॥ रु. खेळलो होतो. त्याबद्दल मला ३० रुपये मिळाले. सर्वात शेवटी पॅडॉकमध्ये येऊन घामाने निथळणारा हा घोडा रेस सुटल्याबरोबर जो वाऱ्यासारखा निघायचा, तो विनिंग पोस्टपर्यंत एकाही घोडयाला जवळ ठरू नाही द्यायचा!

त्या दिवशी त्याच्याबरोबर 'मायलक' घोडा होता आणि 'माय फेव्हरिट लेडी' पण होती. या फेव्हरिट लेडीने अनेक वेळा घोटाळा केल्याचे मी पाहिले होते. घोडे मैदानावर गेले की प्रेससाठी राखून ठेवलेल्या जागेवर जाऊन मी घोडयांचे धावणे व्यवस्थितपणे पाहात असे. ही जागा जज्जेसच्या अगदी जवळ असल्याने विनिंगचा क्षण चांगला दिसत असे. ज्या घोडयावर पैसे लावले असतील तो घोडा जिंकावा म्हणून खूप आरडाओरड चालत असे. 'कम ऑन माय फेव्हरिट लेडी' म्हणून एखाद्या सुंदरीकडे बघायला काही कलंदर कमी करत नसत. दुर्बिणीतून घोडे अगदी जवळ दिसत असल्याने लालाजीने फेव्हरिट लेडीला मागे टाकून मायलकवरही मात केली, असे कित्येक

जण पाहता पाहता मोठ्याने ओरडू लागले, की मोठी मजा येत असे. घोडे बेंड वरून होमस्ट्रेचवर आले, की शौकिनांचा श्वासोच्छ्वास जोरात सुरू होत असे. आणि अखेर पंधरा-वीस घोड्यांत एकच घोडा विन येत असल्याने शेकडोंचे चेहरे पाहण्यासारखे व्हायचे. वृत्तपत्राचा प्रतिनिधी म्हणून रेसेस् कव्हर करता करता मी दर्दी होईन अशी मला कल्पना नव्हती. घोड्याचे वय, वजन, त्याचे आई-बाप यांची तर मला माहिती असेच, पण त्याचा ड्रॉ नंबर लकी कसा, घोडा-जॉकी कॉंबिनेशन महत्त्वाचे कसे, स्क्रॅच करण्याचे प्रयोजन काय आणि आज चौथा आलेला पुढच्या वेळेला विन का होणार हे मी धडाधडा सांगत असे. मात्र १० वर्षे रेसकोर्सवर जाऊनही मला कधीही दोन पैसे ( 'लालाजी' वरील ३० रु. सोडले तर ) मिळाले नाहीत. कारण माझे नशीब वेताबाताचे आणि इन्व्हेस्टमेंटची कुवत शून्य. निर्मलदीप, लिमिट अॅण्ड लिमिट, रॉकली, प्रिन्स प्रदीप, छोटा नवाब, शहेजादी, व्हाईट फ्लॉवर, कमल, रोझ, प्रिन्सेस मुमताझ, ताजमहाल, कुतुबमिनार, एल् मोरोक्को, नेटिव्ह डान्सर ऑर्डेन्ट होप, ऋषीकेश, अलबशीर, झिंदाबाद ही सारी नावे मी झोपेत देखील बरोबर सांगत असे. महालक्ष्मीची एवढी माझ्यावर कृपा होती, पण लक्ष्मीचा वरदहस्त काही कधी लाभू शकला नाही. तथापि एक चांगला 'गेम', खेळांचा राजा मी जवळून पाहिला, त्याचा आनंद मनसोक्त लुटला.

इंडियन ब्रीडच्या घोड्यात गेल्या काही वर्षांत खरोखर काही घोडी फारच चांगली निपजली आणि त्यांनी रेसचे मैदान गाजविले. पूर्वी अरब आणि इंग्लिश घोडे असत आणि या घोड्यांवर हिंदी संस्थानिक हजारो रुपये खर्च करीत. १९४४–४५–४६–४७ या चार वर्षांत वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबच्या रेसेस् अगदी टॉप फॉर्ममध्ये होत्या बडोदे, ग्वाल्हेर, काश्मीर महाराजांच्या तगड्या घोड्यांनी रेसशौकिनांची तबियत खूष ठेवली होती. त्याखेरीज हबीब छोटानी पालेकमेडी, मिरज, कोल्हापूर, देवासचे घोडेही चांगलेच तयार होते. ट्रेनर्सपैकी मेजर लाड, मेजर जाधव, मेजर पटेल, बायरन, शिंदे, इराणी, छोटानी, तालिब आर्दीनी आपल्या एंट्रीजनी रेसच्या खेळाला और मजा आणली होती. त्या वेळी खरोखर वाटायचे की, रेस हा एक जसा जुगार आहे तसा उद्योगधंदाही आहे, आणि त्यात क्रीडाशौक आणि क्रीडा-नैपुण्यही आहे. 'इंडियन डर्बी', 'इंडियन ओक्स', 'एक्लिप्स स्टेक्स', 'इंडियन सेंट लीजर', इंडियन १००० गिनीज, राजपिपला गोल्ड कप, वाडिय गोल्ड कप, छत्रपती राजाराम गोल्ड कप ही जी रेसेसची आकर्षणे होती आणि त्यासाठी २१ ते ५५ हजारांपर्यंत जी बक्षिसे होती ती मिळविण्यासाठी संस्थानिकांमध्ये जी चुरस लागायची ती पहाण्यासारखी असे. बडोदा आणि

जण पाहता पाहता मोठ्याने ओरडू लागले, की मोठी मजा येत असे. घोडे बेंड वरून होमस्ट्रेचवर आले, की शौकिनांचा श्वासोच्छ्वास जोरात सुरू होत असे. आणि अखेर पंधरा-वीस घोडयांत एकच घोडा विन येत असल्याने शेकडोंचे चेहरे पाहण्यासारखे व्हायचे. वृत्तपत्राचा प्रतिनिधी म्हणून रेसेस् कव्हर करता करता मी दर्दी होईन अशी मला कल्पना नव्हती. घोडयाचे वय, वजन, त्याचे आई-बाप यांची तर मला माहिती असेच, पण त्याचा ड्रॉ नंबर लकी कसा, घोडा-जॉकी काँबिनेशन महत्त्वाचे कसे, स्क्रॅच करण्याचे प्रयोजन काय आणि आज चौथा आलेला पुढच्या वेळेला विन का होणार हे मी धडाधडा सांगत असे. मात्र १० वर्षे रेसकोर्सवर जाऊनही मला कधीही दोन पैसे ( 'लालाजी 'वरील ३० रु. सोडले तर ) मिळाले नाहीत. कारण माझे नशीब बेताबाताचे आणि इन्व्हेस्टमेंटची कुवत शून्य. निर्मलदीप, लिमिट अँण्ड लिमिट, रॉकली, प्रिन्स प्रदीप, छोटा नबाब, शहेजादी, व्हाईट फ्लॉवर, कमल, रोझ, प्रिन्सेस मुमताझ, ताजमहाल, कुतुबमिनार, एल् मोरोक्को, नेटिव्ह डान्सर ऑर्डेन्ट होप, ऋषीकेश, अलबशीर, झिंदाबाद ही सारी नावे मी झोपेत देखील बरोबर सांगत असे. महालक्ष्मीची एवढी माझ्यावर कृपा होती, पण लक्ष्मीचा वरदहस्त काही कधी लाभू शकला नाही. तथापि एक चांगला ' गेम ', खेळांचा राजा मी जवळून पाहिला, त्याचा आनंद मनसोक्त लुटला.

इंडियन ब्रीडच्या घोडयात गेल्या काही वर्षांत खरोखर काही घोडी फारच चांगली निपजली आणि त्यांनी रेसचे मैदान गाजविले. पूर्वी अरब आणि इंग्लिश घोडे असत आणि या घोडयांवर हिंदी संस्थानिक हजारो रुपये खर्च करीत. १९४४–४५–४६–४७ या चार वर्षांत वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबच्या रेसेस् अगदी टॉप फॉर्ममध्ये होत्या बडोदे, ग्वाल्हेर, काश्मीर महाराजांच्या तगडया घोडयांनी रेसशौकिनांची तबियत खूष ठेवली होती. त्याखेरीज हबीब छोटानी पालेकमेडी, मिरज, कोल्हापूर, देवासचे घोडेही चांगलेच तयार होते. ट्रेनर्सपैकी मेजर लाड, मेजर जाधव, मेजर पटेल, वायरन, शिंदे, इराणी, छोटानी, तालिब आदींनी आपल्या एंट्रीजनी रेसच्या खेळाला और मजा आणली होती. त्या वेळी खरोखर वाटायचे की, रेस हा एक जसा जुगार आहे तसा उद्योगधंदाही आहे, आणि त्यात क्रीडाशौक आणि क्रीडा-नैपुण्यही आहे. ' इंडियन डर्बी ', ' इंडियन ओक्स ', ' एक्लिप्स स्टेक्स ', ' इंडियन सेंट लीजर', इंडियन १००० गिनीज, राजपिपला गोल्ड कप, बाडिय गोल्ड कप, छत्रपती राजाराम गोल्ड कप ही जी रेसेसची आकर्षणे होती आणि त्यासाठी २१ ते ५५ हजारांपर्यंत जी बक्षिसे होती ती मिळविण्यासाठी संस्थानिकांमध्ये जी चुरस लागायची ती पहाण्यासारखी असे. बडोदा आणि

ग्वाल्हेरचे स्टेबल्स ( तबेले ) मोठे होते. काश्मीरच्या महाराजांचे घोडेही संख्येने आणि दर्जाने भारी होते. बडोद्याच्या घोडयांचे ट्रेनर न्यायरत्न पटेल आणि ग्वाल्हेरचे जाधव–लाड, बडोद्याकडील इंग्रज जॉकी ई ब्रिट आणि ग्वाल्हेरकडील जॉकी रॉबर्ट्स यांनी वेस्टर्न इंडियात नाव गाजविले आणि रेसशौकिनांचा विश्वास संपादून त्यांना पैसे मिळवून दिले. तीच गोष्ट काश्मीरचे महाराज हरिसिंह यांच्याकडील जोन्स आणि बर्न या जॉकींची. पार्टिंग गिफ्ट आणि रिमेंब्रन्स ही नावे मला अजूनही आठवतात. त्याचप्रमाणे ग्वाल्हेरचा 'रिन्टिन्टिन्', बडोद्याचा 'जयविलास', छोटानींचा 'पोस्ट टू पोस्ट', भोपटकरांचा 'बाजीराव' ही नावे रेसशौकिन विसरू शकणार नाहीत.

त्या वेळी एकेकाचे तीन-तीन घोडयांचे ब्रॅकेट्स असत आणि एका रेस-मध्ये २०–२५ घोडे पळत. त्यांची नावे आणि ब्रॅकेट्स लक्षात ठेवायचे म्हणजे पंचाईत पडत असे. इंडियन जॉकीज् अगदीच मर्यादित संख्येने असल्याने ते चटकन् लक्षात रहात. पण ब्रिट, रॉबर्टस्, जोन्स, बर्न, सिब्रिट यांच्यात घोटाळा होई. त्या वेळी पांडू खाडे, शामू चव्हाण, खीमसिंग, दामोदर आदी हिंदी जॉकींनी नुकतीच सुरुवात केली होती. पांडू मात्र पहिल्यापासून हुषार. त्याचे नशीबही बलवत्तर. १९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रेसेसकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन बदलू लागला आणि संस्थाने पुढे विलीन झाल्याबर राजे-महाराजांना घोडयांची मोठी 'स्ट्रिंग' ठेवणेही जड जाऊ लागले. त्यामुळे परदेशी जॉकी हळूहळू सोडून गेले आणि पांडू व शामूचा भाव वधारला. ग्वाल्हेर व बडोद्याने त्यांना जवळ केले. पुढे बडोदे रेसेसमध्ये गळाल्यावर ग्वाल्हेरकरांकडे बरेच हिंदी जॉकी चांगले तयार झाले. पांडूला तर एकदा इंग्लंड व ऑस्ट्रेलियात घोडयावर बसायचे निमंत्रण आले व तो तिकडे जाऊन आपले कसब दाखवून आला. इंग्लंडमधील ईप्सम–डर्बी रेस, त्या रेसमध्ये पळणारे घोडे आणि त्या घोडयावर खेळले जाणारे हजारो पौंड यांची माहिती वाचली, की रेसचा हा शौक इंग्लंडने किती पुढे नेला आहे याची कल्पना येऊ शकते. अमेरिकेच्या केंटकी डर्बीने तर पैसे लावण्यात व मिळण्यात रेकॉर्ड केले आहे. या रेसमध्ये २ लक्ष डॉलर म्हणजे दहा लाख रुपये मिळविणारे महाभाग तेथे होऊन गेले आहेत. आपल्याकडे पैसे लावण्याची मर्यादा, जवळ पैसे असण्याचीही मर्यादा असल्याने एवढा मोठा व्यवहार होत नाही. बुकीही चार-पाच हजारापेक्षा जास्त पैसे घेत नाहीत. 'लान्स कॉर्पोरल' या घोडयावर एकदा एक गृहस्थ एवढा फिदा झाला होता की, त्याने १ लाख रुपये लावण्याची तयारी दर्शविली. पण बुकींनी नकार दिला. यात घोडयावर प्रेम आहे, क्रीडेचा शौक आहे आणि जुगार तर निश्चित आहे. जुगाराला ( Gambling ) देश-प्रदेश, जात, धर्म,

वय, लिंग आदि मर्यादा ठाऊक नाहीत. Gamble for love प्रमाणे Gamble for horse देशादेशांत दिसून येत आहे. म्हणूनच रेसच्या इतिहासाला ३००–४०० वर्षे होऊन गेली आहेत. महाराष्ट्रात रेसवर संक्रांत येण्याचे मध्यंतरी घाटत होते पण त्यांतून रेस बचावून तूर्त तरी कशीबशी रखडत पुढे चालली आहे. जोवर रेसद्वारे जबर कर मिळत आहे तोवर सरकार बंदीच्या निर्णयापर्यंत येईल असे वाटत नाही.

आता घोडे कमी आणि खेळणारेही कमी. 'फोरकास्ट' पूलपर्यंत रेसेसला उतरती कळा प्राप्त झाली. वीस वर्षांपूर्वी महालक्ष्मीच्या मैदानावर बसून रेस पहायची म्हटले तर किती आल्हाददायक आणि मजेशीर वाटायचे. सिनेमाला जाऊन २॥ रु. आणि २॥ तास घालविण्यापेक्षा महालक्ष्मीवर जाऊन हजारो लोकांचे दौडत असणारे नशीब पाहण्यात आणि क्षणात लक्षाधीशाचा भिक्षाधीश आणि भिक्षाधीशाचा लक्षाधीश पाहण्यात कितीतरी मजा असे. झिरझिरीत वस्त्रांनी विभूषित झालेल्या आणि रंगरंगोटीने नटलेल्या त्या शेकडो ललनांची नाजूक हालचाल पाहताना तसेच घोड्यांच्या गतीबरोबर श्वासोच्छ्वासाची त्यांची वाढणारी गती पाहताना, माणूस स्वतःला विसरून जात असल्यास नवल नाही. पुण्याहून सुटणारी ती रेसस्पेशल, तिच्यात जेवण्याचीखाण्याची खास व्यवस्था आणि रेसकोर्सचे एंट्रीसह मिळणारे रिटर्न तिकीट हे एक पूर्वी रेसचे वैशिष्ट्य होते. इंग्रज गेले आणि संस्थानिकही सामान्य झाले. त्यामुळे रेसही आता अगदीच सामान्य बनू लागली आहे. आता तेथे असते ५–५० रुपयेवाल्यांची गर्दी आणि चिडून दंगल करण्याची वृत्ती. आता 'टोटलायझरवरील आकडे फारसे वेगाने फिरत नाहीत, की बुकीचा 'आय पे १ : ५ फॉर पौंटिंग गिफ्ट' हा आवाजही येत नाही. ललनांची संख्या कमी दिसते आणि बेटिंग तर भागीदारीतच अधिक होत असल्याचे पहावयास मिळते. फर्स्टमध्ये ५ रुपयांत बेटिंग करण्यापर्यंत वेळ आल्यावर रेसेसचे आयुष्य ५–१० वर्षांत संपुष्टात येणार की अशी शंका वाटू लागते.

असे होणार असेल तर पांडू वेळेवर निवृत्त झाला असेच म्हणावे लागेल. काही वर्षे त्याने 'एम्परर'च्या रुबाबात रेसकोर्सवर हालचाल केली. पण त्याच्या भाग्याने ऐनवेळी दगा देऊन त्याला बाद केले. पांडूचा ज्यांचा जवळून परिचय असेल त्यांना परवाच्या प्रकरणाबद्दल जरूर हळहळ वाटेल. असे कसे झाले? पांडूने 'मोगल एम्परर'ला मुद्दाम तर मागे ठेवला नसेलना? मग फोटोमध्ये तो 'होमस्ट्रेच'पर्यंत इतका मागे कसा? भाग्यश्रीबद्दलचा त्याचा अंदाज एवढा कसा चुकला? अखेर रेसच्या जुगारात पांडूची भाग्यश्री

कमी पडून 'भाग्यश्री' घोड्याने त्याला जॉकीच्या विजयी जीवनातून उठविले हा दैवदुर्विलास म्हणायचा !

चॅंपियन जॉकी पांडू खाडे यापुढे मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर किंवा पुण्याच्या रेसकोर्सवर बहुधा दिसणार नाही. 'मोगल एम्परर' प्रकरणी टर्फ-क्लबने त्याला कठोर शासन केले आणि पांडूनेही मनाशी निर्णय घेतला असावा की, यापुढे शर्यतीच्या घोड्यावर बसायचे बंद करून आपले उर्वरित आयुष्य शेतीत आणि सामाजिक कार्यात घालवावयाचे. 'भाग्यश्री'ने पांडूला दगा दिला आणि 'पंटर्स'चा आवडता पांडू मैदानाला मुकला ! पांडूचे रेसिंग-मधील 'जॉकी' या नात्याने वैभव आणि भाग्य ज्यांनी पाहिले असेल त्यांना पांडू-प्रकरणी हळहळ वाटल्याशिवाय राहिली नसेल. पॅडॉकमध्ये पांडू आपल्या माऊंटवर बसून घोड्याची तयारी दाखवू लागला, की अनेक पंटर्स पळत जाऊन त्याच्या घोड्यावर पैसे खेळत असत. कारण त्यांना त्याचा पक्का भरवसा वाटत असे. घोडा मैदानावर जाताना 'बक अप पांडू' आणि मैदानावर परतताना 'शाबास पांडू' असे अनेक उद्‌गार निघत पण पांडूच्या भाग्याने गेल्या महिन्यात पांडूला दगा दिला आणि शेकडो रेसशौकिन त्याच्या मागे धावून त्याला मारण्याचा प्रयत्न करू लागले. का तर त्याच्या मोगल एम्परला 'भाग्यश्री'ने मागे टाकून रेस जिंकली आणि पांडू मोगल एम्पररसह बदनाम झाला. लोक प्रक्षुब्ध झाले आणि त्यांनी त्या दिवशीच्या रेसेस बंद पाडल्या. प. महाराष्ट्रातील रेसिंगच्या इतिहासातील तो पहिला अनपेक्षित आणि अनुचित प्रकार होता.

त्यानंतर या प्रकरणाची रेसशौकिनात आणि वृत्तपत्रात कितीतरी चर्चा चाललेली पाहावयास मिळाली. पांडूच्या बाजूने आणि उलट वादविवाद चालू असता लोक हमरीतुमरीवर आल्याचे दृश्य दिसायचे कोणी म्हणायचे की, पांडूला रेसिंगच्या क्षेत्रातून नामशेष करण्याचा कट होता, तर कोणी म्हणायचे की, ओनर, ट्रेनर आणि जॉकी या तिघांनी सहमताने आपले घोडे मागे ठेवून 'भाग्यश्री'ला संधी दिली. कारण 'मोगल एम्परर' एवढा हॉट फेव्हरिट झाला होता की, त्याचेवर विन म्हणून १० ला १० रुपये मिळाले असते. त्याऐवजी भाग्यश्रीवर स्वतःच बेटिंग करून या मंडळींनी चांगलेच पैसे मिळविले. म्हणजे रेसमध्ये लबाडी होऊन हजारो प्रेक्षकांच्या पैशांची लुबाडणूक झाली. मोगल एम्परर तसा हरला असता तर खेळणारांना तितके वाईट वाटले नसते पण बदमाषी करून त्याला ओनर-ट्रेनर-जॉकी या त्रिकूटाने हरविल्याने लोक खवळले आणि त्यांनी दंगल करून टर्फ क्लबला धडा शिकविला. महालक्ष्मी

मैदानावरील चंचललक्ष्मीला 'भाग्यश्री' कोणत्या वेळी कोठे नेईल याचा नेम राहिला नसल्याने रेसबद्दल लोकांची श्रद्धा हळूहळू कमी होऊ लागली आहे. प. भारतात १०० वर्षे (१८६४ पासून) टिकलेल्या घोड्यांच्या या शर्यतीचे भाग्य काळाच्या पोटात कसे दडलेले असेल कोणास ठाऊक !

● ● ●

## चर्चगेटचे चौफेर चमत्कार : २ :

रात्री ९ ची वेळ असेल. चर्चगेटच्या परिसरातील एका पाश्चात्य पद्धतीच्या हॉटेलात मी थोडा बुजल्यासारखा शिरत होतो आणि त्या हॉटेलच्या दारातून एक भारतीय तरुण आणि एक परदेशी तरुणी बाहेर पडत होती. दोघेहि थोडे परिचयाचे होते पण त्यांनी मला टाळण्याचा प्रयत्न केला व मी पण त्यांना टाळण्याचा प्रयत्न केला. कारण एका परदेशी वकिलातीत काम करणाऱ्या त्या तरुणीची व माझी दुपारीच भेट झालेली होती आणि त्या तरुणाला दोन तासांपूर्वी मी गरिबीवर आणि समाजवादावर चर्चा करताना ऐकले होते. म्हणूनच मला चुकवावे असे त्यांना वाटणे स्वाभाविक होते. मी त्याना चुकविण्याचे कारण म्हणजे मला त्यांच्या त्या 'आपल्याला कोणी पाहिले नाही' या आनंदावर विरजण घालावयाचे नव्हते. मी आत शिरलो आणि एका कोपऱ्यातील टेबलाशी जाऊन बसलो. हॉटेलातील वातावरण शांत आणि प्रसन्न होते. दिव्यातून प्रकाशाची व्यवस्था आणि संगीताचे ध्वनी कानी पडण्याची व्यवस्था अशी काही केलेली होती की, जणू काय आपण कुठेतरी परदेशातीलच एखाद्या हॉटेलात बसलो आहोत असे वाटावे. ऑर्डर नोंदवून घेणारी ती सुटाबुटातील व्यवस्थित माणसे, बोलण्यातील त्यांचे मार्दव आणि एकेक पदार्थ आणण्याचे व वाढण्याचे बेअररचे कौशल्य पाहिल्यावर आपण एका प्रतिसृष्टीत आहोत की काय असा भास व्हायचा. मी टेबलाशी बसल्याबरोबर माझ्यापुढे 'मेनू कार्ड' ठेवून मला काय हवे, काय नको याची चौकशी करण्यात आली. तथापि पंचविशीतील त्या देखण्या तरुणाला मला सांगावे लागले की, "जरा थांब, माझा एक मित्र यायचा आहे. तो आल्यावर देईन ऑर्डर." अदबीने "ऑल राइट सर" असे त्याने म्हटले आणि तो दुसऱ्या टेबलाकडे वळला.

तसे पाहिले तर मला हॉटेलात जायचा फारसा शौक नाही आणि कधी गेलोच तर पाश्चात्य पद्धतीची उंची हॉटेले मी टाळतो. कारण ती फार महाग

असतात आणि तेथे येणारी माणसेही फार महाग असतात. त्यांचे उंची कपडे आणि शंभराची नोट सहज मोडण्याची लीला पाहिली की, मी गुदमरून जातो. माझ्या अंगावर असतो खादीचा नेहरू शर्ट व लेंगा किंवा खादीचा पांढरा बुशशर्ट आणि पँट. दोन्हींची किंमत पंचवीस रुपयांच्या आत. मी त्या हॉटेलात जाऊन काय खाणार आणि खर्चणार? हॉटेलातील सारेच नोकरवर्ग माझ्यासारख्याला पाहून मनात नाराज होतात व त्यांचे एक टेबल एक तास अडवून बसणार म्हणून खट्टू होतात. चार–पाचशे रुपये किंमतीचे सूट पेहेरून आलेले ते पुरुष आणि नॉयलॉनच्या, सिल्कच्या उंची साड्या नेसून आलेल्या त्या तरुणी पाहिल्या, की मी मनात म्हणतो, मुंबई किती वेगळी आहे नाही? बिनबाह्यांचा, पोट उघडे टाकणारा तो पारदर्शक ब्लाऊझ, ती लिपस्टिक, गालाला लावलेला तो गुलाबी रंग, तोंडाला फासलेली भारी पावडर आणि गळ्याभोवती चोपडलेले अत्तर अशा या वातावरणात मी गुदमरून का नाही जाणार? माझ्या शेजारच्या टेबलाशी बसलेले ते दोन तरुण आणि त्यांच्या बरोबर आलेली ती युवती पाहिल्यावर मला वाटले, ही खरी जिवाची मुंबई! काय आहे आमच्या खेड्यात. ना पोटभर खायला अन्न, ना प्यायला स्वच्छ पाणी. चहा प्यायला एखादेहि चांगले हॉटेल नाही, की जिवाची करमणूक करायला सिनेमा नाही. शहरात कसे सारे काही सेवेला आहे. पैसा टाकला, की प्रत्यक्ष ब्रह्मदेव सेवेला तयार. चार माणसे आली, की शे–पाऊणशे रुपये हॉटेलात खर्च व्हायचेच. तिकडे एका कुटुंबावर महिन्याला शंभर रुपये खर्च करता येण्याची मारामार. पण त्याला कोण काय करणार! प्रत्येकाचे नशीब म्हणायचे आणि गप्पच बसायचे. कोण कोणाची पंचाईत करणार?

परमेश्वराजवळ मी प्रार्थना करीत होतो, की माझा मित्र लवकर येऊ दे आणि माझ्याकडे इतरांनी रोखून पाहण्याचे थांबू दे. कारण माझे एकटेपण प्रत्येकाला जाणवत होते. नव्हे काहीजण मनात म्हणत होते की, हा काँग्रेसवाला प्राणी येथे एकटा वेड्यासारखा का बसला आहे? चुकून तर या हॉटेलात शिरला नाही ना? ही त्यांची कल्पना पूर्णसत्य नव्हती तरी अर्धसत्य मात्र खास होती. पुण्यातील उडुपी श्रीकृष्णभवनमध्ये भजी खाण्याची किंवा 'गुडलक'च्या कासमची कोंबडी खाण्याची आवड असलेला मी मुंबईला गेलो तर जास्तीत जास्त 'पुरोहित'-मध्ये किंवा 'आराम'मध्ये जेवणार. मांसाहार करण्याची इच्छा झाली तर 'शेरे–पंजाब' निवडणार. पण 'गेलॉर्ड' किंवा 'गॉर्डन' किंवा 'रेडियो–क्लब' किंवा 'ताजमहाल' मला कसे परवडणार? एकदा माझ्या एका वडिलधाऱ्या सहकाऱ्याने मला नेले होते 'गुलमोहर'मध्ये. चौघेजण होतो आम्ही. जेवणखाण झाल्यावर बेअररने जेव्हा बिल आणले तेव्हा माझे डोळेच पांढरे झाले! ७६ रु.

बिल आणि ४ रु. टिप असे रोख ८० रु. काढून देण्यात आले. मी मनात म्हटले, एका गरीब माणसाच्या कुटुंबाचा महिन्याचा खर्च आम्ही एक तासात केला आणि शिवाय अर्धपोटीच बाहेर पडलो. कारण त्या उंची हॉटेलात 'आडवा–हात' मारणे धाडसाचेच होते. काटा–चमचा आणि सुरी पुढे आली की जेवणाची उपासमार झालीच. शिस्तीत जेवणाची ज्यांना सवय नाही त्यांची अशा हॉटेलांतून मोठी पंचाईत होते याचा मला अनुभव होता. म्हणूनच आपली 'ब' वर्गीय किंवा 'क' वर्गीय हॉटेले वेळेला बरी असे मला वाटते. आता अशा हॉटेलांतून स्वच्छता-टापटिपीचा विशेष धरबंद नसतो ती गोष्ट सोडा, पण 'भुकेला कोंडा आणि झोपेला धोंडा' या न्यायाने चहा-भजी किंवा घावन–वडा-सांबारला ही हॉटेले ठीक वाटतात. पुण्या-मुंबईत कामगार–मध्यमवर्गाला याच हॉटेलांचा आधार आणि आसरा. श्रीमंतांसाठी आहेत, 'नटराज', 'ॲम्बॅसडर', 'ग्रीन्स', 'रिट्झ्' आदी उंची हॉटेले !

पंधरा–वीस मिनिटांनी माझा मित्र प्रवेश करता झाला आणि माझा जीव भांड्यात पडला. तो खुर्चीवर स्थानापन्न होताच मघाचा तो ऑर्डरवाला आला आणि मित्राने चिकनसूप, रोल्स, फिश, सलाड, ऑईस्क्रीम, कॉफी आदी पदार्थांची ऑर्डर दिली. सारे पदार्थ त्याचे तोंडपाठ होते आणि तो हॉटेलातील खाद्यपदार्थांचा चांगला जाणकार होता. त्याचा सूट, टाय, सिगारेटकेस, ह्या केसमधील अमेरिकन कॅट सिगरेट, लायटर, सारे आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण होते. पंचवीस वर्षांपूर्वी आम्ही एका शाळेत एका बाकावर बसत होतो. त्या वेळी अभ्यासात आणि इतर साऱ्याच क्षेत्रांत अगदी यथातथा असणारा हा मुलगा पुढे एका कंपनीचा मोठा अधिकारी होईल याची कल्पना नव्हती. आज त्याला दरमहा १५००–१६०० रु. पगार मिळत आहे. शिवाय ऑफिसची गाडी व रहायला जागा. दर आठ–दहा महिन्यांनी युरोपची वारी; आणखी काय हवे ? याला नशीब नाही म्हणावयचे तर काय ? तरीहि हा मित्र लहानपणाप्रमाणे स्वभावाने सरळ व साधाच राहिला होता. त्यामुळे तो सर्वांना हवाहवासा वाटत असल्यास नवल नव्हते. माझ्याशी बोलता बोलता त्याने आजूबाजूला पाहिले आणि "हॅलो प्रकाश, हाऊ डु यु डू ?" असे विचारीत शेजारच्या टेबलाशी जाऊन त्या मघाच्या तरुणाशी हस्तांदोलन केले. त्या तरुणीनेही नमस्कार करण्याऐवजी हात पुढे करून 'शेकहॅंड' केला. मी तिच्याकडे पहातच राहिलो. मित्र गालात हसला आणि माझ्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाला, "बाबा ही मुंबई आहे. या मुंबईत लंडन आहे, न्यूयॉर्क आहे, शिकागो आहे. हॉंगकॉंग, सिंगापूर पण आहे. पैशाने येथे जगातील सारी सुखे उपभोगायला मिळतात, सारा विलास करायला मिळतो. या चर्चगेटच्या आसपास रात्री किती तरी 'विलासी ईश्वर' मजेखातर पहायला सापडतात आणि

ते एका रात्रीत मजेखातर हजारो रुपयांची सहज उधळपट्टी करतात. तू बसला आहेस ना या हॉटेलात, येथेच बघ तास दीड तासांत काय काय घडते ते. येथे कोण कोण येतात, कोणाबरोबर येतात, किती पैसे खर्च करतात हे जर पुण्याच्या लोकांनी पाहिले तर त्यांचा डोळ्यांवर विश्वास नाही बसायचा ! पण जाऊ दे, कशाला त्यांची चौकशी हवी. सूप संपवून फिशकडे वळू या. "

चर्चगेटचे नाव काढताच मला महिन्यापूर्वीच्या एका घटनेची आठवण झाली. बॉंबे सेंट्रल स्टेशनहून मी लोकलने चर्चगेटला येत होतो. गर्दी टाळायची म्हणून मी पहिल्या वर्गाचा आश्रय घेतला होता. त्या डब्यात दोनतीन पुरुष आणि एक स्त्री म्हणजे तरुणी बसलेली होती. ती एकाद्या कॉलेजात शिकत असावी असे तिच्या पेहरावावरून व हातातील पुस्तकांवरून वाटत होते. मी चर्चगेटला उतरलो तेव्हा सायंकाळचे ७ वाजले होते. रस्ता ओलांडून पलीकडील प्रुडेन्शियल कंपनीच्या इमारतीजवळ मी आलो. तेथे बसलेल्या पुस्तकविक्रेत्याच्या पुस्तकांवरून नजर टाकावी म्हणून थांबलो तो ती तरुणी माझ्याजवळ येऊन शेजारी उभी राहिली व माझ्याकडे पहात स्मित करू लागली. मी तेथून काढता पाय घेतला व एअर लाईन्स हॉटेलच्या बाजूने अेस्सो इमारतीकडे निघालो. मागे वळून पहातो तो ती तरुणी झपझप पावले टाकीत माझ्या मागोमाग येत असल्याचे दिसले. मी थोडा रेंगाळलो. ती माझ्याजवळ आली आणि हिंदीत विचारू लागली, " आप कहाँ जा रहे हो ? मैं आपके साथ आ सकती हूँ ? " हिंदी चांगले येत असूनही मला त्या प्रश्नाचा अर्थ प्रथम समजला नाही. त्या प्रश्नाचा रोख समजणे माझ्या बुद्धीपलीकडेच होते. तथापि मी स्वतःला सावरीत म्हटले, " आंपकी और मेरी पहचान तो नही है, आप मेरे पीछे क्यों पडती हो ? " " इसलिये कि मेरी कहानी मैं आपको बताना चाहती हूँ " असे म्हणून तिने डोळ्याला पदर लावण्याचे सोंग केले. तिच्या त्या जाळ्यात अडकण्यापूर्वी मी तिला नमस्कार केला आणि एका सरकारी अधिकाऱ्याशी असे वर्तन बरे नाही म्हणून तेथून सुटका करून घेतली. मला आमदार निवासात जायचे होते. इंडस्ट्री हाऊस ' जवळ आल्यावर एका पुरुषाने मला हटकले. तो म्हणाला, " क्यों भाईसाब, वह लडकी आपको क्या कहती थी ? वह बिलकुल नयी है, और उसको कुछ समझता नहीं, मैं आपको अच्छी जगह लेजा सकता हूँ. जहाँ आप अच्छी तरहसे जी बहलायेंगे " मला या साखळीची किंवा सापळ्याची कल्पना तावडतोब आली. मी त्याला सांगितले की, आमदार निवासापर्यंत चल बरोबर, मग तेथून मिळून जाऊ आपण. त्याने माझ्या बोलण्यातील रोख ओळखला व तो तेथून निसटून त्या मुलीच्या रोखाने निघाला. सुटकेचा निःश्वास सोडून मी आमदार निवासात दाखल झालो आणि 'राव' यांच्या कॅन्टीनमध्ये शिरून दोन ग्लास थंड पाणी प्यालो.

मुंबईत अशा मुली भेटतात, त्यांचे एजंट भेटतात, खिसेकापू भेटतात आणि गुंगी देऊन फसविणारे भामटे पण भेटतात. कोणावर कोणी चटकन विश्वास टाकणे धोक्याचे. मी काही बोलत नाही असे पाहून मित्र म्हणाला, अरे, बोल की जरा. गप्प का ? माला खाताना फक्त काट्याचा उपयोग करणारा तू खाण्यात बराच दर्दी झालेला दिसतोस. मी त्याला म्हटले, "मासाच काय चिकनसुद्धा मी सुरी न लावता काट्याने खाऊन दाखवितो. माझ्या वेषावर जाऊ नकोस!" माझे वाक्य आमच्या शेजाऱ्यांनी ऐकलेले असावे. त्या दोघांतील ती तरुणी माझ्यासंबंधी काही तरी बोलत असावी असे मला वाटले. मी मित्राला म्हटले, "काय रे, तुझे ते परिचित आहेत तरी कोण ?" मित्र म्हणाला, "श्रीमंत बापांची श्रीमंत मुले आहेत. काळ्याबाजारातील पैशाचे काय करायचे याची विवंचना करणारे मुंबईतील लक्ष्मीधर रोज सायंकाळी आपल्या मुलाला किंवा मुलांना शंभराची नोट देतात व ती खर्च करायला सांगतात म्हणजे तेवढेच महिन्याला ३००० रु. चे ओझे कमी झाले. जमाखर्चात न दाखविलेल्या पैशांचे काय करायचे ही कित्येक उद्योगपतींची व व्यापाऱ्यांची रोजची विवंचना आहे. नट-नट्यांकडे काळा पैसा एवढा पडला आहे की, त्यातून एखादे धरण बांधता येईल. त्या धरणाऐवजी त्यांचे ते पैसे 'नटराज', 'ग्रीन्स' किंवा 'व्हेनिस' मध्ये खर्च होत असतात. रात्रीची नृत्यगृहे मुंबईत जोरात चालू आहेत. परदेशी तरुणी येथे आणून त्यांना भरपूर पैसे देऊन अर्धनग्न नृत्यांची खैरात चालू आहे. 'अदररूम' एवढी पॉप्युलर झाली आहे की, रिझर्वेशनचा काळा बाजार होऊ लागला आहे. येथे पांढरे थोडे असून सारा काळ्यांचाच सुळसुळाट झाला आहे. ही समोरची दोन मुले अशीच एका उद्योगपतीची असून त्यांनी त्या पोरीला गमतीखातर आणली आहे. त्या पोरांना जर विचारले की, तुम्ही उद्योग काय करता ? तर ते सांगतील की, वडिलांची चिंता कमी करण्याकरिता दिवसभर मोटारी उडवून रात्री जिवाची मुंबई करीत असतो. पण पैसे उडविण्याचे कामी तुम्हांला वाईट व्यसनें नाही का लागत, असे विचारले तर ही मुले म्हणतात, चांगले आणि वाईट मानण्यावर आहे. पैसा जवळ असणारे नेहमी चांगलेच करतात, नव्हे त्यांचे वाईट झाकून जाते असा अनुभव नाही का ! पाप–पुण्याचा विचार म्हातारपणी करायचा असतो. तरुणपणी नव्हे !"

मित्राने मुंबईतील श्रीमंतांच्या मुलांच्या एकएक ज्या हकीगती सांगितल्या त्या धक्का देणाऱ्या होत्या. हॉटेलवाल्यांनी आता स्वतः मुली पैदा करून आपला धंदा वाढविला आहे आणि ही बेफिकीर मंडळी रोज शेकडो रुपयांच्या नोटा मोडून आपल्या जिवाचे चोचले पुरवीत आहेत. चर्चगेटच्या चौफेर चाललेले हे चमत्कार पाहिले की 'मदर इंडिया' अजूनही कोठे कोणत्या अवस्थेत आहे याची कल्पना येऊ शकते व कल्याणकारी राज्याचे स्वप्न या हयातीत साकार होणे

अशक्य आहे याची चिंता वाटू लागते. श्रीमंत अधिक श्रीमंत बनून गरीब गरीबच रहात आहेत. एकीकडे मलबार हिलवर आलिशान बंगले तर दुसरीकडे फूटपाथला निवारा, एकीकडे अंगावर वीतभर कापड तर दुसरीकडे पाचशे रुपयांचा सूट, एकीकडे चार आण्यांची ब्रेडभजी खाऊन भूक भागविण्याचा प्रयत्न तर दुसरीकडे २ रुपयांचे सूप असलेली १६ रुपयांची लंच पहावयास मिळत आहे. चर्चगेटला लोकल गाड्या भरभरून येत आहेत आणि त्यातून उतरलेले कारकून कचेऱ्यात जाऊन दिवसभर काम करीत आहेत. सायंकाळी थकून घरी परत गेल्यावर पुन्हा दुसऱ्या दिवशी लवकर उठून लोकल गाठण्याची चिंता रोज ग्रस्त करीत आहे. त्या चर्चगेटच्या आसपासच्या रात्रीच्या जगाची ओळख करून घ्यायला त्यांच्याजवळ कोठे आहेत पैसे आणि कोठे आहे वेळ. चर्चगेटच्या आसपास असणारे क्रॉस मैदान, ओव्हल मैदान, नरीमन पॉईंट नजिकची खुली जागा आदी ठिकाणी अंधार पडल्यावर रात्री जे चमत्कार चालतात ते पाहिले की 'हाईड पार्क मैदाना'पेक्षा मुंबईतील ही मैदाने मागे आहेत असे वाटत नाही. मुंबईच्या या जीवनाची दुसरी बाजू विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील झोपड्यात उघड्या डोळ्यांनी पहाताना आम्ही कोठे चाललो आहोत याची चिंता वाटल्यावाचून रहात नाही.

● ● ●

## कालाय तस्मै नमः । : ३ :

मुंबईची ट्राम ज्या दिवशी बंद पडली, त्याच दिवशी मुंबईला जाण्याचा आणि मुंबईत गोवालिया टँकच्या बाजूने फिरण्याचा प्रसंग माझ्यावर आला. गोवालिया टँकशी निगडित असलेल्या किती तरी स्मृतींना त्या दिवशी उजाळा मिळाला आणि गेल्या वीस-बावीस वर्षांतील ठळक घटना डोळ्यांपुढून सरसर पुढे सरकल्या. तेच ते टँकचे मैदान आणि त्या मैदानावर भरलेली काँग्रेसची ऐतिहासिक बैठक. ऑगस्ट ८ ला गांधीजींनी "चलेजाव" ची घोषणा याच ठिकाणी केली आणि सारा देश लढ्याला सज्ज झाला. गांधीजींचे त्या दिवशी मुंबईत अस्तित्व असल्याने मुंबई आघाडीवर राहिली नसल्यास नवल! गांधीजीं-सह सर्व पुढाऱ्यांना रात्रीच पकडून पुण्यास नेल्याचे ता. ९ ला सकाळी मुंबईकरांना जेव्हा समजले, तेव्हा लगेच लढ्याचे शिंग फुंकले गेले आणि गोवालिया टँकपासून गनिमी युद्धाला सुरुवात झाली. त्या दिवशी सकाळी

गोवालिया टँक मैदानावर झेंडावंदनाचा कार्यक्रम होता म्हणून सकाळीच मी तिकडे गेलो होतो. तेथील वातावरण रात्रीतून पार बदलून गेले होते. पोलिसांचा कडक बंदोबस्त आणि अश्रुधुराची पथके सज्ज असलेली पहावयास मिळाली. प्रथम कोणी आक्रमण करावयाचे या विचारात फारसा वेळ गेला नाही. कोठून तरी ठिणगी पडली आणि पोलिसांच्या लाठीहल्ल्याला सुरुवात झाली. मुंबईत मी अगदीच नवखा असल्याने एखाद्या इमारतीत आश्रय घेऊन लपावे हे काही मला जमले नाही. लाठीहल्ल्यानंतर जो अश्रुवायु सोडण्यात आला त्यात मी सापडलो आणि डोळे चोळीत चोळीत मटकन् खाली बसलो. एवढ्यात कोणी तरी वरून बादलीभर पाणी टाकले आणि मला ओलेचिंब करून त्या अश्रुधुरातून मोकळे केले. अश्रुधुरावर ‘ पाणीफेक ’ हा उपाय मला त्या वेळी प्रथम समजला. पोलिसांनी अश्रुधुराच्या फैरी झाडायच्या आणि लोकांनी पाण्याच्या बादल्या रिकाम्या करायच्या, असे किती वेळ चालले होते. अखेर पोलीस थकले आणि जमावाने पुढच्या कार्याकडे मोहरा वळविला.

ट्राम आणि बसेस बंद पाडणे, वाहतुकीला अडथळा आणणे आणि हरताळ पाडून मुंबईचे दैनंदिन सारे जीवन विस्कळीत करणे या कार्याला लोकांनी तातडीने सुरुवात केली. चालत्या ट्रामवर चढून दोरीच्या सहाय्याने तिचे कनेक्शन तोडण्याची चपळाई आणि ते धाडसी यश पाहून मला चळवळ्यांचे कौतुक वाटले. डोक्यावरील विजेच्या तारांना घासणारी ट्रामची शेंडी दूर केली, की ट्राम निर्जीव होऊन जागच्याजागी थांबायची. बसच्या पुढे पाच-पंचवीस लोक उभे राहून तिला अडवायचे, किंवा आतील उतारूंना खाली उतरायला सांगून ती ओस पाडायचे. जेथे नकार दिसेल, विरोध आढळेल तेथे काडीच्या पेटीचा उपयोग केला जायचा. सकाळी १०-११ पर्यंत मुंबईचे स्वरूप पार बदलून गेले आणि ब्रिटिशांविरुद्ध खरोखरीचा लढा सुरू झाला. या लढ्यातील आपला वाटा उचलण्यासाठी त्याच दिवशी सायंकाळी मी पुणे गाठले आणि आपल्या पुढील कामाला सुरुवात केली. त्या दिवशी दिवसभर काही ट्राममध्ये नाही बसता आले. पण सायंकाळी मात्र थोडा वेळ ट्रामचा प्रवास करून मी भायखळा स्टेशन गाठले व पुण्याला पोहोचलो.

मुंबईच्या ट्रामचे चळवळीशी आणि दंग्याशी जे साहचर्य होते ते सहजासहजी स्मरणातून जाणार नाही. ट्राम ट्राम म्हणतात ती पहावयाची असेल तर चला “ म्युझियममध्ये ” असे यापुढे म्हणावे लागणार असले आणि एक पुराणवस्तू म्हणून नवी पिढी तिचे कौतुक करणार असली तरी ज्यांनी त्या ट्रामचा वाहन म्हणून उपभोग घेतला आहे, ते त्या मुंबईच्या लाडक्या परीला कधी

विसरणार नाहीत. थोडीथोडकी नव्हे तर ९० वर्षे ट्रामने मुंबईची आणि मुंबई-करांची सेवा केली आणि मुंबईने मात्र तिला अडगळ-अडचण मानून झुरळा-सारखे झटकून टाकले. केवढी ही कृतघ्नता! पण माणसाने असे नाही काही केले तर तो माणूस कुठला! जन्मदात्या आई-वडिलांची अडगळ दूर करण्या-साठी नाना युक्त्या योजणारी माणसे ट्रामसारख्या निर्जीव वस्तूला तिची उप-युक्तता संपल्यावर कंटाळले नाही तरच आश्चर्य! मुंबई आकाराने आणि ऐश्वर्याने मोठी झाली, पण मनाने लहानच राहिली. तिने ट्रामच्या नफ्या-तोट्याचा, उपयुक्तता-अडचणीचा हिशेब मांडला आणि एके दिवशी तिला रस्त्या-वरून उचलून म्युझियमचे आवार दाखविले.

मुंबईच्या ट्रामवर जे आघात करण्यात आले ते एखाद्या प्रचंड वटवृक्षाच्या फांद्या हळूहळू तोडून मग बुंध्यावर घाव घालून तो जमीनदोस्त करण्यासारखे झाले. ट्राम उखडून टाकण्याचे प्रयत्न गेली काही वर्षे चालू आहेत. प्रथम कुलाबा, फोर्ट असे करता करता परवा अखेर शेवटचा रूटही बंद करण्यात आला आणि डोक्या-वरच्या तारा कापून आणि पायाखालचे रूळ उखडून कॉर्पोरेशनने ट्रामचा माग-मूसही मागे राहू दिला नाही. नगरपित्यांना आणि बेस्ट कंपनीला मुलांचे मन काय ठाऊक! परगावाहून मुंबईला गेलेली मुले प्रथम ट्राममध्ये बसावयाचा हट्ट धरायची. रस्त्याच्या मधोमध टाकलेल्या रुळावरून चालणारी ट्राम, तिचा तो लयबद्ध खडखड आवाज आणि कानात घुमणारा घंटानाद केवळ मुलांनाच नव्हे तर मोठ्या माणसांनाही आपल्याकडे आकर्षून घ्यायचा. मला चांगले आठवते की, मी प्रथम ट्राममध्ये बसलो ते साल १९३७ असेल. इंग्रजी पाचवीत होतो आणि मुंबई पहायला म्हणून पहिल्यांदा गेलो होतो. भायखळ्याला रे रोडवर सुंदर गल्लीतील एका जुन्या तीनमजली इमारतीत एका खोलीत छोटा पाहुणा म्हणून माझा मुक्काम होता. त्या रस्त्याला अगदी जवळपास ट्राम नव्हती, तरी पहाटेच्या वेळेस भायखळा ब्रिजवरून जाणाऱ्या ट्रामचा आवाज स्पष्टपणे ऐकू यायचा. मुंबईतील लोकांना ट्रामच्या धडधडीचा आणि खणखणाटाचा कंटाळा वाटायचा. पण माझ्यासारख्या पाहुण्याला मोठी मजा वाटायची. पुण्याची गाडी मुंबईस सकाळी ११ ला पोहोचल्यावर मी दुपारी ३ चे सुमारास जो गुंगारा मारला तो सायंकाळी ७ पर्यंत घरी परतलोच नाही. सगळीकडे शोधाशोध झाली व पोलिसापर्यंत खबर दिली गेली. पण जेव्हा मला एकट्यालाच ७ चे सुमारास सुंदर गल्लीत परतताना वडिलांच्या स्नेह्याने दुरून पाहिले तेव्हा त्यांचा जीव भांड्यात पडला. माझ्यावर रागावण्याऐवजी मी सुखरूपपणे परत आल्याबद्दल त्यांनी मला पोटभर जिलेबी खाऊ घातली व वरती मसाला दुधाची लोटी पण प्यायला दिली. मात्र हळूच सांगितले की, " मुंबईत लहान मुलाने एकट्याने फिरू

नये, भीती असते, अपघात होतात, कोणीतरी फसविते. मुंबई फार लबाड आहे, धोकेबाज आहे " हे शब्द मला अजून आठवले की, १९३७ ची मुंबई २८ वर्षांनंतरही अद्याप लबाड, धोकेबाज रहावी याचे आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही.

त्या दिवशी मी घरातून जो सूबाल्या केला तो भायखळा स्टेशनसमोर राणीच्या बागेजवळ जाऊन उभा राहिलो. प्रथम राणीचा बाग बघावा की, ट्राममध्ये बसावे असा संदेह क्षणभर निर्माण झाला. तेवढ्यात ट्रामची घंटा पण ऐकू आली आणि मी ट्राममध्ये प्रवेश करता झालो. सारेच काही नवीन असल्यामुळे कंडक्टर ' कोठे जायचे ' म्हणून हिंदीत विचारू लागताच मी गडबडलो. कारण कुठे जायचे हे माझे मलाच माहीत नव्हते. शाळेत शिकवल्या जाणाऱ्या हिंदीच्या साहाय्याने मी मोडक्यातोडक्या हिंदीत त्याला सांगितले की, " ट्राम जेथपर्यंत जात असेल तेथपर्यंत जायचे." त्याने माझ्याकडून दोन आणे घेतले आणि माझ्या हातात तिकिटे देताना चमत्कारिक हास्य केले. ट्राम दुमजली असल्याने मी साहजिक शहर उंचावरून पहाता यावे म्हणून दुसऱ्या मजल्यावर खिडकीशी बसलो. भायखळा ब्रिज सोडल्यावर ट्राम उजवीकडे वळली आणि काही वेळाने बकाली वस्तीतआली. गळ्यात रंगीबेरंगी रुमाल अडकविलेला, पान चघळत असलेला एक आडदांड रंगीला माझ्याशेजारी बसला होता. ' फोरास रोड ' म्हणून सांगितल्यावर तो मिशा पिळीत पिळीत खाली उतरला. ग्रँट रोड, गिरगाव, धोबी तलाव, बोरीबंदर, फ्लोरा फौन्टन असा मार्ग काढीत आमची बस म्युझियमपाशी आली आणि कंडक्टरने मला खाली उतरण्याची खूण केली. त्या तास-सव्वातासात मी बरीच मुंबई पाहिल्यासारखे मला वाटले. एकट्याने एवढा विक्रम केल्याबद्दल मला अभिमान वाटला व मी म्युझियमच्या आवारात प्रवेश केला. माझ्या त्या वेळच्या १५ वर्षांचे वयात मला म्युझियममधील वस्तूंचे आकर्षण वाटू शकले नाही. त्यापेक्षा राणीच्या बागेतील वाघ, सिंह, अस्वले पाहावीत असे मनाने घेतले व मी पुन्हा ट्राममध्ये पाऊल ठेवले. दादर पाटी असलेली ट्राम राणीच्या बागेवरून जाते का एवढे विचारून खात्री करून घेतली होती. राणीच्या बागेने मला खूपच रमविले आणि सात वाजता घराची जेव्हा आठवण झाली तेव्हा छाती धडधडू लागली. जीव मुठीत धरून मी बागेपुढील रस्ता ओलांडला. सुंदर गल्लीतील घर गाठले. मुंबईच्या ट्रामचा आणि माझा त्या दिवशी अशा प्रकारे प्रथम परिचय झाला आणि त्याचे स्नेहात रूपांतर झाले.

त्यानंतर अनेक वेळा ट्राममध्ये बसण्याचा योग आला. जागा नाही म्हणून मागच्या साखळीला धरून किंवा लोंबकळून प्रवास केल्याचे किंवा चालत्या ट्राममध्ये चढून कंडक्टरचे लक्ष चुकवून ट्राम थांबण्यापूर्वीच उडी टाकून फुकट प्रवास केल्याचेही मला स्मरते. यामागे आणा-दोन आणे बुडविण्याचा हेतू नव्हता, तर मुंबईकरांप्रमाणे आपल्यालाही जमते का ? जमत नसल्यास का जमू नये हे पहाण्याचा उद्देश होता. भायखळ्याला ट्राममध्ये एखादी ख्रिश्चन बाई आपल्या शेजारी बसली किंवा महंमदअली रोडला काळा बुरखा घेतलेली मुस्लीम स्त्री बसली किंवा फोर्टमध्ये एखादी गलेलठ्ठ पार्शी बाई बसली की, मला गुदमरल्यासारखे वाटे. काही वेळा केवळ 'महिलाओंके लिये' हे न वाचताच एखाद्या स्त्रीशेजारी बसण्याचा प्रमाद हातून घडे व मग कंडक्टर अदबीने जवळ येऊन दुसरीकडे बसावयास सांगत असे. अशा वेळी इतर उतारू आपल्याकडे कोणत्या नजरेने पहातात हे लक्षात आले, की खजिल झालेली मान वर काही काढता येत नसे. एकदा तर ट्रामच्या संगतीने मला चांगलेच गोत्यात आणले होते. हिंदु-मुसलमान दंग्याच्या वेळी महंमदअली रोडवरून जाणाऱ्या ट्रामवर मुसलमान ड्रायव्हर-कंडक्टर ठेवीत आणि उतारूही फक्त मुसलमान घेत. भायखळा ते क्रॉफर्ड मार्केट आणि क्रॉफर्ड मार्केट ते भायखळा या दरम्यान फक्त मुस्लीम प्रवाशीच ट्राममध्ये बसत. हे लफडे एकदा माझ्या नाही आले लक्षात आणि व्ही. टी. ला लोकल पकडण्याऐवजी मी व्ही. टी. ला ट्राम पकडली आणि तीही महंमदअली रोडने जाणारी. क्रॉफर्ड मार्केटपर्यंत मला कोणी काही बोलले नाही; पण ट्रामने महंमदअली रोडचा काही भाग मागे टाकल्यावर कंडक्टरच्या लक्षात आले की, एक हिंदू उतारू ट्राममध्ये तसाच बावळटासारखा बसून राहिला असून इतर उतारूंत त्याच्याबद्दल कुजबुज चालू आहे. तो तिकिटाच्या निमित्ताने माझ्याजवळ आला आणि त्याने मला ड्रायव्हरच्या शेजारी जाऊन उभे राहण्यास सांगितले. ड्रायव्हरला त्याने उर्दूत काहीतरी सांगितले आणि ड्रायव्हरने माझा एक हात त्याच्या त्या ट्राम कंट्रोल करण्याच्या पेटीवर ठेवण्यास सांगितला. उद्देश हा की, मी कोणीतरी ट्रामचा शिकाऊ नोकर आहे. महंमदअली रोड संपेपर्यंत जिवात जीव नव्हता. मी सारखे देवाचे नाव घेत होतो. रस्त्याच्या बाजूला उभी असलेली मुसलमान मंडळी जागजागी थांबणाऱ्या ट्रामकडे संशयितदृष्ट्या पाहू लागली, की माझ्या पोटात धस्स व्हायचे. पण त्या वेळी मला भायखळ्याचा मारुती पावला. मी सुखरूपपणे भायखळ्याला येऊन पोहोचलो.

ट्रामशी निगडीत अशा कितीतरी आठवणी त्या दिवशी मला आठवल्या आणि गोवालिया टँकवर उभा राहून त्या ९० वर्षांच्या वृद्धेला मी मनातून प्रेमाने आणि कृतज्ञतेने निरोप दिला. त्या दिवशीच्या रात्रीच्या निरोप-समारंभाला

हजर रहाण्याला माझे मन तयार नाही झाले. कारण त्यात वरवर कृतज्ञतेचा भाग होता तरी आतमध्ये कृतघ्नता पुरेपूर भरलेली होती. शेवटच्या ट्रामला हार घातला काय आणि तिची खणानारळाने ओटी भरली काय, खरे काही ढोंगीपणाचे पांघरूण होते. ९० वर्षांनंतर जिची घरातून हाकलपट्टी होणार होती त्या म्हातारीला मनातून काय वाटत असेल याची कोणी क्षीती बाळगत नव्हते. म्हातारी ट्राम म्हणत होती, "आम्ही जातो आमच्या गावा" आणि महानगरपालिका म्हणत होती, "काळ बदलला आहे, ट्रामचे युग संपले आहे, आम्ही तरी काय करणार!" मी मात्र मनात म्हटले, "कालाय तस्मै नमः" हेच खरे. आता थांबायला कोणाला वेळ आहे. ट्राममध्ये फुकट वेळ किंवा जादा वेळ घालवायला श्रीमंतांना, उद्योगपतींना, अधिकाऱ्यांना, कारकुनांना वेळ नाही. बस, टॅक्सी, लोकलने वेळ वाचतो आणि कामाचा उरक अधिक होतो. वेळ वाचतो हे खरे; पण कामाचा अधिक उरक होतो हे अर्धे खरे. जुन्याची कदर करायची नाही हे एकदा ठरल्यावर मग कारणे लागेल तेवढी. पुणेरी पगडी आणि पुणेरी जोडा जुना म्हणून काही संपूर्णपणे फेकून दिलेला नाही. हॅट आली आणि बूट आले, तरी ती पगडी, तो जोडा पुण्याचे वैभव म्हणून अस्तित्वात, वापरात आहे. मग ट्रामचा एखादा रस्ता वाहतुकीखाली ठेवला असता तर काय बिघडले असते? पण जुन्या वस्तूचा आणि परंपरेचा आम्हाला अभिमान पाहिजे ना! गोवालिया टॅंकवरून पुढे गेल्यावर मरीनड्राईव्हवरून जाताना मला अमेरिकेच्या प्रवासाची सहज आठवण झाली आणि मी मनाशी म्हटले, मुंबईचे जीवन गतिमान होत असता तिने आपले पुराणत्व अजिबात पुसून टाकलेच पाहिजे असे तर काही ठरलेले नाही ना?

सॅनफ्रान्सिस्को शहराचे दृश्य माझ्या डोळ्यांपुढे दिसू लागले. सात टेकड्यांवर वसलेले हे शहर निसर्गसौंदर्याने नटलेले तर आहेच; पण अतिशय रम्य आणि शीतल पण आहे. शहराची एक आगळीच रचना आहे आणि तेथील माणसांचाही एक आगळाच स्वभाव आहे. एक वेळ न्यूयॉर्कचा कंटाळा येतो पण सॅनफ्रान्सिस्कोचा येत नाही. चायना टाऊनमधील चिन्यांची जुनी हॉटेले जशी ५०–६० वर्षांपूर्वी होती तशीच आजही ठेवलेली आहेत. सॅनफ्रान्सिस्कोमधील ट्रामगाडी अथवा ट्रॉलीबस काही मोजक्या रस्त्यावर अद्याप धावत आहे. आधुनिक शहरातील आधुनिक लोक या जुन्या-पुराण्या वाहनात ऐटीत बसून जाताना पाहिले की, त्यांच्या पुराणप्रियतेचे कौतुक वाटू लागते. भव्य अलिशान शेवरलेट गाडीपुढे किंवा टॅक्सीपुढे किंवा बसपुढे या ट्राम गाड्या मागासलेल्या वाटत असल्या तरी त्यांना सॅनफ्रान्सिस्कोने अजूनही उखडून फेकून दिलेले नाही. जुने ते सोने म्हणून त्यांची अजूनही स्मृती म्हणून रस्त्या-

वरच जपणूक केली आहे. इतिहास व परंपरेचा हा त्यांचा अभिमान मुंबईकरांना अस्थानी वाटत असला तरी मला मात्र त्यांचे कौतुक वाटले. शेवरलेट गाडीतून उतरून त्या ट्रामगाडीत बसण्याचा मोह माझ्यासारख्या प्रवाशाला आवरला नाही, म्हणून माझे हसू होण्याऐवजी त्या म्हाताऱ्या वाहनात माझे स्वागतच झाले आणि एका वृद्ध गृहस्थाने उठून मला त्याची जागा दिली. तीन वर्षांपूर्वीची म्हणजे १९६२ मधील ही गोष्ट. मला त्या वेळी मुंबईच्या ट्रामची आणि बसेसची आठवण झाल्याशिवाय नाही राहिली.

उपयुक्तता संपल्यावर एखाद्या वृद्ध माणसाला किंवा शेतीवरील वृद्ध बैलाला आपण बाजूला करण्याचा प्रयत्न करतो तसेच या ट्रामबाबत मुंबईच्या नगरपित्यांनी केले आहे. ट्रामची ९० वर्षांची सेवा विसरून तिला म्युझियममध्ये एक प्रदर्शनीय वस्तू म्हणून ठेवली आहे. आता मुंबईच्या रस्त्यावर ट्रामचे रूळ दिसणार नाहीत, की डोक्यावरच्या विजेच्या तारा पण दिसणार नाहीत. रात्री उशीरापर्यंत व पहाटे पाच वाजल्यापासून रस्त्यावर धडधड–खडखड आवाज ऐकू येणार नाही, की घणघण घंटानाद कानात घुमणार नाही. त्या एकमजली व दुमजली ट्रामगाड्या आणि त्या चालविणारा फेटेवाला ड्रायव्हर आता पुन्हा पहावयास मिळणार नाही. मुंबई श्रीमंत झाली आणि गरिबाला विसरली. गरिबांचे वाहन तिने हिरावून घेतले. एक-दोन आण्यात संबंध मुंबईचा घडणारा प्रवास संपुष्टात आणला. आता ट्राम पहायची असेल तर म्युझियममध्ये पुराणवस्तू म्हणून ठेवलेली पहावयास मिळेल किंवा कलकत्त्याला तरी जावे लागेल. मुंबईच्या इतिहासातील ट्रामचे पान उलटले गेले आणि ट्राम इतिहासजमा झाली.

● ● ●

## रहाटगाडगे चालू आहे ! : ४ :

मुंबईतील कामे एका दिवसात संपवून सायंकाळी परतण्याच्या दृष्टीने सकाळी ६–२५ ची जनता एक्स्प्रेस सोयीची पडते; गैरसोय एवढीच की, सकाळी पाचला उठून सहाला स्टेशन गाठावे लागते व गर्दीत जागा सायासाने मिळवावी लागते. शिवाजीनगर स्टेशनवर जागेची हमी असते. पण अलीकडे जनता एक्स्प्रेसच्या शिवाजीनगर डब्याला मालगाडीच्या डब्याचे स्वरूप मिळाल्याने डब्यात चटकन् प्रवेश मिळवून आरामशीर जागा मिळविणे मुष्कील होते. शिवाजीनगरचा डबा जेथे उभा राहातो त्या जागेसमोर पाच–पन्नास भाजीची

पोती आणि बोचकी डब्यात चढविण्यासाठी तयार असतात :आणि पाऊण इंजन मध्ये अवघी हिंदीत एकमेकांची थट्टामस्करी करीत बसलेले असतात. त्या हातगाड्या, ते हमाल, ते भय्ये आणि त्यांचा तो माल पाहिल्यावर उतारूंवरील अतिक्रमणाबद्दल या लोकांचा राग येतो. उदरनिर्वाहासाठी त्यांची ती धडपड, ते कष्ट पाहिल्यावर प्रथम सहानुभूती वाटत असली तरी उतारूंच्या जागेवर ते जेव्हा ठाण मांडून बसतात आणि जा-ये करायचे जागेवर मालाचा ढीग रचून ठेवतात तेव्हा त्यांच्या त्या धसमुसळेपणाचा आणि रेल्वेच्या बेपर्वाईचा राग येऊ लागतो. तथापि केंद्रीय रेल्वेपुढे कोण काय करणार ?

खादीची पांढरी पँट, पांढरा कोट आणि हातात कातडी ब्रीफ केस पाहिल्यावर त्या दिवशी एका भय्याने मला तिकिट-चेकर समजून रामराम ठोकला. माझ्यालगत तो आला आणि हळूच सांगू लागला, "साहेब, चार डागांपैकी दोनच वजन केलेले आहेत, बाकीच्यांचे डब्यात बघू. लोणावळा सुटल्यावर मी येईन तुमच्याकडे." प्रथम मला काही उमजलेच नाही, पण नंतर लक्षात आले की, मालाच्या वाहतुकीच्या भाड्यात ही मंडळी रोज बदमाषी करीत असावीत व त्यांच्याशी तिकिट-तपासनिसाचे सूत जमलेले असावे. मी 'ठीक' म्हटले आणि गाडी प्लॅटफॉर्मवर आल्याबरोबर उडी मारून आत बसलो. खडकी स्टेशन गेल्यावर टी. सी. आला आणि तिकिट मागू लागला. मी म्हटले, "मालाला उतारूंच्या डब्यात घेता मग उतारूंना मालाच्या डब्यात का बसवीत नाही ? रोज ह्या पोत्यांचा आणि भय्यांचा त्रास किती काढायचा ? त्यांचेसाठी एक स्वतंत्र मालडबा का ठेवीत नाही ?" त्यावर तो म्हणाला, "सेंट्रल रेल्वेला वरती कळविले आहे, पण अद्याप दाद लागत नाही. भय्यांचे तकदीर आहे तोवर असेच चालायचे. जाऊ द्या, बिचारे कष्ट करून पोट भरीत आहेत." त्याच्या बोलण्यातील आशय ध्यानी आल्यावर मी तो विषय तेथेच सोडून एका भय्याशी प्रवासगट्टी केली आणि त्याला त्याच्या धंद्याविषयी माहिती विचारू लागलो.

तो म्हणाला, "पुण्याच्या फुले मंडईत रोज पहाटे माल खरेदी करून आम्ही या गाडीने मुंबईला नेतो आणि उपनगरातील आमच्या दुकानात तो विक्रीला ठेवतो. काहीजण तो किरकोळ दुकानदाराला विकून दोन पैसे लगेच मिळवितात. सायंकाळी पुन्हा पुण्याला परततो व रात्र पुण्यात काढून सकाळी मुंबई गाठतो. महिन्याच्या पासामुळे आम्हांला ते परवडते. दोन पैसे मिळतात हे खरे, पण रोजचा त्रास लक्षात घेता उदरनिर्वाहाचे हे साधन खडतरच वाटते. देशावरील उपासमारीपेक्षा हे पुष्कळ बरे. इकडचे लोक बरे आहेत म्हणून आम्ही दुधापासून भाजीपाल्यापर्यंत वेगवेगळे धंदे करू शकत आहोत. कधी खोटे बोलावे

लागते, कधी लबाडी करावी लागते. पण सारे काही पोटासाठी, पोट भरण्यासाठी. पैशाचा संचय करून श्रीमंत होण्यासाठी नव्हे."

खरे होते त्याचे म्हणणे. थंडीत कुडकुडत मंडई केल्यानंतर ती मुंबईत पोहोचवीपर्यंत हाल आणि त्रासच पदरी पडतो. चहा पी, विडी ओढ, चिवडा खा, थोडी झोप काढ असे करीत ही मंडळी दादरला पोहोचतात व मग पुढच्या मार्गाला लागतात. डब्यात माझ्याशेजारी पुण्यातील एकदोन दुकानदार माल-खरेदीसाठी मुंबईला चालले होते. त्यांच्या पलीकडे पुण्याहून रोज नोकरीसाठी मुंबईला जाणारे उतारू होते. रोज सात तास गाडीत, एक तास वाटेत आणि आठ तास कचेरीत वा कारखान्यात म्हणजे १६ तास घराबाहेर. रात्री ११ ते ५ अशी ६ तास झोप. म्हणजे दोन तास बायका-मुलांत, मित्रांत. या जीवनाला काय म्हणायचे? गाडीत वेळ जावा, कंटाळा येऊ नये म्हणून पत्ते खेळण्याचा रोजचा क्रम. लोणावळ्याला चौघांमिळून चहाचा एक ट्रे व ब्रेडबटर. चालू आहे नित्यनेम अनेक वर्षे. कर्जतला अशा मंडळींची आणखी भर. बाकावर बसायला जागा मिळत नाही. म्हणून त्यांनी लोखंडी घडीच्या खुर्च्या बनवून घेतल्या असून त्या खुर्चीवर बसून कर्जत ते मुंबई व परत मुंबई ते कर्जत असा त्यांचा रोजचा प्रवास चालू असतो. काय करणार? मुंबईत जागा नाही आणि मुंबईचा खर्च परवडत नाही. पिशवीत खुर्ची आणि छोटा डबा टाकला की झाले काम. दोन तासांचा जायचा प्रवास आणि यायचा प्रवास. गप्पागोष्टीत वेळ निघून जातो. रोज नवा नवा विषय मिळतोच चर्चेला. त्या दिवशी गोडसे-अभ्यंकर-डावरे अटकेचा विषय होताच चर्चेला. शिवाय दफ्तर-दिरंगाई आणि लाचलुचपत हा न संपणारा प्रश्न असतोच रोज चघळायला. बोलण्याचे ओघात शेजारचे पुण्याचे दुकानदार म्हणाले, "केतकरांनी बोलून घोटाळा केला. नाहीतर नंतरचे सारे काही झालेच नसते. गुपचुप बसण्याऐवजी प्रसिद्धीची हाव धरली आणि ही मंडळी गोत्यात आली." म्हणजे त्याला त्या कार्यक्रमाबद्दल खेद वाटण्याऐवजी धरपकडीबद्दल खेद वाटत होता.

तेवढ्यात दुसरा मला म्हणाला, "टी. सी. पैसे खातात म्हणून तर हे भय्ये एवढा माल थोड्या पैशांत नेतात. पण याही सद्‌गृहस्थाला भान न राहून तो म्हणाला, "परवा मी दुकानात विकण्यासाठी बॉलपेन्सची एक पेटी अशी काही युक्तीने शहरात आणली की, स्टेशनवरील जकातवाल्यांचे लक्षातच आले नाही." मी म्हटले, "अहो, ही लबाडी-फसवणूक झाली. ज्या चेकरकडे तुम्ही लाच घेतो म्हणून बघता, त्याच्याइतकेच तुम्ही पण दोषी आहात. तुमच्यांत आणि या भय्ये लोकांत काय फरक आहे? तेही उपजीविकेसाठी धंदा करीत

आहेत, कष्ट घेत आहेत आणि पचेल एवढी लबाडीही करीत आहेत. सारे येथून तेथून सारखेच. लोकलमधून विनातिकीट प्रवास करणे, हॉटेलवाल्याचा डोळा चुकवून गर्दीत बाहेर सटकणे आदी छोटे छोटे गुन्हे अशिक्षितांबरोबर सुशिक्षित नि गरिबांबरोबर श्रीमंतही करीत असतात. एवढेच नव्हे तर प्राप्तिकराच्या मोठ-मोठया रकमा चुकवून, काळा पैसा दडवून ठेवून सरकारचे व समाजाचे नुकसान करीत असतात. थांबायला वेळ नाही, एकमेकांकडे लक्ष द्यायला वेळ नाही, म्हणून बऱ्याचवेळा हे खपून जाते एवढेच !

त्या दिवशी मी दादरला उतरून भायखळ्याला गेलो. मार्केटमध्ये मला एकाला भेटायचे होते. भायखळा मार्केट म्हणजे देशाचे, समाजाचे एक वैशिष्ट्य-पूर्ण चित्र. पहाटे चारपासून रात्री दहापर्यंत गजबजून गेलेले. पुन्हा अकरानंतर आहेच ट्रक्सची आवक. महाराष्ट्रप्रमाणेच गुजरातचाही माल मुंबईत. बडोदे, सुरत, वलसाड, पार्डी-पालघरहून रोज भाजीपाल्याची आवक. पुण्यातला माल आणणाऱ्या भय्याप्रमाणेच बडोद्याहून माल आणणारे भय्ये मुंबईत आहेत. ठाणे व सुरत जिल्ह्यांत तर त्यांची रोज ये-जा. पापडी, सुरण, घेवडा, आंबा आणि चिक्कू मुंबईइतका कोठेही खपत नाही. मार्केटमधील काही दलालांकडे तर गुजरातचाच माल अधिक. रोजची दलाली शेकड्याने व माल घाऊक घेऊन किरकोळ विक्रीतही नफा शेकड्याने. रोज किमान १००-१५० रुपये मिळविणारे कितीतरी दलाल या मार्केटमध्ये आहेत. कॉफर्ड मार्केटमधील फळवाला आणि भायखळा मार्केटमधील भाजीवाला दुकानदार किंवा दलाल म्हटले, की तो जुन्नर-आंबेगाव किंवा खेड तालुक्याचा असणार. माळी-मराठे दोन्हीही. त्यांच्या पगड्या जाऊन डोक्यावर टोप्या आल्या असल्या तरी जुंदरी भाषा काही गेलेली नाही. जाकिटाच्या नाहीतर कोपरीच्या एका खिशात शे-सव्वाशेच्या नोटा आणि पाच–पन्नास रुपयांचा खुर्दा. पहाटे पाच ते दुपारी एकपर्यंत मार्केटमध्ये उभा राहणार. दुपारी घरी जाऊन जेवून झोपून चारला बाहेर पडणार आणि जागजागची वसुली करून पुन्हा रात्री मार्केटमध्ये चक्कर मारणार. भायखळ्याला तायडे, ताजणे, मेहेर, टिळेकर, ढोले आणि कॉफर्ड मार्केटला आवटे, ढोबळे, लेंडे आदी नावे जेवढी महशूर आहेत तेवढीच दानशूर आहेत. जुन्नर-आंबेगावचा त्यांनी कायापालट घडवून आणला आहे. कष्टातून पैसा आणि पैशातून सामाजिक सुधारणा असे कित्येक वर्षे चालले आहे. सातारच्या गिरणी कामगारापेक्षा या मंडळींची राहाणी, विचारसरणी अगदी वेगळी आहे. वरील दोन-चार लोकांकडे त्यांच्या आग्रहास्तव चहा घेऊन आणि माझे काम संपवून मी बाहेर पडलो व फोर्ट विभाग गाठला.

फोर्टमधील मी माझी कामे करीत असता त्या दिवशी मधूची आणि

माझी अचानक भेट म्हणजे कपिलाषष्ठीचा योगच म्हणायचा. बँक ऑफ महाराष्ट्राच्या हमाम स्ट्रीटवरील शाखेतून मी बाहेर पडलो आणि पोटात दोन घास घालावेत म्हणून पलीकडच्या अपोलो स्ट्रीटवरील इराण्याच्या हॉटेलात शिरलो. लंच टाईम असल्याने जेवणारांची ही गर्दी त्या हॉटेलात होती. एका टेबलाशी एक जागा कशीबशी मिळवून मी ' लाईट लंच ' घेतली आणि दोन ग्लास थंड पाणी पिऊन बाहेर पडू लागलो, तेवढ्यात मधू आत शिरून एका टेबलाशी बसत असल्याचे दिसले. कितीतरी वर्षांनी आम्ही एकमेकांना भेटत होतो. त्याला पाहिल्यावर मला जेवढा आनंद झाला तेवढाच त्यालाही झाला. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात सात वर्षे आम्ही केवळ एका वर्गातील एका तुकडीतच नव्हे तर एका बाकावर बसून काढली होती. शाळा सुटल्यावर एस्. पी. च्या ग्राउंडवर क्रिकेटही भरपूर खेळलो होतो. आठवड्याच्या परीक्षेत आणि तिमाही-सहामाहीत एकमेकांना पुरवणीतील प्रश्न दाखवून मदतही केली होती. रविवारी मधूच्या घरी जाऊन कांदापोहे—लाडूवर कितीतरी वेळा आडवा हातही मारला होता. तथापि मॅट्रिकनंतर त्याने वेगळा मार्ग स्वीकारला आणि मी वेगळ्या मार्गाला लागलो. मधू पुढे अमेरिकेला गेला मोठा होऊन परत आला. त्याचे लग्न झाले, सासरे गरवारे यांच्याकडे तो मोठा अधिकारी झाला. येथपर्यंत मी त्याच्याबद्दल ऐकले होते. पण गेल्या आठ—दहा वर्षांत मला त्याच्याबद्दल काहीच समजले नव्हते. गरवारे यांच्याकडून तो दुसऱ्या एका गुजराती मशिनरी कंपनीत गेल्याचे मात्र ऐकले होते. आता तो प्रत्यक्ष माझ्यापुढे उभाच होता.

" मधू ! कायरे आपले जीवन. एकमेकांची गाठभेट होऊ नये एवढे आपण कामाचे गर्दीत आणि व्यापात. तू पुण्याला येतोस आणि मीही अधून-मधून मुंबईला येतो, पण पाच मिनिटे एकमेकांची भेट घेण्याची किंवा होण्याची मारामार. फरासखाना बोळातील चंद्रचूडांचा वाडा लांब होता तरीही मी तुझ्याकडे येत असे आणि आता तुझी ती पाह्याभाई पटेल कंपनी हमाम स्ट्रीटच्या जवळ असूनही तुझी-माझी भेट होऊ नये हे आश्चर्य नव्हे का ! पण जाऊ दे. आता पुण्याला केव्हा येणार ? मुलं-बाळं किती आहेत, मुंबईत राहायला कोठे आहेस, वडील कोठे आहेत ?" आदी प्रश्न मी भराभर विचारीत होतो आणि तो शांतपणे उत्तर देत होता. त्याचा लहानपणापासूनचा तो शांत व अघळपघळ स्वभाव कायम होता. अमेरिकेतील शिक्षणाचा वा वास्तव्याचा त्याच्यावर शिष्टपणाचा संस्कार काही होऊ शकलेला नव्हता. मधूच्या पेडर रोडवरील घरी एकदा जायचे कबूल करून मी त्याचा निरोप घेतला आणि माझ्या पुढील कामासाठी हॉटेलच्या बाहेर पडलो. मुंबईतील त्या यांत्रिक जीवनाचा पदोपदी प्रत्यय मला नकोसा झाला होता. सारीच घाई—गर्दी आणि गडबड. शांतता—स्वास्थ्य म्हणून नाही. पुण्याच्या

स्टेशनवर मुंबईच्या गाडीत पाऊल ठेवल्यापासून तो पुन्हा पुणे स्टेशनवर परत येईपर्यंत एका वेगळ्या जीवनाचा व एका वेगळ्या जगाचा अनुभव घ्यावा लागतो व त्यात गुदमरून जाणारा जीव पुण्यात पोहोचल्यावर भांड्यात टाकावा लागतो. व्ही. टी. स्टेशनवर उतरले की टॅक्सी, बस, लोकल यांच्या मदतीने वेगवेगळी ऑफिसे गाठावी लागतात. दुपारी १५-२० मिनिटे सवड काढून एखाद्या हॉटेलात दोन घास पोटात ढकलावे लागतात आणि साडेचार पाच वाजले की, पुन्हा व्ही. टी. गाठावे लागते. दर खेपेला, दर महिन्याला दरवर्षी तेच तेच जीवनाचे ते एक रहाटगाडगे बनले आहे.

परतताना डेक्कन क्वीनमधील ते नेहमीचे दृश्य डोळ्यापुढे उभे राहिल्यावर जनता एक्सप्रेस, भय्ये, भाजी, कर्जतचे ते रोजचे नोकरीवाले प्रवासी, भायखळा मार्केट, फोर्टमधील धांदल–गडबड, मधू, त्याची नोकरी, शाळेतील ते दिवस, एकमेकांच्या व्यापामुळे वर्षानुवर्षे गाठ न पडू शकणारे इतर मित्र यांची पुन्हा आठवण झाली. डेक्कन क्वीन जशी गेली अनेक वर्षे रोज न चुकता मुंबईस जाते व परत येते, त्यात कधी खंड नाही, तसेच मानवी जीवनाच्या रहाटगाडग्याचे चालू आहे. कोणी भाजीच्या धंद्यासाठी, कोणी स्टेशनरी-कटलरी दुकानाच्या मालासाठी, कोणी व्यापारधंद्यासाठी, कोणी राजकीय वा सरकारी कामासाठी अथवा माझ्यासारखा पत्रकार आपल्या वृत्तपत्राच्या गरजांसाठी प्रवास करीत असतो, धावपळ करीत असतो, धडपडत असतो. सारेच जीवन प्रवासी. हा प्रवास किती दिवस आणि कसकसा चालणार आहे याची कुणालाच निश्चित कल्पना नाही. तथापि त्यात क्षण–दोन क्षण विरंगुळ्याचे-सुखासमाधानाचे लाभत नाहीत हे खरे शल्य आहे. वडील–मुलाची, भाऊ–बहिणीची, मित्र–मित्रांची वर्षानुवर्षे गाठभेट होत नाही. चारदोन तास शांतपणे बसून एकमेकांचे कुशल विचारता येत नाही हे खरे दुःख आहे. गतिमानता हा आजचा परवलीचा शब्द झाला आहे आणि स्वत्व, स्वावलंबित्व, विकसित व्यक्तिमत्व हा धर्म बनला आहे. म्हणूनच भाजीवाल्यापासून फ्रिजिडियरच्या व्यापाऱ्यापर्यंत कोणाला कोण हसणार आणि त्यातून काय निष्पन्न होणार? जाऊ द्या, जो तो "पोटासाठी धडपडत आहे" हेच खरे.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ..................... वि: ..................
क्रमांक ..................... नों. दि. ..................

— ३ —

# आपण कोठे चाललो आहोत ? : १ :

एस्. एम्. जोशी गौरव-ग्रंथ चाळीत असता श्री. रावसाहेब पटवर्धन यांच्या 'आपण कुठे चाललो आहोत ?' या लेखावर दृष्टी खिळली आणि तो लेख एकदा नव्हे दोनदा वाचून काढला. त्यातील काही भागांचे मनन केले आणि मनात म्हटले, 'जे विचार गेले काही दिवस माझ्या मनात घोळत होते, जे विचार जाहीरपणे वृत्तपत्रातून मांडण्याची इच्छा होती, त्या विचारांना रावसाहेबांनी एस्. एम्. गौरव ग्रंथांतून वाचा फोडली आणि माझ्यासारख्यांच्या मनात कोंडलेल्या विचारांना मोकळी वाट करून दिली यात शंका नाही.' या लेखाचे मनन करताना मी माझे विचार त्यात मिसळून पाहिले आणि त्यातून एकादे चांगले चित्र उभे करता येईल का असा प्रयत्न करून पहावयाचे ठरविले. गौरव ग्रंथ सर्वांच्याच हाती पडेल असे नाही, आणि पडला तरी रावसाहेबांच्या बहुमोल विचारांची प्रत्येकजण दखल घेईलच असेही नाही. म्हणूनच वृत्तपत्रांतून त्यांच्या विचारांचा काही अत्यंत महत्त्वाचा आणि उपयुक्त भाग उद्धृत करून लोकांपुढे विचारासाठी मांडावा या दृष्टीने येथे हा प्रपंच करायचे ठरविले आहे.

" वर्ध्याला सेवाग्राममध्ये पूर्वी गेले, की तेथे नवसमाज निर्मितीच्या समस्येचे चिंतन–मनन–संशोधन करणारे अनेक जीवनवीर म. गांधींच्या नेतृत्वाखाली

त्यांच्या अवतीभोवती एकाग्रतेने, निष्ठेने कार्य करीत असलेले दिसत. सेवाग्राम-मध्ये सतत संशोधन आणि प्रयोग चालत. कुमारप्पा, काका कालेलकर, आर्य-नायकम् यांच्या विविध कार्यांच्या मध्यभागी महात्माजी स्वतः आपली अनेकविध कार्ये अखंड चालवीत. कर्मयोगाचे हे सर्व एक ढळढळीत प्रात्यक्षिक होते. महात्मा गांधींना जाऊन एक–दीड तप उलटते न उलटते तो ही सर्व क्षेत्रे किंवा तीर्थे उध्वस्त व वैराण झालेली दिसतात !

डॉ. ॲनी बेझंट या अशाच अद्वितीय कर्मयोगिनी होऊन गेल्या. त्यांच्या कार्याची कक्षा जगभर पसरलेली होती. साऱ्या जगातून हजारो सत्प्रवृत्त स्त्रीपुरुष त्यांचे शिष्य बनले होते. मद्रासजवळ अड्यार येथे थिऑसॉफिकल सोसायटीचे जागतिक केंद्र आहे. आजही आपण तेथे गेलो तर ते स्थान रम्य वाटेल. पण तेथेही डॉ. बेझंट गेल्यावर त्यांची समाधीच उरली आहे ! ! प्राण गेलेल्या शरीरासारखी या संस्थांना तात्काळ कळा येते. असे का होते ? किंवा का व्हावे ? शांतिनिकेतन पहा ! रवींद्रनाथांचे रहाते घर जसेच्या तसे तेथे आहे. नंदबाबूंचे कलामंदिर आहे. विश्वविद्यालयामुळे माणसांची खूप रहदारी आहे. पण रवींद्रनाथांचे स्मारक म्हणजे त्यांचे रिकामे घर ! पुण्यांत ना. गोखल्यांनी १९०८ साली स्थापन केलेली सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी पहा. पं. हृदयनाथ कुंझरू तिचे अध्यक्ष आहेत. त्यांचे वय ७५ वर असेल. ते अजून सतत कार्य करीत असतात, पण त्यांची सोसायटी ?

सेवासदन, महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी अशा शेकडो संस्था आपल्याभोवती आपण निष्प्राण स्थितीत पहातो. या सामूहिक प्रयोगातील मूळ स्फूर्ती आणि निष्ठा इतक्या अल्पकाळात का बरे नष्ट व्हाव्या ? या संस्था एवढ्या अल्पकाळात का बरे निष्प्रभ बनाव्यात ? याला उत्तर काय ? पावसाळा गेला, की अनेक नद्या कोरड्या ठणठणीत पडतात. तसे थोर पुरुषांच्या प्रतिभेचा जिवंत झरा आटला की त्याने स्थापन केलेल्या संस्था निर्जीव बनतात. कार्याचे सातत्य टिकविणे, कार्य व संस्था प्रधान बनविणे हे अद्याप आपल्याला मुळीच साधलेले नाही. आपली सर्व कार्ये मग ते विद्यालय असो वा वृत्तपत्र असो, राजकीय पक्ष असो वा सामाजिक संस्था असो, सोसायटी असो वा बँक असो, एका खांबावर उभ्या राहिलेल्या ‘ द्वारका ’ आहेत असे दिसेल. एका व्यक्तीच्या आधारावर तेथे जिवंतपणा आणि गति–प्रगती आढळून येते. बहुतेकांची ध्येयनिष्ठा वरपांगी असते. त्या ध्येयवादात बुद्धीची तेजस्विता आणि भावनेचा उन्माद फारच बेताबाताचा असतो. राजकीय पक्षामध्ये ही अधोगती तर फारच झपाट्याने चाललेली दृष्टीस

पडते. कोणत्याही पक्षात दहा वर्षे देखील सातत्याने ऐश्वर्य म्हणजे जिवंतपणा टिकून राहिलेला नाही.

समाजशिक्षणाचे कार्य अद्याप अपुरे राहिलेले आहे. म. ज्योतिरावांचे अनुयायी म्हणविणारांस अस्पृश्यता निवारणाची किती निकड आहे हे पाहिल्यावर मनाला विषाद वाटतो. डॉ. आंबेडकरांच्या नवबुद्धांना भगवान बुद्धाच्या तत्त्वांचे किंवा मार्गाचे किती आकलन झाले आहे हे पाहिले, की पदरी निराशा पडते. जिल्हा परिषदेपासून पार्लमेंटपर्यंत सर्व क्षेत्रे निवडणुकीची रणक्षेत्रे बनली आहेत. एकाच पक्षाच्या हातात वरपासून खालपर्यंत सत्ता असल्याने राज्ययंत्र अगदी ढिले, बोटचेपे व मिंधे बनले आहे. येथे अराजक निर्माण होते की काय अशी भीती वाटू लागली आहे. कॉंग्रेसविरोधी सर्व पक्षांची एकजूट करून कॉंग्रेसला ठेचून काढण्याचा प्रयत्न कांहीं नेते करीत आहेत. पण अमेरिका, रशिया, चीन येथे अराजक निर्माण होऊ देणार नाहीत. सत्तांतराला त्यांच्या सवडीसोयीप्रमाणे कमीअधिक मदत करतील. म्हणजे सध्या आहे असेच कांहीं तरी राज्य येथे चालू राहील. विरोधी पक्षांची स्थिती कॉंग्रेस पक्षाइतकीच दयनीय आहे. राज्य अधिक चोखपणे, तत्त्वनिष्ठेने आणि चातुर्याने चालविण्याचा मगदूर एकाही विरोधी पक्षात नाही. कॉंग्रेसची मक्तेदारी नको म्हणूनच विरोधकांना मते अशी आजची स्थिती आहे. सत्तारूढ पक्षाच्या सद्भावनेला आवाहन करून सहकारी क्षेत्र, ग्रामपंचायती व शेतीचे उत्पादन या क्षेत्रांत पक्षीय राजकारण, चुरस व सध्या चालू असलेली दांडगाई होणार नाही अशा चिकाटीने यत्न करीत राहिले पाहिजे. हजार रुपयांपेक्षा निवडणुकीवर खर्च न करणारे उमेदवार तयार केले पाहिजेत. अत्यंत खर्चिक अशी सध्याची निवडणूकपद्धति जी सहकारी सोसायट्या, बँका, शाळेची व्यवस्थामंडळे, जिल्हा परिषदांपासून पार्लमेंटपर्यंत एका धर्तीची म्हणजे भयंकर खर्च व जातिनिष्ठेची बनली आहेत, ती आमूलाग्र बदलल्याशिवाय लोकशाही नावारूपाला येणार नाही. विहिरीत असेल तेच पोहोऱ्यात येते. समाज खालपासून जेवढा सुधारेल तेवढे लोकशाही राज्य नेकीचे, न्यायाचे व प्रगतिपर होईल."

रावसाहेबांच्या या विचारधारेचे विभाग पाडून त्या प्रत्येकावर वेगवेगळा विचार केला तर त्यातून आपणांस पुरेसे, उपयुक्त मार्गदर्शन मिळू शकेल. आजकाल निर्भयपणे बोलणारी, विचार मांडणारी विचारवंत मंडळी कमी आढळून येतात. उच्च पदस्थांची खप्पा मर्जी होऊ नये म्हणून बहुतेकजण जपून बोलण्याचा व सावरून घेण्याचा प्रयत्न करतात. 'सुरात सूर मिळविणे' किंवा 'ढोल बडविण्याची वृत्ती' वाढती दिसत असल्याने रावसाहेबांसारखे निःस्वार्थी

आणि निर्भीड नेते अत्यावश्यक आहेत. ज्यांनी या देशाचे गेल्या चाळीस-पन्नास वर्षांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक जीवन जवळून पाहिले आहे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे, त्यांनी आज जर कोठे चुकत असेल, घसरगुंडी चालू असेल तर ती निदर्शनास आणून देऊन योग्य तो इशारा देणे जरूर आहे. रावसाहेब पटवर्धनांनी हे कार्य चालू ठेवले आहे याबद्दल त्यांना धन्यवाद देणे जरूर आहे. विविध पक्षांतील 'पदस्थ' मंडळींनी आणि राज्यकर्त्यांतील होतकरू नवीन मंडळींनी रावसाहेबांनी मांडलेल्या विचारसरणीतील काही विचार ग्रहण केले तर त्याचा त्यांना निश्चित उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही. राजकीय पक्षांनी धार्मिक संस्थांप्रमाणे स्वीकारलेल्या सांप्रदायिकतेचा त्याग केल्याखेरीज त्या पक्षांचा कायापालट होणे शक्य नाही. निष्ठा डोळस असली, पोथी-प्रामाण्य चार हात दूर ठेवलेले असले आणि लौकिक प्रतिष्ठेच्या मागे न जाण्याची मनीषा असली तरच राजकीय पक्षातील कार्यकर्ते तो पक्ष मोठा करू शकतील, एरव्ही नाही. आज सारेच चित्र उलटे दिसत आहे आणि सारेच पक्ष एका वेगळ्याच स्थित्यंतरातून जात आहेत. प्रत्येकाला आपल्या भवितव्याबाबत साशंकता वाटत असल्याने सर्वसामान्य माणूस राजकारणाबद्दल निराश झाला आहे. ही अवस्था पाहिल्यावर 'आपण कोठे चाललो आहोत?' असा प्रश्न डोळ्यांपुढे उभा राहिल्यावाचून कसा राहील ?

राष्ट्रपिता म्हणून महात्माजींचा आपण सभा-समारंभ व व्याख्यानांतून उल्लेख करतो, तथापि या राष्ट्रपुरुषाला अवघ्या पंधरा-सोळा वर्षांत खऱ्या अर्थाने आपण पार विसरून गेलो आहोत. विशेषतः काँग्रेस पक्ष आणि काँग्रेसचे सरकार यांना महात्माजींचा, त्यांच्या शिकवणींचा विसर पडावा हे मोठे खेदजनक आहे. महात्माजींचा कोणता आदर्श पुढे ठेवून आम्ही वागत आहोत, बोलत आहोत, कार्य करीत आहोत? दरिद्री नारायणाच्या सेवेसाठी आमच्यापैकी कितीजण पुढे होत आहेत? त्या कार्याला वाहून घेत आहेत? साधेपणा जाऊन देशाची गरिबी दृष्टिआड करून भपक्यासाठी पैशाची जी उधळपट्टी चालू आहे तिला जगात तोड नाही. कमी काम, कमी उत्पादन आणि अधिक मिजास असे आमचे चालले आहे. सत्यवचन, सदाचरण, जनतेसाठी त्याग आणि कष्ट हे शब्दप्रयोग आम्ही आमच्या शब्दकोषातून काढून टाकले आहेत. त्याऐवजी थातुरमातुर, स्वैराचरण आणि स्वतःसाठी लाभ आणि भोग यांची कास धरली जात आहे. यामुळे काँग्रेसची मंत्रिमंडळे भ्रष्ट होऊन काँग्रेस-संघटना बदनाम होत आहे. केरळ काय-ओरिसा काय-आणि पंजाब-बिहार काय, सगळीकडे त्याच बोरी आणि त्याच बाभळी! आम्हांला त्यातल्या त्यात समाधान हे की, आमचा महाराष्ट्र या राज्यां-पेक्षा बरा. तथापि त्यालाही अलीकडे दृष्ट लागली आहे की काय असे वाटू

लागते. ज्याच्या हाती ससा तो पारधी अशी दृश्ये दिसू लागली आहेत. सत्ता-स्थानी बसलेल्यापैकी कित्येकजण दहा-वीस वर्षांच्या सेवेची, कर्तबगारीची जिद्द बाळगण्याऐवजी, त्या दृष्टीने वृत्ती आणि कर्तृत्व दाखविण्याऐवजी, पाच वर्षांत जेवढे काही करता येईल तेवढे करावे, पुढे कोणी पाहिले आहेत हेच दिवस— असे म्हणून एका वेगळ्याच भूमिकेवरून वागत आहेत. ही मंडळी गांधीजी जाणत नाहीत, की त्यांच्या शिकवणुकीची कदर करीत नाहीत. मग गांधीजीं-सारख्या सर्व क्षेत्रांतील पुरुषोत्तमांचा संग्रह तर फारच दूर. राज्यकर्त्यांना अभ्यासू नकोत, कष्टाळू नकोत आणि संशोधकही फारसे जवळ नकोत. त्यांना आपल्या जवळपास हवे आहेत तोंडपुजे भाट लोक आणि म्हणूनच काँग्रेस आणि काँग्रेस-सरकार गांधीजींनी आखून दिलेल्या मार्गापासून दूरदूर चालले असून पर्यायाने जनतेपासूनही दूर चालले आहे. सेवाग्रामला महत्त्व देणारी पूर्वीची मूल्ये आता बदलली असून नवी मूल्ये समाजजीवनात, देशाच्या जीवनात निर्माण केली गेली आहेत.

जुन्या संस्थांची स्थिती देवळासारखी किंवा मशिदीसारखी झाली असून ही क्षेत्रे आज ओस पडू लागली आहेत. ती सेवापरायण माणसे गेल्यावर कार्याचे सातत्य टिकविणारी नवी माणसे पुढे न आल्याने संस्था कशाबशा उभ्या आहेत, चालू आहेत. तथापि त्यांच्यात प्राण नाही, जोर नाही, उन्मेष नाही. निर्माण झालेल्या नव्या संस्थांत जी व्यक्ती एकलेपणाने कार्य करीत आहे, आपला सारा वेग त्या कार्यासाठी देऊन आर्थिक व शारीरिक झीज सोशीत आहे तिला राज्य-कर्त्यांकडून किंवा अधिकारारूढ पक्षाकडून साधी शाबासकीसुद्धा मिळू नये अशी अवस्था आज पहावयास मिळते. जे पुढेपुढे करतील, खोटी स्तुती करतील, अशा स्वार्थी—लोभी-कारस्थानी मोठेपणाला हपापलेल्या लोकांची आज चलती दिसून येते. त्यांना त्यागाचा, संस्थेच्या विनामूल्य कार्याचा संपर्कही झालेला नसतो. 'त्याग' करणाऱ्या 'पराक्रमी' माणसाची कदर करणारेच राहिले नसल्याने त्या संस्था वाढणार कशा आणि टिकणार कशा? सरकारला आणि सरकारी पक्षाला त्या दृष्टीने विचार करावयास फुरसतच नसल्याने, वा त्यांना त्याची जरूरी वाटत नसल्याने या देशाला उपयुक्त ठरलेल्या आणि ठरत असलेल्या संस्था डोळ्यांदेखत मोडकळीला येऊन जमीनदोस्त होऊ लागल्या आहेत. पुढच्या पिढीत त्या पहावयासही मिळणार नाहीत. मग त्या सामाजिक—शैक्षणिक-धार्मिक कोणत्याही संस्था असोत. हे एकखांबी तंबू केव्हा खाली बसतील कोणास ठाऊक अशी स्थिती निर्माण झाली आहे. समाज आणि सरकार याचा गंभीरपणे विचार करणार आहे की नाही?

राजकीय पक्षांची स्थिती पाहिली, की मन विषण्ण होते. निवडणुका हे एकच ध्येय आणि हा एकच कार्यक्रम त्यांच्या नोंदीला आहे. मग त्या निवडणुका राजकीय-सामाजिक-शैक्षणिक-सहकारी संस्थांच्या असोत. निवडणुकीसाठी खूपसा वेळ आणि बराच पैसा खर्ची घालण्यात त्यांना कसलीही दिक्कत वाटत नाही. ज्याच्याजवळ अधिक पैसा, अधिक माणसे, अधिक साधने त्याच्याकडे यशाचे पारडे झुकते. मग ती सहकारी बँकेची, कारखान्याची, जिल्हा परिषदेची वा विधानसभेची निवड असो. एखाद्या लायक, कर्तृत्ववान उमेदवाराजवळ वरील सामुग्री नसेल तर तो निवडून येणे अशक्य. आमच्या अशा संसदीय लोकशाहीत निरनिराळ्या क्षेत्रांतील चांगली गुणी, लायक माणसे कशी उपलब्ध होणार ! काही क्षेत्रांत पक्षीय निवडणुका बाजूला ठेवल्या तरच कर्तबगारीला योग्य वाव मिळेल. एरव्ही मागचेच पुढे चालू राहील. पक्षाचा उमेदवार निवडताना आज ज्या कसोट्या लावल्या जात आहेत, त्या राजकीय पक्षाला आणि त्या देशाला कधीही उपयुक्त ठरणार नाहीत. पक्षापेक्षा जनता मोठी आहे, पक्षापेक्षा देश मोठा आहे, याची जोवर काळजी घेतली जात नाही, तोवर देशाला पुढे नेण्याची स्वप्ने ही स्वप्नेच रहाणार आहेत. आमचे देशप्रेम, आमची देशभक्ती एवढी तकलुपी आहे की स्वतःच्या स्वार्थाकरिता आम्ही देशाचे, जनतेचे नांव वापरत असतो. दैनंदिन जीवनात देशासाठी आम्ही काय करीत आहोत ? महिन्यातून, वर्षातून किती दिवस आम्ही समाजासाठी, देशासाठी देत आहोत ? आमच्या शिक्षणातील, आमच्या ज्ञानातील, आमच्या द्रव्यातील किती हिस्सा आम्ही ज्यांना शिक्षण लाभलेले नाही, ज्यांना ज्ञान मिळालेले नाही, ज्यांच्याजवळ पैसा नाही त्यांच्याकरिता देत आहोत ? देशाच्या कोणत्या प्रश्नात आम्ही लक्ष घालून तन-मन-धनापैकी काहीतरी द्यायला उद्युक्त होत आहोत ? त्याऐवजी आम्ही आमचा बहुमोल वेळ टीकेत, निंदानालस्तीत घालवत असतो. आम्ही स्वतःही काही चांगले करीत नाही व नव्या पिढीलाही चांगले काही देत नाही. म्हणूनच अनेकदा वाटते—' आपण कुठे चाललो आहोत ? '

जर्मनी-जपानचा आदर्श पुढे ठेवून त्या राष्ट्रासारखे स्वयंपूर्ण, स्वाभिमानी राष्ट्र बनण्याऐवजी आम्ही प्रत्येक गोष्टीत इंग्लंड-अमेरिका-रशियाकडून भीक मागून जे राष्ट्रजीवन जगत आहोत ते लांछनास्पद आहे. १९४४–१९४५ मध्ये जर्मनी-जपानची काय स्थिती होती आणि आज हे दोन देश कोठे गेले आहेत ? कशामुळे हे सारे घडले ? सरकारवर सर्वस्वी अवलंबून की लोकांच्या जिद्दीतून, महत्त्वाकांक्षेतून, श्रमातून आणि कल्पकतेतून ! काय कमी आहे जर्मनीत आणि जपानमध्ये ? प. जर्मनीची आर्थिक स्थिती साऱ्या युरोपने हेवा करावा अशी आहे. राख झालेले राष्ट्र १५ वर्षांत पुन्हा ताठ उभे राहून इंग्लंड-अमेरिकेशी

पुन्हा स्पर्धा करू लागते, रशियाला विचारात पाडू शकते! मग आम्हां ४० कोटी लोकांचा देश असा रडतराऊ का? केवढा आहे जपान? किती आहे तेथे शेती? पण शेतीत आणि उद्योगात जपानने केलेली क्रांती पाहिली, की सारे जग आश्चर्याने तोंडात बोट घालते. याचे कारण जपानी माणूस आणि त्याची ती जिद्द. माझा देश, माझे राष्ट्र अभिमानाने जगले पाहिजे, स्वावलंबी बनून समृद्ध झाले पाहिजे, तोवर मी विश्रांती घेणार नाही, फुकट चैन करणार नाही हा त्यांचा बाणा. आमचा बाणा कोणता आणि तो कोठे आहे? आम्ही फक्त प्राचीन इतिहासात मोठे, आधुनिक इतिहासात अद्यापही छोटे, मागास, दरिद्री. काय करीत आहेत वेगवेगळे राजकीय पक्ष आणि सरकार? कोठे आहे आमच्या चाळीस कोटींची शक्ती–युक्ती–बुद्धी? ती स्वेच्छेने कामाला लागत नसेल तर तिचा काहीही उपयोग नाही. त्या शक्तीवर व बुद्धीवर गंज चढेल आणि देश आहे तसा मागे राहील. म्हणूनच साऱ्या कल्पना, साऱ्या सवयी बदलून कामाला लागले पाहिजे. प्रामाणिकपणा आणि कळकळीचा अवलंब करून नवा इतिहास घडविला पाहिजे. अधिक काम, अधिक दाम, अधिक सुखसोयी हे ध्येय अंगी बाणविले पाहिजे, तरच आपण इष्ट त्या स्थळी पोहोचू. नाही तर "गरीब देशाला धान्य दे अमेरिका, बोटी दे इंग्लंड आणि विमाने दे रशिया" असेच करीत बसायची सवय लागेल आणि स्वातंत्र्य मिळालेल्या महान् राष्ट्राला लाचारीत दिवस कंठावे लागतील.

● ● ●

## केरळात कम्युनिस्टांशी करार : २ :

प्रजा समाजवादी पक्षाचे एक नेते श्री. ना. ग. गोरे यांनी 'केसरी'च्या रविवार ता. १७ जानेवारी १९६५ च्या अंकात लिहिलेला लेख, त्या लेखात मांडलेले विचार आणि त्यात केलेली विधाने वाचल्यावर या मंडळींच्या ओठात काय आणि पोटात काय याची पुरेशी कल्पना येऊ शकते. दुर्गापूरला काँग्रेस अधिवेशनानिमित्त जमलेली नेती आणि कार्यकर्ती मंडळी नानासाहेबांना आणि 'केसरी'कारांना 'जळत्या राष्ट्रमंदिरा'चे वासे पळवू पाहणारे टोळके दिसत असले किंवा श्री. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री असताना संरक्षणसूत्रे अद्याप श्री. कृष्ण मेनन हेच हलवीत असल्याचा साक्षात्कार श्री. गोरे यांना झाला असला तरी जनता अद्यांप अशा समजुतीपासून आणि साक्षात्कारापासून दूर आहे

एवढे निश्चित ! नानासाहेब काँग्रेसला कठोर आत्मनिरीक्षणाचे बोधामृत पाजून आर्थिक अराजकाची जी भीती व्यक्त करीत आहेत तत्पूर्वी त्यांनी आपल्या पक्षाच्या भूमिकेबद्दल आत्मपरीक्षण करून तथाकथित आर्थिक अराजकात त्यांचा कितपत वाटा आहे हे पाहिले असते तर अधिक बरे झाले असते. दुर्गापूर अधिवेशनाला विनाशी आणि वांझोटे अधिवेशन संबोधताना आपला पक्ष आणि त्या पक्षातील आपले कार्य गेली सतरा वर्षे कसे वांझोटे आणि विनाशी ठरले आहे याचा गोऱ्यांनी आढावा घेतला असता तर ते त्यांना व त्यांच्या पक्षाला अधिक उपयुक्त ठरले असते.

प्रजासमाजवादी आणि समाजवादी हे दोन्ही अपेशी पक्ष एकत्र आल्यानंतर आणि श्री. एस्. एम्. जोशी यांच्याकडे त्या पक्षाचे नेतृत्व गेल्यानंतर या पक्षाला काही चांगले वळण लागेल, त्याच्या हातून समाजाची व देशाची काही विधायक सेवा घडेल असे वाटले होते. तथापि " आधी होता वाघ्या, मग झाला पाग्या, त्याचा येळकोट राहीना मूळ स्वभाव जाईना " अशी या पक्षाची आणि या पक्षातील मंडळींची गत असल्याने हा पक्ष आणि या पक्षातील मंडळी देशातील संसदीय लोकशाहीला पोषक होण्याऐवजी घातक होण्याची भीती निर्माण झाली आहे. जनता आणि तिच्या आशा-आकांक्षा एकीकडे आणि या पक्षाच्या इच्छा-महत्त्वाकांक्षा दुसरीकडे असे आजचे चित्र आहे. या देशाला देशद्रोही कम्युनिस्टांपासून वाचविण्याची आजची निकड असता संयुक्त समाजवादी या कम्युनिस्टांना मिठी मारून देशाला आग लावण्याच्या त्यांच्या प्रयत्नात त्यांना रॉकेल आणि आगपेटी आपल्या हाताने नेऊन देऊ लागले आहेत. सत्तेच्या आसुरी लालसेने त्यांना आंधळे केले असून, ते केरळमध्ये काँग्रेसच्या पाडावासाठी कम्युनिस्टांची बटिक बनू पहात आहेत. ज्या कम्युनिस्टांना दुरूनही स्पर्श करणे हे देशाच्या दृष्टीने धोक्याचे ठरणार आहे, त्यांना मोहित करण्यासाठी साधनशुचितेची राख कपाळी लावून त्यांच्यापुढे संयुक्त समाजवादी केरळात पिंगा घालीत आहेत. अशा स्थितीत प्रसोपचे नानासाहेब गोरे द्वेषाने, मत्सराने, असूयेने काँग्रेसच्या नावाने बोटे मोडीत आहेत, काँग्रेसला आत्मपरीक्षणाचे बोधामृत पाजीत आहेत याचे आश्चर्य वाटते.

काँग्रेस ही एक जुनी संघटना आहे, बलशाली संघटना आहे, थोर इतिहासपरंपरा असलेली संघटना आहे, जनमानसात अद्याप तिला प्रेमाचे आणि आदराचे स्थान आहे याची जाणीव गोरे यांना पूर्ण आहे. या काँग्रेसमध्येच आपण वाढलो आणि मोठे झालो याचीही त्यांना कल्पना आहे आणि म्हणूनच ते तिचा सर्वात अधिक द्वेष करीत आहेत. कारण काँग्रेसची प्रतिष्ठा, काँग्रेसचा

लौकिक, काँग्रेसचे जनतेमधील स्थान गोरे आणि कंपनी हिसकावून घेऊ शकत नाहीत. काँग्रेसच्या चुकांचे भांडवल करून, काँग्रेसला शिव्याशाप देऊन आपण लोकांना आपल्याकडे आकर्षित करू शकू अशी त्यांची भाबडी समजूत आहे. संयुक्त समाजवाद्यांच्या जमेला काय आहे ? जनतेच्या आणि देशाच्या प्रश्नाशी एकरूप होऊन या मंडळींनी तन-मन-धनाने त्याग केल्याचे काही लोकांना आठवत नाही, आणि म्हणूनच हा पक्ष कधी वाढू शकला नाही, प्रबळ होऊ शकला नाही. प्रत्येक खेपेला या पक्षाला कोणाच्या ना कोणाच्या तरी कडेवर बसावे लागले आहे. कधी कम्युनिस्ट, तर कधी रिपब्लिकन, तर कधी जातीयवादी मुस्लिम लीग देखील. सत्तेचा त्यांचा धोशा त्यांना अशा थराला नेत आहे की कोणाशीही चुंबाचुंबी करण्याची त्यांना दिक्कत वाटत नाही, आणि म्हणूनच हा पक्ष वेळोवेळी मोडीत निघून त्याला एक नवे रंग, रूप आणि नाव धारण करणे प्राप्त होते. गोरेसाहेबांना हे ठाऊक नाही किंवा आठवत नाही अशातला भाग नव्हे. पण जेव्हा विधायक कर्तृत्वाची बाजू फार कमी पडते तेव्हा विघातक दुष्कृत्यांनी माणूस लोकांपुढे येण्याचा प्रयत्न करीत असतो. संयुक्त समाजवाद्यांची आजची भूमिका अशीच विघातक बनली आहे.

गोरे म्हणतात की, चीनचा धोका कायम असताना भारताकडून जी संरक्षक उपाययोजना चालू आहे, ती अपुरी आहे. तसेच संरक्षणमंत्री कोणीही असला तरी संरक्षक धोरण अद्यापही कृष्णमेननच ठरवीत आहेत. देशाच्या संरक्षक उपाययोजनेला संयुक्त समाजवाद्यांनी किती हातभार लावला हे सर्वांना ठाऊकच आहे. मोर्चे, संप, हरताळ, निदर्शने यापलीकडे ज्यांनी गेल्या दोन–अडीच वर्षांत कोणतेही विधायक कार्य केले नाही, उद्योगधंद्यांतून संप घडवून आणणे, मोर्चाच्या द्वारे सरकारी यंत्रणेत अडथळे आणणे, जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे बघ्याची भूमिका घेऊन दुरून गंमत बघणे यापलीकडे ज्यांची दृष्टी गेली नाही, ते चीनच्या धोक्याची जाणीव काँग्रेसला देत आहेत. चीनचा धोका कमी करण्याऐवजी देशी कम्युनिस्टांचे हात बळकट करून गोरे आणि कंपनी हा धोका वाढविण्याचे पाप जाणूनबुजून करीत आहेत. म्हणे केरळात समाजवाद्यांनी संयुक्त आघाडी केलेली नसून निवडणूक-करार केला आहे. भोपाळच्या ठरावाला ते चिकटून आहेत. संयुक्त समाजवादी समजतात एवढे लोक बावळट राहिलेले नाहीत.

मूल होण्याकरिता एखादी बाई जशी बुवाच्या किंवा देवऋषीच्या जाणूनबुजून मागे लागते, तशी अवस्था संयुक्त समाजवाद्यांची झाली आहे. त्या बुवापासून व अंगारे-धुपारे करणाऱ्यापासून धोका पोहोचण्याची तिला कल्पना असते. पण 'मला मूल पाहिजे' म्हणत ती तो धोका पत्करीत असते. कम्युनिस्ट देश-

बुडवे आहेत, मुस्लीमलीगवाले जातीयवादी आहेत, हे ठाऊक असूनही सत्तेच्या लालसेसाठी संयुक्त समाजवादी कम्युनिस्ट आणि लीगच्या मांडीवर बसण्याची तयारी करू लागले आहेत. म्हणे त्यांच्या जागा सोडून त्यांना निवडून येण्यास मदत करण्यापुरता हा करार आहे. हा अधमपणा आहे, बेशरमपणा आहे, धावळी छाप तत्त्वज्ञानाची पायमल्ली आहे. "देशद्रोह्यांना निवडून देऊ नका, जातीयवाद्यांना, लोकशाही विरोधकांना जवळ करून थारा देऊ नका, देश धोक्यात आणू नका" असे मतदारांना सांगण्याऐवजी त्यांची फसवणूक करून कम्युनिस्ट व लीगवाल्यांच्या घरात संयुक्तसमाजवादी मागच्या दाराने शिरू पहात आहेत. या भूमिकेत कोठे आहे त्यांची लोकशाही आणि समाजवादावरील श्रद्धा ? कशाकरिता या दोन समाजविरोधी आणि देशविरोधी लोकांना निवडून आणायचे ? त्यांना सत्तेजवळ आणून त्यांच्या गळ्यात हात टाकला, की त्यांच्याबरोबर आपल्यालाही सत्तासिंहासनावर बसता येईल ही 'मंथरानीती' मधू लिमये आणि कंपनीच्या डोक्यात शिरावी आणि गोरे आदींनी 'मम' म्हणून मान्यता द्यावी हा केवढा अधःपात ! समाजवाद्यांच्या वांझोटेपणाचे हे लक्षण असून राष्ट्रमंदिराला जाणूनबुजून आग लावण्याची ही भयानक वृत्ती आहे.

प्रजासमाजवाद्यांना समाजवाद्यांनी बगलेत मारले असून त्यांच्या नैतिक उच्च भूमिकेचा खिमा करून लोहिया, लिमये, फर्नांडिस तो चविष्टपणे चघळीत आहेत आणि जोशी-गोरे अगतिकपणे त्याकडे पहात आहेत. कोण विचारतो आहे या दोन पुणेरी संतमहंतांना ! त्यांची साधनशुचिता आणि लोकशाही समाजवादाचा जप यांना लिमये आणि कंपू धूप घालीत नसून ते कम्युनिस्टांच्याही पुढे जाऊन देशाचे वाटोळे झाले तरी चालेल, पण काँग्रेसला सत्तेवरून खाली ओढू अशा शेखमहंमदी स्वप्नात आहेत. सत्तेच्या स्वप्नात त्यांना भारताच्या प्रतिष्ठेचा, अर्थव्यवस्थेचा आणि जनतेच्या अन्नधान्यादी प्रश्नाचा पूर्ण विसर पडला असून ते देशाला धोक्याकडे नेत आहेत. प्रजासमाजवाद्यांच्या गेल्या पंधरा-सोळा वर्षांच्या कामाकडे पाहिले तर काही कार्यक्रम घेऊन ते जनतेपर्यंत पोहोचले आहेत किंवा चीनच्या आक्रमणानंतर संरक्षण प्रयत्नांना त्यांनी सक्रीय हातभार लावला आहे असे काही दिसून येत नाही. उलट काँग्रेस आणि सरकार चुकते कोठे हे पहात बसणाऱ्या बध्यांची भूमिका घेऊन कावळ्यासारखे व्रणावर टोचण्यात ते मशगूल झालेले आहेत. "लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण" याची त्यांना जाणीव नाही, की खेद वा खंत नाही. पन्नास पुढारी आणि पाच कार्यकर्ते अशी अवस्था. ज्या लोहियांनी भारताची प्रतिष्ठा देशात आणि परदेशात भरपूर घालविली त्यांचे पाय अखेर धरून लिमये–जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारख्या कम्युनिस्ट-धार्जिण्यांकडे पुढारपण सुपूर्त करण्यात गोरे–जोशींनी धन्यता मानली. आता या

संयुक्त समाजवादी पक्षात जोशी–गोरे पडद्याआड गेले असून लिमये–फर्नांडिस दादा बनले आहेत. जोशी-गोरे यांना बाजूला ठेवून केरळचा बनाव त्यांनीच घडवून आणला आहे. पुणेकर साधनशुचितावाल्यांना म्हणावे की, असा आता या बनावाचे समर्थन करीत. कॉंग्रेसच्या नावाने बोटे मोडून किंवा निवडणूक-कराराने कॉंग्रेसला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करून जर सत्ता मिळती तर १९५७ व १९६२ मध्ये विरोधकांची दाणादाण झाली नसती.

ज्या कॉंग्रेसने राष्ट्रमंदिर उभारले ती कॉंग्रेसच या मंदिराचे रक्षण करून त्याची शान वाढविणार आहे. गुरवाप्रमाणे नैवेद्यावर लक्ष ठेवून कारस्थाने करणाऱ्यांना नैवेद्य तर कधी मिळणार नाहीच, पण लोकांकडून पुन्हा एकदा धडा शिकावा लागेल. गोरे आणि मंडळींचे आतापर्यंतचे वांझोटे राजकारण आणि लोहिया–लिमये–फर्नांडिसांचे विनाशी राजकारण देशाचे भले करणार नसून देश पेटविणारे आहे. होळीच्या या होळकरांच्या हातातील चूड काढून घेण्यास जनता समर्थ आहे हा धडा त्यांना पुन्हा मिळाल्याशिवाय रहाणार नाही. दुर्गापूरचे दोष दाखविणाऱ्या नानासाहेब गोरे यांनी आपल्या पक्षाच्या नाकाला लागलेली घाण आणि कम्युनिस्ट संगतीने येणारी दुर्गंधी काढून टाकण्याचा प्रयत्न केला तरी पुष्कळ कार्य होईल. पण ते त्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने कुंभाराकडील कामचुकार प्राण्याप्रमाणे ते लाथा झाडण्याचेच काम करीत रहाणार. दिल्लीतील राजकारणातून उचल-बांगडी झाल्यावर गल्लीचे राजकारण करण्याची पाळी आलेले नानासाहेब यापेक्षा वेगळे काय करू शकणार! दुर्गापूरला कृष्ण मेनन बोलल्या-बरोबर गोरे महाशयांनी निष्कर्ष काढला की, संरक्षणविषयक धोरण कृष्ण मेननच अजूनही ठरवितात. रामाचा मत्सर करणाऱ्या कैकेयीच्या विचारांची ही परंपरा गोरे यांनी उचलून धरण्यात आपले वैशिष्ट्य कायम राखले आहे. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत कोणी विचारीत नाही, त्यांना काही स्थान नाही असेच गोऱ्यांना सुचवावयाचे आहे. लोकसभेनंतर म्युनिसिपालिटीत बसण्याची पाळी आल्यावर विचारांची झेप कुंपणापलीकडे कशी बरे जाऊ शकणार? महाराष्ट्रातील जनता या विचारसरणीची यथायोग्य दखल घेईलच.

• • •

## "कोणाचा कोणास मेळ नाही!" : ३ :

नव्या प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब गोरे यांनी 'देशातील समाजवाद्यांपुढील समस्या' या शीर्षकाखाली स्पष्ट केलेली आपली नवी भूमिका 'साधना'मध्ये प्रसिद्ध झाली असून त्याची एक छापील प्रत लालजी कुलकर्णी या जुन्या निष्ठावंत प्रजासमाजवादी कार्यकर्त्याने अवलोकनार्थ अगत्याने आणून दिली. या पत्रकावरून नजर टाकता आढळून आले की, नानासाहेबांनी वाराणशीहून परतल्यावर पत्रकारांपुढे जे निवेदन केले, पक्ष-कार्यकर्त्यांपुढे जे निवेदन केले ते संकलित रूपाने व सूत्ररूपाने या पत्रिकेत मांडले आहे. समाजवादी म्हणविणाऱ्यांकडून खऱ्या प्रश्नांची उपेक्षा होत आहे, निष्ठेच्या त्रिसूत्रीचे विस्मरण होत आहे, जनमानस व जनसंघटन करण्याचे उद्दिष्ट सर्व-प्रथम ठरविण्याऐवजी सत्ता-संपादनासाठी जवळच्या पण वाटेल त्या मार्गाचा अवलंब केला जातो, असे सांगून नानासाहेबांनी आपल्या प्रजासमाजवादी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांचे हे निवेदन वाचल्यावर वाराणशीला जाण्यापूर्वी त्यांनी 'जळत्या घराचे वासे पळविणारे टोळके' म्हणून काँग्रेसच्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची 'केसरी'तील लेखांमधून जी हेटाळणी केली होती त्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. या लेखावर लिहिताना मी म्हटले होते की, नानासाहेबांनी काँग्रेसला आत्मपरीक्षणाचा साळसूद सल्ला देताना आपल्या संयुक्त समाजवादी पक्षाचे योग्य ते मूल्यमापन करावे आणि ही आवळ्या-भोपळ्यांची मोट किती दिवस टिकेल याची जनतेला शाश्वती द्यावी. त्यांनी आपल्या छापील निवेदनात ज्या त्रिसूत्राची प्रशंसा केली आहे, खऱ्या प्रश्नांच्या उपेक्षावर भर दिला आहे, जनमताच्या ठेकेदारीचा उल्लेख केला आहे त्याचा उल्लेख याच सदरात त्या वेळी करून मी नानासाहेबांना विचारले होते की, तुमची ही प्रजा-समाजवादी आणि समाजवादी युती किती दिवस टिकते ती पहा. हा अनैसर्गिक सहवास अल्पकाळ टिकेल आणि शेवटी एस्. एम्. सारख्या माणसाला राज-कारणचा संन्यास घेऊन सर्वोदयात शिरण्याची पाळी येईल. महिना दीड महिन्यात हे भाकित जवळजवळ खरे ठरण्याची वेळ आली असून, दोन स्वतंत्र चुली मांडून वेगवेगळा स्वयंपाक करणारे हे पुढारी वैचारिक गोंधळाने, समाजवादाचा मार्ग नीट सापडू शकत नसल्याने एका विचित्र अवस्थेत सापडल्याचे स्पष्ट दिसत आहे.

त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ही की, श्री. नानासाहेब गोरे व त्यांचा प्रसोप हा एकदोनदा ठेच बसल्यावर शहाणा होऊन राजकारणाच्या धोपट रस्त्याने जाण्याचा विचार करीत आहे. तथापि एस्. एम्. जोशी हे कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी समाजवादी यांच्या जाळ्यात अडकून सत्तासंपादनाच्या आड-मार्गात शिरले आहेत. राजकारणात संगत वा सहवास, तसेच सल्ला व मार्गदर्शन कोणाचे किती असावे याला निश्चित महत्त्व आहे. डांगे आणि लोहिया यांच्या सहवासात राष्ट्रवाद-लोकशाही-समाजवाद या त्रिसूत्रीची आपण जपणूक करू शकू असा जर एस्. एम्. चा समज असेल तर तो भ्रम आहे आणि तो भ्रमनिरास व्हायला फारसा वेळ लागण्याचेही कारण नाही. मात्र त्या वेळी पश्चात्ताप व्यक्त करताना देशाची व जनतेची झालेली मोठी हानी भरून काढण्याचे सामर्थ्य एस्. एम्. आणि त्यांच्या अनुयायांत रहाणार नाही. एस्. एम्. यांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल, जनहिताच्या कळकळीबद्दल, लोकशाही समाजवादाच्या प्रेमाबद्दल कोणाच्याही [illegible]त शंका नाही. तथापि खेद आहे तो " ढेकणाच्या संगे हिरा तो भंगला। [illegible] नाडला साधू जैसा " या परिस्थितीचा. मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, [illegible]व डांगे आणि डॉ. राममनोहर लोहिया यांच्या संगतीत एस्. एम्. यांची [illegible] टिकणे अशक्य असून, त्यांच्या निष्ठेचे तारू या कम्युनिस्ट—समाजवादी [illegible] आपटून फुटल्याशिवाय रहाणार नाही. केरळमध्ये चीनवादी कम्युनिस्ट [illegible]कस्तानवादी मुस्लीम लीगला बरोबर घेऊन संयुक्त समाजवादी मताचा [illegible]गत असता एस्. एम्. नी आपला पक्ष लोकशाहीवादी–राष्ट्रवादी आहे [illegible] मिरवण्यात काय अर्थ आहे? निवडणुकी, सत्ता आणि त्यासाठी [illegible] यातच जर संयुक्त समाजवादी पक्ष देशाचे आणि जनतेचे कल्याण [illegible] असेल आणि एस्. एम्. त्यांची तरफदारी करणार असतील तर त्यांचे [illegible] संपुष्टात आले असेच म्हणावे लागेल. हातमिळविणीच्या त्यांच्या [illegible]णाची फसगत त्यांना लवकरच दिसली, की घोर निराशेखेरीज त्यांच्या [illegible] दुसरे काहीही पडू शकणार नाही.

त्या निराशेची चित्रे आतापासूनच अंधुक दिसू लागली आहेत; कारण एस्. एम्. कम्युनिस्टांशी सहकार्यास आता नकार दर्शवू लागले असून, राष्ट्रीय संग्राम-समितीपासून स्वतःला दूर ठेवू लागले आहेत. एवढेच नव्हे तर या संग्राम-समितीतून संयुक्त समाजवाद्यांनी बाहेर पडावे असे त्यांचे मत आहे. त्यांच्या या मताला मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस किती किंमत देणार हे लवकरच दिसेल. कारण ही राष्ट्रीय संग्राम समिती या दुकलीने वाराणशी अधिवेशनापूर्वीच स्थापन केली होती व तीत कम्युनिस्टांसह काही डावे पक्ष आणि त्या पक्षाच्या कामगार संघटना समाविष्ट केल्या होत्या. त्या वेळी प्रसोप आणि त्यांची हिंद मजदूर सभा

## “ कोणाचा कोणास मेळ नाही ! ” : ३ :

नव्या प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब गोरे यांनी ‘ देशातील समाजवाद्यांपुढील समस्या ’ या शीर्षकाखाली स्पष्ट केलेली आपली नवी भूमिका ‘ साधना ’मध्ये प्रसिद्ध झाली असून त्याची एक छापील प्रत लालजी कुलकर्णी या जुन्या निष्ठावंत प्रजासमाजवादी कार्यकर्त्याने अवलोकनार्थ अगत्याने आणून दिली. या पत्रकावरून नजर टाकता आढळून आले की, नानासाहेबांनी वाराणशीहून परतल्यावर पत्रकारांपुढे जे निवेदन केले, पक्ष-कार्यकर्त्यांपुढे जे निवेदन केले ते संकलित रूपाने व सूत्ररूपाने या पत्रिकेत मांडले आहे. समाजवादी म्हणविणाऱ्यांकडून खऱ्या प्रश्नांची उपेक्षा होत आहे, निष्ठेच्या त्रिसूत्रीचे विस्मरण होत आहे, जनमानस व जनसंघटन करण्याचे उद्दिष्ट सर्व-प्रथम ठरविण्याऐवजी सत्ता-संपादनासाठी जवळच्या पण वाटेल त्या मार्गांचा अवलंब केला जातो, असे सांगून नानासाहेबांनी आपल्या प्रजासमाजवादी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांचे हे निवेदन वाचल्यावर वाराणशीला जाण्यापूर्वी त्यांनी ‘ जळत्या घराचे वासे पळविणारे टोळके ’ म्हणून काँग्रेसच्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची ‘ केसरी ’तील लेखांमधून जी हेटाळणी केली होती त्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. या लेखावर लिहिताना मी म्हटले होते की, नानासाहेबांनी काँग्रेसला आत्मपरीक्षणाचा साळसूद सल्ला देताना आपल्या संयुक्त समाजवादी पक्षाचे योग्य ते मूल्यमापन करावे आणि ही आवळ्या-भोपळ्यांची मोट किती दिवस टिकेल याची जनतेला शाश्वती द्यावी. त्यांनी आपल्या छापील निवेदनात ज्या त्रिसूत्राची प्रशंसा केली आहे, खऱ्या प्रश्नांच्या उपेक्षावर भर दिला आहे, जनमताच्या ठेकेदारीचा उल्लेख केला आहे त्याचा उल्लेख याच सदरात त्या वेळी करून मी नानासाहेबांना विचारले होते की, तुमची ही प्रजा-समाजवादी आणि समाजवादी युती किती दिवस टिकते ती पहा. हा अनैसर्गिक सहवास अल्पकाळ टिकेल आणि शेवटी एस्. एम्. सारख्या माणसाला राज-कारणचा संन्यास घेऊन सर्वोदयात शिरण्याची पाळी येईल. महिना दीड महिन्यात हे भाकित जवळजवळ खरे ठरण्याची वेळ आली असून, दोन स्वतंत्र चुली मांडून वेगवेगळा स्वयंपाक करणारे हे पुढारी वैचारिक गोंधळाने, समाजवादाचा मार्ग नीट सापडू शकत नसल्याने एका विचित्र अवस्थेत सापडल्याचे स्पष्ट दिसत आहे.

त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ही की, श्री. नानासाहेब गोरे व त्यांचा प्रसोप हा एकदोनदा ठेच बसल्यावर शहाणा होऊन राजकारणाच्या धोपट रस्त्याने जाण्याचा विचार करीत आहे. तथापि एस्. एम्. जोशी हे कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी समाजवादी यांच्या जाळ्यात अडकून सत्तासंपादनाच्या आड-मार्गात शिरले आहेत. राजकारणात संगत वा सहवास, तसेच सल्ला व मार्गदर्शन कोणाचे किती असावे याला निश्चित महत्त्व आहे. डांगे आणि लोहिया यांच्या सहवासात राष्ट्रवाद-लोकशाही-समाजवाद या त्रिसूत्रीची आपण जपणूक करू शकू असा जर एस्. एम्. चा समज असेल तर तो भ्रम आहे आणि तो भ्रमनिरास व्हायला फारसा वेळ लागण्याचेही कारण नाही. मात्र त्या वेळी पश्चात्ताप व्यक्त करताना देशाची व जनतेची झालेली मोठी हानी भरून काढण्याचे सामर्थ्य एस्. एम्. आणि त्यांच्या अनुयायांत रहाणार नाही. एस्. एम्. यांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल, जनहिताच्या कळकळीबद्दल, लोकशाही समाजवादाच्या प्रेमाबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. तथापि खेद आहे तो "ढेकणाच्या संगे हिरा तो भंगला। कुसंगे नाडला साधू जैसा" या परिस्थितीचा. मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, श्रीपादराव डांगे आणि डॉ. राममनोहर लोहिया यांच्या संगतीत एस्. एम्. यांची साधुवृत्ती टिकणे अशक्य असून, त्यांच्या निष्ठेचे तारू या कम्युनिस्ट–समाजवादी खडकावर आपटून फुटल्याशिवाय रहाणार नाही. केरळमध्ये चीनवादी कम्युनिस्ट आणि पाकिस्तानवादी मुस्लीम लीगला बरोबर घेऊन संयुक्त समाजवादी मताचा जोगवा मागत असता एस्. एम्. नी आपला पक्ष लोकशाहीवादी–राष्ट्रवादी आहे अशी शेखी मिरवण्यात काय अर्थ आहे? निवडणुकी, सत्ता आणि त्यासाठी आघाड्या यातच जर संयुक्त समाजवादी पक्ष देशाचे आणि जनतेचे कल्याण मानीत असेल आणि एस्. एम्. त्यांची तरफदारी करणार असतील तर त्यांचे राजकारण संपुष्टात आले असेच म्हणावे लागेल. हातमिळविणीच्या त्यांच्या राजकारणाची फसगत त्यांना लवकरच दिसली, की घोर निराशेखेरीज त्यांच्या पदरी दुसरे काहीही पडू शकणार नाही.

त्या निराशेची चित्रे आतापासूनच अंधुक दिसू लागली आहेत; कारण एस्. एम्. कम्युनिस्टांशी सहकार्यास आता नकार दर्शवू लागले असून, राष्ट्रीय संग्राम-समितीपासून स्वतःला दूर ठेवू लागले आहेत. एवढेच नव्हे तर या संग्राम-समितीतून संयुक्त समाजवाद्यांनी बाहेर पडावे असे त्यांचे मत आहे. त्यांच्या या मताला मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस किती किंमत देणार हे लवकरच दिसेल. कारण ही राष्ट्रीय संग्राम समिती या दुकलीने वाराणशी अधिवेशनापूर्वीच स्थापन केली होती व तीत कम्युनिस्टांसह काही डावे पक्ष आणि त्या पक्षाच्या कामगार संघटना समाविष्ट केल्या होत्या. त्या वेळी प्रसोप आणि त्यांची हिंद मजदूर सभा

यांनी विरोध दर्शविला होता. आता संसोप पुढे प्रश्न पडला आहे की, संग्राम-समितीत रहावयाचे म्हणजे कम्युनिस्टांबरोबर सहकार्य करावयाचे आणि ते तर एस्. एम्. आणि मंडळींना नको आहे. बोनस प्रश्नापुरतेच समितीचे कार्य मर्यादित नसल्याने महाराष्ट्रातील संसोप कार्यकर्त्यांपुढे प्रश्न उभा राहिला आहे आणि ते एस्. एम्. च्या आदेशाची वाट पहात आहेत. लिमये–फर्नांडिस जोडी डांगे यांना बरोबर घेऊन संग्राम-समिती चालवू पहात असताना संसोप आणि एस्. एम्. व त्यांचे चहाते हे चक्रव्यूहात सापडले असल्यास नवल नाही आणि म्हणूनच संसोप आणि एस्. एम्. यांचे भवितव्य कम्युनिस्टांशी सहकार्य की नाही यावरच ठरणार आहे यात संदेह नाही.

संयुक्त समाजवादी पक्षात कोणाचा कोणास मेळ नाही ही वस्तुस्थिती आहे. लोहियावाद्यांना कम्युनिस्टांप्रमाणेच कॉंग्रेसला घालवून देण्याची घाई झाली असल्यामुळे ते वाटेल त्याबरोबर हातमिळवणीस आणि समझोत्यास आतूर झालेले आहेत. या बारभाईंना वाटते की, आपल्या कारस्थानाने आपण कॉंग्रेसला खाली ओढू शकू. तथापि त्यांना साधी गोष्ट कळत नाही की, जनतेला अशी घाई झालेली नसून जनता या बारभाईंकडे देशाचा कारभार देण्यास मुळीच उत्सुक नाही. जेथे जेथे कम्युनिस्ट आणि जातीयवादी आहेत तेथे तेथे राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद धोक्यात आहे याची जनतेला खात्री आहे व म्हणूनच समाजवादाचा टिळा कपाळाला लावून हिंडणाऱ्या संसोपला जनता स्पष्ट सांगणार आहे की, समाजवादाची कफनी काढून टाकून कम्युनिस्ट चिनी हुकूमशाहीच्या जटा वाढवा आणि पाकवादी लीगची दाढी वाढवून मग जनतेत वावरा. याला काय राजकारण म्हणायचे, की राजकारणाचा चुथडा! जे पक्ष जनमानसापर्यंत जाऊ शकत नाहीत, आपल्यामागे जनसंघटना उभारू शकत नाहीत, त्यांनी कितीही घोषणा केल्या, कोलांट्या उड्या मारल्या, सत्तेवर जाण्याची तयारी केली तरी त्यांचे जनतेतील स्थान काही बदलू शकणार नाही. कॉंग्रेसच्या हातून काही चुका घडत असतील, काही धोरणेही चुकत असतील, तथापि कॉंग्रेस हा एकच पक्ष आहे की, तो जनमानसापर्यंत जाऊन पोहोचला आहे. जनसंघटन त्याच्या मागे आहे आणि राष्ट्रवाद–लोकशाही–समाजवादाला त्याने ध्येय-रूपाने बांधून घेतले आहे. कॉंग्रेसमध्ये मतभेद आणि संघर्ष जरूर आहेत; पण ते जिवंतपणाचे, वाहत्या पाण्याच्या स्वरूपाचे आहेत. सर्वांना एकत्र ठेवणारी एक मोठी शक्ती आणि परंपरा कॉंग्रेसजवळ आहे आणि म्हणूनच इतर पक्षांसारखे कॉंग्रेसचे विघटन होणे सहजसाध्य नाही. कॉंग्रेस सुधारण्यासाठी, कॉंग्रेसला योग्य मार्गावर ठेवण्यासाठी कोणत्यातरी एका देशव्यापी, कृतनिश्चयी, लोकसत्ताक समाजवादी पक्षाची निश्चित जरूरी आहे. पण तो पक्ष आजचा एस्. एम्. यांचा

संयुक्त समाजवादी पक्ष नव्हे, की नानासाहेब गोरे यांचा प्रजासमाजवादी पक्षही नव्हे. एस्. एम्. यांचा संसोप हातमिळवणीच्या राजकारणामुळे पंचमस्तंभीयांना, देशद्रोह्यांना बळकटी आणीत आहे, तर प्रसोप आपल्या काँग्रेसद्वेषाने व दुर्बल अवस्थेने जातिनिष्ठांना व अप्रत्यक्षरीत्या कम्युनिस्टांना प्रबळ करीत आहे. या दोन्ही पक्षांची आजची ‘ कोणाचा कोणास मेळ नाही ’ ही स्थिती पाहिल्यावर या देशाचे कसे होणार, राजकारणाचे तारू कोणत्या दिशेने भरकटणार याची चिंता वाटल्यावाचून रहात नाही.

अशा स्थितीत अधिकारारूढ काँग्रेस पक्षावरील जबाबदारी अधिकच वाढते. सगळे विरोधी पक्ष एकमुखाने म्हणत आहेत की, गेल्या सतरा वर्षांत काँग्रेसने देशाला चांगला कारभार दिला नाही. लोकांचे दुःख, अडचणी, प्रश्न निवारण स्वा...ले नाहीत. काँग्रेसच्या कारकीर्दीत भ्रष्टाचार, अकार्यक्षमता वाढली. विरोधकांची झाल्य दोषारोप म्हणून यांत अतिशयोक्ती असणारच. तथापि त्यात काहीच तथ्य नाही दुबळं दुर्लक्ष करणे हितावह ठरणारे नाही एवढे मात्र निश्चित. काश्मीरपासून कन्या-कालचे पर्यंतचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक चित्र पाहिले तर समाधान, मराठ वाटण्याऐवजी खेद-निरुत्साहाचा पगडा बसू लागतो. सबळ राष्ट्रवादी लोक-शकणा निष्ठ विरोधी पक्ष अस्तित्वात नाही म्हणून लोक काँग्रेसलाच मत देऊन आणतात आणि एक निवडणूक झाली, की दुसऱ्या निवडणुकीपर्यंत काँग्रेस-पाहिल शिव्याशाप देऊ लागतात. या स्थितीचा शोध आणि त्यापासून योग्य बोध बघित याखेरीज परिस्थिती सुधारणार नाही, आणि देशाच्या ऐक्याला बळकटी व व सर ला गती येणार नाही. काँग्रेसमधील काही जबाबदार मंडळी आज एवढी हळवी लागते आहेत की, त्यांना स्वकीयांची विधायक टीकाही मानवेनाशी झाली आहे. कठोर मुर्दा बोचक वाटू लागले आहे आणि स्तुतिप्रशंसेची चटक लागू लागली आहे. ही आत्मवंचना त्यांना, संघटनेला आणि देशाला बाधक ठरविल्याशिवाय रहाणार नाही. विरोधकांत ‘ कोणाचा कोणास मेळ नाही ’ म्हणून ठीक. तथापि तीच अवस्था काँग्रेसमध्ये दिसू लागली तर देशाचे काय होईल याचा सूज्ञ जेवढा लवकर विचार करतील तेवढे बरे !

● ● ●

# राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव ! : ४ :

प्रकृती बरी नसल्याने विश्रांतीसाठी चार दिवस औरंगाबादला जावे म्हणून गेल्या आठवड्यात पुण्याहून रवाना झालो. तथापि तेथे आजार वाढल्याने चार दिवसांत पुन्हा पुण्याला परतावे लागले. या चार दिवसांत औरंगाबाद मुक्कामी निरनिराळ्या क्षेत्रांतील जी काही मंडळी भेटण्यासाठी आली आणि त्यांनी ज्या काही हकीगती सांगितल्या, त्या ऐकल्यावर आपण १९६५ मध्ये नसून २/ वर्षां-पूर्वी १९४५ मध्ये तर नाहीना असे क्षणभर वाटले. ‘मोगलाई’ हा शब्द प्रचारातून बराचसा गेला असला तरी मोगलाईचे अवशेष अद्यापही ठळली अनुभवास आल्याशिवाय राहात नाहीत. घाई

महाराष्ट्रात मराठवाडा हा भाग मागासलेला खरा. औद्योगिक व उत्सुक दृष्ट्या मराठवाड्याला अद्यापही फार दूरचा पल्ला गाठावयाचा आहे हेह्वाद, कृषि—औद्योगिक विकासाच्या मार्गात दळणवळण व वाहतुकीची फार मोठी उ व आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि या साऱ्या अवस्थांवर मात करून प्र स्पष्ट पराकाष्ठा करून आपण आर्थिक प्रगती साधली पाहिजे अशी जिद्द वा चिनी कांक्षा विशेषशी आढळून येत नाही. याउलट “ठेविले अनंते तैसेची रहावेतेत दैववादावर विसंबून मराठवाड्याचा शेतकरी आणि श्रमजीवी एकएक दिवस सक्ष तसा ढकलत असल्याचे दृश्य पाहावयास मिळते. अर्थात् या परिस्थितीचा गैरफकत काही हितसंबंधी मंडळी घेत असल्यास नवल नाही. पूर्वी निजामचे अधिवर सावकार, व्यापारी, दलाल आदी मंडळी आम जनतेला फसवून तिच्या अज्ञी. वर आणि कष्टावर गबर होत. त्यात पुढारी, कार्यकर्ते या नव्या वर्गाची › पडली असून यातील कित्येकजण उपजीविकेचे हमखास साधन उपलब्ध नसता गबर झालेले पाहावयास मिळतात.

निजामी जाऊन त्या जागी आपल्या लोकांचे सरकार आल्यावर सर्व-सामान्य माणसाची प्रतिष्ठा वाढेल व त्याला मानाने व सुखाने जगता येईल अशी सर्वसाधारण कल्पना होती. ना. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाबद्दल आदर होता तशी श्रद्धाही होती. ते कोठे काही गैर खपवून घेणार नाहीत याची लहानापासून मोठ्यापर्यंत जाणीव होती. तथापि यशवंतराव दिल्लीला गेल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत नाटकातील ‘सीन’ तात्काळ बदलून त्या ठिकाणी दुसरा ‘सीन’ दिसावा तसे घडले आणि सर्वसामान्य माणूस दिङ्मूढ बनला. मूठभर मंडळींनी

आपली भलावण करून घेतली आणि अखिल जनांची परिस्थिती होती, त्यापेक्षा खालावत चालली. पाच जिल्ह्यांचा जो एकोपा आणि एकसूत्रीपणा आवश्यक होता तो दुर्लभ होऊन पाच जिल्ह्यांची तोंडे पाच दिशांना दिसू लागली. नेतृत्वाला शह आणि काटशहाच्या प्रयत्नात काही हुशार आणि धूर्त मंडळींनी आपला स्वार्थ बरोबर साधून घेतला आणि ते संघटनेपेक्षा स्वतःच मोठे बनले. जुने नेते कालांतराने मागे पडले आणि नवे रक्त पुढे आले. या नव्या रक्तातून चारित्र्य, निष्ठा, सेवा या गुणांची जी अपेक्षा त्या अपेक्षेचाच भंग झाल्याने आपण कोणाकडे बघावे असा प्रश्न सर्वसामान्य लोकांपुढे उभा राहू लागला. कित्येक आमदारांची कुलंगडी ऐकल्यावर मन विषण्ण झाल्याशिवाय राहात नाही. मोगलाईतील चित्र यापेक्षा काहीसे वेगळे असू शकेल असे वाटत नाही. निजामाच्या गुलामगिरीतून जनतेची मुक्तता झाली तरी तेथील नव्या राजकीय स्वातंत्र्यात तिला खऱ्या अर्थाने सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्वातंत्र्याचा लाभ झाल्याचा अनुभव येत नाही. ही दीनदुबळी जनता विचार-आचाराने अजूनही दुबळी राहिली असून या दुरवस्थेचा गैरफायदा परंपरागत पुढाऱ्यांबरोबर आजकालचे राजकीय पुढारी घेऊ लागले आहेत. ही परिस्थिती बदलल्याखेरीज मराठवाडा झपाट्याने बदलणार नाही आणि त्याचा आर्थिक नवा चेहरामोहरा दिसू शकणार नाही.

दौलताबाद येथील रामदेवराव यादवांचा इतिहासप्रसिद्ध देवगिरीचा किल्ला पाहिल्यावर, खुलताबाद येथील औरंगजेबाची ती साधी आणि शांत समाधी बघितल्यावर आणि औरंगाबादच्या आसमंतात उभ्या राहिलेल्या शिक्षणसंस्थांच्या व सरकारी कचेऱ्यांच्या नव्या इमारती पाहिल्यावर जुना-नवा इतिहास आठवू लागतो आणि आपण कोठून कुठे चाललो आहोत याची याद येते. यादव-भोसले [illegible]दी पूर्वजांनी तो वैभवशाली इतिहास घडविला आणि आज कित्येक नवी मंडळी [illegible] इतिहास घडवीत आहेत. तथापि ह्या दोघांत मोठा फरक जाणवल्याशिवाय [illegible]हात नाही. मुसलमानांच्या स्वाऱ्या प्राणपणाने लढून थोपवून धरल्या आणि यादवांनी प्रजेचे रक्षण केले. राजाबद्दल लोकांमध्ये प्रेम आणि विश्वास निर्माण केला म्हणूनच लोक राजासाठी वाटेल तो त्याग करावयास त्या वेळी तयार झाले. घृष्णेश्वराचा आशीर्वाद घेऊन शहाजी भोसले वेरूळबाहेर पडले आणि लढाया मारत मारत त्यांनी शिवबाच्या हस्ते स्वराज्याची संस्थापना केली. बलाढ्य मोगल पातशहा औरंगजेबाला सळो की पळो करून शूर संभाजीराजांनी मर्द मराठ्यांचा शूर बाणा दाखविला. एवढेच नव्हे तर धर्मासाठी हसत हसत प्राण देऊन राजे धर्मवीर बनले. त्यांचेच वंशजना आम्ही ! कुठे आहे ती जिद्द, महत्त्वाकांक्षा आणि मराठी बाणा ! जनतेने पुढाऱ्यांसाठी हवे ते दिले आणि हवा तो त्याग केला, पण

पुढाऱ्यांनी जनतेला काय दिले ? सतरा वर्षांनंतर स्वातंत्र्यकाळातील अवस्था पाहिल्यावर भूक-उपासमार-महागाई-हालअपेष्टा यांचे भेसूर चित्र डोळ्यांपुढे उभे राहते. आमचे आज कुठेतरी फार चुकत आहे हे मनाला बोचू लागते. ती चूक सुधारण्याचा, तो दोष दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही का बरे करू नये ? आम्ही करतो ते सारे बरोबर आणि लोकांच्या कल्याणाकरिता असा वृथा अभिमान काय कामाचा ! राज्यकारभाराच्या प्रत्येक अंगोपांगाकडे पाहिले, की त्यात अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार बोकाळत असल्याचे दिसावे हे कशाचे बरे लक्षण ? काँग्रेस संघटनेकडे दृष्टिक्षेप टाकला की गटबाजी, कट-कारस्थान, डावपेच, सत्तास्पर्धा, मोठेपणाची हाव यापेक्षा दुसरे काही चांगले दिसू नये हे कशाचे बरे लक्षण ? राज्यकारभार आणि संघटनेची ही अवस्था समाजाला, आणि देशाला कितीकाळ बरोबर नेऊ शकणार याचा विचार नको का व्हायला ! पण हा विचार करायला आज वेळ आहे कुणाजवळ ! जो तो स्वतःचे पाहण्यात, स्वतः पुढे जाण्यात गर्क झाला आहे. त्याला पक्ष दिसत नाही, समाज दिसत नाही आणि देशही दिसत नाही, मग त्या देशाची लोकशाही व समाजवाद दूरच राहिला.

औरंगाबादेत पडल्या पडल्या जसजसा अधिक विचार करू लागलो तसतशी काही प्रश्नांची उत्तरे सापडू लागली. कार्यकर्ते आणि नेत्यांची अवनती एकट्या औरंगाबादेत नसून ती सर्वत्र असल्याचे दिसू लागले. महाराष्ट्रातील एकएक जिल्हा डोळ्यापुढे आणल्यावर आणि तेथील राजकीय परिस्थिती लक्षात घेतल्यावर मुळातच कोठेतरी मोठा दोष निर्माण झाल्याचे आणि त्यातून अनेक प्रकारचा बिघाड होत गेल्याचे आढळून आले. देशाची एकूण राजकीय प्रकृती बिघडली असून ती ठाकठीक होण्यासाठी एखाद्या जालीम उपायाची आवश्यकता अपरिहार्य वाटू लागली. राष्ट्रीय चारित्र्याचा ( National character ) अभाव, राष्ट्रीय शिस्तीचा अभाव, कष्ट-दीर्घोद्योगाचा अभाव यांमुळे देश पुढे जाण्याऐवजी मागे मागे जात असल्याचा अनुभव येतो अशी खात्री वाटू लागली. चारित्र्यहीन (Crisis of character) आणि विश्वासाचा अभाव (Crisis of confidence यांमुळे देश धोक्यात येत असल्याची प्रचीती येऊ लागली. गेल्या सोळा-सतरा वर्षांत या दृष्टीने राज्यकर्त्यांनी, शिक्षणसंस्थांनी, सामाजिक संस्थांनी, राजकीय पक्षांनी काही योजनाबद्ध प्रयत्न केल्याचे कांही आढळून येईना. उलट नैतिक चारित्र्य, राष्ट्रीय शिस्त आणि उद्योगीपणा आवश्यक असल्याची जाणीव ही जबाबदार मंडळी विसरत गेली आणि त्याचा परिपाक आजच्या बजबजपुरीत दिसू लागला. स्वतंत्र राष्ट्र म्हणून ज्या प्रश्नांची आवश्यकता होती त्यांच्याकडेच दुर्लक्ष केले गेल्यामुळे देश तेवढा जागेवर राहिला पण त्याला स्वाभिमानी, स्वावलंबी राष्ट्राचे स्वरूप काही प्राप्त होऊ शकले नाही.

स्वतंत्र राष्ट्र जन्माला आल्यानंतर त्याची निकोप वाढ त्या राष्ट्रातील जनतेने आणि राज्यकर्त्यांनी करावयाची असते. देशाचे हे दोन्ही घटक त्या दृष्टीने पात्र असावे लागतात. "माझा देश, माझे राष्ट्र हे मोठे, त्याचा मान मोठा, त्याची शान मोठी आणि त्यासाठी मी मजजवळचे वाटेल ते देण्याची तयारी ठेवली पाहिजे" असे मानणारे लोक आणि लोकनेते ज्या देशात आहेत ते देशच मोठे होऊ शकतात. जर्मनी–जपानमध्ये हे पहावयास मिळते, अनुभवावयास मिळते. आमच्या देशात काय स्थिती आहे? गेल्या सतरा वर्षांत देशासाठी कोणी, किती, काय, दिले आहे याचा आढावा काढला तर पदरी घोर निराशा पडते. आपले तन-मन-धन यांपैकी रोज कोण किती आपल्या देशासाठी देत आहे याचा हिशोब पाहिला तर फारसे आशादायक दिसू शकत नाही. व्यक्तिगत स्वार्थ, मोठेपणा आणि भलेपणा यापलीकडे पाहण्याची कोणाची दृष्टी दिसत नाही. 'पापभिरूपणा' शब्द म्हणून नावाला शिल्लक असून आपले कोण काय करणार आहे अशा घमेंडीत वावरताना उच्चपदस्थ दिसत आहेत. नीतिमत्तेला तिलांजलि देऊन अनीतीचा मार्ग राजरोसपणे चोखाळणारे अनेक जबाबदार महाभाग दिसून येत आहेत. गांधीजींच्या आणि काँग्रेसच्या नांवावर राजरोसपणे हवे ते करून लोकाना उपदेशाचे पांडित्य पाजणारे काहीं अल्प प्रमाणात आढळून येत नाही. हे सारे कसे बिनबोभाट चालू आहे! देशाचे उद्या काय याची कुणाला कसलीही फिकीर नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या सतरा वर्षांच्या काळावरून नजर फिरवताना राष्ट्रीय चारित्र्य, राष्ट्रीय शिस्त आणि सेवा हे गुण कार्यकर्त्यांत आणि नेत्यांत प्रकर्षाने आढळून येत. नेत्याने उडी टाक म्हटल्यावर हजारो लोक कसलाही विचार न करता सत्याग्रहांत उडी घेत. स्वार्थाचा मनी लवलेशही येऊ न देता संसारावर निखारे ठेवत. त्या वेळी देशाला एवढ्या लवकर स्वातंत्र्य मिळेल व त्याची फळे अन्य प्रकारे चाखावयास मिळतील याची कोणाला कल्पना नसे. हा काळ, ही माणसे आणि त्यांची ती शिकवण एवढ्या लवकर दृष्टिआड व्हावी किंवा इतिहासजमा व्हावी हे देशाचे दुर्दैव म्हटले पाहिजे. स्वतंत्र देशाच्या इतिहासात सतरा वर्षांचा काळ फार मोठा नसला तरी तो लहानही नाही. या सतरा वर्षांत आम्ही नवे काय चांगले शिकलो, नवे काय आचरणात आणले, आमच्यात कोणते दोष निर्माण झाले याची वजाबाकी करणे अत्यावश्यक झाले आहे. देश जुन्या इतिहासाने किंवा भूगोलाने मोठा होऊ शकत नाही. देश मोठा होतो तो, देशातील लोकांच्या चारित्र्याने, कर्तृत्वाने आणि इतर आवश्यक गुणवत्तेने. जबाबदार मंडळींनी या दृष्टीने विचार करण्याचीं वेळ केव्हाच येऊन ठेपली आहे.

● ● ●

— ४ —

# जग हे बंदिशाळा ! : १ :

'सो जा राजकुमारी सो जा' ही स्वर्गीय सायगलची रेकार्ड लागली, की मला १९४२ मधील बंदीवासाची आठवण येते. रेफरमेटरीच्या भिंतीजवळ झाडाला पाठ लावून बसले, की रात्री ९-९॥ च्या दरम्यान वरील गाण्याचा दर्दभरी आवाज कानावर येऊन आदळावयाचा आणि न्यू थिएटर्सच्या 'जिंदगी' बोलपटाची आठवण व्हायची. त्यानंतर लगेच 'बालम आओ बसो मेरे मनमे' हे गाणे लागायचे आणि 'देवदास' माझ्यापुढे उभा रहावयाचा. जमुना आणि सायगलनी आपल्या अभिनयाने हा बोलपट 'अमर' केला असून ज्यांनी ज्यांनी तो पाहिला असेल ते त्यातील पारू व देवदास कधीही विसरणार नाहीत. 'बालम आओ बसो मेरे मनमे। सावन आया तुम न आये ॥' या गाण्यामधून सायगलने हृदयाच्या छेडलेल्या तारा अजूनही झंकारत असल्याचा कानाला भास होतो. चंडीदास, देवदास, दुश्मन, धरतीमाता, डॉक्टर, सूरदास, तानसेन, शहाजहान आदी बोलपटांतील सायगल ज्यांनी पाहिला असेल आणि ऐकला असेल त्यांना या महान कलाकाराचे कधीहि विस्मरण होणार नाही. 'दिया जलाओ जगमग जगमग' हा मेघमल्हार आळवणाऱ्या सायगलनी सिनेसंगीताची अशी काही 'बरसात' करून ठेवली आहे की. त्या सूरसम्राटाचा मधुर वर्षाव अजूनही हवाहवासा वाटतो. कॉलेजात प्रवेश करण्यापूर्वी आणि केल्यावर सायगलचा एकही चित्रपट मी सोडला नाही. त्याच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिकांचा

संचय केला असल्याने त्याचा आवाज कानी पडला, की माझी श्रवणभक्ती जागृत होते आणि मी त्या सुराबरोबर तल्लीन होऊन जातो.

येरवड्याच्या बंदीवासातही सायगलची गाणी ऐकण्याचे भाग्य मला लाभले याचे अनेकांना आश्चर्य वाटेल. तुरुंगात जेथे वृत्तपत्रांना बंदी तेथे रेडिओ कसा नेता येणार आणि ऐकता येणार! पण मी मात्र रेडिओ सतत तीन महिने ऐकला--नव्हे नव्या चित्रपटातील गाणीही बंदीवासात पाठ करून मी गुणगुणू लागलो. रात्रीची जेवणे आटोपली, की बराकी बंद करण्यापूर्वी मी तुरुंगाच्या तटाजवळच्या झाडाखाली जाऊन बसत असे आणि भिंतीपलीकडून येणारा मधुर आवाज नेमका टिपत असे. रात्रीच्या वेळी वातावरण शांत असल्याने जेलच्या डॉक्टरांच्या बंगल्यात लागलेल्या रेडिओचा आवाज भिंतीचा छेद करून आत घुसत असे आणि माझ्या कानांना तो टिपणे सहजसाध्य होत असे. कारण रेफरमेटरीच्या भिंतीची उंची आणि जाडी येरवड्याप्रमाणे भयानक नव्हती. तीत जरा मार्दव होते. अठरा वर्षांखालील गुन्हेगार मुलांसाठी बांधलेली ती औद्योगिक शाळा ( येरवडा इंडस्ट्रियल स्कूल ऊर्फ रेफरमेटरी ) येरवडा तुरुंगातील जागा कमी पडू लागल्याने आमच्या वाट्याला आली होती व आम्हांला बेरड सराईत गुन्हेगारांच्या सहवासातून लहान कोवळ्या मुलांच्या बंदीशाळेत आणले होते. मात्र त्या वेळी ती मुले आंत नव्हती आणि त्यांचा उद्योगधंदाहि जागेवर नव्हता. म्हणून आम्हीच तिला अल्पावधीत राजकीय उद्योगशाळेचे स्वरूप दिले व तेथे राजकारणाचे पाठ सुरू केले. कोणीतरी एखाद्या विद्वान्—अभ्यासू राजबंद्याने वर्ग घ्यायचा आणि आम्ही गंभीरपणे टिपणे घेऊन राजकारणातील प्रगतीचे एकेक पाऊल टाकावयाचे. आठ-नऊ महिन्यांचे वास्तव्यांत राजकारणातील बी. ए. पदवी मिळविण्याइतकी माझी तरी चांगली तयारी झाली.

येरवड्यातील पहिले तीन-चार महिने सोडले तर नंतरचे रेफरमेटरीतील आमचे बाकीचे दिवस खरोखरच फारच चांगले गेले. त्यातल्यात्यात माझी निश्चित सर्वांगीण सुधारणा झाली. मी शरीराने आणि मनाने चांगलाच तयार झालो. माझे वजन २५ पौंडांनी वाढले आणि बुद्धीही चांगलीच तैल झाली. वयाने सर्वांत लहान म्हणून सारेजण माझे लाड करीत व बरेचजण त्यांच्या दुधातील व लोण्यातील काही हिस्सा मला देत. भरपूर व्यायाम करायचा आणि दूध पिऊन मस्त रहायचे असा माझा नित्यक्रम झाला होता. रोज सकाळी पाव-लोणी खाल्ल्यावर आणि दुधाची लोटी मारल्यावर वजन का नाही वाढणार? जेलर पोतदार मला नेहमी विनोदाने म्हणत, " काय अनंतराव, 'होस्टेल लाईफ' बरे आहे ना? कॉलेजच्या वसतिगृहासारखाच हा तुरुंग आहे. फक्त या चार

भिंतीपलीकडे जायचे नाही एवढेच बंधन. भरपूर खा--प्या आणि वाचन करा. त्याचा भावी काळात चांगला उपयोग होईल. "

आणि खरोखर बंदीशाळेतील माझ्या त्या दहा महिन्यांच्या वास्तव्यांत मला खूप शिकता आले, खूप मिळविता आले आणि भावी आयुष्यासाठी पुरेशी शिदोरी बांधून ठेवता आली. बंदीशाळेत फार मोठमोठ्या मंडळींचा सहवास मला लाभला. जेलरपासून तो जेलच्या नोकरापर्यंत सारी भली मंडळी लाभली. एवढेच नव्हे, तर जेलचे डॉक्टरही एवढे भले मिळाले की, त्यांनी रात्री ९ नंतर रेडिओ किंवा ग्रामोफोन मोठ्याने लावून गाणे ऐकण्याची माझी हौसही भागविली. झाडावर चढून तुरुंगाच्या भिंतीपलीकडचे जग पहाण्याची व टांग्यात एकटा बसून तुरुंगाच्या आवारात फेरफटका मारण्याची संधीही मी दवडली नाही. या साऱ्या गोष्टी आठवल्या, की मला वाटते मी त्या वेळी एवढा बेदरकारपणे कसा वागलो, जेलचे नियम कसे मोडले आणि त्यासाठी मला कोणी रागे कसे भरले नाही! " जाऊद्या लहान पोर आहे " असे म्हणून माझ्या वयाकडे पाहून तर त्यांनी मला त्या वेळी क्षमा केली नसेल ना?

. . . •तुरुंगात भाजीपाला, दूध, किराणाभुसार माल पुरविणारा एक कंत्राटदार होता. हा कंत्राटदार आपला माल एक टांग्यातून आणायचा आणि त्याचा टांगा सरळ स्टोअररूमपर्यंत जायचा. टांग्याला टप नसल्याने तो गवळीटांग्यासारखा दिसायचा, तथापि या टांग्याचे घोडे फारच देखणे असल्याने त्या टांग्यात बसण्याचा मोह मला व्हायचा. पण तुरुंगात स्थानबद्ध असलेल्या राजकीय कैद्याला टांग्यात बसून हिंडता कसे येणार? पण ' इच्छा तेथे मार्ग ' म्हणतात त्याप्रमाणे एके दिवशी हा टांगा स्टोअररूमपुढे उभा असता व टांगा चालविणारा सारा माल उतरून आत चहा पीत असतां त्याच्या संमतीने मी टांग्यांत बसलो आणि घोड्याला ' चल ' म्हणून आज्ञा केली. घोडाही उमदा असल्याने त्याने ठेक्यात पळायला सुरुवात केली. त्याच्या गळ्यातील घुंगुरमाळ आणि टापांचा आवाज यांमुळे साऱ्यांचे लक्ष टांग्याकडे वेधले. जेलला आतून एक चक्कर मारावी अशी माझी इच्छा होती. पण दुर्दैव आडवे आले आणि नेमके त्याच वेळी सिनियर जेलर श्री. कुलकर्णी राऊंडसाठी जेलमध्ये प्रविष्ट झाले. त्यांना पहाताच मी घोड्याचा लगाम खेचला आणि टांगा परत वळवू लागलो. काय बोलावे आणि करावे हेच जेलरना समजेना. त्यांनी जेलर पोतदार यांच्याकडे पाहिले. पोतदारांनी मला खोट्या रागाने विचारले, " अहो, हा तुरुंग आहे आणि आपण कैदी आहांत. हे काही तुमच्या घराचे अंगण नाही. उतरा पाहू खाली. " त्यावर मी म्हटले, " पोतदारसाहेब, उगाच का रागावता माझ्यावर. अहो टांग्यासह घोडा एकाएकी उधळला असता मी धाडस

करून घोड्याला अडविले आणि टांग्यात बसून त्याला वठणीवर आणले. घोड्यांने टांगा कोठे नेला असता याचा नेम नव्हता ! मला माझ्यावरील जबाबदारीची जाणीव आहे. " माझ्या या उत्तराने दोन्ही जेलर मनात खजिल झाले व त्यांनी टांगा स्टोअररूमपर्यंत परत नेण्यास संमती दर्शविली.

घोड्यावर बसणे आणि नदीत वा विहिरीत पोहणे हे माझे लहानपणाचे दोन आवडते छंद. त्यांपैकी घोड्याच्या पाठीवर थाप मारून त्याला एक चक्कर मारायला लावता आली होती. पण पोहण्याची इच्छा कशी तृप्त होणार ? मे महिन्यात रोज सकाळी थंड पाण्याच्या नळाखाली बसून आंघोळ करण्याचा कंटाळा आला होता. म्हणून मी एके दिवशी जेलर पोतदारांना म्हटले, " पोतदारसाहेब, आपल्याला तास दोन तास जेलबाहेर घेऊन चला की ? आपण दोघेही पोहायला जाऊ आणि लगेच परत येऊ. " त्यावर पोतदार म्हणाले, " शाब्बास ! म्हणजे आपल्या दोघानांही येथे परत आणण्याऐवजी मेंटल हॉस्पिटलमध्ये नेतील म्हणजे झाले. अहो, हा तुरुंग आहे हे तुम्ही विसरता. " पोतदारांना असे थोडे छेडले, की ते काम माझ्याकडे द्यायचे व तेवढाच दुपारचा माझा वेळ जायचा. वडीलधारी मंडळी दुपारी जेवण करून झोपेच्या आधीन झाली, की मी जेलच्या ऑफिसमध्ये जाऊन पोतदारांबरोबर गप्पागोष्टी करीत बसायचा. अशा वेळी ते कधी कधी मला राजबंद्यांनी घरी लिहिलेली पत्रे बंद करून जुळवून ठेवायला सांगायचे. आठवड्यांतून दोन वेळा सरकारी खर्चाने घरी पत्र लिहिण्याची मुभा असल्याने राजबंदी त्याचा पुरेपूर फायदा घ्यायचे व बऱ्याच जणांना साहित्यिक, कवी, प्रेमिक बनण्याची लहर यायची. एकदा पोतदार नियमाप्रमाणे पत्रे वाचून ती सेन्सॉर करीत असता त्यांना घरून बोलावणे आले व त्यांनी त्यांच्या पुढ्यांतील गठ्ठा माझ्यापुढे सरकावून ते निघून गेले. सेन्सॉर म्हणजे काय याची कल्पना त्यांनी यापूर्वीच दिलेली होती. मी त्या ढिगाऱ्यांतील एक पत्र उचलले आणि ते वाचण्याचा प्रमाद माझ्या हातून घडला. पन्नाशीच्या आसपासच्या एका पुढाऱ्याने आपल्या पत्नीला ते पत्र लिहिले होते. कॉलेजजीवनात मी प्रेमाबद्दल फक्त कथा—कादंबऱ्यांतून वाचले होते, ऐकले होते पण त्या पत्रात मला एक प्रेमकथाच वाचायला मिळाली.

" प्रिय............

तुझ्यापासून दूर राहून होऊन आता दहा महिने होत आले. तुझी रोज आठवण होते आणि झोप उडून जाते. प्रिये, आपले लग्नाचे पहिले दिवस तुला आठवतात ना ? तू अशीच पहिल्यांदा माहेरपणाला गेली होतीस आणि तुला तेथे थोडे अधिक दिवस थांबावे लागले होते. तेव्हा मी तुझ्यावर किती रागावलो. पण आता तू माझ्यावर रागावली असशील, पण

काय करू, प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आणि व्यक्तीपेक्षा देश मोठा आहे. देशासाठी तुझा विरह सहन करण्यास मी बांधलेलो आहे. खूप खूप लिहावेसे वाटते. पण कागद ठराविक आकाराचा लहान असल्याने आटोपते घेतो. मुलांना आठवण दे-प्रकृतीची काळजी घे.

— तुझा ''

पत्र वाचून झाल्यावर मला थोडे हसू आले. पण ते हसू दाबीत मी पत्र गठ्ठयात ठेवले व पोतदारांच्या टेबलावरील आलेल्या पत्रांतील एक पत्र उचलून वाचू लागलो. ते एका पत्नीने आपल्या पतिराजांना लिहिलेले पत्र होते. चार मुलाच्या त्या आईने तर अगदी शिरिन–फरहाद, लैला-मजनूला प्रेमात मागे टाकले होते. पोतदार परत आल्यावर मी त्यांना म्हटले होते, " साहेब, तुमची कमाल आहे. रोज ही पत्रे वाचून तुमचे डोके नाही का फिरत ? घरच्या अडचणी, मुलांचा त्रास, थकलेले भाडे, दुधाची राहिलेली बिले आदि मजकूर वाचताना तुम्ही घामाघूम नाही का होत ? " त्यावर पोतदार म्हणाले, " जग ही एक मोठी बंदीशाळा आहे. मग त्यातील प्राणी आपल्यापेक्षा वेगळे कसे असणार ? " पोतदारांचे हे प्रवचन सुरू होताच मी उठलो व परत बराकीत जाऊ लागलो. तेवढ्यात डॉ. मेहता आत आले आणि त्यांनी ' ज्युथिका रे ' च्या नव्या रेकॉर्डचे नाव सांगून रात्री ग्रामोफोनवर लावण्याचे कबूल केले. कु. रे ही आमच्या दोघांची आवडती गायिका बनलेली होती. मीराबाईची भजने तिने एवढी सुंदर म्हटली आहेत की, ती गाताना मीरा आणि तिचा प्रभू साक्षात् डोळ्यांपुढे उभा राहातो.

" मीराके प्रभु " म्हटले की, नरुभाऊ लिमये यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. रेफरमेटरीत जी काही धडपडी, खटपटी, लटपटी माणसे होती, त्यांत सातारचे नरुभाऊ प्रमुख होते. नगरचे बाळासाहेब भारदे, नरुभाऊ लिमये आदींचा एक ग्रूप असे आणि मी, बारामतीचे बंडोपंत करंदीकर यांचा ग्रूप असे. कै. तात्यासाहेब जेधे, तुळशीदास जाधव, मेमाणे, गायकवाड, ल. र. पाटील, बाबासाहेब घोरपडे आदी मंडळी एकत्र बसत. शंकरराव मोरे आपले वेगळेच असत आणि काकासाहेब गाडगीळ, तात्या देशपांडे, कै. डॉ. लागू, लिमये, बुवासाहेब गोसावी, बु. साठे ही मंडळी वेगळी असत. त्याखेरीज मुंबईचे सुंदरदास मोरारजी, भवानजीभाई खिमजी, भानुशंकर याज्ञिक, तुल्ला आणि अहमदाबादचे वाडिलाल चिमणलाल, डॉ. हरिप्रसाद देसाई आदी मंडळी वेगळी असत. प्रार्थनेच्या किंवा कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्ही एकत्र येत असू. जावडेकरांची लोकशाहीवरील व्याख्याने, सानेगुरुजींची व्याख्याने, देवगिरीकरांचा बंगालीचा वर्ग या निमित्तानेही एकत्र बसणे–उठणे होत असे. सायंकाळी व्यायाम म्हणून आम्ही

हँडटेनिस खेळत असू. त्यांत मी आणि करंदीकर बहुतेकांना भारी ठरत असू. तपासे व भारदे चांगले खेळत. कधी कधी शंकरराव मोरे व ल. मा. पाटील पण. खेळत. आमचा इकडे हा मैदानी खेळ सुरू झाला, की तिकडे तटाशी बसून भारदे-लिमयेंचा बांबू क्लब भरून एकादा बांबू टाकला जायचा. या बाबूचे कोडे कित्येकांना अनेक दिवस उलगडले नव्हते. सिनिअर मंडळी म्हणत, " जाऊ द्या हो ! ही टारगट मंडळी आपले थोडेच ऐकणार आहेत! यांना बारावे आणि बारसे सारखेच." आणि खरोखरच अनेकांचे बारसे जेवलेले आमचे हे वीर जाता जाता एखाद्याची टोपी अशी काही सफाईदारपणे उडवीत की बोलायची सोय नाही. कै. जावडेकरांच्या उपस्थितीमुळे आणि कै. सानेगुरुजींच्या आगमनामुळे बांबू क्लबच्या हालचाली हळूहळू मंदावून तो बंद पडला.

कै. तात्यांचा मटणाचा डबा हे आमचे मोठे आकर्षण असे. दर रविवारी केशवरावजींचा मटणाचा मोठा डबा येत असे व आम्ही चारपाच मंडळी त्यवर आडवा हात मारीत असू. काही राजबंद्यांचे जेवणाचे डबे तर रोज असत. काही बंदी तर आजारपणाच्या नावाखाली ससूनला जाऊन बायकामुलांना भेटत असत. साहेबाने राजबंद्यांची बडदास्त मोठी चांगली ठेवली होती. ' अ ' वर्गाच्या स्थान-बद्धांना तुरुंगाचे वातावरण बाधू नये म्हणून शक्य तेवढी काळजी घेण्यात आली होती. ग्रंथनिष्पत्तीसाठी हे वातावरण फारच अनुकूल व पोषक होते. पण माझ्यासारख्याच्या डोक्यात इंटर सायन्सचे फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायॉलॉजी घुसलेली असल्याने मला कथा-कादंबरी लिहिण्याची व काव्य करण्याची स्फूर्ती होणे शक्य नव्हते. वाचनाची आवड मात्र निर्माण होऊ शकली आणि थोरामोठयाकडील ग्रंथ जमवून मी जास्तीत जास्त वेळ वाचनात घालविला. गुजराथी व बंगाली भाषांची चांगली ओळख करून घेतली. " केम हरिभाई " म्हटले की, डॉ. देसाईंना बरें वाटायचें. येरवड्याच्या तुरुंगातील गुजराथी वॉर्डरशी बोलले की त्यालाही बरे वाटायचे. हा वॉर्डर आणि माझी भांडी कधी कधी घासून देणारा कल्लू दरोडेखोर मी अजून विसरू शकलो नाही. या वॉर्डरने रागाच्या भरात सदोष मनुष्यवध केला होता. आणि कल्लू शिक्षा भोगण्यासाठी चौथ्यांदा येर-वड्याला आला होता. त्याची काळी टोपी त्याच्या बेडरपणाची साक्ष देत होती. येरवड्यातील पहिले दोन महिने मोठ्या धामधुमीत गेले. हॉस्पिटल यार्ड आणि अंधेरीमध्ये वडी वडी मंडळी ठेवलेली होती. पण त्यांना एकत्र येण्याची संधी दिली जात नव्हती. तुरुंगात रोज नवे नवे चेहरे पहायला मिळायचे. कैद्यांची भांडणे आणि पोलिसांकडून त्यांना रोज मारपीट हे नित्याचे होऊन बसले होते.

● ● ●

## बसूंचे बंगाली रसगुल्ले ! : २ :

येरवडा तुरुंगात आता व्हिजिटर म्हणून सहज फेरफटका मारला तर तुम्हांला गेल्या वीस वर्षांत कितीतरी फरक झालेला आढळून येईल. तुरुंगाचा दरवाजा आता पूर्वीसारखा अक्राळविक्राळ वाटत नाही, की आत जाताना किंवा बाहेर येताना अंगझडती घेतली जात नाही. आतील वातावरणही रम्य आणि प्रसन्न वाटावे असा प्रयत्न केलेला आढळून येतो. कैद्यांकडे निव्वळ शासनाच्या दृष्टीने न पहाता त्यांच्या सुधारणेकडेही लक्ष पुरविले जात असल्याचे दिसून येते. त्यांना कामाचा मोबदला तर मिळतोच, पण सांस्कृतिक कार्यक्रमाचीही मुभा दिली जाते. तुरुंगाच्या बाह्य आणि अंतर्गत स्वरूपांत खूप खूप बदल झाल्याचे अनुभवास येते. गेल्या महिन्यात जेलच्या मुख्य दरवाजापुढून जाण्याचा प्रसंग आला असता थोडा वेळ थांबून मी त्या मध्यवर्ती तुरुंगाचे निरीक्षण केले. अल्पावधीत माझ्या डोळ्यांपुढून १९४२-४३ च्या आंदोलनाचा आणि अनुभवांचा चित्रपट सरकून गेला. १९४२ ऑगस्टच्या एके रात्री १२ च्या सुमारास मला पोलिसांनी या तुरुंगाच्या दरवाजाशी आणून तुरुंगाधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले. वेळ रात्रीची, घटना बंदीवासाची आणि कल्पना येरवड्याच्या कठोरतेची, त्यामुळे माझ्यासारखा वीस वर्षांचा तरुण त्यावेळी थोडा चपापला असल्यास नवल नाही. त्या अंधाऱ्या रात्री मला कचेरीतून हॉस्पिटल यार्डकडे नेत असता मुसळधार पावसाने मी ओलाचिंब झालों आणि पहिली रात्र तर जवळ जवळ कुडकुडतच काढली. तथापि सकाळी उठल्यावर जेव्हा बहुतेक ओळखीचे चेहरे दिसले, तेव्हा फार बरे वाटले. सारेजण माझ्याभोवती गोळा झाले आणि बाहेरची खबरबात विचारू लागले. मीही ९ ऑगस्ट नंतरच्या घटना थोडक्यात निवेदन करून माझ्या आगमनाच्या कारणांचा ठसा त्यांच्या मनावर उमटविला.

देशात कोठे काय घडले, कोठे गाडी पडली का, पूल उडवून लावला का, साहेबाला एका गोळीत यमसदनाला पाठविले का हे जाणून घेण्यास प्रत्येकजण उत्सुक दिसला. त्याचबरोबर जर्मनांनी रशियात किती प्रगती केली, स्टालीनग्राड पडण्यास किती दिवस लागतील याची माहिती घेण्यासही अनेक आतुर दिसले. कारण तुरुंगात वृत्तपत्र आणण्यास व येण्यास बंदी होती. एवढेच नव्हे, तर उघडपणे, सामुदायिकपणे, राजकारणावर किंवा लढाईवर चर्चेची मुभा नव्हती. गांधीजींच्या या वेळच्या चळवळीबद्दल राज्यकर्ते साशंक होते. शांततापूर्ण सत्या-

ग्रहाचे मार्गानेच काँग्रेसवाले जातील अशी खात्री राहिली नव्हती. भूमिगत चळवळीचा ब्रिटिशांनी धसका घेतला होता. म्हणूनच तुरुंगातील राजबंद्यांवर विशेष लक्ष ठेवलेले होते. अशातच एके दिवशी सोलापूरचे भाई छन्नूसिंग व विभूते आणि पुण्याचे बलदेव प्रसाद रात्रीच्या वेळी तुरुंगाची मागील भिंत चढून उड्या टाकून पसार झाले आणि वातावरण प्रक्षुब्ध बनले. राजबंद्यांवर लाठी-हल्ल्यापर्यंत पाळी आली. हॉस्पिटल यार्डमधील राजबंद्यांचे नेते होते काकासाहेब गाडगीळ. त्यांनी तुरुंगाधिकाऱ्यांकडे अन्यायाचा प्रतिकार नोंदवितांच झटापटीत काकासाहेबांना थोडी खोक पण पडली. त्याचा निषेध म्हणून एक दिवस अन्न-त्यागाचा प्रकारही घडला.

हॉस्पिटल यार्डमधील काका आमचे कर्णधार. सर्वांना सांभाळून कसे घ्यावे, कोणाच्या लहरी कशा सांभाळाव्यात हे काकासाहेबांना चांगले ठाऊक. त्यामुळे काहीही अडचण आली की, काकांचेकडे धांव घ्यायची आणि काका तिचे हमखास निवारण करायचे. हॉस्पिटल यार्ड आणि रेफरमेटरीत काकांनी खरोखर सर्वांना घरच्यासारखे वागविले, काही कमी पडू नाही दिले. काका म्हणायचे, " अरे ही बंदीशाळा नसून आपली राजकीय शाळाच आहे. आपण बाहेर नाही का जगाच्या एका मोठ्या बंदीशाळेत रहात. येथे आपण टिकलो, वाढलो की बाहेर वाढलोच म्हणून समजा. " त्यांचे उद्‌गार आजही माझ्या कानात घुमत आहेत. जगाच्या बंदीशाळेतील कोणत्याही परिस्थितीत मी टिकत आहे, वाढत आहे, पुढेपुढे जात आहे याचे कारण माझा तो बंदीवास. दोन्ही बराकीत जागा पुरेना म्हणून आम्हां काही मंडळींना पटांगणात तंबू ठोकून त्यात ठेवले होते. माझ्या तंबूत होते दादा मिराशी आणि जगन्नाथ किराड. हे दोघेही आत कसे आले याचे प्रत्येकाला त्या वेळी आश्चर्य वाटले. कारण दादाचा व्यवसाय अगदी वेगळा आणि भाऊ तर पहिलवान. आपले दुकान आणि व्यवसाय यांत गुंतलेला. पण पोलिसांनी दोघांनाही आत आणून सोडले होते. एवढेच नव्हे तर गांधीजींना स्थानबद्ध करण्यात आलेल्या आगाखान पॅलेसच्या रस्त्याने कुतूहलाने जाणाऱ्या दोघा उत्तर हिंदुस्थानी प्रवाशांना पकडून आमच्या हॉस्पिटलयार्डमध्ये आणून सोडले होते. बिचाऱ्यांचा नाही काँग्रेसशी संबंध की चळवळीशी संबंध. एक कपूर व दुसरा सक्सेना. दोन दिवसांत बिचारे रडकुंडीला आले होते. त्या वेळी स्थानबद्धता कायद्याखाली दोन महिनेपर्यंत कोणालाही चौकशीविना डांबून ठेवता येत असे. प्रभू आणि अंबिके या दोन व्यक्तीही अशाच दोन महिने उगाच डांबून ठेवल्या होत्या. या प्रभूबद्दल प्रत्येकजण संशय व्यक्त करी. एवढेच नव्हे तर काही जण मिराशीकडे संशयाने बघत. त्यांचे म्हणणे की पोलिस अधिकाऱ्यांनी यांना मुद्दाम आत आणून सोडले. हेतु हा की या दोघांकडून आतील हालचाली

कळून बाहेर कोठे काय संबंध जोडलेले आहेत की काय हे समजेल. म्हणजे त्यांना पोलिसचे साहाय्यक समजून त्यांच्याशी थोडे तुटकपणेच वागले जात असे.

मिराशी मोठा डोकेबाज माणूस. त्याचा रोज जेवणाचा जो डबा यायचा त्यात पोळ्या या वृत्तपत्राच्या कागदात गुंडाळलेल्या असायच्या. जेलचे पोलिस तो कागद पाहण्याची तसदी घेत नसल्याने आम्हांला रोज त्या दिवशीचे वृत्तपत्र वाचायला मिळायचे. या वृत्तपत्रावरून जेलबाहेरच्या जगाची कल्पना येऊ शकायची. दुपारी जेवण झाले, की दोन चर्चा सुरू व्हायच्या आणि त्या म्हणजे स्टालिनग्राड जर्मनांनी जिंकले तर काय होईल आणि दुसरे म्हणजे काँग्रेसच्या १९४२ च्या चळवळीला जे विघातक--विध्वंसक स्वरूप प्राप्त झाले आहे ते आपल्याला स्वातंत्र्याप्रत नेईल का ? गांधीवादी मंडळींना भूमिगत चळवळ तेवढी मान्य नव्हती. पण तिला नाकेही मुरडता येत नव्हती. आचार्य स. ज. भागवत आम्हां विद्यार्थ्यांच्या चळवळीला हसत असत. पण विद्यार्थ्यांनी १९४२ मध्ये केलेले कार्य केवढे मोठे होते याची प्रचीती त्यांना नंतर येऊन त्या सर्वांना गप्प बसणे भाग पडले.

राजबंद्यांत २० ते ४० आणि ४० ते ६० असे वयाचे दोन गट स्पष्ट पडलेले असायचे व त्या त्या गटाची मंडळीच प्रथम एकत्र येऊन मोकळेपणाने बोलत बसायची. आमच्या तंबूच्या पलीकडील तंबूत पुण्याचे केतकर व चव्हाण आणि सातारचे देवरे असे तिघे जण होते. देवरे आणि चव्हाण चहा आणि तंबाखूचे शौकिन. चहाची हुक्की आली की त्यांच्या तंबूत जायचे आणि मस्त चहा पिऊन वर पान खायचे. या मंडळीच्या पलीकडे श्री. तेंडूलकर या नावाचे युद्धकैदी एका तंबूत एकटेच होते. जर्मनांशी संबंध या संशयावरून त्यांना पकडून ठेवण्यात आले होते. श्री. तेंडूलकर जर्मनीहून शिकून आलेले होते. ते जर्मन भाषा फारच सुरेख बोलत. इंटर सायन्सला मी जर्मन भाषा घेतलेली असल्या[illegible] त्यांच्याशी काही वाक्ये जर्मनीत बोलत असे. हे डॉक्टर जर्मनांच्या बाजूचे आमचे केतकर-देवरे चाहते रशियाचे. त्यांच्यात एकदा ठिणगी टाकून दिली क[illegible], असा भडका उडायचा की विचारू नका. या डॉक्टरांना आमच्यापेक्षा थोडे अधिक रेशन मिळत असे आणि ते त्यांना संपत नसे. मग त्यांच्या लोण्यावर आणि दुधावर कधी कधी आम्ही ताव मारीत असू. डॉक्टर कम्युनिस्टांचे आणि कम्युनिझमचे पक्के द्वेष्टे होते. आता हे डॉ. तेंडूलकर बागलकोट सिमेंट फॅक्टरीचे बडे अधिकारी असून ते चतुर्भुजही झाले आहेत. तुरुंगात असताना पत्राने प्रेम करण्याच्या अवस्थेतच ते होते. बाहेर पडल्यावर गांधीजींच्या संमतीने

आणि आशीर्वादाने ते इंदुमती गुणाजी यांच्याबरोबर विवाहबद्ध झाले. हे डॉक्टर वडिलधाऱ्या मंडळींना बहुधा टाळून आमच्यातच वेळ घालवीत असत.

आमच्या दिमतीस दिलेल्या गुन्हेगारांपैकी कल्ल्याबद्दल मला कुतूहल वाटे. तो विजापूर जिल्ह्यातला होता आणि एका दरोड्याबद्दल त्याला ६ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. यापूर्वी तो दोन वेळा येरवड्याची हवा खाऊन गेला होता. मी त्याला एके दिवशी दुपारी सहज बोलता बोलता विचारले, "कल्लू, तुला बायका-मुले आहेत म्हणतोस मग दरोड्यासारखा गुन्हा करून तुरुंगात का येतोस ? कष्ट करून कौटुंबिक जीवन आनंदात का नाही घालवीत ?" त्यावर तो म्हणाला, "आनंद व सुख आम्हांला का नको आहे ! पण सुखाने जगून कोण देतो आम्हांला ? सावकाराने व्याजापायी गिळलेली जमीन परत मिळविण्यासाठी बापाला दिलेली शपथ पुरी करायला गेलो आणि इकडे आलो. सावकाराच्या घरावर दरोडा घालून त्याचे सारे खोटे कागदपत्र पळविण्याचा बेत होता, पण बंदुकीने दगा दिला. अंधारात बंदुक सावकारावर झाडली आणि ती चुकवून सावकाराने बरोबर डाव साधला. सारा गाव जमला आणि सावकाराने दाराला कडी घातल्यामुळे आत अडकलेला मी लोकांच्या हाती सापडलो. जमीन-परी जमीन गेली आणि तुरुंगाची हवा खायचे नशिबी आले."

त्याची कहाणी सांगून झाल्यावर त्याने भीत भीत विचारले, "साहेब, पण तुम्ही का आलात तुरुंगात ? तुमचे हे वय आहे का जेल पहायचे. गांधीबाबाची चळवळ सुरू झाली, की तरुण-म्हातारे सारे उसळून उठतात आणि गांधीबाबा सांगतात तसे ऐकतात. एकटा माणूस साहेबाच्या राज्याला भारी ठरतोय बघा. पण साहेब, तुम्ही किती दिवस रहाणार—जेलात ? तुम्हांला आई—वडिलांची आठवण नाही का येत ? मला माझ्या मुलाची आणि अस्तुरीची लई आठवण येते." कल्लूच्या डोळ्यात पाणी तरारले व त्याने तोंड फिरवून ते हळूच टिपून घेतले. तसा तो फार हळव्या मनाचा होता. एकदा जमिनीच्या बांधावरून मारामारी करून तुरुंगात आला होता, तर एकदा पोलिस-शिपायावर हात उगारला म्हणून तुरुंगात आला होता. आता त्याला तुरुंगाची चांगलीच संवय झाली होती. त्याच्या डोक्यात पांढऱ्या टोपीऐवजी काळी टोपी दिसू लागली होती आणि त्याबद्दल त्याला कसला खेद वा खंत वाटत नव्हती. माझे काम तो प्रेमाने—आपुलकीने करायचा. एकदा मला तो म्हणाला, "साहेब, घरी काही निरोप पाठवायचा आहे का ?" त्यावर मी विचारले, "तू कसा रे घरी निरोप पोहोचविणार ?" त्यावर तो हंसून म्हणाला, "अहो, जेलच्या पोलिसाला गांजा व भांगेची गोळी दिली किंवा एखादी नोट फिरविली, की तो करतो आपले काम.

अहो, पोलीस हा देखील माणूसच आहे ना? मग त्याला लोभ कशाचा नसणार? लालूच दाखविली, की सारे काही होते.'' आणि मग त्याने रोज आतून बाहेर जाणारे निरोप व वस्तू आणि बाहेरून आत येणाऱ्या वस्तूंची यादी पाठ म्हणून दाखविली. मी अगदी चाट पडलो. चिरीमिरी प्रकरणाने मानला तर जेल नाहीतर ते घर बनवून टाकले होते.

एकदा मी दुपारी असाच वाचीत पडलो असता भिंतीपलीकडून 'आई ग' अशी आर्त किंकाळी ऐकू आली. आवारातील झाडावर थोडे चढून मी पलीकडे पाहण्याचा प्रयत्न केला. एका कैद्याला फटक्याची शिक्षा देण्याचे काम चालू होते. कैद्याच्या कमरेला फक्त वस्त्र होते आणि त्याच्या उघड्या पाठीवर चामडीच्या चाबकाने फटके मारण्यात येत होते. शेजारी मॅजिस्ट्रेट, डॉक्टर व जेल सुपरिंटेंडेंट उभे होते. फटके मारणारा हा एक ट्रेंड माणूस होता. कैद्याचे दोन्ही हात वर बांधून त्याला उघडा उभा केला होता. प्रत्येक फटक्याला तो कळवळून ओरडे आणि माझ्या अंगावर काटा उभा राही. पाच फटके झाल्यावर डॉक्टरांनी त्याची प्रकृती तपासली आणि मग त्याला त्याच्या कोठडीत नेण्यात आले. इंग्रजी सिनेमात कैद्यांना फटके मारताना पडद्यावर पाहिले होते. पण त्या दिवशी ही क्रूर क्रिया, निर्दय शिक्षा प्रत्यक्ष डोळ्याने पाहिली होती. फाशीगेटला फाशी देण्यासाठी नेण्यात येणाऱ्या कैद्याच्या मनात कोणते विचार येत असतील, तो शरीराने व मनाने कसा हतबल होत असेल हा साधा विचार जेथे असह्य, तेथे फटक्याच्या शिक्षेची अंमलबजावणी पाहणे किती असह्य झाले असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. चक्की पिसणे, खडी फोडणे आदी शिक्षांबद्दल ऐकले होते. तुळसीदास जाधव यांनी १९३२ मधील आपले अनुभव रसभरीत वर्णन केले होते. त्या साऱ्या शिक्षा रद्द केल्यावर फटक्याची शिक्षा रद्द का होऊ नये, या विचाराने चार–दोन दिवस मला अगदी बेचैन केले होते. अशा अवस्थेत असतानाच माझ्या डोळ्यांचा विकार मला त्रास देऊ लागला आणि डॉक्टरांच्या शिफारशीनुसार उपचारासाठी माझी ससून हॉस्पिटलमध्ये रवानगी करण्यात आली.

ससूनमध्ये मला युरोपियन वॉर्डमध्ये ठेवले होते आणि माझ्या खोलीच्या दाराशी २४ तास पोलिस-पहारा ठेवण्यात आलेला होता. इंग्रजांकरिता खास राखून ठेवलेल्या या वॉर्डमध्ये नर्सेस ॲंग्लोइंडियन, पार्शी किंवा ख्रिश्चन होत्या. त्या इंग्रजीशिवाय पाणी पीत नसत. डॉ. पटवर्धनांनी माझ्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया केल्यावर मी डॉक्टरांना विनंती केली की, शुश्रूषेला महाराष्ट्रीय नर्स दिली गेली तर बरे होईल. कारण त्या पाश्चात्य पद्धतीने बोलणाऱ्या–वागणाऱ्या नर्सेसची मला घृणा वाटू लागली होती. ते नाताळचे दिवस होते आणि त्या सणात आणि

मुद्दीत काही इंग्रज किंवा ऑस्ट्रेलियन किंवा अमेरिकन सैनिक या युरोपियन वॉर्डाच्या आवारात रात्री दहानंतर येऊन रात्रपाळीच्या नर्सेसशी प्रेमाचे चाळे करीत बसत. काही नर्सेस आपल्या क्वॉर्टर्समधून रात्रीच्या उतरून येऊन एखाद्या झाडाच्या आड या सोजिराशी प्रणयक्रीडा करीत बसत. त्यामुळे हे हॉस्पिटल आहे, की प्रेमाची देवघेव करण्याचा एखादा नाइटक्लब आहे असे मला वाटू लागे.

माझ्या शेजारच्या खोलीत एक बंगाली डॉक्टर होता व तोही जेलमधून उपचारासाठी ससूनमध्ये आला होता. त्याच्याही डोळ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. हा डॉक्टर युरोपातून शिकून आलेला असल्याने त्याला नाताळ म्हणजे जेलबाहेर एक पर्वणीच वाटत होती. त्याला भेटयला रोज सायंकाळी बरेच स्त्री-पुरुष येत. रात्री जेवणानंतर तो एखाद्या अँग्लोइंडियन नर्सशी गप्पा मारीत बसे. एकदा मी त्याला म्हटले, " डॉ. बसू, तुम्ही कैदी आहांत हे विसरला की काय ? " त्यांवर डॉक्टर मजकूर म्हणाले, 'तूर्त विसरलो आहे. आज रात्री मी डान्समध्ये भाग घेणार आहे. तुम्हांला पहायला यायचे असेल तर माझ्या खोलीत जरूर या " आणि खरोखर त्या डॉक्टरने ग्रामोफोन, इंग्रजी गाण्याच्या काही रेकॉर्डस, रस-गुल्ल्यांचा एक डबा एवढी सामुग्री जमवून एक–दोघा नर्सेसबरोबर रात्री सुरेख नाच केला. त्यांना मिठाई दिली आणि नाताळची रात्र उत्साहाने साजरी केली. दुसऱ्या सकाळी डॉ. बसू मला म्हणाले, " Young lad, life is for living, Work, drink, eat and be merry " या डॉक्टरचे जीवनविषयक तत्त्वज्ञान मोठे और होते. पण त्याने स्वकष्टाने, बुद्धीने व कर्तृत्वाने नाव आणि धंदा मिळविला असल्याने त्याचे वजन, त्याची इभ्रत खूप मोठी झालेली होती. या डॉक्टरच्या आठ दिवसांच्या सहवासात मी कितीतरी नवीनवी माहिती मिळविली, नवेनवे शिकलो.

एके दिवशी सायंकाळी डॉक्टर बसू मला म्हणाले, जा गावात भटकून या. मी डॉक्टरची आणि सिस्टरची काढली आहे परवानगी. तुमच्या पोलिसालाही दिले आहेत पाच रुपये. स्टेशनच्या बाजूने एक फेरफटका मारून या आणि खरोखर त्या दिवशी सायंकाळी मी कॅम्पच्या बाजूने स्टेशनवर जाऊन खूप भटकून आलो. बरोबरचा पोलिस म्हणू लागला, 'साहेब' आपण बाहेरच जेवलो आणि एकादा सिनेमा टाकला तर ? 'मी म्हटले,' कल्पना चांगली आहे, पण रात्रीच्या दहाच्या हजेरीचे काय ? त्यावर तो म्हणाला, 'अहो' हॉस्पिटलमध्ये येणारे काही राजबंदी घरी जाऊन येतात, दोन दोन तास तेथे थांबतात किंवा हॉस्पिटलमधील आपल्या खोलीत घरच्या मंडळींना बोलावून घेतात. एकदा मी एका राजबंद्याच्या खोलीच्या दारावर पहाऱ्याला असताना सायंकाळी ६ ला आत शिरलेली त्याची

पत्नी तीन तासांनी बाहेर आली. तेव्हा मी सुटकेचा निश्वास टाकला. या बड्या माणसांना आम्ही कसं काय सांगणार ? तुम्ही एक कॉलेज विद्यार्थी आहात म्हणून ठीक. तुमच्या मागे नाही काही जंजाळ आणि जबाबदाऱ्या. तुम्ही नर्सला टाळता. बाकीचे लोक नर्सला तासन् तास जवळ बसवून घेऊन डोके चेपून घेतात किंवा स्पंज करवून घेतात.

ससून हॉस्पिटलमधील माझे दहाबारा दिवस चांगले गेले. नातेवाईकांच्या भेटी होऊ शकल्या आणि डोळ्यावर उपचारही चांगला करून घेता आला. डॉ. बसू यांच्या सहवासामुळे बंगालच्या क्रांतिकारकांची आणि तेथील सामाजिक–सांस्कृतिक चळवळींची माहिती मिळू शकली. डॉक्टर संगीताचे शौकिन होते. काननबाला, सायगल आणि पंकज मलीक यांच्या लोकप्रियतेमागे त्यांची संगीतसाधना कशी कारणभूत आहे हे त्यांनी विशद करून सांगितले. ‘ पिया मिलन को जाना ’ हे ‘ कपालकुंडले’तील पंकजचे गाणे आणि ‘ बालम मोरा ’ ही सायगलची गझल डॉक्टरांनी मला एकदा म्हणूनही दाखविली. शरदबाबूंच्या साहित्याने बंगालच्या सामाजिक जीवनाचे कसे जिवंत दर्शन घडविले आहे याचे वर्णन केले. के. सी. डे या अंध गायकाच्या पहाडी आवाजाने हिंदी आणि बंगाली चित्रपटांना त्या वेळी कशी लोकप्रियता मिळाली याचे त्यांनी ‘ पन घट पे कन्हैया आता है । ’ हे गाणे म्हणून सोदाहरण वर्णन केले. न्यू थिएटर्स आणि प्रभातने चित्रपटसृष्टीत नवा इतिहास कसा घडविला हे सांगताना त्यांनी महाराष्ट्र आणि बंगालच्या महात्म्याचे गुणवर्णन करून महाराष्ट्राचा इतिहास बंगालला स्फूर्तिप्रद कसा वाटतो याची माहिती निवेदन केली.

डॉक्टर बोलताना मध्येच काही बंगाली शब्द वापरीत आणि ते कानाला मोठे गोड वाटत. त्यांच्या या अल्प सहवासांतच बंगालीची आवड निर्माण झाली व पुढे मी मामासाहेब देवगिरीकरांकडून बंगाली भाषेचे काही धडे घेतले. ‘ बांगला ’ म्हटले की बंगालची आठवण येते आणि शूर–बेडर क्रांतिकारक, गुरुदेव टागोर, शरदबाबू, सुभाषबाबू आदींची चित्रे डोळ्यांपुढून सरकू लागतात. एवढेच नव्हे तर बी. एन. सरकार, देवकी बोस, सायगल आदींची आठवणही येते. डॉ. बसू, त्यांचे रसगुल्ले आणि ससूनमधील ते वास्तव्य याचेही स्मरण येते. येरवड्याच्या बंदीवासाची आठवण जर अजूनही कोण करीत असेल तर ‘ सो जा राजकुमारी सो जा ’ हे गाणे म्हणणारा सायगल आणि त्याचा तो दर्दभरी आवाज. जेलर पोतदार, जेलचे डॉ. मेहता, डॉ. बसू आणि तुरुंगातील सहाध्यायी यांनी माझ्यावर आपुलकीचा वर्षाव केला नसता तर आज मी आहे असा कदाचित् दिसलोही नसतो.

• • •

## " मी ' काँग्रेसभवन 'वर जातो ! " : ३ :

गेल्या रविवारी काँग्रेसभवनवर जाण्याचा योग आला होता. रविवार असूनही दुपारी १ वाजेपर्यंत कचेरीत काम केले असल्याने थकल्यासारखे वाटत होते. बाहेर पाऊसही पडत होता, तरीही कपडे घालून दुपारी २ ला काँग्रेस-भवनची वाट धरावी लागली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या युवक संघटनेच्या ' नवयुवक ' नावाच्या नव्या मासिकाचा प्रकाशन समारंभ होता. अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष विनायकराव पाटील यांची आणि प्रमुख पाहुणे म्हणून गृहमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांची नियुक्ती करण्यात आली होती. युवक काँग्रेसचा कार्यक्रम आणि प्रदेशाध्यक्ष व गृहमंत्र्यांची उपस्थिती असा योग आल्याने समारंभाला जाणे भाग होतेच. शाहू मंदिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मंगुडकर यांच्या समवेत काँग्रेसभवनवर पोहोचताच एक वेगळेच दृश्य पहायला मिळाले. कार्यकर्त्यांची गर्दी चांगलीच जमली होती आणि सर्वांनी समारंभ सुरू होण्यापूर्वी जागेवर उपस्थित राहण्याची दक्षता घेतली होती. पांढऱ्याशुभ्र कपड्यातील ते कार्यकर्ते पाहिल्यावर बरे वाटले. मंत्र्यांच्या निमित्ताने का होईना काँग्रेसभवनाला त्यांचे पाय लागतात हे काय थोडे आहे. माझ्या शेजारचा लॉन्ड्रीवाला मला नेहमी म्हणतो की, काँग्रेस हाऊसवर मंत्री येणार याची आम्हांला आगाऊ माहिती मिळू शकते. कपडे ' टिनोपाल ' धुलाईसाठी आले, की समजावे कोणीतरी मंत्री पुण्यात येणार व काँग्रेसभवनाला भेट देणार. एरव्ही त्या भवनाची आणि काँग्रेसची आठवण कोणाला होते ? त्या दिवशी मोटारींची संख्याही बरीच होती. प्रमुख पाहुणे यावयास उशीर होता. मंत्री मोटारीतून उतरताच आपला चेहरा दिसावा अशी प्रत्येकाची इच्छा आणि धडपड. म्हणून बरेचजण खाली व्हरांड्यातच उभे होते.

ही धडपड मला कधी जमत नाही. मी आपला ' बॅक बेंचर'सारखा अगदी शेवटच्या कोपऱ्यात प्रथम जाऊन बसतो आणि तेथून कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावरील भाव टिपून घेतो. त्यातील बरेच निर्विकार असल्याने फारसा त्रास होत नाही. त्या दिवशी असाच मी अगदी शेवटी निवांत जाऊन बसलो. माझ्या शेजारी एक-दोन पत्रकार आणि कार्यकर्ते येऊन बसले. त्यांपैकी एकजण म्हणाला, " संपादक ! तुम्ही असे मागे का ? पुढे जाऊन बसा. " मी त्याला म्हटले,

"पुढच्या जागेवर बसल्याने का मोठेपणा प्राप्त होणार आहे ? सभेला बसण्याच्या जागेने माणूस मोठा होत नाही, तर त्याची ती जागा तो बसल्याने मोठी होत असते. माझी उंची मला कुठेही दर्शनीय ठेवील आणि पाहुण्यांचे तेथूनही माझ्याकडे लक्ष जाईल." आमचा हा संवाद चालू असता युवक काँग्रेसचा एक कार्यकर्ता मला पुढे नेण्यासाठी आला. मी त्याला अदबीने म्हटले, "बाबा कार्यकर्त्यांत मी ठीक आहे. ही माझी हक्काची जागा असून गेली २५ वर्षे मी येथेच बसत आहे. तुमच्या युवकांना पुढे बसू देत आणि पाहुण्यांचे मार्गदर्शन ऐकू देत. हा समारंभ त्यांच्यासाठी आहे, आम्ही आपले पाहुणे-प्रेक्षक." त्यावर माझ्या शेजारचा कार्यकर्ता चटकन् म्हणाला, "पण येथे युवक तर दिसत नाहीत. पुण्याच्या कॉलेजात दहा हजारांवर विद्यार्थी-विद्यार्थिनी असताना येथे तर शंभरही युवक दिसत नाहीत. बरेच खासदार-आमदार-मंडळ काँग्रेसचे पदाधिकारीच दिसत आहेत." मी ती चर्चा तेथेच थांबविण्याचा प्रयत्न केला आणि 'नवयुवक'चे संपादक श्री. शरश्चंद्र पवार यांचे प्रास्तविक भाषण ऐकू लागलो. शेजारी पत्रकारांची कुजबूज चालूच होती. "हा एक नवीन संपादक उदयाला आला. पण याने जुन्यांना-अनुभवींना कितपत विचारले कोणास ठाऊक! काय हो, तुमचा काही सल्ला घेतला का याने ?" मला पुन्हा प्रश्न विचारण्यात आला. मी म्हटले, "मासिक मुंबईत काढले आहे आणि तेथे संपादक डझनावारी पडले आहेत. मी असा कोण टिकोजी लागून गेलो आहे ?"

"अरे, पण तुम्ही काँग्रेसचे वृत्तपत्र चालविताना ? तुमचा या क्षेत्रातला अनुभवही मोठा आहे. तुमचा लेख तरी नक्कीच घेतला असेल. महाराष्ट्र काँग्रेस तुम्हांला नाही डावलणार ?" त्या पत्रकाराची ही डोकेदुखी थांबविण्याकरिता मी त्याला नमस्कार केला आणि म्हटले, 'कृपा करून गप्प बसा ना. बाळासाहेब काय सांगतात ते जरा ऐकू या. काही तरी चांगले ऐकायला मिळेल.' माझा हा बाण उपयोगी पडला आणि त्याचे भाष्य थांबून तो नोट्स् घेऊ लागला.

बाळासाहेब देसाई सांगत होते, "तरुणांत उंचीची ओढ हवी. त्यांनी आपल्या बुद्धीवर, कार्यावर आणि कर्तृत्वावर मोठे व्हावे. कोणाच्या तरी आधाराने मिळालेले मोठेपण टिकाऊ नसते. स्वतःची बैठक भक्कम असली तरच युवक समाजाला-देशाला काही देऊ शकतील." नवयुवकांच्या दृष्टीने आणि कार्यकर्त्यांच्या दृष्टीनेही बाळासाहेबांचे भाषण चांगले झाले. त्यांनी निवड आणि संग्रह यांचे सुरेख विवेचन केले. ते म्हणाले की, 'वेगवेगळ्या क्षेत्रांत चांगले काम करणारांची पारख करून त्यांचा संग्रह केला गेला पाहिजे. अशा कार्यकर्त्यांचा संचय संस्थेला किंवा संघटनेला मोठा करीत असतो.' बाळासाहेबांचे हे विचार

मोठे व्यवहार्य आणि पल्लेदार होते. पण त्या समारंभापासून तो इतरत्र कोठेही त्याची अंमलबजावणी होत असल्याचे काही अनुभवास येत नव्हते. कॉंग्रेस संघटना आणि कॉंग्रेसचे शासन या विचारांना कृतीत उतरविण्यापासून अलिप्त असल्याचेच अनुभवास येते.

'ज्ञान आणि नीती' यांची किंमत भराभर उतरली असून उथळपणा आणि नाचरेपणा यांचा भाव वधारला आहे. जो अधिक तापदायक तेवढी त्याची चलती किंवा जो अधिक पुढे पुढे करणार त्याची चंगळ. मग त्याच्या ज्ञानाचा आणि चारित्र्याचा विचार करण्याची जरूरी पण भासत नाही. अशा अनुभवामुळे ज्ञानसंपन्न आणि चारित्र्यवान् मंडळी कॉंग्रेसपासून दूर रहात असली तर त्यात त्यांचा काय दोष? कॉंग्रेसमध्ये हल्ली ना 'प्रोबेशन'ची जरूरी, ना शिक्षणाची आवश्यकता. कोणी केव्हाही संस्थेत आला, की तावडतोब झालाच पदाधिकारी किंवा आमदार, खासदार. त्याने उमेदवारी करण्याची किंवा कार्य करून दाखविण्याची काही आवश्यकता उरली नाही. अशा स्थितीत 'उंचीची ओढ' आणि स्वकर्तृत्वावर मोठे होण्याची अपेक्षा पूर्ण कशी होणार? "सस्ता माल उठाव, दो दो आना" असेच सध्याचे धोरण असून त्याप्रमाणे विक्रेते आणि ग्राहक दोन्हीही उपलब्ध आहेत.

बाळासाहेबांचे भाषण संपल्यावर शेजारच्या पत्रकारमित्राच्या टीकेची फेर पुन्हा सुरू झाली. तो म्हणू लागला, "आता मंत्रिमहाशय कॉंग्रेसभवनाबाहेर पडले, की येथील गर्दी क्षणार्धात संपेल आणि पुन्हा महिना-दोन महिने शुकशुकाट आढळेल. कॉंग्रेस ही निव्वळ निवडणूक यंत्रणा बनली आहे. सार्वत्रिक व पोटनिवडणुका लढवावयाच्या आणि मध्यंतरी पुढारी-मंत्री यांची भाषणे व सभा-समारंभ घडवून आणावयाचे, एवढेच काम कार्यकर्त्यांना उरले आहे. लोक एकीकडे आणि कॉंग्रेस कमिटी एकीकडे. लोकांचे प्रश्न एकीकडे आणि कार्यकर्ते-नेते यांचे प्रश्न एकीकडे. असाच चालला आहे हा जगन्नाथाचा रथ पुढेपुढे. जुन्या जबाबदार मंडळींची कोणी कदर करीत नाही आणि नव्यावर कोणी अंकुश चालवीत नाही. नव्यांना वाटते की, आपण हुशार-कर्तबगार म्हणून आपल्याला मानाचे पान. मग आपण कसेही वागले-उधळले तरी काय हरकत आहे? त्याची ही मुलुखमैदान तोफ थांबविण्याकरिता मी जागेवरून उठलो व बाहेर चालू लागलो. दोन-तीन जुनी कार्यकर्ती मंडळी दिसताच मी त्यांना नमस्कार केला व त्यांनीही त्याचा स्वीकार करीत माझी विचारपूस केली. जिना उतरता उतरता त्यांच्यापैकी एक कार्यकर्ता सहज म्हणाला, "१९६२ ची निवडणूक आपण नाही का सहज जिंकून दिली. मग १९६७ काय अवघड

आहे ? निवडणूक म्हणजे हातचा मळ असेच कॉँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना वाटत आहे. कॉँग्रेस कार्यात वाचन–अभ्यास–विचार-विनिमयाची काय जरुरी ? ज्यांना बौद्धिके देता येतात ते आम्हांला केव्हाही उपलब्ध होतात. समजा प्रसिद्धी नाही कॉँग्रेसच्या पत्राने दिली तर कॉँग्रेसविरोधी पत्रे आहेतच की ! कॉँग्रेस सरकारची जाहिराती व खपासाठी मदत त्यांना हवीच की ! मंत्र्यांचे फोटो छापले, की जाहिराती मिळतात असा त्यांचा केवळ समज राहिलेला नसून अनुभव झाला आहे. एवढेच नव्हे, तर आपण काही कॉँग्रेसच्या पत्रापेक्षा कमी नाही असे वरून भासविले तर कॉँग्रेसवाले आपले पत्र विकत घेण्याऐवजी विरोधी पत्र घेतात असा त्यांचा निर्वाळा आहे.'' ही परिस्थिती त्या कार्यकर्त्याने मला सांगितल्यावर माझा निर्विकार चेहरा पाहून सोबतचा पत्रकार म्हणाला, ''तुम्ही तर और दिसता. तुमच्यावर या कशाचाच काही परिणाम कसा दिसत नाही ! तुम्ही काय एखादे कवच मिळविले आहे की काय ?''

मी त्याला म्हटले, ''गांधीजींच्या कॉँग्रेसमध्ये जे जन्मले, त्या कॉँग्रेसमध्ये जे वाढले, त्यांना महात्माजींनी निश्चित कवच दिले आहे. ते कवच मंत्ररूपी आहे.'' ''कॉँग्रेसची, जनतेची आणि देशाची सेवा निष्काम वृत्तीने तन–मन–धन लावून करायची. हाव धरायची असेल तर ज्ञानाची आणि वाढत जायचे असेल तर ते उंचीने–अभ्यासाने–कर्तृत्वाने. 'एक काम अंगावर घ्या आणि ते शेवटपर्यंत तडीस न्या.' हा तो महात्माजींनी आम्हांस शिकविलेला मंत्र आहे. म्हणूनच आम्हांला १९४७ च्या नंतर कॉँग्रेसमध्ये आलेल्या बऱ्याच कार्यकर्त्यांचे बोलणे–चालणे–वागणे रुचत नसले तरी आम्ही त्यांचा हेवा–मत्सर न करता कॉँग्रेसचे काम करीत आहोत. कॉँग्रेसभवनाला आम्ही मंदिर मानणारे लोक आहोत. या मंदिरातील कॉँग्रेस जोवर जागेवर आहे, तोवर त्या मंदिराची आम्हांस सदैव ओढ लागणार. मग त्या मंदिरात पुढे-मागे बसण्याचा किंवा कोणी 'या बसा' म्हणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जे कार्य अंगावर घेतले आहे त्याचा गाजावाजा न करता ते करीत रहायचे हा आमचा बाणा आहे. त्या कामाचे मूल्यमापन करण्याची कुवत सगळ्याच कार्यकर्त्यांमध्ये असेलच असेही नाही. देश आणि पक्ष मोठा होतो–जेव्हा नेत्यावर अनुयायांची अढळ निष्ठा असते तेव्हा. माझी तशी निष्ठा असल्याने स्थितप्रज्ञ बनून मला हे सारे दृश्य निमूटपणे, निर्विकारपणे पहाता येते.''

प्राचार्य मंगुडकरांच्या बरोबरच मी कॉँग्रेसभवनाच्या आवाराबाहेर पडलो आणि त्या वास्तूकडे मागे वळून पाहिले. बऱ्याच कार्यकर्त्यांचा घोळका पुन्हा

मंत्र्यांच्या मोटारीभोवती जमलेला दिसला. आम्ही दोघे जिमखान्यापर्यंत पायी चालत गेलो आणि कॉफी हाऊसमध्ये कॉफी घेऊन आपापल्या मार्गाला लागलो. कचेरीत जाऊन खुर्चीवर बसलो तरी 'काँग्रेसभवन' काही डोळ्यांपुढून हलेना. पंचवीस वर्षांतील ती दृश्ये डोळ्यांपुढून सरसर पुढे सरकू लागली.

पुण्यातील 'काँग्रेसभवन'चा आणि माझा गेल्या २५ वर्षांचा निकटचा संबंध. मुठा नदीपलीकडे जुन्या भांबुर्डा गावातील गावठाण जागेत काँग्रेसभवनचे बांधकाम सुरू केल्यापासून मी त्या वास्तूशी संबंधित आहे. त्या वेळेला मी असेल फारतर शाळेत इंग्रजी सहावीत. तथापि काँग्रेसप्रेमी म्हणून शालेय जीवनापासून खांद्यावर काँग्रेसचा तिरंगी ध्वज घेऊन 'वंदे मातरम्' व 'महात्मा गांधीकी जय' आदी घोषणा करण्याची व काँग्रेसच्या सभांना हजर रहाण्याची सवय झाल्याने पुण्याच्या काँग्रेसभवनाला माझ्या जीवनात एक महत्त्वपूर्ण स्थान मिळालेले आहे. शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे, देवकीनंद नारायण, भाऊसाहेब हिरे, श्री. मामासाहेब देवगिरीकर, श्री. मालोजीराव नाईक–निंबाळकर, श्री. राजारामबापू पाटील, डॉ. आबासाहेब खेडकर आणि आता विनायकरावजी पाटील या साऱ्या प्रांताध्यक्षांच्या कारकीर्दी मी अगदी जवळून पाहिल्या आहेत, अनुभवल्या आहेत. देव–गाडगीळांच्या काँग्रेस प्रचाराशी मी तेवढासा संबंधित नसेल, पण जेधे-गाडगीळ या जोडगोळीने महाराष्ट्रातील साऱ्या खेड्यापाड्यांत आणि ग्रामीण भागातील बहुजन समाजात काँग्रेसला प्रिय करण्याचे जे ऐतिहासिक कार्य केले त्याच्याशी मी निश्चितच जवळून परिचित होतो. केशवरावांनी 'सत्यशोधकां'ना आणि ब्राह्मण–ब्राह्मणेतर चळवळीच्या खंद्या पुरस्कर्त्यांना काँग्रेसमध्ये आणून काँग्रेस बलवान केलेली मला चांगली आठवते. जेधे-गाडगीळांच्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीचे चित्र अजूनही माझ्या डोळ्यांपुढे आहे आणि त्यानंतर गाडगीळ-हिरेंनी गाजविलेली निवडणूकही मला चांगली आठवते. "हिरे ते हिरे ठरणार, पण गाडगीळांच्या गारेचे काय ?" असे पुण्याच्या काही पत्रांनी विचारलेले जाहीर प्रश्नही मला चांगले स्मरतात. त्या निवडणुकीचा तो जोष आणि काँग्रेसभवनावर कार्यकर्त्यांची बाराही महिने रोज होणारी ती वर्दळ आठवली, की वाटू लागते, कोठे गेली बरे आमची ती ४०–४२ ची आणि ५०–५२ ची काँग्रेस !

काँग्रेसभवन कसे सदैव गजबजलेले असायचे त्या वेळी. प्रान्तिकचे पदाधिकारी असोत वा जिल्हा काँग्रेसचे आणि तालुक्याचे पदाधिकारी असोत आपल्या खर्चाने पुण्यात यायचे, रहायचे, आणि प्रवास करायचे. मिळाला थोडाफार खर्च तर ठीक, नाहीतर कोणाकडून काही तरी सोय करून संघटनेचे काम करीत रहायचे. सायकल

आणि बस हीच वाहने आणि चहाचा एखादा कप हेच जेवण समजून त्या वेळी कळकळीने काम केले जाई. संघटना वाढविण्याचा धोशा बाळगला जाई. तात्या देशपांडे, माधवराव मेमाणे, शामराव पाटील, बाबुराव गायकवाड, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, भारदे आदी, चिटणीस मंडळींनी काँग्रेसभवनवर काढलेले दिवस आणि संघटनेसाठी घेतलेले कष्ट आठवले की वाटते, वीस वर्षांत का ती सारी मूल्ये बदलून जावीत आणि अशा प्रकारच्या सेवेचे निर्माल्य बनावे? 'नवे पाहिजे' म्हणताना जुन्यांना अडगळ मानून कोपऱ्यात तर ढकलण्याचा विचार नाही ना? यापैकी किती चिटणीस कोठे आहेत? शहरातील लिमये–लागू-अतीतकर-गोसावी काँग्रेसभवनवर का बरे दिसत नाहीत? शहर काँग्रेसची कचेरी पूर्वी कशी नेहमी भरलेली असे. 'आम्हांला काम द्या' म्हणून कार्यकर्त्यांत कशी अहमहमिका लागलेली असे. आणि आता कार्यकर्त्यांना बोलावणे पाठवून ते येण्याची पंचाईत झाली आहे. "Old order changeth yielding place to new" (नव्यासाठी जुने बदलत असते) हे खरे आहे. पण ते नवे नाणे खणखणीत वाजवून घेतले गेले तरच जगाच्या बाजारात चालणार. एरव्ही बद्द म्हणून त्याचे हसे होणार. आज काँग्रेसचे असे तर झाले नाही ना, अशी शंका वाटल्यावाचून रहात नाही. १९४० चा वैयक्तिक सत्याग्रह आणि १९४२ चा स्वातंत्र्यलढा मला चांगला आठवतो. "सत्याग्रहाला आम्हांला परवानगी द्या" म्हणून लोकांच्या प्रान्ताध्यक्षाकडे-जिल्हाध्यक्षाकडे रांगा लागत. आणि आता विकासाची, कृषि-औद्योगिक समाजरचनेची कामे पडली असता कार्यकर्ते मिळेनात अशी अवस्था झाली आहे. १९४२ मध्ये शाळा-कॉलेजमधील मुले-मुली, संसारातील स्त्री-पुरुष आणि वृद्ध देखील लढ्यात उडी घेण्यासाठी आतुर झालेले दिसत. काँग्रेसभवनाला एखाद्या युद्धतळाचे स्वरूप येई आणि आता तेथील शुकशुकाट जाणवल्याशिवाय रहात नाही. कोण आहे तेथे ?

कधी कधी या काँग्रेसभवनचे नशीब उघडते एवढे खरे. संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यायचे असले किंवा गृहमंत्री बाळासाहेब देसाई किंवा प्रांताध्यक्ष विनायकराव पाटील यावयाचे असले, की कार्यकर्त्यांची एकच गर्दी उडते. टिनोपाल केलेले पांढरे शुभ्र खादीचे कपडे पेहरलेली ती मंडळी पाहिली कीं, एखाद्या परकीयाला वाटावे की, काँग्रेसभवन कार्यकर्त्यांनी नेहमी गजबजलेले असते. तथापि या दिवसाच्या आदल्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी सकाळ, दुपार, सायंकाळी 'काँग्रेसभवन'वर चक्कर मारली तर फारसे कोणी आढळून येत नाही. दुपारी स्त्रियांचा एक वर्ग आणि सायंकाळी चारदोन पदाधिकारी याखेरीज कोणी काही दिसत नाही. युवक, कामगार आणि महिला हे तीन महत्त्वाचे घटक केव्हातरी सभा–समारंभ शिबिर-

मेळाव्याच्या वेळी दृष्टोत्पत्तीस येतात. एरव्ही त्यांचे अभ्यासवर्ग किंवा चर्चा-विचारविनिमयाच्या बैठकी दिसतील तर शपथ ! प्रदेश कॉंग्रेसच्या कागदोपत्री वरील सारे स्वतंत्र विभाग काम करीत असल्याच्या नोंदी आहेत, अहवाल आहेत. तथापि पुण्यात त्या कामाचे दर्शन घडले म्हणजे सालावादप्रमाणे पालखीच्या सोहळ्या-सारखे असते. कॉंग्रेसभवन आणि कॉंग्रेसचे दैनंदिन कार्य कॉंग्रेसभवन आणि चर्चासत्र-अभ्यासवर्ग, यांचे एवढे वावडे का असावे याचे कोडे मला तरी अजून उलगडलेले नाही.

" विद्वानांपासून दूर रहा, अपक्षीय अभ्यासू मंडळींचा संपर्क टाळा " अशा प्रकारची नवी विचारसरणी तर जबाबदार पुढाऱ्यांकडून किंवा पदाधिकाऱ्यांकडून कॉंग्रेस कार्यकर्त्यांना मिळाली नाही ना, असे वाटू लागते. किंवा सत्तास्थाने पदरी पडली, पदाधिकारपदावर आरूढ होता आले, की संघटना आणि तिचे कार्य यांची फारशी चिंता बाळगू नका अशी शिकवण तर या मंडळींना मिळाली नाही ना ? सारेच उलटे झालेले दिसते. पूर्वी पायाचा विचार करून तो भक्कम ठेवण्याची दक्षता घेतली जाई. आता अगोदर कळसाचा विचार आणि मग पाया ! आपल्याला मिळालेल्या स्थानाचा संघटना हा पाया आहे, याचा सोईस्कर विसर पडत असल्याने तो पाया भक्कम ठेवण्याची आठवणही कोणाला होत नाही. हाती सत्ता आहे तोवर आपल्याला कोण काय करणार अशीच भावना सत्तेवर आणि स्थानावर असलेल्यांच्या ठायी दिसून येते. चांगल्या माणसांच्या संग्रहाची, सहवासाची या मंडळींना जरूरी वाटत नाही, की त्यांची क़दर करण्याची आठवण होत नाही. सारा विचार पायापुरता आणि स्वतःपुरता. दहा-वीस वर्षा-नंतर संघटनेचे काय होईल याची फिकीर आपण का करावी अशीच त्यांची धारणा दिसून येते. कॉंग्रेसभवनाची वास्तू उभी आहे, आपले मागचे दिवस आठवीत आणि भवितव्याची काळजी करीत. ना तिची झाडलोट ना तिची घासपूस. समोर नदीकडे आणि गावाकडे बघत दिवसामागून दिवस आणि रात्री-मागून रात्र ढकलत आहे ती ऐतिहासिक-स्फूर्तिदायक वास्तू !

• • •

# संघटनेचे यश कशात ?



कोल्हापूर म्हटले, की जगदंबेची जशी आठवण येते, तद्वतच छत्रपतींच्या गादीची आठवण येते. कोल्हापूरची कला, कोल्हापूरची कारागिरी आणि कोल्हापूरची कृषी व उद्योग डोळ्यांपुढे उभा रहातो. कोल्हापूरचा ऊस आणि गूळ पाहिल्यावर जसे समाधान वाटते तसेच समाधान कोल्हापूरच्या उद्यमनगरातील ऑईल-इंजिने पाहूनही वाटते. कोल्हापूरच्या सिने-नाट्यकलावंतांनी तर सबंध देश गाजवून सोडलेला आहे. दक्षिण काशीतील अंबाबाईचा कोल्हापूरवर सतत वरदहस्त आहे. या कोल्हापूरने जसे शूर शिपाई दिले आहेत, जातिवंत कलावंत पुरविले आहेत, उद्योगधंद्यांत व शेतीत कर्तबगार लोकांची परंपरा राखली आहे, तसेच सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांतही महत्वाची भर घातली आहे. कै. कर्मवीर भाऊराव पाटलांची जडण-घडण जशी कोल्हापुरात झाली तशीच कालच्या आणि आजच्या कित्येक राजकीय, सामाजिक नेत्यांची बैठकही कोल्हापुरातच तयार झाली. म्हणूनच कोल्हापूरकडे महाराष्ट्र मोठ्या आस्थेने आणि आदराने पहात असतो आणि बोलत असतो. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेने गौरविलेल्या कोल्हापुरात विश्वविद्यालयीन शिक्षणाबरोबरच औद्योगिक आणि कृषीच्या क्षेत्रांत नवे नवे खूप बदल घडावेत, राजकारणांत कोल्हापूरने अग्रेसर रहावे अशी इच्छा कोल्हापूर अभिमान्यांच्या मनात वसत असते. तसे प्रयत्नही केले जातात. तथापि कुठेतरी काही खटकते आणि कोल्हापूरकरांच्या मनात नाराजी निर्माण होते. आपण असे का वागतो आणि आपल्याला असे का वागविले जाते असे दोन्हीही प्रश्न मनाशी विचारले जातात.

कोल्हापूरशी माझा गेल्या वीस वर्षांचा निकटचा संबंध. कोल्हापुरात काही खट् झाले, की मी तिकडे पळायचा आणि कारणांचा व परिणामांचा मागोवा घेत कोल्हापूरच्या सर्व क्षेत्रांतील जीवनाशी परिचय करून घेण्याची संधी साधायचा. कोल्हापूरचा तो गाजलेला शेतकरी मेळावा, प्रजापरिषदेची गारगोटी बैठक, परिषदेच्या विविध चळवळी आणि हालचाली, संस्थानी अमदानीत माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार, श्रेष्ठी, बगाडे आणि इतर शेकडो लहान-मोठे कार्यकर्ते जेव्हा हातात हात घालून राजेशाहीविरुद्ध लढा देण्याची तयारी करीत; स्नेहाच्या, बंधुभावाच्या आणि सहकाराच्या वातावरणात एकदिलाने काम करून कोल्हापूरचा राजकीय नकाशा बदलण्याचा मनसुबा रचीत; तेव्हा ही मंडळी

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एवढ्या अल्पावधीत एकमेकांपासून विचाराने दूर होतील असे कधी वाटले नाही. बागल आणि कुंभार ही एकेकाळची अभेद्य जोडी आज एकमेकांशीं बोलायलाही तयार नाहीं हे पाहिले, की ह्या राजकारणी मंडळींना होते तरी काय असे वाटू लागते. १९४२ च्या भूमिगत चळवळीत जेव्हा कुंभार बेपत्ता होते तेव्हा माधवराव नेहमी भाषणात सांगायचे की, "रत्नाप्पा जिवंत असून माधवराव मेला आहे." एवढे एकमेकांचे प्रेम. पण प्रेमाचा तो झरा १९४७ नंतर आटत जाऊन आज कोरडा ठणठणीत पडला आहे.

कोल्हापूरच्या प्रजा-परिषदेत खांद्याला खांदा लावून काम केलेली कुठे आहेत ती खंदी जुनी माणसे ? आय. जी. पी. खानबहादूर साद्रीच्या पोलिसी दडपशाहीला न डगमगता स्वातंत्र्यासाठी जीव धोक्यात घालणारे आणि प्राण दिलेले ते स्वामी–वारके आदी शेकडों तरुण कुठे आहेत ? नारायणराव सरनाईक, खांडेकर, कारखानीस आदी मंत्रिमंडळांतील सहकारी एकमेकांना भेटून प्रेमाने बोलतात असे दृश्य दिसणे दुर्मिळ झाले आहे. मुख्यमंत्री माधवराव बागवेंच्या कारकीर्दीतील शालिनी पॅलेसवरील तो इतिहासप्रसिद्ध मोर्चा आठवला, की वाटायचे, कोल्हापूर महाराष्ट्राचे पुन्हा एकदा नेतृत्व केल्याशिवाय रहाणार नाही. एकाहून एक वरचढ तरुण-तडफदार कार्यकर्ते भेटायचे, जिद्दीने-एकीने काम करण्याची भाषा बोलायचे, तथापि अवघ्या सतरा वर्षांत ती भाषा लोप पावली आणि जिद्द दुर्मिळ झाली. आज जुने एकीकडे आणि नवे दुसरीकडे, जुन्यांत भांडणे आणि नव्यात तट अशी स्थिती झाली आहे. कोल्हापूरची शेती, कोल्हापूरचा उद्योगव्यवसाय पुढे चालला आहे. पण राजकारण मात्र मागे मागे चालल्याचे दिसत आहे. एकजूट नाही, एकमत नाही, एकमेकांबद्दल मने साफ नाहीत आणि विश्वास उरलेला नाही. अशा स्थितीत जिल्हा आघाडीवर कसा जाणार ?

गेल्याच आठवड्यात मी कोल्हापूरला जाऊन आलो. जास्तीत जास्त नव्या-नव्या कार्यकर्त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. 'अॅडहॉक कमिटी' संबंधात त्यांच्या विचाराचा कानोसा घेतला. पण भिन्न भिन्न मतांचा गलबला ऐकून मी कष्टी झालो. शेवटी प्रांताध्यक्ष विनायकराव काय करतील त्याकडे सर्वांचे लक्ष असल्याचे दिसून आले. काही स्नेह्यांना मी म्हटले देखील, '१९६० मध्ये महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर कोल्हापूर काँग्रेसची परिस्थिती होती तीच चार वर्षांनंतरही रहावी हे खेदजनक होय. कोठे गेले ते तरुण सळसळणारे रक्त आणि करवीरचे क्षात्रतेज ? किती दिवस असे भांडत तंडत रहाणार ? काम करायला तयार व्हा की पदाधिकारपद, मोठेपणा आपोआप येईल मागे धावत.' दुहीच्या

शापातून मुक्त व्हायचा प्रयत्न का करीत नाही. तथापि सुंभ जळेल पण पीळ जाणार नाही, अशीच अवस्था ऐकायला मिळाली. मी एका कार्यकर्त्याला म्हटले देखील, " अरे बाबा, तुमच्या जिल्ह्यात एकोप्याचा अभाव म्हणून तुम्हाला महत्त्व आणि तुमच्या पुढे पुढे सारेजण करतात. आमच्या पुणे जिल्ह्याला कोणी विचारते का पहा ! कारण जिल्ह्यात एक विचाराने, एकदिलाने, एक निर्णयाने काम करण्याची आमची प्रथा. जिल्हापरिषद आणि जिल्हा काँग्रेस हातात हात घालून कार्य करते आणि जिल्ह्याचे प्रश्न, अडचणी सोडविण्याची जबाबदारी पार पाडली जाते. किती ठिकाणी हे दृश्य पहायला मिळते ? बऱ्याच ठिकाणी जिल्हा काँग्रेसचे जिल्हापरिषदेतील पदाधिकाऱ्यांशी बिनसलेले आणि एकमेकांवर आरोपांची खैरात असेच दृश्य दिसून येते. लोककल्याणरूपी रथाची ही दोन चाके एकागतीने, एका आवाजाने चालण्याऐवजी पुढेमागे रट्-रट् करीत चालविता हे बरे नव्हे. कोल्हापूरने राजकारणात पुन्हा एकदा नेतृत्व आपल्याकडे घेतले पाहिजे. रत्नाप्पा कुंभार, शंकरराव माने, दिनकरराव मुद्राळे, श्रेष्ठी अण्णा, बगाडे, खांडेकर, श्रीपतराव बोंद्रे, दिनकरराव यादव, बाळासाहेब कौलवकर, खंजिरे, व्ही. टी. पाटील, गणपतराव जाधव, बराले आदी विविध छटांच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकदा एकत्र बसले पाहिजे आणि माधवराव बागल यांच्या उपस्थितीत त्यांच्या सल्लामसलतीने कोंडी फोडली पाहिजे. ' विसरा आणि क्षमा करा ' असे म्हणून जर ही मंडळी एकत्र काम करू लागली तर कोल्हापूर काँग्रेसची शक्ती किती तरी वाढेल.

हीच स्थिती आणि परिस्थिती सोलापूर जिल्ह्यात आढळून येते. नामदेवराव जगताप आणि शंकरराव मोहिते पाटील या दोन्ही शक्ती मोठ्या आहेत आणि त्यांचा जिल्ह्याला उपयोग होणे जरूर आहे. या दोघांनी एकमेकांची शक्ती अजमावण्याचा प्रयत्न करण्याऐवजी किंवा जागजागचे कार्यकर्ते आपल्याकडे आकर्षित करण्याऐवजी, काँग्रेसच्या कार्याला, जिल्ह्याच्या अडी-अडचणी सोडविण्याच्या कामाला लावले तर कार्याचा केवढा तरी उठाव होईल. शंकरराव पाटील यांनी सहकार क्षेत्रात एवढे काम उभे केले आहे आणि आणखी ते एवढे उभे करीत आहेत की, त्यांना राजकारण पहायला केव्हा व कसा वेळ मिळणार याचे कोडेच आहे. शंकररावांना सत्ता नको, की पदाधिकारपदाचा मोठेपणाही नको. त्यांना फक्त हवे आहे की, आपली शक्ती बरोबर घेऊन जिल्हा काँग्रेसच्या आणि जिल्हापरिषदेच्या नेत्यांनी वागले पाहिजे—काम केले पाहिजे. नामदेवरावाविरुद्ध दंड थोपटून त्यांना राजकारणात शह देण्याचा शंकररावांचा मानस असेल असे मुळीच संभवनीय नाही. मग नामदेवराव त्यांच्या निकट येऊन दोन्ही शक्ती एक-

करण्याचा प्रयत्न का करीत नाहीत, असा प्रश्न निर्माण होतो. नामदेवरावांना जे जवळून ओळखतात. त्यांनाही त्यांच्या विशिष्ट वागण्या-बोलण्याचे गूढ तितकेसे अद्याप उलगडलेले नाही. मनाचा माणूस चांगला. पण आसपास कोण माणसे असावीत आणि किती अंतरावर असावीत याचे तारतम्य रहात नसल्याने गैरसमज पसरण्यास चटकन मदत होते. नामदेवराव अमुक चूक आहे, करू नका म्हटले तर ऐकण्याची तयारी, सुधारण्याच्या प्रयत्नाची इच्छा. पण शेवटपर्यंत तो विचार टिकत नाही आणि मग पूर्वीचा खाक्या पुढे चालू. नामदेवराव आणि शंकरराव यांच्यातील तथाकथित गैरसमज दूर करून त्यांना एकत्र आणण्याचे जे प्रयत्न आतापर्यंत झाले, त्यांना मीही थोडाफार हातभार लावला असल्याने मी दोघांनाही अगदी जवळून ओळखत आहे. ही दोन माणसे हातात हात घालून काम करू लागली तर सोलापूर इतर जिल्ह्यांच्या पुढे केव्हाच आघाडी मारून महाराष्ट्रात आदर्श होईल. दोघांजवळही गुण आहेत, कर्तृत्व आहे. ग्रामीण जनतेच्या सेवेची-उन्नतीची तळमळ आहे. एखाद्याकडून एखादी चूक घडतहि असेल, तिचा बोभाटाही होत असेल पण हाडाने व मनाने वाईट असे काही म्हणता येत नाही. अशा स्थितीत सोलापुरचे हे पुढारपण जर जरा अधिक डोळस आणि समंजस झाले तर महाराष्ट्रात चमत्कार घडवून आणल्याशिवाय रहाणार नाही. कारण तालुक्या-तालुक्यात जुन्या-नव्या कार्यकर्त्यांचा चांगला संच तयार आहे. त्यांना एकत्र आणून कामाला लावायचाच तेवढा अवकाश आहे.

कोल्हापूर-सोलापूरसारखीच जवळजवळ परिस्थिती नाशिक, धुळे, कुलाबा आदी जिल्ह्यात आढळून येते. हिरे-वाघ-नाईक, आमदार माळी व व्यंकटराव धोबी, दत्ता खानविलकर आणि बॅ. अंतुले आदी कार्यकर्ते जेव्हा अलग अलग राहून वेगवेगळा विचार करू लागतात, तेव्हा अतिशय खेद होतो. एकाच संघटनेतील या मंडळींनी संघटना प्रथम आणि नंतर व्यक्ती असा विचार का बरे स्वीकारू नये? संघटना मोठी का व्यक्ती मोठी याचे बरोबर उत्तर का बरे सापडू नये? ' तूं मोठा की मी मोठा असे ठरवून घेण्यासाठी जेव्हा शिक्षणसंस्था, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यातून रस्सीखेच सुरू होते तेव्हा जनता आणि जनतेचे प्रश्न यांचा विसर पडून सारा तालुका वा जिल्हा गटबाजीच्या राजकारणाने घुसळून निघतो. अशा या अस्थिर राजकीय वातावरणात विरोधी पक्षांनी मासेमारी न केली तरच नवल! मला परवा एका बड्या नेत्याने सहज विचारले, " अमुक एका जिल्ह्यात कॉंग्रेसचे यश कशात साठविले आहे? मी म्हटले, " कॉंग्रेसचे यश विरोधकांच्या दुर्बलतेत साठविलेले नसून कॉंग्रेस अंतर्गत ऐक्यावर–सहकार्यावर आणि शक्तीवर अवलंबून आहे. कॉंग्रेसजन जर वैयक्तिक हेवेदावे, मत्सर, असूया, ईर्षा, महत्त्वाकांक्षा आणि परस्पर विरोधी

कारवाया यांपासून दूर राहिले तर जनता विरोधकांना जवळ करणे शक्य नाही. मात्र हे घडून येण्याची, त्वरित घडून येण्याची जरुरी आहे आणि त्याकरिता वरिष्ठांनी प्रेक्षकांची भूमिका सोडून देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील हे छोटे चित्र भव्य स्वरूपात मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा आदी राज्यात पहावयास मिळते. मिश्रा गट आणि काटजू गट, त्रिपाठी गट आणि चंद्रभानू गुप्ता गट, के. बी. सहाय गट आणि झा गट अशी ही खेचाखेच पाहिली, की ही मंडळी काँग्रेस संघटना जागेवर राहू देणार आहेत की नाही याची चिंता वाटू लागते. प्रदेश काँग्रेस एकीकडे आणि मंत्रिमंडळ एकीकडे ही अवस्था ठीक नाही. सुदैवाने महाराष्ट्रात मंत्रिमंडळ आणि प्रदेश काँग्रेस एकविचाराने चालत आहेत. मतभेद किंवा ओढाताण दिसून येत नाही. मात्र मंत्रिमंडळाच्या कारभारात आणि प्रदेश काँग्रेसच्या कामकाजात जेवढा जोष, जेवढी जिद्द, जेवढी झेप दिसायला पाहिजे तेवढी दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. याची कारणे सर्व संबंधितांना ठाऊक आहेत. जिल्ह्याजिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या परिस्थितीचा मंत्रिमंडळाचे आणि प्रदेश काँग्रेसचे कामावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. धोरणाबाबत मतभेद होणे स्वाभाविक असले तरी जुळवून-जमवून घेऊन एकविचाराने कार्य केले जाणे आवश्यक आहे. कारण संघटनेला बळकटी आणून राज्याला पुढे न्यायचे आहे, वाढवावयाचे आहे. गेल्या महिना दीड महिन्यांत वर उल्लेखलेल्या तीनचार जिल्ह्यांत जाण्याचा व तेथील कार्यकर्त्यांशी बोलण्याचा योग आल्याने त्यांच्याकडून जे ऐकायला मिळाले, जे प्रत्यक्षात दिसले त्यांचे शब्दचित्र येथे उभे केले आहे. त्यांतून जरूर ते आणि योग्य ते घेऊन संबंधित मंडळींनी काँग्रेसला खऱ्या अर्थाने मोठी करावी हीच इच्छा.

● ● ●

## नेत्यासाठी सर्वस्व द्यायला हवे : ५

गोवा प्रश्नाच्या चर्चेसाठी काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची शनिवारी-रविवारी भरणारी बैठक पुढे ढकलल्याची दिल्लीची बातमी वाचल्याबरोबर निर्णयात काहीतरी काळेबेरे असण्याची शंका वाटू लागली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा नागपूरचा ठराव, ठरावावरील म्हैसूरची प्रतिक्रिया आणि मुंबईत काँग्रेसचे अध्यक्ष कामराज यांच्या कानांत झालेली कुजबुज ध्यानी घेता काँग्रेसश्रेष्ठींनी महाराष्ट्राची सत्वपरीक्षा घेण्याचे ठरविले असावे असे हमखास वाटू लागते. एका बाजूला म्हैसूरचे मुख्य-

मंत्री निजलिंगप्पा, दुसऱ्या बाजूला गोवा काँग्रेसचे काही पदाधिकारी, तिसऱ्या बाजूला युनायटेड गोवन्स नावाचा गोव्यातील विरोधी पक्ष आणि चौथ्या बाजूला महाराष्ट्र काँग्रेसचे आणि महाराष्ट्र नेतृत्वाचे हितशत्रू असा बनाव घडून आल्यानंतर काँग्रेसश्रेष्ठी त्या दडपणाला बळी नाही पडले तरच नवल ! महाराष्ट्र काँग्रेस आणि महाराष्ट्र काँग्रेसचे दिल्लीतील आणि महाराष्ट्रातील नेतृत्व यांना इरेस पेटावयास लावून साधा प्रश्न गुंतागुंतीचा करण्याची आणि जनमनाला अकारण ताणण्याची काँग्रेसश्रेष्ठींची जी काही किमया आहे ती अनाकलनीय म्हटली पाहिजे. आता म्हणे दुर्गापूर काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी काँग्रेस पार्लमेंटरी बोर्ड गोवा प्रश्न विचारासाठी घेण्याचा संभव आहे. म्हणजे तोवर महाराष्ट्र विरोधी मंडळींना प्रचाराला–वजन आणण्याला–दबाव पाडण्याला भरपूर अवसर मिळेल आणि काँग्रेसश्रेष्ठींना पूर्वीच्या निर्णयाला चिकटून बसायला आयती संधी मिळेल.

गोवा प्रश्न आणि महाराष्ट्र-म्हैसूर सीमा प्रश्न यांच्याबाबत महाराष्ट्राची कसोटी आहे हे निश्चित. दोन्ही प्रश्नांत म्हैसूर राज्य आडवे पडले असून म्हैसूरचा आडमुठेपणा दिवसेंदिवस वाढतच आहे. याखेरीज कृष्णा-गोदावरी पाण्याचा प्रश्न भिजत पडलेला आहेच. हे तिन्ही प्रश्न अखिल भारतीय पातळीवरून सोडविले जायचे असल्याने त्या कामी धसमुसळेपणा किंवा गोंधळ-गडबड करून काहीही चालण्यासारखे नाही. केंद्र सरकारला महाराष्ट्राची न्याय्य भूमिका पटवून देऊन केंद्राकडूनच या तिन्ही प्रश्नांत न्याय मिळवावा लागणार आहे. केंद्राची आजची अवस्था पाहिली तर ती महाराष्ट्रानुकूल आहे असे वाटत नाही. महाराष्ट्राच्या शिस्तीची, संयमाची, देशप्रेमाची आणि त्यागाची केंद्र कदर करीत आहे असेही दिसून येत नाही. म्हणजे दिल्लीतील उच्चपदस्थ महाराष्ट्राकडे वेगळ्या दृष्टीने पहात असावेत असा संशय येऊ लागतो. अशा स्थितीत महाराष्ट्र काँग्रेसवर आणि महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळावर फार मोठी जबाबदारी येऊन पडते.

पुण्याचे गोडसे-करकरे सत्कार प्रकरणातून महाराष्ट्रात जे वादळ उठले त्याचा केंद्राला थोडाफार का होईना तडाखा बसला. गृहमंत्री नंदा यांनी गोडसे–करकरेच्या मुक्ततेचा निर्णय महाराष्ट्राचा विरोध बाजूला सारून घेतला, याबद्दलची महाराष्ट्र सरकारची नाराजी साऱ्या देशाला समजून आली आणि तिचा प्रतिध्वनी पार्लमेंटमध्ये उमटला. त्यामुळे महाराष्ट्राबद्दल गृहमंत्र्यांच्या मनात नाराजी निर्माण झाली असणे शक्य आहे. त्याचबरोबर पुण्यात अद्यापही गोडसे प्रवृत्ती जिवंत रहावी याबद्दल महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्राबाबत नापसंती व्यक्त केली जाणे शक्य आहे. गांधीजींच्या खुनीचा गौरव करणारा महाराष्ट्र असाच उल्लेख महाराष्ट्र-विरोधी मंडळी करीत असतील व मग महाराष्ट्राच्या न्याय्य मागण्यांकडे एका

वेगळ्या दृष्टीने पाहू लागले असतील. पुण्याने महाराष्ट्राला एकदा बदनाम करून ठेवल्यानंतर तो डाग धुवून काढण्याचा प्रयत्न चालू असता पुन्हा नवा डाग पाडण्याचे जे दुष्कृत्य पुण्यातील काही महाभागांनी केले त्याचा परिणामही महाराष्ट्राच्या अखिल भारतीय स्थानावर झाल्याखेरीज राहिलेला नाही. ही सारी पार्श्वभूमी, हा सारा संदर्भ लक्षात घेऊन पुढील काही महिन्यात महाराष्ट्राला गोवा, सीमा प्रश्न सोडवून घेण्याच्या दृष्टीने युक्तीने व नेटाने प्रयत्न करावे लागतील.

या प्रयत्नात महाराष्ट्र काँग्रेसच्या स्थानाला आणि महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या भूमिकेला विशेष महत्त्व असल्याने या दोन्ही शाखेंत एकवाक्यता आणि एकसूत्रता असणे अत्यंत जरूर आहे. नागपूरच्या बैठकीत संरक्षणमंत्री ना. चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र हा प्रदेशापेक्षा देशाला अधिक महत्त्व देत असल्याने त्याने आपले प्रश्न देशाच्या प्रश्नाच्या मागे ठेवले आहेत. तथापि, जे प्रश्न सरळ—साधे—सोपे आहेत ते गुंतागुंतीचे करण्यात काहीच प्रयोजन नाही. आपल्याला महाराष्ट्रात विलीन व्हावयाचे असा निकाल गोव्याने दिला असता त्या निकाला-विरोधी भूमिका घेणे देशाच्या हिताचे ठरणार नाही. गोव्याबाबत महाराष्ट्राची भूमिका लोकशाहीला धरून असल्याचेही ना. चव्हाण यांनी सांगितले. महाराष्ट्राचे एक जबाबदार नेते या दृष्टीने ना. चव्हाण यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळातील एक महत्त्वाचा घटक या नात्याने पडणाऱ्या जबाबदारीची त्यांना पूर्ण जाणीव आहे. गोव्याबाबत आपल्याला किती कडवा विरोध होणार याचीही त्यांना कल्पना आहे. अशा स्थितीतही ते गोव्याबाबत रोखठोक बोलत आहेत, सीमा प्रश्नाबाबत निर्भय भूमिका घेत आहेत याची जाणीव काँग्रेसने आणि महाराष्ट्रातील जनतेने ठेवणे आवश्यक आहे. यशवंत-रावांचे दिल्लीतील स्थान, दिल्लीतील वजन त्यांच्या कर्तृत्वावर, नेतृत्वावर, बुद्धि-मत्तेवर, राजकारणनिपुणतेवर, राज्यकुशलतेवर तर अवलंबून आहेच, पण त्याचबरोबर महाराष्ट्रातील त्यांच्या स्थानाला आणि एकमुखी नेतृत्वालाही या संदर्भात विशेष महत्त्व आहे. गोव्याबाबत त्यांनी एकदा उघडपणे भूमिका घेतल्यानंतर त्यांच्या आवाजात उभ्या महाराष्ट्राचा आवाज मिसळला पाहिजे. सीमा प्रश्नाबाबत त्यांच्यामागे महाराष्ट्र एकसंघ उभा पाहिजे. काँग्रेसश्रेष्ठीतील त्यांच्या स्थानास महाराष्ट्र काँग्रेस एकमुखाने त्यांच्यामागे उभी हवी आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या विचाराच्या आणि कार्याच्या बैठकीवर दिल्लीतील महाराष्ट्राचे नेतृत्व अवलंबून असते, याचा विसर महाराष्ट्र काँग्रेसला पडून चालणार नाही. महाराष्ट्र काँग्रेसचे नेतृत्व एकमुखी नाही असे कित्येकजण काँग्रेसश्रेष्ठींच्या कानांत कुजबुजत असल्याने महाराष्ट्र काँग्रेसला अत्यंत खबरदारीने पाऊल टाकणे भाग झाले आहे.

महाराष्ट्रातील काँग्रेसच्या कामकाजाबद्दल संरक्षणमंत्री चव्हाण समाधानी नाहीत. काँग्रेस कमिट्या आणि काँग्रेस कार्यकर्ते यांच्याबद्दलच्या अनेक तक्रारींनी त्यांचे मन नाराजीपलीकडच्या उद्विग्नतेपर्यंत जाऊन पोहोचले आहे. स्थानाची स्पर्धा, आणि सत्तेची रस्सीखेच यांबद्दल त्यांना विशाद तर वाटत आहेच पण ही स्पर्धा, गटबाजी कशी थांबवावी याची चिंता लागली आहे. या चिंतेची वाच्यता त्यांनी आपल्या भाषणात केली असून कार्यकर्त्यांकडून यापुढे काही चांगल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. कार्यकर्त्याने एका जागेपेक्षा अधिक अधिकारपदाच्या जागा भूषवू नयेत असे सांगूनही जी मंडळी ऐकत नाहीत, नव्हे त्या जागेसाठी स्पर्धा करतात, सामना देतात याला काय पक्षाची शिस्त म्हणायची! त्याचबरोबर अपेक्षेप्रमाणे एखादी गोष्ट घडली नाही, की त्रागा करून संघटनेबद्दल आणि आपल्या नेत्याबद्दल वाटेल तेथे वाटेल ते बोलायचे याला काय जबाबदार कार्यकर्ता म्हणायचे! आपली एखादी इच्छा व महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊ शकली नाही, की अमूक एका नेत्याचे, अमूक एका मंत्र्याचे आपल्यावर लक्ष नाही, त्याचेकडून आपल्याला 'पुश' मिळणार नाही असे चारचौघांत सांगण्याची जी प्रवृत्ति पसरू पहात आहे तिलाही आळा बसायला पाहिजे. एकदा नेता मानल्यावर त्याच्या शब्दासाठी वाटेल ते करण्याची, वाटेल त्या त्यागाची मनाची तयारी असली तरच तो नेता मोठा होऊ शकेल आणि आपणही होऊ. शिवाजी महाराजांना एकदा नेता मानल्यावर त्यांच्या शब्दासाठी हजारोंनी आपले तन-मन-धन निःस्वार्थीपणे दिले व महाराष्ट्र मोठा केला. आज अशाच वृत्तीची गरज आहे. स्वतःपेक्षा संघटनेचा आणि महाराष्ट्राचा विचार प्रथम करणे जरूर आहे. आणि हा विचार करताना कष्टाची-त्यागाची सवय लावून घेतली पाहिजे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांत आज या दोन गुणांचा अभाव वाढत असल्याचे दिसून येते आणि म्हणूनच काँग्रेस संघटना दुर्बळ होण्याची भीती वाटू लागते.

महाराष्ट्र मंत्रिमंडळाने एकोप्याने, एकसूत्रीपणाने, महाराष्ट्राच्या प्रश्नात लक्ष [illegible]न तो तडीस नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'टीम' वर्कच्या परंपरेला कोठ-[illegible]ही बाध आणता कामा नये. मंत्रिमंडळाच्या एकवाक्यतेच्या व नेत्याच्या शब्दाला मान द्यावयाच्या प्रथेला गालबोट लावता कामा नये. महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ जेवढे सुलभपणे आणि स्वतंत्रपणे काम करील, महाराष्ट्र काँग्रेस जोवर एकदिलाने कार्य करील तोवर महाराष्ट्रद्वेष्ट्यांचे कांही एक चालू शकणार नाही. ना. चव्हाण यांच्यामागे महाराष्ट्र मंत्रिमंडळ नाही किंवा महाराष्ट्र काँग्रेस नाही असे म्हणावयाची आज तरी कोणाची ताकद नाही, आणि म्हणूनच चव्हाणांच्या दिल्लीतील स्थानाला धक्का लावण्यास कोणी धजू शकणार नाही. चव्हाणांच्या दिल्लीतील वास्तव्याचा फायदा घेऊन त्यांच्या पश्चात् महाराष्ट्रात कोणी चबढब करण्याचा प्रयत्न करीत असेल तर

त्याला स्पष्ट सांगितले पाहिजे की, चव्हाणांच्या नेतृत्वाला आम्ही केसभरही धक्का लागू देणार नाही. गोव्याच्या प्रश्नावर काहींनी चव्हाणांच्या विरुद्ध Positions घेतलेल्या असल्या आणि त्या अनुरोधाने आपले नेतृत्व रुजविण्याचा प्रयत्न चालविला असला तरी तो यशस्वी होऊ शकणार नाही. महाराष्ट्रातील जनतेचे प्रेम ना. चव्हाण यांच्यावर कायम असून ते अखंड रहाणार आहे. म्हणूनच गोवा प्रश्न असो वा सीमा प्रश्न असो, चव्हाण ठाम भूमिका घेऊन बोलू शकत आहेत. देशाशी निष्ठा प्रथम, हे तर त्यांचे ब्रीदवाक्य आहे. देशहितानंतर महाराष्ट्रहित ही तर त्यांच्या धोरणाची सूत्री आहे. तथापि, देशाच्या नावावर कोणी महाराष्ट्राचा तेजोभंग करण्याचा, महाराष्ट्राला दाबण्याचा प्रयत्न करू इच्छित असतील तर त्यांची गय चव्हाण करणार नाहीत. गोवा प्रश्नाचा विचार पार्लमेंटरी बोर्डाने पुढे ढकलला असला तरी तो बासनात बांधून ठेवण्याचा प्रयत्न बोर्डाला करता येणार नाही. या संबंधातील ना. चव्हाणांच्या भूमिकेला समर्थ करण्याकरिता महाराष्ट्र कॉंग्रेसने आणि महाराष्ट्राने सारे बळ एकवटणे ही खरी कसोटी असून तिला कॉंग्रेस उतरली तरच ती महाराष्ट्रात आपले स्थान टिकवू शकेल आणि ना. चव्हाणांचे स्थान अधिक बळकट करील यात शंका नाही.

• • •

— ५ —

# डेक्कन क्वीनने प्रवास : १ :

पुर्णे ते मुंबई दरम्यानचा प्रवास डेक्कन क्वीनने करण्यांत मोठी मजा असते असे म्हणतात. खोलीसारखी ती स्वतंत्र बसण्याची जागा आणि त्या जागेत बसल्या बसल्या गरम गरम चहा आणि टोस्ट खाण्याची ती सोय कोणाला आवडणार नाही ! पंधरा रुपयांत उतारू ऐटीत आणि आरामांत मुंबईपर्यन्त जाऊ शकतो किंवा मुंबईहून पुण्याला येऊ शकतो. दख्खनची राणी ( डेक्कन क्वीन ) रोज सकाळी पुण्याहून मुंबईला आणि सायंकाळी मुंबईहून पुण्याला गेली अनेक वर्षे अव्याहतपणे धावत आहे. तिचा रंग बदलला, तिचे रूप बदलले पण तिची रोजची धावपळ काही बदलली नाही. पहिला आणि दुसरा वर्ग जाऊन पहिला आणि तिसरा वर्ग झाला, भाड्यात एकसारखी थोडीथोडी वाढ होत गेली तरी प्रवाशांची संख्या काही कमी नाही झाली. गाडी सदैव भरलेलीच.

अशा या दिमाखाच्या दख्खनच्या राणीत बसण्याचा योग माझ्या सारख्याला कधीतरी आला की मी गांगरून जातो. मुंबईला सकाळी जाऊन सायंकाळी परतावयाचे तर आपली जनता एक्स्प्रेस किंवा मेल काय वाईट ? जनता जर तिसऱ्या वर्गाने म्हणजे पाच रुपयांत आणि मेल दुसऱ्या वर्गाने म्हणजे साडेआठ रुपयात मुंबईला नेते तर मग डेक्कनने दुप्पट-तिप्पट खर्च कशाला करायचा असा

विचार मनात येऊन जातो आणि या विचारांना पुष्टी म्हणून गांधीजी नव्हते का तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत असे सांगून डेक्कन क्वीनवाल्यापेक्षा आपण अधिक साधे आहोत अशा भावही मारायला संधी मिळते. तथापि मनात कुठे तरी आत सुप्त इच्छा दडलेली असते की एखादे वेळी डेक्कनने गेले म्हणून काय बिघडले ? अशा या दबलेल्या इच्छेला वाव देण्याचे ठरवून का डेक्कनने जायचे म्हटले की चांगल्या कपड्यापासून हँडबॅगपर्यंत सारी तयारी करावी लागते. एवढेच नव्हे तर अगोदर रिझर्व्हेशन करून आपल्या जागेची खात्री करून घ्यावी लागते. बस-मधून स्टेशनला जायला संकोच वाटतो आणि रिक्षापेक्षा टॅक्सी बरी वाटू लागते. आणि गाडीत मग ओळखीच्या कोणाला तरी चहा-टोस्ट ऑफर करावा लागतो. व्ही. टी. ला उतरले की टॅक्सीच्या रांगेत उभे राहून इच्छित स्थळ गाठावे लागते. ज्यांना उद्योगधंद्यामुळे सवय झाली आहे, किंवा जे सरकारी खर्चाने जातात–येतात त्यांचे ठीक आहे. पण माझ्यासारख्याला, कधीतरी एकादशीला जाणाऱ्याला, ते अवघडच वाटते.

पण कधीतरी डेक्कन गाठावी लागते किंवा टाळता येणे शक्य नसते, आणि मग गाडी चुकेल म्हणून घरून ६॥ लाच निघणारा माझ्यासारखा वक्तशीर माणूस जेव्हा स्टेशनवर अर्धा ते पाऊण तास फलाटावर किंवा प्लॅटफॉर्मवर उभ्या अस-लेल्या गाडीत घालवितो, तेव्हा गाडी सुटायला दोन मिनिटे असताना पळत पळत गाडीत बसणारे हसले तर त्यात नवल नाही. कारण या गाडीचा उपयोग महत्त्वाचा वेळ वाचविण्याकरिता असतो, असे एका पत्रपंडिताने सांगितलेले मी विसरलो नाही. अगदी वेळेवर ही मंडळी आपला डबा बरोबर गाठतात व जागेवर स्थानापन्न होऊन लगेच एखादे पुस्तक किंवा ऑफिसची फाईल उघडून तिच्यात डोके खुप-सून बसतात. तीन तासांच्या प्रवासाचा आपल्या कामासाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याची त्यांची धडपड चालू असते आणि माझ्यासारखा रोजच्या कामातून थोडी उसंत मिळाल्याचे समाधान मानून खिडकीच्या बाहेरील जगाकडे मोठ्या कुतूहलाने बघत रहातो. मी स्वतःला विसरण्याचा प्रयत्न करीत असतो आणि ही मंडळी जगाला विसरण्याचा प्रयत्न करीत असतात. पिंपरीच्या आसपासच्या उद्यो-धंद्यांच्या टोलेजंग इमारती, किंवा तळेगाव–वडगावची शेती किंवा खंडाळ्याचे सृष्टिसौंदर्य यांपैकी कांहीही त्यांना आकर्षित करू शकत नाही. कारण त्यांचा जीवन-प्रवासही असाच रूक्षतेने झालेला असतो. मी मात्र या प्रत्येक गोष्टीत रस घेण्याचा प्रयत्न करीत असतो. लहानपणी मला नेहमी वाटायचे की, आगगाडीत खूप वेळ बसावे, मुंबई काही केल्या लवकर येऊ नये. म्हणून मी पॅसेंजरचा आग्रह धरीत असे. पॅसेंजरचा तिसरा डबा आणि तोही अगदी पाठीमागचा असला म्हणजे मला मजा वाटे. त्या डब्यातील गर्दी, आरडाओरड, भांडणे, भिकाऱ्यांची

भिक्षांदेही, आणि चिक्की–टॉफी विकणारांची आपल्या मालाची बढाई ऐकतांना कंटाळा वाटण्याऐवजी कुतुहल वाटत असे. डेक्कनक्वीनमध्ये असे काही पहायला मिळत नाही. मोजकी स्टेशने आणि अवघा तीन तासांचा प्रवास. सारे काही शिस्तीत आणि रुबाबात !

वर्तमानपत्रापलीकडे डेक्कनक्वीनमध्ये काही गंभीर वाचन होऊ शकते असा माझा तरी अनुभव नाही. खडकी-चिंचवडपर्यंत ही वृत्तपत्रे पुरतात आणि मग गाडीत आणखी कोणी ओळखीचे आहे का हे पहाण्याची हुक्की येऊन माझ्यासारखा गाडीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्याचा प्रयत्न करू लागतो. या प्रयत्नात कॉरिडॉरची जागा अरुंद असल्याने माझ्यासारख्या तुंदील तनूच्या माणसाची तशाच दुसऱ्या एखाद्या उतारूशी टक्कर होते किंवा एखाद्या स्थूल शरीराच्या स्त्रीला जागा करून देता देता श्वासोच्छ्वास रोखून मला शरीर कृश करून घ्यावे लागते. तेवढ्यात...... "काय अनंतराव! आज कोणीकडे? खूप दिवसांनी दिसताय गाडीवर?" असा प्रश्न ऐकू येतो. आवाजाच्या दिशेने पहावे तो डेक्कनने रोज मुंबईला जाणारे आणि मुंबईहून येणारे श्री. हरिभाऊ अभ्यंकर असतात किंवा हेमंत खरे वा नरुभाऊ लिमये यांच्यापैकी कोणीतरी असते. हरिभाऊ अभ्यंकर यांच्या पेशन्सचे मला खरोखर कौतुक वाटते. मुंबईस नोकरी पण रहायला जागा नाही म्हणून हे गृहस्थ गेली १०–१२ वर्षे रोज ६ तास गाडीत काढतात. सकाळी ६॥ ते रात्री ९॥ पर्यंत म्हणजे १५ तास घराबाहेर. त्यात ६ तास गाडीत, ७ तास ऑफिसांत व २ तास, बस–रिक्षा–टॅक्सीत. खरा धीराचा माणूस-हेमंत खरे व नरुभाऊ लिमये या स्वाऱ्या आठवड्यातून तीन वेळा मुंबईची यात्रा करणारे यात्रेकरू. मुंबईचा उद्योग पुण्याला आणून त्यावर जीवनाला जिवंतपणा आणून द्यावयाचा ! कोणी सोमवार, बुधवार, शुक्रवार तर कोणी मंगळवार, गुरुवार, शनिवार. अशी किमान १५–२० मंडळी गाडीत असतातच. त्याखेरीज सेक्रेटरीएट मुंबईत आणि डायरेक्टोरेट पुण्यांत ठेवून वेळेचा आणि पैशाचा नाहक खर्च करणाऱ्या आमच्या सरकारचे चार-पाच वरिष्ठ सरकारी अधिकारी डेक्कन क्वीनमध्ये भेटले नाहीत तरच नवल ! पूर्वी शेतीखात्याचे डॉ. उप्पल, शिक्षण-खात्याचे डॉ. पावटे, व रजिस्ट्रार सुब्रह्मण्यम् दिसायचे. आता डॉ. घाटगे, धोंगडे आणि बोंगिरवार दिसतात, एवढाच फरक. दामुअण्णा पोतदार, वसंतराव वेनाडीकर गाडीवर दिसले नाहीत की कसेसेच वाटल्याशिवाय रहात नाही.

या मंडळींच्या एकेका डब्यात दहापंधरा मिनिटे सहज बोलत बसायचे म्हटले, तरी २-२॥ तास तेव्हाच निघून जातात. त्यात यांचेपैकी एखाद्याने चहाचा आग्रह केला आणि रेस्टॉरंटकारमध्ये जाण्याची सुपीक कल्पना

काढली, की अर्धा-पाऊण तास मोडलाच समजायचा. डेक्कन क्वीनची 'रेस्टॉरंट-कार' हे एक खास आकर्षण म्हटले पाहिजे. जागा थोडी आणि ब्रेकफास्ट-वाले अधिक. मग पुण्यात सरकारी दूधकेंद्रावर मोठ्या रांगेत उभे राहून आपली पाळी येण्याची वाट पहावी लागते, तसे या रेस्टॉरंटकारचे होते. यांत चौघे-पांचजण एकत्र गेले, की दोघे एका टेबलावर आणि दोघे दुसऱ्या टेबलावर असे बसून मेनूबद्दल जी चर्चा होते ती ऐकण्यासारखी असते. एकदा असेच गाडीवर माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बापूसाहेब जाधवराव होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या कारखान्याची डायरेक्टरमंडळी आणि श्रीरामचे विजयसिंह नाईक निंबाळकर यांच्याबरोबर त्यांची डायरेक्टर मंडळी होती. या दहा-बारा मंडळींनी डायनिंगकारमधील बहुतेक जागा अडविल्यावर बाकीच्या उतारूंची झालेली कुचंबणा पहाण्यासारखी होती. शिवाजीराजांनी ( विजयसिंह ) मला पाहुणा म्हणून आग्रहाने या मंडळींबरोबर चहाला नेले असल्याने मला काहीच बोलता येईना. एकूण तीन टेबलांवर बसलेल्या या दहा लोकांना काय द्यायचे, असा पेच वेटरनाही पडला. एकजण ऑमलेट म्हणतो, तर दुसरा फ्राइड एग्ज म्हणतो, तिसऱ्याला इडली-सांबार व चौथ्याला गुरुवार असल्याने साबुदाणा खिचडी हवी होती. डेक्कनक्वीनच्या भारतीयकरणात आणि भावनिक एकात्मता साधण्याच्या प्रयत्नात इडलीसांबारने मेनू कार्डमध्ये स्थान पटकावले होते. पण साबुदाणा खिचडीचा समावेश झालेला नव्हता. तथापि 'फिंगर चिप्स' उपासाला चालतात असे कोणीतरी म्हटल्यावर बटाट्याचे तळलेले तुकडे एकाच्या वाट्याला येऊ शकले. खाऊन झाल्यावर चहा आला आणि मग खरी परीक्षा सुरू झाली. धावत्या गाडीत कपात व्यवस्थितपणे चहा ओतायचा म्हणजे सोपी गोष्ट नाही हे लक्षात न आल्याने एकाने चहा चुकून टेबलावर ओतला आणि आपल्या पांढऱ्याशुभ्र परीटघडीच्या कोटावरही सांडून घेतला. दुसऱ्याने टोस्टला बटर लावल्यावर सुरीने त्याचे तुकडे करताना एक तुकडा जो उडविला तो नेमका कॅशिअरच्या मांडीवर जाऊन पडला. तिसऱ्याने लोण्याने माखलेला ब्रेडचा तुकडा चहाच्या कपात बुडवून तो मचमच आवाज करीत खायला सुरुवात केली. हे सारे ओठावर हसू येऊ न देता गंभीरपणे पहाण्याची सर्कस मला अर्धा तास करावी लागली. 'थँक्स्' म्हणत मी तेथून धूम ठोकली व आपल्या डब्याकडे मोर्चा वळविला; पण डब्यापर्यंत जाऊ कोण देतोय ?

पास होल्डर्सच्या डब्यात एके ठिकाणी ब्रिजचा डाव रंगात आला होता. तथापि पार्टनरची उतारी चुकल्यामुळे दुसरा त्याच्यावर ओरडत असल्याचे व वादविवादाला भांडणाचे स्वरूप येत असल्याचे पहावयास मिळाले. "अरे

जनुभाऊ, खेळात कसले भांडता ?" म्हणून तिसरा सांत्वन करीत असतानाच मी आत शिरलो. माझ्या या अगांतुक प्रवेशामुळे लवादाचे काम माझ्यावर आले. मी गंभीर चेहरा करीत म्हटले, "कोणत्याही खेळात खिलाडूवृत्ती असणे आवश्यक आहे. मग तो क्रिकेटचा खेळ असो वा ब्रिजचा. सांघिकवृत्ती नसेल तर खेळाचा आनंद लुटता येणार नाही. गाडीतील तीन तासांचा वेळ कंटाळा न येता घालविण्याचा सोईचा मार्ग म्हणून तुम्ही पत्ते खेळता. मग एखादी उतारी चुकली म्हणून कोठे बिघडले ? 'स्टेक्स'चा जोवर संबंध नाही तोवर होऊ द्या एखादी चूक. त्याखेरीज खेळ कसा सुधारणार ? पत्त्याच्या खेळातदेखील ज्यांना दोघात जमवून घेता येत नाही, त्यांना एखाद्या संस्थेच्या कामात कसे जमवून घेता येईल ? तेथे तर भिन्न स्वभावाची, भिन्न प्रवृत्तीची कितीतरी माणसे असतात. जमवून घेण्याची भूमिका नसेल तर जीवन सुखी—समाधानी होण्याऐवजी कष्टी होण्याचीच शक्यता नाही का ?" माझे हे प्रवचन ऐकल्यावर एकाने अक्षरशः साष्टांग नमस्कार घातला आणि म्हणाला, "अनंतराव, तुम्ही पत्रकार म्हणजे अगदी और. एखाद्या दिवशी परगावी जावे लागले तरी तुम्ही आपली उपदेशाची हौस काही सोडीत नाही. आज अग्रलेख लिहिता नाही आला, म्हणून आम्हांला तोंडी ऐकविता काय ? तुमची ती खिलाडूवृत्ती आणि सांघिकवृत्ती पलीकडच्या डब्यात दाखवा. तेथे आहेत काही अधिकारी, व्यापारी आणि कारखानदार. त्यांच्या मेळ्यात मार्गदर्शनाला आहे चांगला वाव. आमच्या 'टू हार्टस्'मध्ये नाही वाटणार तुम्हांला रस." माझ्या उपस्थितीने या पत्तेप्रिय मंडळींचा विरस झाल्याचे पाहून मी तेथून उठलो व शेजारच्या डब्यात शिरलो. तेवढ्यात लोणावळ्याच्या डॉ. देसाईंनी मला हाक मारली, "संपादक, या की." मी त्यांच्या कंपार्टमेंटमध्ये शिरलो आणि डॉ. देसाईंच्या शेजारी स्थानापन्न झालो.

डॉ. देसाई म्हणजे एक और व्यक्ती. लोणावळ्याहून रोज सकाळी मुंबईस जाणार व सायंकाळी लोणावळ्याला परतणार. मुंबईत वैद्यकीय व्यवसाय व लोणावळ्यात शेतीव्यवसाय. अनेक वर्षे असे चालले आहे. लोणावळ्याला डब्यात येऊन बसणाऱ्या डॉ. देसाईंना सहज विचारले, "काय डॉक्टर, कसे काय चालले आहे ?" की डॉक्टर म्हणालेच, "काय चालायचे ! तुमच्या काँग्रेसच्या राज्यात खाण्यापिण्याचेही हाल. महागाई वाढतच आहे. लोकांना पोटाला खायला नाही आणि नैतिक पातळी वाढविण्याचा उद्योग कोट्यवधि रुपये खर्च करून चालला आहे. लोकांना खरे बोलायला, सरळ व उघडपणे वावरायला शिकविण्याऐवजी त्यांना खोटे बोलायला, चोरून कृत्ये करायला काँग्रेस प्रवृत्त करीत आहे. कसा काय समाज सुधारणार आणि देश सुधारणार ?" "पण डॉक्टर, झालंय तरी काय ?" असे म्हटले, की देसाई मराठीतून सांगणार, "जरा

मावळात हिंडून बघा. लोकांना पोटभर खायला नाही, की अंगभर पुरतील एवढे कपडे नाहीत. कमरेला लंगोटी लावून दिवसभर कष्ट करायचे आणि कोर-दोन कोर भाकर खाऊन पाणी प्यायचे. हातभट्टीला तर लोणावळ्यात तोटा नाही. या हातभट्टीने लोकांना सर्रास खोटे बोलायला, चोरटे व्यवहार करायला आणि कायदे मोडायला शिकविले आहे. सरकारला काय मिळालं दारूबंदी करून! लोकांची ना दारू सुटली ना सुधारणा झाली. उलट चोरट्या दारूचा सुकाळ होऊन, ती वाईट दारू पिऊन लोकाचे आरोग्य बिघडले. लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे खाऊ-पिऊ का देत नाही? त्यांच्या खाजगी जीवनात का ढवळाढवळ करता? त्यांची कार्यक्षमता वाढवून उत्पादनवाढीला त्यांना प्रवृत्त का करीत नाही? मोरारजींच्या डोक्यात हे नैतिक वेड काय आले आणि त्याला सर्वांनी माना काय डोलावल्या! पाहू आता तुमचे नाईकसाहेब काय करतात. द्राक्षांची लागवड वाढवावयाची म्हणतात. पण ती द्राक्षे मातीमोल होऊ नयेत म्हणजे मिळविली!''

डॉ. देसाईंचे बोलणे प्रथम मला फटकळ वाटले, पण त्यावर मी जसजसा विचार करू लागलो आणि उद्योगधंदेवाले, व्यापारी, सरकारी नोकर यांचे बोलणे लक्ष देऊन ऐकू लागलो, तसतसे लोकांमध्ये नाराजी, असंतोष वाढत असल्याचे मला अनुभवास येऊ लागले. जानेवारीत असेच बोलणे व मार्चमध्येही हेच बोलणे कानांवर पडल्यामुळे कुठेतरी काहीतरी चुकत असल्याचे वाटू लागले. खाजगी कारखानदार सरकारी कारखानदारीला व सहकारी कारखानदार खाजगी कारखानदारीला नावे ठेवताना किती पोटतिडकीने बोलतात याचा कानोसा डेक्कन-क्वीनमध्ये चांगल्यापैकी घेता येतो. तुम्ही जर तुमची ओळख पटू दिली नाही आणि डोळे मिटून स्वस्थ बसल्या बसल्या संभाषण काळजीपूर्वक ऐकू लागला तर समाजजीवनाची आणि व्यक्तीजीवनाची कितीतरी विविध दृश्ये परिचित होऊ लागतात. १९६४, १९५४ आणि १९४४ असे १०–१० वर्षांचे कालखंड घेतले तर गेल्या वीस वर्षांत देशाच्या बदलाबरोबर लोकही विचाराने कितीतरी बदलल्याचे आढळून येते.

डेकनक्वीनचा तो अँग्लोइंडियन कंडक्टर आणि त्याला व्हिस्कीचा एक पेग दिल्यावर पहिल्या वर्गाच्या डायनिंगकारमध्ये बसून जवळजवळ फुकट प्रवास करण्याची मिळणारी संधी आता उपलब्ध राहिलेली नाही. मला चांगले आठवते की, मी १९४६ मध्ये बार कौन्सिलची परीक्षा देऊन पुण्याला परतत असता तिकीट विकत घेऊन गाडीत बसण्याइतका वेळ मला मिळू शकला नाही, म्हणून मी या अँग्लोइंडियन दोस्ताला व्ही. टी. ला सांगून चालत्या गाडीत कसाबसा घुसलो. गाडीने ठाणे मागे टाकीपर्यंत त्याची–माझी भेट होऊ शकली नाही.

ठाण्याच्या बोगद्यातून गाडी बाहेर पडल्याबरोबर हा मित्र माझ्याजवळ आला व त्याने मला रेस्टारंटकारमध्ये येण्याची विनंती केली. त्याच्या मागोमाग मी मुकाट्याने उपहारगृहात गेलो व त्याने सांगितलेल्या जागेवर बसलो. माझ्याजवळ उभा राहून तो वेटरला काही सांगत असताच मी खिशातून पैसे काढून त्याच्या हाती देऊ लागलो. त्यावर तो म्हणाला, 'काळजी करू नका. एक पेग तुम्ही घ्या व एक पेग मला द्या. फार तर दुसरा मी घेईन. त्याचे बिल द्या म्हणजे झालं.' अर्थात व्हिस्की हा शब्द मी त्या वेळी नुसता ऐकला असल्याने मला त्या व्हिस्कीची चव आणि किंमत ही दोन्हीही माहीत नव्हती. तथापि १० रुपयांच्या आत सारे काही होईल असा दिलासा मला त्याने देऊन ठेवला होता. त्याच्याबरोबर काहीतरी घ्यायला पाहिजे म्हणून त्याच्या व्हिस्कीत मिसळला जाणारा सोडा मी प्यालो व त्याने व्हिस्कीचे दोन पेग मारले. बिल देऊन मी उठू लागताच तो मला म्हणाला, 'पुणे स्टेशनपर्यंत येथेच बसा. पुण्यात उतरल्यावर मी तुम्हांला तिकीट कलेक्टरच्या दाराबाहेर पोहोचवीन.'

उपहारगृहातील त्या दिवशीचा माझा मुक्काम चांगलाच ओशाळल्यागत झाला. कारण कंडक्टर निघून गेल्यावर मुंबई विद्यापीठाच्या ॲकेडमिक कौन्सिलच्या बैठकीसाठी गेलेली पुण्यातील काही प्राचार्य आणि प्राध्यापक मंडळी मुंबईहून पुण्याला परतत होती. कल्याण सोडल्यावर त्यांनी रेस्टॉरंटकारमध्ये प्रवेश करून खाण्या-पिण्याचा, नव्हे पिण्या-खाण्याचा कार्यक्रम सुरू केला. शिष्यासमोर विलायती दारूला स्पर्श करण्यास गुरुजनांनी संकोच बाळगण्याचे काही कारण नसले, तरी शिष्याने तेथे बसणे मला शिष्टसंमत वाटले नाही. म्हणून मी उठून जाऊ लागलो. माझा हा उपहारगृहत्याग ज्ञानाने, वयाने आणि मानाने थोर अशा आमच्या एका प्राचार्यांना नाही आवडला. त्यांनी मला जवळ बोलावले आणि म्हटले, "अरे, तू एल. एल. बी. होऊन बार कौन्सिलची परीक्षा दिल्यावरही स्वतःला कॉलेजातील विद्यार्थी मानीत आहेस का ? बैस येथे जवळ आणि खा फिश नाहीतर ऑमलेट, व्हिस्की नाही तुला जमायची आणि बियर नाही पुरायची. गुरु-शिष्य नाते वर्गात, बाहेर आले की मित्र. जीवन जगायचे असते हे विसरू नकोस." मी ते शब्द अजूनही विसरलो नाही. खरोखर ते प्राचार्य खऱ्या अर्थाने जीवन जगले, नव्हे त्यांनी जीवनाचे सार्थक केले. त्या दिवशी मी त्यांच्याजवळ गाडीत अर्धा-पाऊण तास बसलो, पण जीवनाकडे बघण्याचा एक उदात्त आणि भव्य दृष्टिकोन शिकलो. मद्यपान करणाऱ्या त्या प्राचार्य-प्राध्यापकाकडे पाहून नाके मुरडणारी मंडळी मी त्या दिवशी गाडीत पाहिली. पण त्या प्राचार्यांच्या व प्राध्यापकांच्या कार्याची, कळकळीची आणि तळमळीची

कोणाबरोबरही तुलना करता येऊ शकली नाही. असा सहवास, असे बोल आणि असे दृष्य गेल्या २० वर्षात पुन्हा नाही पहावयास मिळाले.

त्यानंतर दोन वर्षांनी मी मुंबई असेंब्लीची बैठक संपवून ( आमदार म्हणून नव्हे तर 'सकाळ' चा प्रतिनिधी म्हणून ) पुण्याला परतत असता गाडीने दादर सोडल्यावर 'सकाळ' चे संचालक डॉ. नानासाहेब परुळेकर अचानक माझ्या शेजारी येऊन बसले. त्यांच्या उपस्थितीमुळे माझ्या तोंडाला कुलूप पडले. नाहीतर मी आणि माझ्यासमोरचा प्रवासी असे आम्ही दोघे हास्य-विनोदात चांगलेच गर्क झालो होतो. नानासाहेबांनी इकडची तिकडची थोडी चौकशी केल्यावर बॅगमधून पुस्तक काढले आणि ते वाचू लागले. त्यांचे लक्ष पुस्तकात गुंतलेले पाहून मी गाडीत एक चक्कर मारण्याच्या हेतूने उठू लागताच नानासाहेबांनी मला हटकले व 'चला कॉफी घेऊ या' म्हणून ते मला रेस्टॉरंटकारमध्ये घेऊन गेले. मला थोडे आश्चर्यच वाटले. कारण आम्ही दोघांनी गाडीत भेटण्याचा आणि गाडीत एकत्र कॉफी घेण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. तत्पूर्वी एकदा रोटरी क्लबमध्ये नानासाहेब येण्यापूर्वी एका इंग्रजसाहेबाने बिअरचा ग्लास माझ्या हाती दिला असता तो ओठाला लावण्यापूर्वी नानासाहेब येऊन दाखल झाल्यामुळे बिअरची जागा लेमोनेडनी घेतली आणि रोटरी क्लबमधील ते रुक्ष भाषण दीड तास ऐकण्याची शिक्षा भोगावी लागली. नानासाहेबांनी कॉफी पिता पिता मजकुराचा विषय काढला आणि मग मी भानावर आलो. डॉ. परुळेकर म्हणाले, " अनंतराव, डेक्कनमध्ये आपल्याला अजून चांगला दोन–अडीच तास वेळ मिळणार आहे. या वेळेचा उपयोग आपण 'रविवार सकाळ'चा मजकूर तयार करण्यासाठी केला तर नाही का चालायचे ? आपण असे करू की मी परराष्ट्र घडामोडीचा मजकूर सांगतो, तुम्ही घ्या लिहून. तीन–चार कॉलम मजकूर पुण्याला पोहोचल्यावर आपल्याला कंपॉझिटर्सच्या हाती देता येईल. मी मुकाट्याने कोटाचा पेन काढला आणि नानांचा लेखनिक बनून मजकूर लिहून घेऊ लागलो. वेळेला दिले जाणारे महत्त्व आणि कामाची आमची ती पद्धत पाहून अर्थात बाकीचे प्रवासी थक्क न झाल्यासच नवल ! कॉफीच्या एका कपावर आम्ही ४ कॉलम मजकूर संपविला.

वृत्तपत्रासाठी असा मजकूर लिहायला आता डेक्कनक्वीनमध्ये जागा नाही आणि शांतता पण नाही. आता आहे गर्दी आणि गडबड. व्हिस्कीची जागा 'सोसयोने' आणि ऑमलेटची जागा इडलीने घेतली आहे. वाचनाची जागा पत्त्याने आणि चर्चेची जागा गप्पांनी घेतली आहे. आता गाडीवर कधी प्रिन्सिपॉल जोग दिसत नाहीत आणि तरुणांच्या मनांत कोणी जिवंतपणा आणत

नाही. हरिभाऊ अभ्यंकरासारखे नोकरीसाठी रोज प्रवास करणारे, डॉ. देसाई यांच्यासारखे मुंबईत प्रॅक्टिस करणारे, सेक्रेटरिएटमधील सेक्रेटरीच्या तोफखान्याला तोंड देणारे डायरेक्टर, परवान्यासाठी खेटे घालणारे उद्योगपती भेटतात आणि आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान अघळपघळपणे सांगत सुटतात. हे सारे पाहिले आणि ऐकले की वाटू लागते, " याला जीवन ऐसे नाव ! "

● ● ●

## रहाटगाडगे चालू आहे ! : २ :

मुंबईतील कामे एका दिवसात संपवून सायंकाळी परतण्याच्या दृष्टीने सकाळी ६–२५ ची जनता एक्स्प्रेस सोयीची पडते. गैरसोय एवढीच की, सकाळी पाचला उठून सहाला स्टेशन गाठावे लागते व गर्दीत जागा सायासाने मिळवावी लागते. शिवाजीनगर स्टेशनवर जागेची हमी असते. पण अलीकडे जनता एक्स्प्रेसच्या शिवाजीनगर डब्याला मालगाडीच्या डब्याचे स्वरूप मिळाल्याने डब्यात चटकन् प्रवेश मिळवून आरामशीर जागा मिळविणे मुष्कील होते. शिवाजीनगरचा डबा जेथे उभा रहातो त्या जागेसमोर पाच-पन्नास भाजीची पोती आणि बोचकी डब्यात चढविण्यासाठी तयार असतात आणि पाऊण डझन भय्ये हिंदीत एकमेकांची थटामस्करी करीत बसलेले असतात. त्या हातगाड्या, ते भय्ये आणि त्यांचा तो माल पाहिल्यावर उतारूंवरील अतिक्रमणाबद्दल या लोकांचा राग येतो. उदरनिर्वाहासाठी त्यांची ती धडपड, ते कष्ट पाहिल्यावर प्रथम सहानुभूती वाटत असली तरी उतारूंच्या जागेवर ते जेव्हा ठाण मांडून बसतात आणि जा-ये करायच्या जागेवर मालाचा ढीग रचून ठेवतात तेव्हा त्यांच्या त्या धसमुसळेपणाचा आणि रेल्वेच्या बेपर्वाईचा राग येऊ लागतो. तथापि केंद्रीय रेल्वेपुढे कोण काय करणार ?

खादीची पांढरी पँट, पांढरा कोट आणि हातात कातडी ब्रीफ-केस पाहिल्यावर त्या दिवशी एका भय्याने मला तिकिट-चेकर समजून रामराम ठोकला. माझ्यालगत तो आला आणि हळूच सांगू लागला, " साहेब, चार डागांपैकी दोनच वजन केलेले आहेत, बाकीच्यांचे डब्यात बघू. लोणावळा सुटल्यावर मी येईन तुमच्याकडे. " प्रथम मला काही उमजलेच नाही, पण नंतर लक्षात आले की, मालाच्या वाहतुकीच्या भाड्यात ही मंडळी रोज बदमाषी करीत असावीत व त्यांच्याशी तिकिट तपासनीसाचे सूत जमलेले असावे. मी ' ठीक '

म्हटले आणि गाडी प्लॅटफार्मवर आल्याबरोबर उडी मारून आत बसलो. खडकी स्टेशन गेल्यावर टी. सी. आला आणि तिकिट मागू लागला. मी म्हटले, "मालाला उतारूंच्या डब्यात घेता, मग उतारूंना मालाच्या डब्यात का बसवीत नाही? रोज ह्या पोत्यांचा आणि भय्यांचा त्रास किती काढायचा! यांच्यासाठी एक स्वतंत्र मालडबा का ठेवीत नाही?" त्यावर तो म्हणाला, "सेंट्रल रेल्वेला वरती कळविले आहे; पण अद्याप दाद लागत नाही. भय्यांचे तकदीर आहे तोवर असेच चालायचे. जाऊ द्या, बिचारे कष्ट करून पोट भरीत आहेत." त्याच्या बोलण्यातील आशय ध्यानी आल्यावर मी तो विषय तेथेच सोडून एका भय्याशी प्रवासगट्टी केली आणि त्याला त्याच्या धंद्याविषयी माहिती विचारू लागलो.

तो म्हणाला, "पुण्याच्या फुले मंडईत रोज पहाटे माल खरेदी करून आम्ही या गाडीने मुंबईला नेतो आणि उपनगरातील आमच्या दुकानात तो विक्रीला ठेवतो. काहीजण तो किरकोळ दुकानदारांना विकून दोन पैसे लगेच मिळवितात. सायंकाळी आम्ही पुन्हा पुण्याला परततो व रात्र पुण्यात काढून सकाळी मुंबई गाठतो. महिन्याच्या पासामुळे आम्हांला ते परवडते. दोन पैसे मिळतात हे खरे; पण रोजचा त्रास लक्षात घेता उदरनिर्वाहाचे हे साधन खडतरच वाटते. देशावरील उपासमारीपेक्षा हे पुष्कळ बरे. इकडचे लोक बरे आहेत म्हणून आम्ही दुधापासून भाजीपाल्यापर्यंत वेगवेगळे धंदे करू शकत आहोत. कधी खोटे बोलावे लागते, कधी लबाडी करावी लागते. पण सारे काही पोटासाठी, पोट भरण्यासाठी. पैशाचा संचय करून श्रीमंत होण्यासाठी नव्हे."

खरे होते त्याचे म्हणणे. थंडीत कुडकुडत मंडई केल्यानंतर ती मुंबईत पोहोचवीपर्यंत हाल आणि त्रासच पदरी पडतो. चहा पी, विडी ओढ, चिवडा खा, थोडी झोप काढ असे करीत ही मंडळी दादरला पोहोचतात व मग पुढच्या मार्गाला लागतात. डब्यात माझ्याशेजारी पुण्यातील एक-दोन दुकानदार मा[illegible] खरेदीसाठी मुंबईला चालले होते. त्यांच्या पलीकडे पुण्याहून रोज नोकरीसा[illegible] मुंबईला जाणारे उतारू होते. रोज सात तास गाडीत, एक तास वाटेत आणि आठ तास कचेरीत वा कारखान्यात म्हणजे १६ तास घराबाहेर. रात्री ११ ते ५ अशी ६ तास झोप. म्हणजे दोन तास बायका-मुलांत, मित्रात. या जीवनाला काय म्हणायचे? गाडीत वेळ जावा, कंटाळा येऊ नये म्हणून पत्ते खेळण्याचा रोजचा क्रम. लोणावळ्याला चौघा मिळून चहाचा एक ट्रे व ब्रेडबटर. चालू आहे नित्यनेम अनेक वर्षे. कर्जतला अशा मंडळींची आणखी भर. बाकावर बसायला जागा मिळत नाही म्हणून त्यांनी घडीच्या लोखंडी खुर्च्या बनवून

घेतल्या असून त्या खुर्चीवर बसून कर्जत ते मुंबई व परत मुंबई ते कर्जत असा त्यांचा रोजचा प्रवास चालू असतो. काय करणार ? मुंबईत जागा नाही आणि मुंबईचा खर्च परवडत नाही. पिशवीत खुर्ची आणि छोटा डबा टाकला, की झाले काम. दोन तासांचा जायचा प्रवास आणि यायचा प्रवास. गप्पागोष्टींत वेळ निघून जातो. रोज नवा नवा विषय मिळतोच चर्चेला. त्या दिवशी गोडसे-अभ्यंकर-डावरे अटकेचा विषय होताच चर्चेला. शिवाय दफ्तर-दिरंगाई आणि लाचलुचपत हा न संपणारा प्रश्न असतोच रोज चघळायला. बोलण्याच्या ओघात शेजारचे पुण्याचे दुकानदार म्हणाले, " केतकरांनी बोलून घोटाळा केला. नाही-तर नंतरचे सारे काही झालेच नसते. गुपचुप बसण्याऐवजी प्रसिद्धीची हाव धरली आणि ही मंडळी गोत्यात आली." म्हणजे त्याला त्या कार्यक्रमाबद्दल खेद वाटण्याऐवजी धरपकडीबद्दल खेद वाटत होता.

तेवढ्यात दुसरा मला म्हणाला, " टी. सी. पैसे खातात म्हणून तर हे भय्ये एवढा माल थोड्या पैशांत नेतात. पण याही सद्‌गृहस्थाला भान न राहून तो म्हणाला, " परवा मी दुकानात विकण्यासाठी बॉलपेन्सची एक पेटी अशी काही युक्तीने शहरात आणली की, स्टेशनवरील जकातवाल्याच्या लक्षातच आले नाही." मी म्हटले, " अहो, ही लबाडी-फसवणूक झाली. ज्या चेकरकडे तुम्ही लाच घेतो म्हणून बघता त्याच्याइतकेच तुम्ही पण दोषी आहात. तुमच्यांत आणि या भय्ये लोकांत काय फरक आहे ? तेही उपजीविकेसाठी धंदा करीत आहेत, कष्ट घेत आहेत. सारे येथून तेथून सारखेच. लोकलमधून विनातिकीट प्रवास करणे, हॉटेल-वाल्याचा डोळा चुकवून गर्दीत बाहेर सटकणे आदी छोटे छोटे गुन्हे अशिक्षितां-बरोबर सुशिक्षित नि गरिबांबरोबर श्रीमंतही करीत असतात. एवढेच नव्हे तर प्राप्तीकराच्या मोठमोठ्या रकमा चुकवून, काळा पैसा दडवून ठेवून सरकारचे व समाजाचे नुकसान करीत असतात. थांबायला वेळ नाही, एकमेकाकडे लक्ष द्यायला वेळ नाही म्हणून बऱ्याच वेळा हे खपून जाते एवढेच !

त्या दिवशी मी दादरला उतरून भायखळ्याला गेलो. मार्केटमध्ये मला भेटायचे होते. भायखळा मार्केट म्हणजे देशाचे, समाजाचे एक वैशिष्ट्यपूर्ण चित्र. पहाटे चारपासून रात्री दहापर्यंत गजबजून गेलेले. पुन्हा अकरानंतर आहेच ट्रक्सची आवक. महाराष्ट्राप्रमाणेच गुजरातचाही माल मुंबईत. बडोदे, सुरत, बलसाड, पार्डी, पालघरहून रोज भाजीपाल्याची आवक. पुण्यातला माल आणणाऱ्या भय्या-प्रमाणेच बडोद्याहून माल आणणारे भय्ये मुंबईत आहेत. ठाणे व सुरत जिल्ह्यात तर त्यांची रोज ये-जा. पापडी, सुरण-आंबा आणि चिक्कू मुंबईइतका कोठेही खपत नाही. मार्केटमधील काही दलालांकडे तर गुजरातचाच माल अधिक.

रोजची दलाली शेकड्याने व माल घाऊक घेऊन किरकोळ विक्रीतही नफा शेकड्याने. रोज किमान १००-१५० रुपये मिळविणारे कितीतरी दलाल या मार्केटमध्ये आहेत. क्रॉफर्ड मार्केटमधील फळवाला आणि भायखळा मार्केटमधील भाजीवाला दुकानदार किंवा दलाल म्हटले की, तो जुन्नर-आंबेगाव किंवा खेड तालुक्याचा असणार. माळी-मराठे दोन्हीही. त्यांच्या पगड्या जाऊन डोक्यावर टोप्या आल्या असल्या तरी जुंदरी भाषा काही गेलेली नाही. जाकिटाच्या नाहीतर कोपरीच्या एका खिशात शे--सव्वाशेच्या नोटा आणि पाच--पन्नास रुपयांचा खुर्दा. पहाटे पाच ते दुपारी १ पर्यंत मार्केटमध्ये उभा रहाणार. दुपारी घरी जाऊन जेवून-झोपून चारला बाहेर पडणार आणि जागजागची वसुली करून पुन्हा रात्री मार्केटमध्ये चक्कर मारणार. भायखळ्याला तायडे, ताजणे, मेहेर, टिळेकर, ढोले आणि क्रॉफर्ड मार्केटला आवटे, ढोबळे, लेंडे आदी नावे जेवढी महशूर आहेत तेवढीच दानशूर आहेत. जुन्नर-आंबेगावचा त्यांनी कायापालट घडवून आणला आहे. कष्टातून पैसा आणि पैशातून सामाजिक सुधारणा असे कित्येक वर्षे चालले आहे. सातारच्या गिरणी कामगारापेक्षा या मंडळींची रहाणी, विचारसरणी अगदी वेगळी आहे. वरील दोन-चार लोकांकडे त्यांच्या आग्रहास्तव चहा घेऊन आणि माझे काम संपवून मी बाहेर पडलो व फोर्ट विभाग गाठला.

फोर्टमधील माझी कामे मी करीत असता त्या दिवशी मधूची आणि माझी अचानक भेट म्हणजे कपिलाषष्ठीचा योगच म्हणायचा. बँक ऑफ महाराष्ट्राच्या मुंबईच्या हमाम स्ट्रीटवरील शाखेतून मी बाहेर पडलो आणि पोटात दोन घास घालावेत म्हणून पलिकडच्या अपोलो स्ट्रीटवरील इराण्याच्या हॉटेलात शिरलो. लंच टाईम असल्याने जेवणारांची ही गर्दी त्या हॉटेलात होती. एका टेबलाशी एक जागा कशीबशी मिळवून मी 'लाईट लंच' घेतली आणि दोन ग्लास थंड पाणी पिऊन बाहेर पडू लागलो. तेवढ्यात मधू आत शिरून एका टेबलाशी बसत असल्याचे दिसले. कितीतरी वर्षांनी आम्ही एकमेकांना भेटत होतो. त्याला पाहिल्यावर मला जेवढा आनंद झाला तेवढाच त्यालाही झाला. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात सात वर्षे आम्ही केवळ एका वर्गातील एका तुकडीतच नव्हे तर एका बाकावर बसून काढली होती. शाळा सुटल्यावर एस्. पी. च्या ग्राऊंडवर क्रिकेटही भरपूर खेळलो होतो. आठवड्याच्या परीक्षेत आणि तिमाही सहामाहीत एकमेकांना पुरवणीतील प्रश्न दाखवून मदतही केली होती. रविवारी मधूच्या घरी जाऊन कांदापोहे--लाडूवर कितीतरी वेळा आडवा हातही मारला होता. तथापि मॅट्रिकनंतर त्याने वेगळा मार्ग स्वीकारला आणि मी वेगळ्या मार्गाला लागलो. मधू पुढे अमेरिकेला गेला, मोठा होऊन परत आला, त्याचे लग्न झाले, सासरे गरवारे यांच्याकडे तो मोठा अधिकारी झाला, येथपर्यंत मी त्याच्याबद्दल ऐकले

होते. गेल्या आठ–दहा वर्षांत मला त्याच्याबद्दल काहीच समजले नव्हते. गरवारे यांच्याकडून तो दुसऱ्या एका गुजराथी मशिनरी कंपनीत गेल्याचे मात्र ऐकले होते. आता तो प्रत्यक्ष माझ्यापुढे उभाच होता.

"मधु! कायरे आपले जीवन. एकमेकांची गाठभेट होऊ नये एवढे आपण कामाच्या गर्दीत आणि व्यापात! तू पुण्याला येतोस आणि मीही अधूनमधून मुंबईला येतो. पण पाच मिनिटे एकमेकांची भेट घेण्याची किंवा होण्याची मारामार. फरासखाना बोळातील चंद्रचूडांचा वाडा लांब होता तरी मी तुझ्याकडे येत असे. आणि आता तुझी ती पाशाभाई पटेल कंपनी हमाम स्ट्रीटच्या जवळ असूनही तुझी-माझी भेट होऊ नये हे आश्चर्य नव्हे का! पण जाऊ दे ते. आता पुण्याला केव्हा येणार? मुलं-बाळं किती आहेत, मुंबईत रहायला कोठे आहेस, वडील कोठे आहेत?" आदी प्रश्न मी त्याला भराभर विचारीत होतो आणि तो शांतपणे उत्तर देत होता. त्याचा लहानपणापासूनचा तो शांत व अघळपघळ स्वभाव कायम होता. अमेरिकेतील शिक्षणाचा वा वास्तव्याचा त्याच्यावर शिष्टासारखा संस्कार काही होऊ शकलेला नव्हता. मधूच्या पेडररोडवरील घरी एकदा जायचे कबूल करून मी त्याचा निरोप घेतला व माझ्या पुढील कामासाठी हॉटेलच्या बाहेर पडलो. मुंबईतील त्या यांत्रिक जीवनाचा पदोपदी प्रत्यय मला नकोसा झाला होता. सारीच धाई–गर्दी आणि गडबड. शांतता–स्वास्थ्य नाही. पुण्याच्या स्टेशनवर मुंबईच्या गाडीत पाऊल ठेवल्यापासून तो पुन्हा स्टेशनवर परत येईपर्यन्त एका वेगळ्या जीवनाचा व एका वेगळ्या जगाचा अनुभव घ्यावा लागतो व त्यात गुदमरून जाणारा जीव पुण्यात पोहोचल्यावर भांड्यात टाकावा लागतो. व्ही. टी. स्टेशनवर उतरले की टॅक्सी, बस, लोकल यांच्या मदतीने वेगवेगळी ऑफिसे गाठावी लागतात, दुपारी १५–२० मिनिटे सवड काढून एखाद्या हॉटेलात दोन घास पोटात ढकलावे लागतात आणि साडेचार पाच वाजले, की पुन्हा व्ही. टी. गाठावे लागते. दरखेपेला, महिन्याला, दरवर्षी तेंच तेच. जीवनाचे ते एक रहाट-गाडगे बनले आहे.

परतताना डेक्कन क्वीनमधील ते नेहमीचे हास्य डोळ्यांपुढे उभे राहिल्यावर जनता एक्स्प्रेस, भय्ये, भाजी, कर्जतचे ते रोजचे नोकरीवाले प्रवासी, भायखळा मार्केट, फोर्टमधील धांदल-गडबड, मधू, त्याची नोकरी, शाळेतील ते दिवस, एकमेकांच्या व्यापामुळे वर्षानुवर्षे गाठ पडू न शकणारे इतर मित्र यांची पुन्हा आठवण झाली. डेक्कन क्वीन जशी गेली अनेक वर्षे रोज न चुकता मुंबईस जाते व परत येते, त्यात कधी खंड नाही, तसेच मानवी जीवनाच्या रहाटगाडग्याचे चालू आहे. कोणी भाजीच्या धंद्यासाठी, कोणी स्टेशनरी-कटलरी दुकानाच्या

मालासाठी, कोणी व्यापार–धंद्यासाठी, कोणी राजकीय वा सरकारी कामासाठी अथवा माझ्यासारखा पत्रकार आपल्या वृत्तपत्राच्या गरजांसाठी प्रवास करीत असतो, धांवपळ करीत असतो, धडपडत असतो. सारेच जीवन प्रवासी. हा प्रवास किती दिवस आणि कसकसा चालणार आहे याची कुणालाच निश्चित कल्पना नाही. तथापि त्यांत क्षण–दोन क्षण विरंगुळ्याचे, सुखासमाधानाचे लाभत नाहीत हे खरे शल्य आहे. वडील-मुलाची, भाऊबहिणींची, मित्र-मित्राची वर्षानुवर्षे गाठभेट होत नाही, चार-दोन तास शांतपणे बसून एकमेकांचे कुशल विचारता येत नाही हे खरे दुःख आहे. गतिमानता हा आजचा परवलीचा शब्द झाला आहे आणि स्वत्व, स्वावलंबित्व, विकसित व्यक्तिमत्व हा धर्म बनला आहे. म्हणूनच भाजीवाल्यापासून फ्रिजिडियरच्या व्यापाऱ्यापर्यंत कोणाला कोण हसणार आणि त्यातून काय निष्पन्न होणार ? ‘ जाऊ द्या, जो तो पोटासाठी धडपडत आहे ” हेच खरे.

● ● ●

## नंदी, बाहुबली आणि धबधबा : ३ :

म्हैसूरच्या चामुंडी टेकडीवरील प्रसिद्ध आणि प्रचंड नंदी पहात असताना मी सहज चौकस बुद्धीने विचारले की, “ एका दगडातून हा प्रचंड नंदी कोरून तयार करायला किती दिवस लागले असतील बरे ! ” त्यावर आमच्यातील एक-जण म्हणाला, “ अहो, हा नंदी चोवीस तासांत तयार केलेला आहे असे सांगतात ! तुम्ही विश्वास ठेवा किंवा नका ठेवू. ” आमचे हे संभाषण चालू असता तेथे अगोदर आलेल्या दोघा-तिघा प्रवाशांनी आपणही मराठी भाषिक व बेळगावचे आहोत हे सांगण्याकरिता, “ विश्वास कोणावर ठेवायचा कोणा ठाऊक ! गेली सहा वर्षे आम्ही महाराष्ट्र सरकारवर विश्वास ठेवून आहोत. पण बेळगाव-कारवार-निपाणी काही महाराष्ट्रात अजून येईना. तुम्ही लोक ‘ झालाच पाहिजे ’ अशा गर्जना करता आणि गप्प बसता. म्हैसूर काही आम्हांला सोडायला तयार नाही आणि आमची कुचंबणा काही संपत नाही. गांधी टोपी-वाल्यांकडून काही होईल असा विश्वास आता वाटेनासा झाला आहे ” असे शुद्ध मराठीत बोलून त्या प्रवाशांनी जाता जाता काँग्रेसवाले म्हणून आमची टोपी उडविली व साथ साथ म्हैसूर सरकारवरील आपला रागही व्यक्त करून टाकला. चामुंडी देवीच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या त्या टेकडीवरील तो प्रचंड दगडी

नंदी व त्याची पूर्वपीठिका बाजूला राहून त्या प्रसन्न वातावरणात जेव्हा भाषिक वाद मिसळविण्यात आला, तेव्हा मला कसेसेच वाटले. महिषासुराचा वध करून त्या राजराजेश्वरीने देवांना निर्भय केले, पण माणसांच्या मनातील भाषिक भीती किंवा आग्रह-दुराग्रह ती दूर करू शकत नाही, याबद्दल मला वाईट वाटले. राजकारणातील नित्याच्या कटकटी, भांडणे, द्वेष, आगळीका विसराव्यात आणि म्हैसूरच्या त्या रमणीय वातावरणात २४ तास घालवावेत म्हणून आम्ही बंगलोर-हून मुद्दाम म्हैसूरला आलो होतो. आदल्या दिवशी रात्री कृष्णराजसागर धरणा-खालील 'वृन्दावन उद्यान' पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले होते आणि दुसऱ्या दिवशी म्हैसूर महाराजांच्या ललित महाल पॅलेस व म्हैसूर पॅलेस हे दोन राजवाडे पाहून मन थक्क झालेले होते. चामुंडी या शक्तिशाली देवीला म्हैसूरच्या राजघराण्याने आपले दैवत मानून त्याची जी निगा राखली आहे त्याबद्दल कौतुक करीत टेकडीच्या उतरणीवरील 'नंदी' पहावा म्हटले, तर वरील संभाषणाने भाषिक वादाची आठवण देऊन आमच्या मोकळ्या वातावरणाचा भंग केला. आम्ही तेथून लवकर हललो आणि टेकडी उतरून परत आमच्या निवासस्थानी आलो. दुपारी जेवणानंतर कॉटवर पडल्या पडल्या मी म्हैसूर राज्य भेटीचा आढावा घेऊ लागलो आणि म्हैसूरदर्शनाची महाराष्ट्राशी तुलना करू लागलो.

माझ्या स्नेह्यांबरोबर बंगलोरभेटीचा निर्णय मी जेवढा तडकाफडकी घेतला तेवढाच तो त्वरित अमलातही आणला. बारा वर्षांनंतर मी दुसऱ्यांदा बंगलोरला जाणार होतो आणि या खेपेला एक दिवसाची सवड काढून म्हैसूरचे 'वृन्दावन उद्यान' आणि 'गिरसप्पाचा धबधबा' (जोग फॉल्स) पहाण्याचे ठरविले होते. या प्रवासाची संधी उपलब्ध होण्यास दोन कारणे ठरली. एकतर म्हैसूर राज्यात बंगलोरला अखिल भारतीय पंचायत परिषद भरणार होती आणि तिला जयप्रकाश नारायण, बलवंतराय मेहता, एस्. के. डे यांच्या-सारखे पंचायत राज्याचे पुरस्कर्ते हजर राहणार होते. तसेच सर्व राज्यांतील जिल्हा परिषदांचे प्रतिनिधी पण येणार होते. पुणे जिल्हा परिषदेचे पदाधिकारी आणि काही पंचायत समित्यांचे चेअरमन यांनी या परिषदेला जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे आणि प्रवास मोटारने करण्याचे ठरविल्यामुळे मला त्यांच्याबरोबर जाणे सोयीचे झाले. मोटाररस्त्याने स्वतंत्रपणे प्रवास केल्याने आम्हां सर्वांना मिळून बरेच नवीन पाहता, अनुभवता आणि शिकता आले. बंगलोरच्या परिषदेचा तर निश्चित उपयोग झालाच, पण त्याचबरोबर म्हैसूर राज्यातील शेती, उद्योग, जंगल, रस्ते, पाटबंधारे पाहून आपल्याकडील स्थितीची व काही बाबतीत मागासलेपणाची तुलना पण करता आली. आम्ही बाराजण आणि ड्रायव्हर व शिपाई मिळून एकूण सोळाजण. खर्च प्रत्येकाने स्वतःचा करायचा

ठरल्याने वर्गणी एकत्र गोळा केली गेली व अर्थसमितीचे चेअरमन श्री. विठ्ठलराव सातव यांना प्रवासप्रमुख निवडून त्यांच्या अधिपत्याखाली आम्ही गुरुवारी सकाळी बंगलोरकडे रवाना झालो. पहिल्या रात्रीचा मुक्काम केला हरिहरला आणि दुसऱ्या दिवशी पाचाला पोचलो बंगलोरला. वाटेत निपाणी आणि टुमकूर येथे श्री. शंकरराव उरसळ यांचे परिचित व्यापारी व बागायतदार यांच्याकडे जेवण घेतले. या दोन्ही ठिकाणचे यजमान मुसलमान होते, पण आदरातिथ्यात त्यांनी आम्हांला लाजविले. वऱ्हाडच्या आदरातिथ्याचा मी अनुभव घेतलेला होता, त्याची मला या वेळी आठवण झाली आणि आम्ही पश्चिम महाराष्ट्रीय लोक पाहुण्यांना कटविण्यात कसे हुषार आहोत याची जाणीव होऊन मनाला विषाद पण वाटला.

बंगलोरला पोहोचल्याबरोबर आम्ही प्रतिनिधी-निवासाची चौकशी केली. तथापि तिथली व्यवस्था तितकीशी सोयीची न वाटल्याने एका बऱ्यापैकी हॉटेलात मुक्काम केला आणि परिषदेच्या कामकाजाच्या तयारीला लागलो. विधानसौदमध्ये जाऊन जरूर ती माहिती घेतली. म्हैसूर राज्य सरकारने विधिमंडळाच्या बैठकी-साठी आणि सचिवालयासाठी बांधलेली ही भव्य इमारत पाहून आमच्यापैकी अनेकांनी समाधानाचे उद्‌गार काढले. लाल विटांतील जुने सचिवालय आणि त्या समोरची विधानसौद इमारत बंगलोरच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या वास्तू आहेत. भारतीय स्थापत्यशास्त्रात भारतीय कला–संस्कृती–परंपरेचा समावेश हवा या आग्रहातून या नव्या वास्तूंची रचना करण्यात आलेली आहे. मुंबईचे आमचे भव्य सचिवालय पाहताना मनाला तेवढा आनंद होत नाही की आल्हाद वाटत नाही. कारण त्यात भारतीय असे काहीही आढळून येत नाही. ना कला ना कौशल्य. सिमेंटकॉंक्रीटची एक आकारहीन इमारत म्हणजे आमचे सचिवालय. बंगलोरमधील इतर इमारती, रस्ते, उद्याने सारेच काही डोळ्यात भरणारे आहे. हवा-पाणी उत्तम असून व्यापार-उद्योगात व प्रवाशांच्या ये-जाने शहर नेहमी गजबजलेले असते. प्रसिद्ध लालबागेमधील त्या भव्य सभागृ[ह]त परिषदेचे कामकाज ठेवण्यात मोठी सूचकता दाखविण्यात आली होती. [अ]शा आल्हाददायक वातावरणात श्री. बलवंतराय मेहता आणि श्री. जयप्रकाश नारायण यांनी जे विचार प्रदर्शित केले, श्री. एस्. के. डे यांनी सरकारच्या बाजूने पुढे जाण्याची जी तयारी दर्शविली आणि प्रतिनिधींनी चर्चा करून जे ठराव संमत केले त्यावरून पंचायत राज्याची आगेकूच जोरात चालू राहणार व हे राज्य खऱ्या अर्थाने 'लोकराज्य' होणार याची खात्री वाटू लागली. बलवंत-भाईंचे भाषण अत्यंत उद्‌बोधक, विचारप्रवर्तक आणि मार्गदर्शक झाले. जयप्रकाशजींनी परिषदेत विशेष रस घेतला आणि घटना बदलून राज्यकारभार

पाच पातळीवर ( फाईव्ह टायर ) करावा असे आग्रहाने प्रतिपादिले. प्रतिनिधींनी परिषदेत उत्साहाने व आग्रहाने भाग घेतला खरा, तथापि भाषेची अडचण जाणवल्याखेरीज राहिली नाही. कोणाला हिंदी समजत नव्हते तर कोणाला इंग्रजी येत नव्हते. कानडी व तामीळची अडचण होतीच. अखेर शक्यतो इंग्रजी, हिंदी व कानडीतून भाषण व चर्चा चालेल असे ठरले व त्याप्रमाणे म्हैसूरचे पंचायत-मंत्री श्री. रामकृष्ण हेगडे यांनी भाषांतराला बहुमोल मदत केली. परिषदेला जोडून राज्य प्रसिद्धी संचालकांनी प्रदर्शन भरवून म्हैसूर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचे यथायोग्य दर्शन घडविले होते.

परिषद संपल्यावर आम्ही दोन दिवसांत म्हैसूर, कृष्णराजसागर श्रीरंग-पट्टणम्, श्रवणबेळगोळा, बेलूर, हळबीड, हसन, कडूर, भद्रावती, शिमोगा, जोग फॉल्स आदी प्रेक्षणीय व सांस्कृतिक स्थळे पाहून पुण्याला परतलो. वाटेत म्हैसूरच्या शेतीची, रस्त्यांची, पाटबंधाऱ्यांची, तलावांची जेवढी मिळविता येईल तेवढी माहिती मिळविली. निसर्गाने म्हैसूरवर वरदहस्त ठेवला असून निसर्गाच्या मदतीने माणसाने आपली प्रगती साधण्याचा प्रयत्न कसोशीने चालविल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. निलगिरी पर्वताच्या डोंगरराजींची शोभा अवर्णनीय तर आहेच, पण या डोंगरांच्या उतरणीवरील जंगलसंपत्तीने आणि डोंगरात उगम पावणाऱ्या नद्यांच्या सुपीक खोऱ्याने म्हैसूरला समृद्ध बनविल्याचे जागोजागी आढळून येते. जुलैमधील मोटारप्रवास एवढा आल्हादायक वाटतो की, वाटते, चित्रदुर्गच्या आसमंतात खूप फेरफटका मारावा किंवा श्रीरंगपट्टणमला कावेरीच्या काठी बसून म्हैसूर–टिपूचा तो पूर्वीचा सारा इतिहास आठवावा किंवा श्रवणबेळगोळाला बाहुबलीच्या सान्निध्यात तासन्तास घालवावे किंवा बेलूर–हळबीड येथील भारतीय शिल्पकलेचे डोळ्याचे पारणे फिटेपर्यंत सूक्ष्म अवलोकन करीत बसावे. जोग धब-धब्याजवळ तासन् तास बसले तरी कंटाळा येत नाही. तो रुपेरी जलौघ उंच कड्यावरून खाली उडी घेताना आपणही त्याचेबरोबर उडी घ्यावी, किंवा खाली खोल दरीत त्या धबधब्याखाली बसून थंडगार पाण्याचे सचैल स्नान करावे असे वाटल्यावाचून रहात नाही. नारळी–सुपारी–केळी–नागवेलीच्या त्या हिरव्यागार उंच उंच बागा, वाऱ्याबरोबर ऐटीत डोलणारी ती हिरवीगार भातशेती, तांबड्या मातीत पिकणारा तो चवदार तांबडा बटाटा, निलगिरीची आणि सागाची ती डौलदार वृक्षराजी मनाला मोहिनी घातल्याशिवाय रहात नाही. शेतात कष्ट करून धान्य पिकविणारा तो म्हैसूरी शेतकरी किंवा रस्त्यावर काम करणारा मजूर पाहिला व त्याचेशी मोडक्या कानडी–मराठी–हिंदीत बोलण्याचा प्रयत्न केला, की त्या माणसाच्या गरीब, कष्टाळू, गोड स्वभावाची थोडीफार कल्पना येऊ शकते. हा माणूस रूढीप्रिय जरूर आहे. पण स्वकष्टाने पुढे जाण्याची जिद्द पण बाळगत

आहे. तो सर्वस्वी सरकारवर अवलंबून न रहाता निसर्गाच्या सहकार्याने स्वतःचा उद्धार करण्यासाठी धडपडत असल्याचें चित्र जागोजागी दृष्टीस पडते. आणि मग वाटू लागते, शेतकरी येथून–तेथून सारखाच आणि माणूसहि सगळीकडे तोच. भिन्न भाषा, भिन्न वेष, भिन्न संस्कृतीतही भारताची एकात्मता दिसून आल्याशिवाय, अनुभवास आल्याशिवाय रहात नाही.

आमचे पथक म्हैसूरच्या या दौऱ्याने समाधान पावले यात शंका नाही. मंडळींना जर विशेष काय आवडले तर प्रत्येक खेड्यात एक तरी तळे आणि त्या तळ्याच्याद्वारे पिण्याच्या पाण्याची आणि शेतीच्या पाण्याची व्यवस्था दळणवळणासाठी चांगले रस्ते आणि खेड्यांची नवी आकर्षक रचना. शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठी पाटबंधारे आणि विजेची उपलब्धताही डोळ्यांत भरल्याशिवाय राहिली नाही. जिल्हा परिषदांच्या स्थापनेनंतर पंचायतराज्य सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागाचा खरा विकास करावयाचा असेल तर शेतीला पाणी आणि वीज, त्याबरोबरच गावोगाव छोटे छोटे उद्योगधंदे यांची तरतूद केली जाणे अत्यावश्यक आहे हे सर्वांना पटले. पंचायत परिषदेतील चर्चा व ठराव हे जेवढे उपयुक्त वाटले, तेवढेच म्हैसूरचा ग्रामीण भाग व तेथील एकूण व्यवस्था यांचे प्रत्यक्ष दर्शन घेणे उपयुक्त ठरले. 'केल्याने देशाटन···'म्हणतात त्याप्रमाणे या म्हैसूर प्रवासाने आमच्या जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या पदाधिकाऱ्यांना पुष्कळच नवीन पहाता आले आणि शिकता आले. त्याचा त्यांना त्यांच्या कामांत उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाही. ही सारी मंडळी प्रवासात अतिशय मोकळेपणाने वागली, औपचारिकपणा त्यांनी सोडून दिला म्हणून प्रवास सुखावह व बोधप्रद ठरला. भोरचे सभापति श्री. शंकरराव शिवतारे यांनी म्हटल्याप्रमाणे बोलण्या-वागण्यात मोकळेपणा ठेवला गेला म्हणूनच वेळ चांगला गेला आणि प्रवासाबरोबर माहितीहि जमविता आली. श्री. शंकरराव उरसळ, श्री. शिवाजीराव काळे, श्री. विठ्ठलराव सातव, श्री. साहेबराव सातकर या चारहि परिषद पदाधिकाऱ्यांनी खेळीमेळीचे एवढे वातावरण ठेवले की, कित्येक सभापतींना आश्चर्य वाटले. जुन्नरचे निवृत्ती शेरकर व इंदापूरचे जगन्नाथ मेरे प्रथम प्रथम थोडे बुजले, पण नंतर चांगलेच रुळले. हवेलीचे दत्तोबा खांदवे पाटील व शिरूरचे रायकुमार गुजर यांची प्रवासातील गट्टी आणि पुरंदरचे विजयबापू निगडे व रामभाऊ फडतरे यांची जोडी यांचे विस्मरण लवकर होणार नाही. साऱ्यांनी एकमेकांचे ऐकले, मानले आणि कोणी कमीजास्त बोलले तरी त्याचा राग मानला नाही. एवढेच नव्हे तर बहुतेकांनी सुचविले की, असे अभ्यासदौरे अधूनमधून आखून आंध्र-राजस्थान-गुजरातमधील कामकाजाची पहाणी करणे जरूर आहे. म्हैसूरच्या दौऱ्याचा त्यांच्यावर येवढा प्रभाव पडला.

शेवटच्या दिवशी आम्ही मोटारप्रवासाचा उच्चांक गाठला. जोगफॉल्स-पासून पुण्यापर्यंत जवळजवळ ५००–५५० मैलांचा प्रवास करून पुणे ठरल्या दिवशी गाठले. रस्त्यात बेळगावातून पुढे होताना मला भाषिक प्रश्नाची आणि सीमावादाची पुन्हा आठवण झाली. कानडी माणूस आणि मराठी माणूस माझ्या डोळ्यापुढे दिसू लागला. गेल्या चार दिवसांत मी हा वेगळेपणा पूर्णपणे विसरून गेलो होतो. खेड्यातही भाषेची अडचण भासली नाही. पण बेळगावने माझ्या विचारांना आणि भावनांना चालना दिली.

"कानडीने केला मराठी भ्रतार। एकाचे बोल दुसऱ्या न कळे॥" असे संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात म्हटलेले आहे. वारकरी संप्रदायात जन्म झाल्याने लहानपणीच या ओळी माझ्या कानावरून गेल्या होत्या आणि वाचनात पण आल्या होत्या. तथापि या ओळींचा आणि सबंध अभंगाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न काही त्या वेळी मी केला नाही. भाषावैचित्र्या-मुळे कसा गोंधळ होतो, एकाचे विचार दुसऱ्याला कसे समजू शकत नाहीत एवढा ढोबळमानाने अर्थबोध मला त्या वेळी होऊ शकला. पुढे कॉलेजात कर्नाटकातील पुष्कळ मुले सहाध्यायी झाली व भाषेच्या वैचित्र्यामुळे माणसाचे अडते किंवा दुरावा निर्माण होतो असा काही अनुभव आला नाही. उलट धारवाड-विजापूरकडची माणसे कानडी बोलणारी असली तरी ती आपलीच आहेत, आपल्या मुंबई प्रांताचीच रहिवाशी आहेत, या कल्पनेमुळे वेगळेपणा कधी जाणवला नाही. प्रिं. गोकाक किंवा प्रो. मुर्डेश्वर इंग्रजी विषय शिकवायला लागले, की कानडी मुलांपेक्षा आम्हा मराठी मुलांना ते अधिक जवळचे वाटत. कानडी साहित्यात मोलाची भर घालणारे प्रा. बेंद्रे एकदा का कन्नड साहित्यातील रस-गंगेचा प्रवाह सुरू करू लागले, की त्यात भरपूर निमज्जन करावेसे वाटे. विजापूरचा गोलघुमट कुठेतरी दूरच्या प्रांतात आहे आणि त्याच्याशी आपला काही एक संबंध नाही असे कधी त्यावेळी वाटले नाही. उलट जिंजी-तंजावरपर्यंत तलवार गाजवून तेथेच स्थायिक झालेले आमचे पूर्वज कर्नाटकात किंवा मद्रास-मध्ये राहतात म्हणून आमचे नाहीत किंवा त्यांना महाराष्ट्र वा मराठ्यांबद्दल प्रेम वाटत नाही असेही कधी जाणवले नाही.

पण मध्यंतरीच्या भाषिक राज्याच्या आंदोलनामुळे आणि भाषिक राज्याच्या स्थापनेमुळे कल्पना आणि भावना बऱ्याच बदलल्याचा प्रत्यय येतो. राजकीय पातळीवर दोन राज्यांत जे काही योग्य-न्याय्य ठरायचे ते ठरेलच आणि ते ठरायला हवे हे खरे, पण तेवढ्यासाठी तुटकतेची जी जाणीव पसरविली जाते किंवा येते, ती मनाला बोचल्याशिवाय राहात नाही. औरंगाबाद भाग

मराठी आणि पुण्याहून अवघ्या १५० मैलांवर असूनही पूर्वी तो मोगलाईत असल्याने आम्हांला शेकडो मैल दूर वाटे. त्याच्याशी आमचे नाममात्र दळण-वळण असे. उलट बेळगाव-कारवार दोन-तीनशे मैल अंतरावर असूनही आम्हांला अगदी जवळ वाटे. आमचे नित्याचे दळणवळण चालू असे. आता हा भाग आम्हांला फार दूर आणि परका वाटण्यासारखे जे काही घडले आहे त्याचा अर्थबोध होणे अतिशय अवघड जात आहे. बंगलोरला जाताना कागल सोडून मैल–दोन मैल पुढे जातो तो म्हैसूर राज्याची हद्द सुरू झाल्याची निशाणी, रस्त्यावर बाजूला वाहनासाठी अडथळा व पोलिस दिसताच थोडे विचित्र वाटले. कानडीतील पाट्या, मैलांचे दगड व मोटारीवरील नावेही कानडीत पाहिल्यावर भाषेचा वेगळेपणा निश्चित जाणवू लागतो. निपाणीत एक कॉलेज मराठी आणि दुसरे कानडी कॉलेज, एका गल्लीत कानडी तर दुसऱ्या गल्लीत मराठी. बाजारात फेर-फटका मारला तर मराठी बोलणारे व जाणणारे दिसून येतात. पेहराव, पद्धती, प्रथा, संस्कृती सारी काही सारखी. बेळगावच्या रस्त्याने पुढे गेले तो मराठी भाषिकांची गाठ-भेट अधिक. कानडी बोलणारेही भेटत पण त्यांना मराठी समजे. शेतकऱ्याची भातशेती आणि मंडईतील दुकानदारांचे मालविक्रीचे कौशल्य काही वेगळे भासले नाही. मग हा कृत्रिम वेगळेपणा आणि ओढूनताणून कडवटपणा विचारात का बरे दिसून यावा याचे मला कोडे वाटू लागले.

लग्नासाठी जेव्हा मी बेळगावची मुलगी पसंत केली, तेव्हा माझ्या बऱ्याच नातेवाईकांनी व मित्रांनी मला म्हटले, "अरे, आपल्याकडे मराठी मुलींचा तुटवडा पडला म्हणून की काय तू लांब कर्नाटकात गेलास. त्या कानडी मुलीला मराठी कसे जमणार? 'कानडीने केला मराठी भ्रतार'–या अभंगाचा अनुभव घ्यायचे ठरविले आहेस की काय?" मी त्या वेळी या मंडळींना सांगितले की, प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांचा विचार करता बेळगाव कर्नाटकात आहे हे खरे. पण तेथे मराठी माणसे मोठ्या संख्येने आहेत आणि जुनी मराठी घराणी बरीच आहेत. त्यांचे सारे व्यवहार मराठीतून चालतात आणि त्यांचे घर अगदी सातारा-कोल्हापूरच्या वळणासारखे आहे. कर्नाटक किंवा कानडी म्हणून बिच-कण्याचे काय एवढे कारण? सोळा वर्षे झाली त्या गोष्टीला. या सोळा वर्षांत मला कधी कानडी-मराठी हा भेदाभेद जाणवला नाही. कर्नाटक-महाराष्ट्रात वैरभाव दिसून आला नाही. मात्र भाषिक वादाने–सीमा वादाने एकमेकांची मने गढूळ झाल्याचा, दुरावा निर्माण झाल्याचा प्रत्यय भरपूर आला. माझा मेहुणा बेळगावचा म्हणून भाषावार प्रांतरचनेत त्याला म्हैसूरच्या नोकरीत ढकलण्यात आले. तो कानडी चांगला बोलतो, लिहितो. त्याची नोकरीही बरी आणि बरीच झाली आहे, तरीही तो भेटला की विचारतो किंवा पत्रातून लिहितो, "मला

महाराष्ट्रात केव्हा घेणार? बेळगाव महाराष्ट्रात केव्हा येणार?" भावनांचे हे कोडे माझ्यासारख्याला लवकर उलगडता येत नाही. तिकडच्या मराठी भाषिकांच्या भावना तीव्र आहेत एवढे खरे. जुन्या कर्नाटकात राहूनही तेथील बरेच लोक म्हणत आहेत, "मराठीला कानडी भ्रतार करण्याची सक्ती करू नका. तिला मराठीच भ्रतार निवडू द्या." या भावनांची कदर महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांनी करावयाची आहे आणि त्या कामी केंद्र सरकारने हातभार लावायचा आहे. भाषिक प्रश्न सुटण्यावर दोन्ही भागांतील लोकांचे सामरस्य अवलंबून आहे एवढे निश्चित.

● ● ●

## गीत गाया पत्थरोंने : ४ :

मुंबईत एका आठवड्यात एक खळबळजनक घटना घडली. वास्तविक खळबळ उडण्यासारखे त्या घटनेत काहीही नव्हते. पण कोणाच्या डोक्यात केव्हा कोणती कल्पना सुचेल आणि त्या कल्पनेचा राईचा पर्वत करून लोक केव्हा काय करतील याचा नेम राहिलेला नसल्याने खळबळ उडविणे सहजसाध्य झाले आहे. मुंबईतील एका सिनेमागृहापुढे 'खजुराहो' मंदिरातील काही चित्रांचे नमुने त्या सिनेमाची जाहिरात म्हणून लावण्यात आले होते. सदर चित्रे खजुराहो शिल्पाची अस्सल प्रतिकृती होती. तथापि लोकांना वाटले की, सिनेमावाल्याने प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी कलेच्या नावाखाली अश्लील चित्रे लावण्याची युक्ती योजिली आहे. सदर चित्रे मुलांमुलींनी पाहणे योग्य नाही. कारण ती फारच 'उन्मादक' आहेत. झाले, कोणीतरी विरोध दर्शविला आणि त्याचे निदर्शनात रूपांतर होऊन अखेर सिनेचालकांना ती चित्रे काढून ठेवावी लागली. लोकमताची सरशी होऊन कला कोपऱ्यात धूळ खात पडली.

कोणत्या सिनेमासाठी जाहिरात करण्याची ती कल्पना होती कोणास ठाऊक! कदाचित् 'गीत गाया पत्थरोंने' या सिनेमासाठी किंवा 'चित्रलेखा' या चित्रपटासाठी त्या चित्रांचा उपयोग केला असण्याची शक्यता आहे. मी गीत गाया...अद्याप पाहिलेला नाही. पण त्याच्या चित्रीकरणाबद्दल ऐकले आहे. वेरूळच्या कैलास लेण्यांच्या चित्रीकरणासाठी शांतारामबापूंनी खूप श्रम घेतल्याचे, आपली कल्पनाशक्ती लढविल्याचे मी ऐकले आहे. या लेण्यातील भारतीय

शिल्पाचे–हिंदू शिल्पाचे एकएक नमुने पाहिले, की मती गुंग होऊन जाते. एक मोठा पहाड फोडून त्यातील दगडावर जी कलाकृती कोरली आहे, जे काव्य उभे केले आहे ते पाहिले, की प्राचीन शिल्पकलेचे पोटभर कौतुक केल्याशिवाय राहवत नाही. अशा कलेचे नमुने भारतात ठिकठिकाणी कोरलेले आहेत. अत्यंत विकट जागी जाऊन बौद्धांनी, जैनांनी, हिंदूंनी आपली कला अमर केली आहे, आपली श्रद्धा अढळ केली आहे आणि आपले प्रेम बोलके केले आहे. महाराष्ट्रातील वेरूळची कैलास लेणी असोत वा मध्यप्रदेशातील खजुराहो मंदिरे असोत वा कर्नाटकातील बेलूर-हळबीड मंदिरावरील शिल्पकलेचे नमुने असोत या कलेत काव्य आहे, प्रेम आहे आणि भक्ती पण आहे. जो या कलेकडे ज्या दृष्टीने पाहील त्याला त्या कलेचे खरे सौंदर्य उमगेल. शांतारामबापूंना वाटले की, ज्या दगडावर कला कोरली आहे ते दगड बोलत आहेत, गात आहेत, नाचत आहेत. भारतीय कलेची दुंदुभी जगभर ऐकवीत आहेत. त्या शिल्पात वाईट, अश्लील असे काही नाही. प्रकृती आणि परमेश्वर, आत्मा आणि परमात्मा, ब्रह्म आणि माया, जीव आणि शिव यांचे मधुर मीलन आहे, अमर एकात्मता आहे.

खजुराहो मंदिरातील शिल्पकला ज्यांनी डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिली असेल, त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटले असेल. एक हजार वर्षांपूर्वीची ती कला अजून अमर आहे, बोलकी आहे, स्फूर्तिपद आहे. चंदेल राजांनी या अमर कलाकृती-साठी सुमारे शंभर वर्षे पैसा, वेळ आणि शक्ती खर्च केली आणि भारतातील या शिल्पकलेला जगश्रेष्ठ बनविली. परदेशी प्रवासी या कलाकृती पाहून आश्चर्यचकित होतात, रसिक बेभान होतात आणि अरसिक नाके मुरडून, तोंड फिरवून आपल्या मूढपणाचे प्रदर्शन करतात. अजिंठ्याच्या चित्रकलेला आणि वेरूळच्या शिल्प-कलेला जगात तोड नाही असे परदेशी प्रवासी स्वतः कबूल करतात. त्यांना या कलेत अश्लील काही दिसत नाही किंवा कामकलेच्या प्रदर्शनाची शंकाही येत नाही. प्रेमातुर युगुलांचे आलिंगन ही प्रकृतीची प्रतिकृती असल्याने त्यात 'अश्लील, अश्लील' असे काव काव करण्यासारखे काही नाही. देवं आणि देवींचे प्रेमा-लिंगन हे अत्युच्च प्रेमाचे, प्रकृती–परमेश्वराच्या एकात्मतेचे प्रतीक असल्याने त्यात संस्कृती बुडाल्याचा कोलाहल करण्याचे काही एक कारण नाही. तथापि, आमच्याकडे तथाकथित संस्कृति-संरक्षकांना यापेक्षा दुसरा कोणता चांगला उद्योग नसल्याने त्यांनी आता अत्युत्तम शिल्पकलेला बदनाम करण्याचा धंदा सुरू केला आहे.

प्रसिद्ध रोमन शिल्पकार बर्नेनी यांनी तयार केलेले संगमरवरी पुतळे पाहिले, की अमेरिकन प्रवाशांच्या तोंडून 'किती सुंदर' असे उद्‌गार बाहेर

पडतात. बर्नेनीची कला तशी आहेच उत्तम. तथापि त्याच्या पुतळ्यांची 'खजुराहो' किंवा कैलासच्या शिल्पकलेशी तुलना केली तर रोमच्या बर्नेनीला अजून फार शिकायचे होते असेच म्हणावे लागेल. रोमन सौंदर्यवती, रोमन योद्धे यांचे सुबक आणि भावपूर्ण पुतळे बनविणाऱ्या बर्नेनीला त्या पुतळ्यांतून काव्य काही निर्माण करता आले नाही. आमच्या भारतीय शिल्पकारांनी मात्र पत्थरातून बोल काढले आहेत, त्यांना गायला-नाचायला लावले आहे. नटराजाच्या नृत्याच्या विविध हालचाली पाहताना आपण दगड पाहात नसून प्रत्यक्ष नटराजाला नाचताना पाहात आहोत असेच वाटते. सबंध रामायण आणि महाभारत दगडात कोरून ते बोलके व अमर करण्यात कलावंतांनी यश मिळविले आहे.

नेपल्सजवळील पॉंपीच्या आसमंतात अजूनही काही जुन्या इमारती, जुन्या स्मृती पडीक स्थितीत उभ्या आहेत. या अवशेषांवर त्या वेळच्या राजे-रजवाड्यांच्या, अमीर-उमरावांच्या प्रणयाची जी चित्रे रंगविली आहेत ती पाहिली की, कला आणि प्रेम, विलास आणि भोग यांचा संयोग करून पॉंपीच्या राजांनी भविष्यकाळाला दिलेल्या देणगीची कल्पना येऊ शकते. यातील काही भाग अजूनही पाहता येतो तर काही भाग काही जणांना पाहाण्यास मनाई असते. त्या कामकलेची खजुराहो किंवा कैलासातील कामकलेशी तुलनाच होऊ शकत नाही. हिंदू शिल्पकारांच्या दृष्टीपुढे शिल्पकलेला बोलकी करण्याचे उद्दिष्ट होते आणि ते त्यांनी वेगवेगळ्या स्वरूपात साकार करून एक महाकाव्य निर्माण केले आहे. ती दगडात कोरलेली चित्रे पाहाताना आपण चित्रे पाहात नसून प्रत्यक्ष आकृती, कृती आणि प्रकृती पाहात असून तिची परमात्म्याशी एकरूप होण्याची धडपडही पाहात असतो. अशा या कलेचे कौतुक करण्याऐवजी विडंबन करणारे नतद्रष्ट विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबईत पुढे यावेत हे महदाश्चर्य होय !

वात्सायनाच्या कामसूत्रातील विविध कामकलांना खजुराहो शिल्पात साकार करून त्या कलेचा आस्वाद कसा घ्यावा, हे बघणाऱ्यांना शिल्पकारांनी स्पष्टपणे—स्वच्छपणे दाखवून दिले आहे. कामाबाबतच्या गैरसमजुती किंवा गैरकल्पना घालवून द्याव्यात, ती एक श्रेष्ठ कला आहे आणि माणसाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहे हे मनावर बिंबवावे म्हणून हिंदु शिल्पशास्त्रज्ञांनी या कलेला गौण न मानता तिला लेण्यांमध्ये आणि मंदिरांच्या गोपुरांमध्ये स्थान दिले आहे. प्रेमिकांच्या प्रेमाला कोठलेही बंधन न घालता त्यांच्या मीलनाला उच्च स्थान देण्याची कल्पना प्राचीन प्रथांशी सुसंगत अशीच आहे. कामदेवाच्या पूजक जातीजमाती अजूनही देशात आहेत. मानवांच्या या रूढींना, रीतिरिवाजांना कोणी अश्लील म्हणत नाही. अंगावर नावापुरते झिरझिरीत किमान कपडे घालून रस्त्याने हिंड-

णाऱ्या युवतींना पाहून कोणी संस्कृती बुडाल्याचा आक्रोश करीत नाही. मग शिल्पातील कलेला आणि काव्याला विरोध दर्शवून संस्कृतीच्या नांवाने ऊर बडवि-ण्याचे प्रयोजन काय ?

कैलास लेण्यातील गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या त्या तीन मूर्ती पाहिल्या-वर शिल्पकाराने त्यांच्या वयोमानाप्रमाणे त्यांचे दाखविलेले शरीरसौष्ठव आणि त्या तीन पवित्र नद्यांच्या मागची प्रेरणा ऐकल्यावर मनुष्य मंत्रमुग्ध होऊन जातो. तेथील गाईड परदेशी प्रवाशांना जेव्हा त्या मूर्तींचे वर्णन आणि त्यामागील भाव-नांचे स्पष्टीकरण करून सांगतो तेव्हा ते प्रवासी हिंदु-शिल्पकलेने भारून गेल्यासारखे दिसतात. तीच गोष्ट खजुराहो मंदिरावरील शिल्पांची. त्या शिल्पांतील कला, काव्य आणि भावना समजावून घेतली, की दृश्यस्वरूपातले ते चित्र अगदी वेगळे दिसू लागते आणि हिंदु तत्त्वज्ञानाच्या परिचयाने माणसाच्या चेहऱ्यावर समाधान दिसू लागते. ज्यांची दृष्टी स्वच्छ, बुद्धी शीघ्र आणि विचार उच्च त्यांना त्या मूर्तींत काही ओंगळ किंवा गलिच्छ दिसू शकत नाही. त्यांत सत्यम्-शिवम्-सुंदरम् मंगल दिसते. प्रेमाचे ते उत्कट क्षण ही जीव-शिवाची भेट वाटते किंवा आत्म्याचे परमात्म्याशी तादात्म्य दिसू लागते किंवा प्रकृती परमेश्वराशी एकरूप झाल्याचे भासते. खजुराहोच्या शिल्पात या हिंदु तत्त्वज्ञानाबरोबर हिंदूंची कामकलाही कोरून ठेवलेली आहे आणि ती माणसाच्या जीवनाशी रोजची संबंधित असल्याने तीत घाण वा ओंगळ वाटण्यासारखे काहीही नाही. जे मुंबईकर स्ट्रीपटीज, बिकिनीज, कॅन कॅनसाठी जीव टाकतात, चोरून चोरटे चावट चित्रपट पहातात, त्यांनी 'खजुराहो'च्या शिल्पकलेला आक्षेप घ्यावा आणि पोलिसांनीही त्यांच्या या वाव-दुकपणाची गंभीरपणे दखल घ्यावी, ही घटना मोठी खेदजनक म्हटली पाहिजे. 'चित्रलेखा'तील अजिंठ्याच्या लावण्यवती किंवा 'गीत गाया पत्थरोंने' मधील कैलासच्या त्या रूपवती पाहिल्यावर भारतीय शिल्पाबद्दल, हिंदु-शिल्पाबद्दल, बौद्ध शिल्पाबद्दल अभिमानाने मान ताठ होते आणि दगडातून काव्य निर्माण करणाऱ्या त्या थोर कलावंतांच्या स्मृतीने मस्तक आपोआप लवते. शांतारामबापूंनी आम्हा हे अनमोल वैभव चित्रपटाच्या रूपाने जगापुढे सादर केले याबद्दल त्यांना धन्यवाद ! मध्यवर्ती सरकारने 'खजुराहो' चा जसा अनुबोधपट काढला आहे तसाच अजिंठा, वेरूळ आदि शिल्पांचा छोटा चित्रपट काढून आमची शिल्प-कला सर्वांना दाखवावी व तिचे रसग्रहण करण्यास शिकवावे अशी नम्र सूचना या निमित्ताने करावीशी वाटते.

• • •

– ६ –

# तोचि दिवाळी-दसरा ! :१:

अगदी परवाची गोष्ट. दसऱ्याचा दिवस होता. तो सणाचा, गोडधोड करून खाण्याचा तर दिवस होताच पण शुभमुहूर्तांचा आणि उद्‌घाटनादी चांगल्या कार्यांचाही दिवस होता. 'दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा' ही लहानपणी शाळेत पाठ केलेली कविता तर दसऱ्याला आठवल्याशिवाय रहात नाही. सकाळी शस्त्रास्त्रांचे पूजन, यंत्रांचे पूजन आणि सायंकाळी शिलंगण आणि सोने लुटण्याची मौज. घरांच्या दारांना, दुकानांच्या पाट्यांना आणि सायकली-मोटारींना झेंडूच्या फुलांच्या माळाच माळा सगळीकडे दिसायच्या. खेड्यांत सोने लुटून सायंकाळी मोरू घरी परत येतो आणि बहीण काशी दारांत येऊन त्याला ओवाळते. शिलंगणाला गावाबाहेर जाताना तिळाच्या पिवळ्या जर्द फुलांनी फुललेली शेते बाजरीच्या डोलणाऱ्या ताटांनी भरलेली शेते आणि ज्वारीची पेर उगवून हिरवीगार झालेली वावरे पाहून खूष झालेला मोरू बहिणीला सोन्याची ओवाळणी टाकू लागत असता तिला केवढा तरी आनंद होत असेल. हे भाग्य आम्हा शहरी मंडळींच्या नाही वाट्याला येत ! शहरांत नाही शिलंगण की नाही तिळाची पिवळी फुले. जरीची टोपी घातलेला मोरू नाही पहायला मिळत, की परकर–चोळी घातलेली काशीही

नाही दिसत. पुण्यासारख्या ठिकाणी सकाळी रस्त्यावर दिसते संघाचे संचलन आणि सायंकाळी दुकानादुकानातून वाढदिवसाचे वादन. येथे नाहीत शमीची झाडे की त्या झाडावर जपून ठेवलेली शस्त्रे. घरोघरच्या तलवारी गेल्या, बरची–भाले गेले. फार झाले तर खेड्यात आहेत कोयते–कुऱ्हाडी आणि शहरात आहेत काटे-सुऱ्या. घोड्यांना फुलांची माळ घालण्याऐवजी जुन्या सायकलीला धुवूनपुसून घालायची दोन आण्यांची झेंडूच्या फुलाची माळ. कारण तेच रोजचे वाहन आणि दैनंदिन जीवनाचे आधारस्थान !

नवरात्राचे नऊ दिवस उपवासात गेले, की दहाव्या दिवशी देवीची पूजा करून तिला मद्य–मांसाचा नैवेद्य दाखवायचा आणि तो ग्रहण करायचा अशी प्रथा कित्येक घरात पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. शक्तिपूजकाचे घरी तर हे दृश्य पहावयास मिळतेच, पण त्याचबरोबर महाराष्ट्रात भवानीमाता ज्यांची कुलस्वामिनी आहे त्यांच्यापैकी काहींच्या घरीही दसऱ्याला देवीचे नैवेद्यात मद्य-मांस पहावयास मिळते. मोरारजीभाईंनी देवा–धर्माचा, पूजा-अर्चेचा आणि नैवेद्याचा विचार न करता मद्यबंदी केली असल्याने अलीकडे अनेकांची कुचंबणा होते हे खरे. दसऱ्याला बोकड किंवा बकरे तुटते पण तीर्थाला सोमरस काही उपलब्ध होऊ शकत नाही. लष्करात मोठ्या हुद्यावर असलेले माझे मेहुणे दसऱ्याच्या दिवशी मला आग्रहाने म्हणायचे, 'अरे, मुंडी आणि मोसंबीशिवाय दसरा साजरा नाही होत. लढवय्यांनी शक्तीची पूजा करायची म्हणजे त्या देवीला प्रसन्न करण्यासाठी तिचा आवडता प्रसाद व तीर्थ ग्रहण करायचा असते. तू तर मुंडी खात नाहीस आणि मोसंबीही घेत नाहीस, कसा शूर होणार ! " तेवीस वर्षांपूर्वी मी कॉलेजात असतानाची ही गोष्ट. यू. टी. सी. ची ( पूर्वीची एन्. सी. सी. ) रविवारची सकाळची परेड संपली की मी तसाच युनिफॉर्ममध्ये सायकलीवरून खडकीला जात असे आणि बहिणीकडे जेवून दुपारी पुण्याला परतत असे. त्या वेळेपर्यंत मी मांसाहार केलेला नव्हता, तर मद्याची गोष्टच सोडा. क्षेत्राच्या ठिकाणी जन्मलेलो आणि वारकरी संप्रदायात वाढलेलो असल्याने मला मांसाशन गैर वाटे. तथापि. यू. टी. सी. तील दोन वर्षांत माझ्या मित्रांनी मला तयार केले आणि मग हळूहळू मी मेहुण्यांच्या पंक्तीला मांसाहार करू लागलो. बहिणीने मात्र मांसाशन न करण्याचा नेम अखेर-पर्यंत पाळला व सर्वांकडून वाहवा करून घेतली. ती घरात मांसाहारातील सारे पदार्थ तयार करून देई, पण स्वतः अन्न म्हणून त्या पदार्थांना हात लावीत नसे. पुरुष आणि स्त्रीच्या निग्रहातील हा मोठा फरक मला तेव्हा समजला व बहिणीच्या पायावर डोके ठेवून तिच्या मनोनिग्रहाचे कौतुक केले. दसरा आला, की मला माझ्या दिवंगत मेव्हण्याची अजूनही आठवण होते आणि त्यांचे ते 'मुंडी व मोसंबी' हे शब्द कानात नकळत ऐकू येतात.

परवा दसऱ्याच्या दिवशी गुरुवार आल्याने घरात काही मुंडी येऊ नाही शकली. श्रीखंडावर भागवावे लागले. अगदीच आळणी बेत झाला. श्रीखंडाच्या सिमेंटचे पोटात प्लॅस्टर झाले, की तो दिवस अगदी आळसात गेलाच समजायचा. पुणे आणि श्रीखंड याची ख्याती भारतभर तर आहेच पण आता युरोप-अमेरिकेपर्यंत ती पोहचली आहे. इंग्रज किंवा अमेरिकन पाहुणा श्रीखंड आवडीने खातो आणि वर आमटीचा भुरका मारतो. त्याला कांद्याची भजी आवडतात आणि वटाण्याची भाजी तो आवडीने खातो. दिल्लीच्या 'मोती-महाल'ची कोंबडी जशी विमानाने रोज न्यूयॉर्कला जाते, तद्वतच मुंबईच्या 'आसू' चे श्रीखंड रोज लंडनला रवाना होते. या श्रीखंडाचे चहाते माझे मित्र प्राचार्य मंगूडकरांना जेवायला बोलावून मी या वर्षीचा दसरा सण साजरा करायचे ठरविले. तथापि त्या दिवशीचा योग लहानसहान नव्हता. प्राचार्यांच्या बरोबर प्रसिद्ध लेखक—साहित्यिक श्री. शंकरराव खरात हेही पंक्तीला लाभले. शंकरराव सहज भेटायला म्हणून आले आणि मी त्यांना आग्रहाने जेवायला थांबून ठेवले. शंकरराव म्हणजे सालस—सत्प्रवृत्त माणूस. कोणाच्या डोळ्यांत कधी खुपायचा नाही. आपले काम, आपले लिखाण आणि आपले विचार बरे आणि आपण बरे ही त्यांची वृत्ती. नम्रता आणि विनयाचा आदर्श. अनाहूत पाहुणा जेवायला नको म्हणून त्यांनी टाळण्याचो शिकस्त केली. पण मी म्हटले, "शंकरराव, साधु—संत येती घरा तोचि दिवाळी-दसरा" असे संत तुकोबारायांनी आम्हांला शिकविले आहे. आज तुम्ही आणि प्राचार्य जेवायला आलात हाच माझा खरा दसरा—हाच खरा आनंद. आणि खरेच हे दोन साधुसंत त्या दिवशी मनापासून आनंदाने जेवले आणि त्यांच्याबरोबर मीही तृप्त झालो. माझी फार दिवसांची इच्छा सफल झाली. पुण्यातील तीस वर्षांच्या वास्तव्यात मी हरिजन मित्रांच्या आणि कार्यकर्त्यांच्या घरी बऱ्याच वेळा जेवलो होतो. पण हरिजन ( नवबौद्ध ) माझ्या घरी, टेबलावर ताटाला ताट लावून जेवण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. पत्नीने आस्थापूर्वक-आग्रहाने आम्हांला वाढले आणि शंकररावाचे तोंडून 'धन्यवाद' उद्‌गार बाहेर पडले.

जेवताना मला बत्तीस-तेहतीस वर्षांपूर्वीची आठवण झाली. १९३०-३२ चा काळ असेल तो. मी गांवी प्राथमिक शाळेत असतांना स्पृश्यांची ( सवर्ण हिंदु ) शाळा वेगळी आणि अस्पृश्यांची शाळा वेगळी असे. गावात एक शाळा आणि महारवाड्यात दुसरी शाळा. आमची शाळा मारुतीच्या देवळात तर अस्पृश्यांची त्यांनी स्वतः श्रमाने बांधलेल्या छोट्या इमारतीत भरत असे. अस्पृश्यांची सावली पडू द्यायची नाही तेथे अस्पृश्य मुलांच्या मांडीला मांडी लावून बसण्याची कल्पनाच शक्य नव्हती. पुढे सरकारने वेगळ्या शाळा रद्द केल्या आणि अस्पृश्यांना स्पृश्यांच्या शाळेत घेण्याची सक्ती केली. तथापि, मारुतीच्या देवळात भरणाऱ्या

शाळेत अस्पृश्य मुले बसणार कशी? शिक्षकांनी मुलांचा बसायचा क्रम लावून देऊन हरिजन देवळाच्या दूरच्या कोपऱ्यात बसतील अशी व्यवस्था केली. पहिल्या जागा ब्राह्मणांना, दुसऱ्या मराठ्यांना, तिसऱ्या सोनार-कासार-तेली तांबोळी आदी जातींना आणि शेवटी उरलेल्या हरिजन मुलांना देण्यात येत असत. तथापि बसण्याच्या जागेवर हुषारी अवलंबून नसलेने शेवटी बसविला जाणारा शंकर चव्हाण किंवा मारुती गायकवाड या महार मुलांचा नंबर ब्राह्मण-मराठ्यांच्या मुलाच्या वर यायचा व शिक्षकांची मोठी पंचायत व्हायची. पुढे पुढे हरिजन मास्तराची शाळेत नेमणूक होऊन सवर्ण हिंदूतील उच्चवर्णीयांना त्यांच्या छड्या बसू लागल्या. शिक्षणक्षेत्रात हा बदल हळूहळू घडत होता, पण सामाजिक-आर्थिक क्षेत्रात हरिजनांची पिळवणूक चालूच होती. इनामदार आणि पाटलाच्या घरी लाकडे फोडणारा मारुती महार अर्धपोटीच रहात असे. त्याची लाकडे चालत पण त्याला ओटीवर बसवून पोटभर भाकरी दिली जात असे.

अशा त्या काळात मी माझा वर्गमित्र शंकर चव्हाण याच्या घरी महारवाड्यात जात असे, तेव्हा ब्रह्मवृंद आणि मराठेमंडळीत खळबळ उडून कुजबुज चालत असे. आमच्या घरी 'महार' गडी माझ्या लहानपणापासून असे आणि तो कित्येक वेळा मला शाळेत पोहोचवीत असे. त्यामुळे स्पृश्यास्पृश्यतेच्या कल्पनांचा 'पगडा' माझेवर बसू शकलेला नव्हता. गावातील शाळेत जायचा माझा रस्ता महारवाड्यातूनच असे आणि जाता जाता कोणी बोलावले तर मी त्याच्या घरी जाऊन थोडा वेळ टेकत असे. पुढे जेव्हा सहभोजनाचे कार्यक्रम घडू लागले तेव्हा तर त्यात भाग घेतल्याबद्दल आम्हांला वाळीत टाकण्यापर्यंत गावातील प्रतिष्ठित हिंदूंची मजल गेली. "महाराच्या घरी जाऊन धर्म बुडविणारे हे पहा नास्तिक" असे म्हणून हेटाळणी केली जात असे. "देवाची सर्व लेकरे सारखी, विठोबाला चोखा, अजामेळ, नामदेव-एकनाथ-तुकाराम सारखे" असे एकीकडे म्हणायचे आणि उच्च-नीचतेच्या कल्पनांनुसार अस्पृश्यांचा छळ करायचा हे मला लहानपण[illegible] पासून खटकत असे. आणि म्हणूनच मी हरिजनांच्या जवळ जेवढे जाता ये[illegible] त्यांच्यात मिसळता येईल, त्यांना बरोबरीने वागवता येईल, नव्हे रोटी व्य[illegible] हाराने भावनिक एकात्मता जेवढी साधता येईल तेवढा साधण्याचा प्रयत्न करीत आलो आहे.

चोखा मेळ्याला विठोबाच्या मंदिरात नाही येऊ दिले म्हणून त्याने काही पांडुरंगाची भक्ती थांबविली नाही. देवाजवळ महार-मांग-कुंभार-माळी-न्हावी-शिंपी असा भेदभाव नव्हता. विठोबाच्या भक्तात साऱ्या जाती-जमातींचे संत होते. हा संतांचा मेळा जेव्हा पंढरपुरी जमत असे तेव्हा पांडुरंगाला प्रेमाचे केवढे

भरते येत असे. देव देवळातून केव्हा निघून भक्ताकडे जायचे ते समजत नसे. आता मात्र देव राउळातच असले तरी त्याच्या भक्तांना काही देवाच्या पायापर्यंत जाऊ दिले जात नाही. नवरात्रात पंढरीला जायचा योग आला तेव्हा पांडुरंगाच्या दर्शनासाठी भक्तिभावाने देवळात जाऊन उभा ठाकलो. तेथे ही गर्दी ! लांबलचक रांग, एका बडव्याने ओळखले आणि आत नेले. पंढरीरायाच्या पायावर डोके ठेवून चरण चुरावे म्हणून खाली वाकलो तो 'दक्षिणा ठेवा' असा वरून हुकूम झाला. एक रुपाया ठेवला तर दुसऱ्याची मागणी झाली. मी पुजाऱ्याकडे पहातच राहिलो. 'येथे इच्छेचा प्रश्न नसून सक्तीचा मामला आहे' असे दिसले तेव्हा वाईट वाटले. बडवे आणि पुजारी यांचे संबंध काय आणि त्यांची पैशाची वांटणी कशी याचेशी कर्तव्य नसल्याने मी कष्टीमनाने बाहेर पडलो. पंढरपूरच्या या ख्यातीत अजूनहि फरक पडू नये व भाविकांच्या भक्तीतून पैसे असे उकळले जावे याचे वाईट वाटले. देवाची सेवा कमी पण प्राप्ती अधिक, अशी स्थिति पाहिल्यावर देवा-धर्माचे या देशात काय होणार याची चिंता वाटल्यावाचून राहिली नाही. ज्या देवळात स्वच्छता नाही, शांतता नाही, स्वास्थ्य व समाधान नाही ते देऊळ कसले ? या देवळातील देवाशी भाविक लोक हितगुज करतात कसे व देवाचा त्यांना अनुग्रह होणार कसा ? शेकडो मैल अंतरावरून भाविकांनी पंढरीला जावे आणि देवळात पाऊल टाकल्यावर त्याना तेथील एकूण वातावरणाचा उबग यावा हे काही ठीक नाही. मुस्लीमांच्या मशिदीत आणि खिश्चनांच्या चर्चमध्ये जेवढी स्वच्छता, शांतता आणि भाविकता दिसून येते त्या मानाने आमच्या मंदिरात या गोष्टीची कितीतरी कमतरता आढळून येते. बाहेरील भिकाऱ्यापासून आंतील पुजाऱ्यापर्यंत साऱ्याकडून अडवणूक आणि भोवतालच्या दुकानदाराकडून फसवणूक. सारेजण धंद्यासाठी बसलेले व गिऱ्हाईकांना हातोहात बनविणारे.

तुळजाभवानीचे दर्शन घ्यावे म्हणून गेल्या मंगळवारी पंढरीहून तुळजापूरला गेलो. देवीच्या देवळाची रचना, व्यवस्था, टापटीप आवडली. जगदंबेची मूर्ति पाहून समाधान वाटले. दही-दुधाचे स्नान चालू असतानाच दर्शनाची संधी मिळाली. जगन्मातेच्या पायावर डोके ठेवले आणि म्हटले, "माते, सारे अमंगळ नाहीसे करून सर्वत्र मंगलमय आनंददायी वातावरण निर्माण कर. भारताला भाग्याचे दिवस आणून माझा महाराष्ट्र मोठा कर. माझ्या हातून महाराष्ट्राची—देशाची आणि देशातील अज्ञ-गरीब-मागास जनतेची सेवा घडू दे." छत्रपति शिवाजी महाराज याच भवानी मातेकडून आशीर्वाद मागत आणि आपल्या कार्यात यशस्वी होत. देवळाची भौगोलिक रचना आणि महाराजांचा देवळात येण्या-जाण्याचा रस्ता पाहिल्यावर महाराजांच्या कल्पकतेचे कौतुक वाटून देवीच्या दयेचा अभिमान वाटला. देवीच्या पूजेसाठी सामान भक्तिभावाने विकत घेतले पण

त्यातील नारळ पाणी नसलेला, वाळून गेलेला, केळी, सुपाऱ्या व खारका माणसाने हातात न धरण्याजोग्या अशा होत्या. ह्या का वस्तू देवीला वहायच्या म्हणून संभ्रमात पडलो. पण विचाराला वेळ नव्हता. मातेची क्षमा मागून म्हटले की, भगवती ! गोड मानून घ्या आणि दुकानदाराना सद्‌बुद्धि द्या. देवाच्या सान्निध्यातही लबाडी करण्यास लोक धजावेत याचे आश्चर्य वाटले आणि जेजुरीच्या खंडोबाची आठवण झाली. खंडोबाच्या अंगावरील सोन्या–नाण्यांची चोरी होऊन चोर सुरक्षित राहतात, नव्हे संपन्न होतात ते कोडे काही उलगडू शकले नाही.

सदाचार आणि सुविचाराची पेरणी केल्याशिवाय समाज सुधारणार नाही. पण त्यासाठी नव्या पिढीपासून सुरुवात करायला हवी. विद्यार्थ्यांना चारित्र्याचे, निष्ठेचे-प्रामाणिकपणाचे श्रद्धेचे शिक्षण द्यायला हवे. प्राचार्य मंगुडकरांच्या शैक्षणिक विचारात अशा प्रकारच्या शिक्षणावर भर असल्याचे मला ठाऊक असल्याने मी त्याना नेहमी म्हणतो काय डॉक्टर, तुमचे ‘ लिबरल एज्युकेशन ’ काय म्हणते ! दसऱ्याचे दिवशी जेवताना शिक्षणाचा प्रश्न मी सहज काढला होता पण त्याला खरातांनी कलाटणी देऊन प्रचलित राजकारणाकडे चर्चेची गाडी वळवली आणि मग चर्चेच्या ओघात जेवण किती जेवलो याचे भान नाही राहिले. संतप्रवृत्तीच्या या दोन व्यक्तींच्या सहवासात गेलेल्या दसऱ्याने मला खराखुरा आनंद उपभोगायला मिळाला आणि ‘ साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा ’ या अभंगाची प्रचीति आली.

● ● ●

## “ पोळी नाही, भाकरी खा ! ” : २ :

“ मी नाही भाकरी खाणार, मला पोळी हवी ” असे आईला निक्षून सांगणाऱ्या छोट्या अंजूची समजूत घालणे तिच्या आईला अशक्य झाले म्हणून तिने मदतीसाठी माझ्याकडे बघितले. मी तरी त्या पाच-सहा वर्षांच्या मुलीला काय सांगणार ! तिच्यापेक्षा थोरली ताई आणि थोरला भाई भाकरी मुकाट्याने खातात म्हणून तूही बेटी भाकरी खा, खाली पाहिजेस एवढेच सांगण्याची सोय होती. त्या बालिकेला अन्नधान्य, महागाई आणि टंचाई काय कळणार !

गेल्या काही दिवसांत घरात खाण्या-पिण्यावर नाईलाजाने काही बंधने घालावी लागली असून त्याचा परिणाम मुलांच्या मनमोकळेपणावर व आनंदी

स्वभावावर झाल्याशिवाय राहिलेला नाही. " आम्हांला अमूक नको, तमूक नको, आम्ही उपाशी राहू " असे मुले सांगू लागली, की आईचा जीव तिळतिळ तुटायला लागतो. महाग गव्हाचे पीठ पोळीसाठी ( चपाती ) मळल्यावर त्याला तेल कोठून लावायचे आणि त्या पोळीवर तूप कोठून वाढायचे असा प्रश्न प्रत्येक गरीब आणि मध्यमवर्गीय आयांपुढे उभा आहे. दूध महागले, साखर महागली, चहा महागला, धान्य महागले आणि भाजीपाला पण महागला. फळांचे तर नाव काढायला नको. केळी हे गरिबांचे फळ पण तेही कितीतरी महाग झाले आहे. डझनाला बारा-चौदा आणे कोठून द्यावयाचे ! घरमालकीण रोज त्रासून जाते आणि घरमालक सायंकाळी कामावरून घरी आला, की त्याच्याशी अबोला धरते. नाहीतरी ती रागावणार कोणावर ? मुले काही ऐकून घेण्याच्या तयारीत नसतात. त्यांना महाग होत चाललेल्या संसाराचे तत्त्वज्ञान ऐकायला फुरसद नसते व फिकीरही नसते.

" घरात जरा लक्ष द्या. दिवसभर तुम्ही बाहेर असता आणि घरात मुले मांझी हाडे काढतात. कोठून आणायचे त्यांना चांगले खायला ? महिन्याचा मर्यादित पगार आणि त्याला शंभर वाटा. घरचे भागवायचे थोडे होते आणि त्यात पाव्हण्या-रावळ्यांचा बोजा येऊन पडतो. हा संसार अगदी नको झाला आहे. तुम्ही सांभाळा हे घर आणि मुले, मी जाते थोडे दिवस कुठेतरी यात्रेला. " असे वैतागून म्हणणारी गृहलक्ष्मी पुढे आली, की तिच्या तोफेचा मारा मुकाट्याने सहन करावा लागतो. कारण संसारात कधी लक्ष घातलेले नाही आणि त्यामुळे ज्वारी-तांदूळ-गव्हापासून तो भाजी-दुधापर्यंतचे भाव कधी ठाऊक नाहीत. सकाळी उठायचे आणि दोन कप गरम चहा घशाखाली घालायचा. आंघोळ वगैरे उरकून ऑफिसला जाताना पुन्हा एक कप रिकामा करायचा. दुपारी एकला पानावर येऊन बसायचे आणि तीनला घर सोडले, की रात्रौ ९॥ ला पुन्हा जेवणाचे पान आहेच पुढे. जेवल्यावर रात्री थोडे वाचले की झोप. कोठे येतो संसारातील दैनंदिन जबाबदाऱ्यांचा संबंध. असे हे कित्येक वर्षे चालले आहे. अजिबात वेळ मिळत नाही म्हणून सारे काही पत्नीवर ढकलायचे व तुटपुंज्या पगारात महिना भागविण्याचे दिव्य तिला करायला लावायचे. एवढेच नव्हे तर अंगाला लावायचा साबण, डोक्याला लावायचे तेल, ब्लेड व ब्रश, रुमाल, अंडरवेअर आदी आपल्या वस्तू तिला बाजारातून आणायला लावायच्या. मग ती गृहलक्ष्मी चिडणार नाही तर काय करणार ?

माझे मित्रमंडळ मोठे म्हणून माझ्याकडे लोकांची वर्दळही अधिक. रोज किती कप चहा होत असेल याची मोजदाद नसते. साखर दुर्मिळ व महाग,

आणि दुधानेही महर्गतेचा उच्चांक गाठलेला. याची मला जाणीव रहात नसल्याने मी आपला कोणी आले की, ऐटीत हुकूम सोडतो, "तीन-चार कप चहा करा बरे." शेवटी परवा पत्नीने स्वच्छ सांगितले की, मित्रमंडळींचा चहा शेजारच्या 'जीवन'मध्ये. पाहुणा आला तरच घरात चहा. साखर-चहा, दुधाचा काही विचार करता का? रोज दोन रुपयांचे दूध कोठून आणायचे? दुधाचा भाव १ रु. ४ आणे झाला आहे. साखर १ रु. ३० पैसे झाली आहे आणि चहा ८ रु. किलोवर गेला आहे. त्यावर मी पत्नीला म्हटले, "अहो, कपबशांचा आकार लहान ठेवा, अर्धाच कप भरून देत जा, पण चहाला नाही म्हणू नका. त्या नानासाहेबांकडे आम्हांला छोट्या कपात अर्धा कप कमी गोड चहा मिळतो. तुम्ही करा की तसे." त्यावर सौ. म्हणते, "मला नाही ते जमायचे. आयुष्यभर जो आवरता हात जमला नाही तो आता कसा जमणार? आणि तुम्ही कुठे कुठे काटकसर करायला लावणार. वाण्याचे बिल किती झाले आहे याची कल्पना आहे का? शंभराचे दोनशेवर गेले असून पुढील महिन्यात अडीचशेवर जाण्याची शक्यता आहे. गोडतेल ३॥ रु. शेर, खोबरेल तेल ३॥ रु. शेर, गहू १॥ रु. शेर, तांदूळ १॥ रु. शेर, ज्वारी एक रुपया शेर, लोणी ७॥ रु. शेर, चहा ८ रु. शेर झाला आहे. खोबरे, साबुदाणा, शेंगदाणा, सावणाचे भाव पण वाढले आहेत. काय घ्यायचे आणि काय खायचे! आता गुरुवारी साबुदाण्याची खिचडी खायचे बंद व रोजचे शेंगदाणे चावायचेही बंद. दर महिन्याला वाढत चाललेला प्रपंचाचा खर्च अंदाजपत्रकात बसेनासा झाला आहे. उत्पन्नात वाढ शक्य नसल्याने काटकसरीचाच मार्ग अवलंबिण्याचा प्रयत्न करू या."

माझ्या घरचा न आवरणारा खर्च पाहिला, की मला चार घरी धुणे-भांडी करणारी मोलकरीण, वाडा झाडून स्वच्छ करायला येणारी महारीण, रद्दीसाठी दारोदार हिंडणारा रद्दीवाला, भीक मागायला येणारा वासुदेव, कचेरीत टाईप जुळविणारा कंपॉझिटर, घंटीबरोबर आत-बाहेर करणारा ऑफिसचा शिपाई, सकाळी वृत्तपत्रे विकणारा माणूस यांचा संसार कसा चालत असेल याचे कोडे पडते. आजच्या महागाईच्या दिवसात शे-पाऊणशे किंवा दीड-दोनशे रुपयांत संसार कसा चालायचा? मुलांचे खाणे-पिणे व शिक्षण यांत कोण कशी काटकसर करणार? एखाद्याच्या घरी चपाती तर दुसऱ्याच्या घरी भाकरी. एकाच्या घरी दोन भाज्या तर दुसऱ्याच्या घरी तेलाशिवाय कोरडी भाजी. तरीही रोज घर कसे चालवावयाचे ही दोघांचीही विवंचना. शेतकऱ्याच्या शेतात दाणे पिकूनही त्याच्या घरात शेरभर ज्वारी नसावी आणि गोठ्याला चार जनावरे असताना कपभर दूध नसावे अशी स्थिती झाली आहे. जनावर आहे, पण वैरण नाही आणि वैरण आहे तर पैशाला महाग झाल्याची स्थिती. किंमती

सारख्या वाढत आहेत आणि कामगार--नोकरवर्ग दिवसेंदिवस हैराण बनत आहे. मध्यमवर्गीयांना पत्नीच्या हाती पगार देऊन आपण मोकळे झाल्याचे समाधान पगाराच्या दिवशी तेवढे मिळत असले तरी सबंध महिनाभर बोलणी खाण्याची तयारी ठेवावी लागते. अर्थमंत्री कृष्णम्माचारींना देशाचे अंदाजपत्रक करणे सहजसुलभ जाते. तथापि पत्नीला महिन्याच्या अंदाजपत्रकात तूट न येऊ देणे तिच्या आवाक्यावाहेरचे झाले असल्याने मोठे कठीण जाते.

कृष्णम्माचारींच्या मदतीला अर्थतज्ज्ञ अधिकारी मंडळी असतात. आपल्या घरी काही कोणी अर्थतज्ज्ञ नसतो. म्हणून गृहखाते आणि अर्थखाते पत्नीकडे सोपवून मोकळे होणेच प्रत्येकाला बरे वाटते. माझी नोकरी झाली वीस वर्षे व संसार झाला पंधरा वर्षे. पण अद्याप मला घरचे अंदाजपत्रक काही शिलकी करता आले नाही. वीस वर्षांत १०० रु. पगारापासून तो ५०० पर्यंत वाटचाल केली. तथापि त्या पहिल्या वर्षी जी ओढाताण होती ती अजून कायमच आहे. दर महिन्याला पाच-पंचवीस व कधी ५०–७५ रुपये कमीच पडतात. मग किराणा दुकानदाराचे, दूधवाल्याचे, कापडवाल्याचे थोडेथोडे पैसे बाकी ठेवून महिना कसाबसा ढकलायचा. काटकसर कोठे आणि कशी करायची हेच समजत नाही. दिवस हे असे महागाईचे म्हणून मुलांचा पसाराही वाढविलेला नाही. इनमिन तीन मुले आणि नवरा-बायको अशी पाचच माणसे घरात. तथापि पत्नीच्या डायरीतील हिशेबाप्रमाणे प्रत्येकी महिना १०० रु. खर्चाचे प्रमाण. प्रत्येकावर महिना १० रु. घरभाडे, ३० रु. जेवण, १० रु. दूध-चहा, १० रु. कपडे, १० रु. फी, १० रु. करमणूक-खेळ खिशातील खर्च आदी. पाहुणा आणि डॉक्टरसाठी १० रु. असा माणशी ७५–१०० रु. खर्च पडतो. तरी मी पान-विडी-सिगरेट-तंबाखूच्या व्यसनात सापडलेलो नाही. मला आवड म्हणजे वाचायची–लिहायची, चहा-आईस्क्रीमची आणि कधी कधी पत्त्यांची. त्यात माझे दरमहा थोडे पैसे खर्च होतात. पत्नीला आवड विणायची आणि शिवायची. त्याही दरमहा १०–१५ रु. यासाठी लागतात. पण आता अलीकडे आम्ही आमच्यावर याही खर्चाचे निर्बंध लादून घेतले आहेत. कारण पोरांचे नीटनेटके पहायला नको का ?

अलीकडच्या मुलांना जुनी पुस्तके, जुन्या कंपासपेट्या, साध्या वह्या चालत नाहीत. कपडेही साधे असून भागत नाही. मुलामुलींना शाळेत गणवेष आणि बाहेर इतर वेष. मुलींच्या फॅशन्स तर विचारूच नका. कपड्याबाबत कुरबूर करायची सोय नाही. पत्नी लगेच म्हणते, “आपल्याला कुठे आहेत डझनभर मुले. एक मुलगा आणि दोन मुलींचे कपडे तरी नीट-नेटके नको का करायला.

तुम्ही आपले खादीचे चार-दोन तागे आणून शिवता नेहरू शर्ट-पायजमे. मुलांना कसे तेवढे साधे चालणार ? त्यांचे वय आहे चांगले खायचे आणि चांगले ल्यायचे." खरे असते तिचे म्हणणे, पण हे सारे जमायचे कसे ? आपण जर सांगायला गेलो, की आमच्या लहानपणी विद्यार्थीदशेत आम्ही असुक केलं, एवढे साधे राहिलो तर मुलगा म्हणतो, त्याला पंचवीस-तीस वर्षे झाली, आता तो जमाना राहिलेला नाही. ते ब्रिटिश सरकारच्या पारतंत्र्यातील दिवस होते. आता स्वातंत्र्यातील कॉंग्रेस राज्याचे दिवस आहेत. रोज वाणापासून किंमतीपर्यंत सगळा बदल. स्वराज्यात जीवनमान, राहणीचे मान नको का वाढायला ? असे बोलणाऱ्या मुलांना काय उत्तर देणार ? त्यांना जर आपण पूर्वीचे काही सांगायला गेलो तर त्यांचा विश्वास बसत नाही. मॅट्रिकच्या वर्गात गेल्यावर तुला सायकल घेऊ असा दोन वर्षांपूर्वी मुलाला वायदा केला होता. त्याची त्याने आठवण करून देताच आठ-दहा दिवसांपूर्वी त्याला सायकल घेऊन देणे भाग पडले. पण ती घेताना ३०० रु. किंमत ऐकून डोळे पांढरे होण्याची वेळ आली. मी मॅट्रिकच्या वर्गात असताना फक्त ५० रु. ला नवी सायकल घेतली होती. पण माझ्या सांगण्यावर मुलाचा विश्वास कसा बसणार ?

त्या दिवशी सायंकाळी मी तिन्ही मुलांना जवळ घेऊन बसलो आणि महागाई आणि स्वस्ताई कशाला म्हणतात हे उदाहरणांसह समजावून देऊ लागलो. मोठ्या मुलाला म्हटले, 'बेटा ! मी हायस्कूलमध्ये होतो तेव्हा मला फी नव्हती आणि शिवाय शिष्यवृत्ती मिळत होती. पुस्तकांचा आणि वह्यांचा खर्च अगदी किरकोळ असे. शाळेच्या अभ्यासिकेत जाऊन मी अभ्यास करायचो. म्हणजे पुस्तकांचा बराच खर्च वाचे. त्या वेळी १०–१२ आण्यांना आयता शिवलेला शर्ट विकत मिळे आणि १॥–२ रुपयांना कोट मिळे. हाफ पॅंट मिळायची १२–१४ आण्यांना. म्हणजे कपड्यांचा एक सेट ५ रुपयांच्या आत होत असे. वर्षाला तीन सेट म्हणजे १२–१५ रुपये लागत. आता मुलाची एक पॅंट २५ रुपयांच्या खाली बसत नाही. टेरिलीनच्या शर्टला २०–२५ रु[illegible] पडतात. म्हणजे किमती व शिलाईचे दर दसपट-पाचपट झाले आहेत. जपा[illegible] हरक पूर्वी ३ आणे वाराने मिळत असे. धोतरजोडीला ४-५ रुपये पडत. आता साधे पांढरे कापड २–२॥ रुपये व धोतरजोडी २०–२२ रुपये झाली आहे. मधल्या सुट्टीत आम्हांला १ पैशात चहा, १ पैशात भजी किंवा शेवचिवडा मिळत असे. अप्पा बळवंत चौकातील 'चॅलेंज टी हाऊस' म्हणजे १ पैशात वस्तूंचे हॉटेल. नू. म. वि. शाळेच्या शेजारचे 'संतोष भुवन' देखील १ आण्यात चहा व मिसळ देत असे. आता एक सिंगल चहाला पडतात १० पैसे. म्हणजे पूर्वीचा दीड आणा. आता मिसळीला पडतात पूर्वीचे ३ आणे. मुलाला 'पॉकेट

मनी ' द्यायचे म्हणजे महिन्याला १०–१५ रुपये द्यावे लागतात. त्या वेळी आम्हांला २–३ रुपये मिळाले, की खूप चैन वाटत असे. सिनेमा ३ आणे नाहीतर ५ आणे देऊन पहायचा. आता १२ आणे शेवटचा दर झाला आहे. महागाई कुठे चालली आहे. प्राप्तीत वाढ झाली असली तरी खर्चाचे प्रमाण एवढे वाढले आहे की, जमा-खर्चाचा मेळ बसणे महाकठीण झाले आहे.

' संगम ' सिनेमा पाहाण्याचे बरेच दिवस टाळल्यानंतर अखेर मुलांच्या आग्रहास्तव चौथ्या आठवड्यात तिकिटे रिझर्व्ह करावयाचे ठरविले. पाच माणसे म्हणजे १० किंवा १२॥ रुपये खर्च होणार होते. कारण दोन रुपये किंवा अडीच रुपयांखेरीज चांगली जागा नाही. अखेर मुलांनी तडजोड केली. त्या तिघांनी प्रत्येकी २ रुपयांत प्रथम जाऊन यायचे व मग आम्ही दोघांनी २॥ रुपयांत जायचे. तेवढीच १॥ रुपयाची काटकसर. कापड-चोपड, बिस्किटे–खाऊ, गहू–ज्वारी–दूध आदी बाबतींतही अशीच काटकसर करावी लागत आहे. मुलांना जेवढे देता येईल तेवढे द्यायचे आणि आपण जरा पोटाला चिमटा घ्यायचा. मला चांगले आठवते की, मी १९३८–३९ मध्ये १ आणा शेराने गूळ, ४ आणे शेराने साखर, ३ आणे शेराने तांदूळ, २ आणे शेराने ज्वारी, ३ आण्यांनी गहू, रुपयाला २२ छटाक लोणी, रुपयाला ५ शेर दूध, १ पैशाला पालेभाजीची जुडी, दोन आणे शेर बटाटे, ३ आणे डझन केळी विकत आणली आहेत. मुलांना हे खरे वाटत नाही. ३ आणे शेराऐवजी १ रु. ४ आणे झालेले दूध कोणाला किती परवडणार ? आम्ही दूध घ्यायचा कंटाळा करीत असू; तर आता मुलांनी अर्धा कप मागितल्यावरही देण्याची पंचाईत. दूध नाही, तूप नाही, फळे नाहीत, गहू नाही, लोणी नाही, मग मुलांची निकोप वाढ होणार कशी आणि ती धष्टपुष्ट राहणार कशी ? आमच्या पिढीने पोळी नाही म्हणून भाकरी खाल्लीही, गरिबीत दिवस काढलेही. पण त्या वेळी आजच्यासारखी टंचाई नव्हती. महागाई नव्हती. धन-धान्याची आणि दूध-दुभत्याची सुबत्ता–चंगळ असे. आमची आजी रोज अर्धा रांजण ताक महारा-पोरांना फुकट देत असे. आजीने दही–ताक कधी विकले नाही. आज ग्लासभर ताक हवे असेल तर ४ आणे मोजावे लागतात आणि मुलं दह्यासाठी भांडत असतात. परिस्थिती कोठे चालली आहे हे पाहिले, की मन विषण्ण होते. ६ आणे शेराचे गोडेतेल ३॥ रुपयांवर गेल्यावर भाजीला काय घालायचे आणि तूप १० रु. शेर झाल्यावर भातावर काय वाढायचे ? सारे कसे अवघड होऊन बसले आहे !

यावर एखादा असेही म्हणेल, " कशाला पाहिजे पोळी, तूप, तेल आणि दूध ? भाजी-भाकरी खावी आणि दणकट रहावे. " हा ठीक आहे हो उपदेश.

पण तो घरातील मुलांच्या गळी उतरविणे अशक्य आहे. मुले म्हणतात, "तुम्ही कॉंग्रेसचे अभिमानी म्हणता, सरकारचे नेहमी समर्थन करता, मग महागाई का हटवीत नाही व सुबत्ता का निर्माण करीत नाही? कॉंग्रेसने १७ वर्षांत चांगले काय दिले आणि लोकांचे भले केले? श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आणि गरीब गरीबच राहिले. श्रीमंत १५० रुपयांचे गव्हाचे पोते घेत आहेत आणि गरिबाला ७५ रुपयांचे ज्वारीचे पोते घेणे अशक्य झाले आहे. तुम्ही कॉंग्रेसजनांनी २०–२५ वर्षांपूर्वी तुरुंगातही पावलोणी खाल्ले आहे. दूध भरपूर प्यायला आहात. ब्रिटिश जर तुम्हांला एवढे देऊ शकत होते तर तुम्ही जनतेला त्यापेक्षा अधिक चांगले का देऊ शकत नाही?" या प्रश्नाला माझ्यासारख्याजवळ काय उत्तर आहे? निरुत्तर झाल्यावर मग त्यागाचे आणि साधेपणाचे तत्त्वज्ञान सांगत सुटायचे. "साधी, राहाणी उच्च विचारसरणी असावी, चैनीचे विचार डोक्यात आणू नयेत" असे सांगून मुलांना गप्प बसविण्याचा प्रयत्न करावा लागतो.

पण आजकालची मुले कितीतरी चौकस आणि बहुश्रुत झाली आहेत. ती लगेच म्हणतात, "मंत्र्यांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकदा प. जर्मनी व अमेरिका पाहायला लावले पाहिजे. अमेरिकेने कष्टातून काढलेला सोन्याचा धूर आणि जर्मनांनी जिद्दीने–देशाभिमानाने बेभान होऊन जर्मनीची केलेली फेर-उभारणी वरील मंडळींच्या डोळ्यांत अंजन घातल्याशिवाय राहणार नाही. येथे कष्ट कमी, काम कमी. सुकाळ आहे तो वाचाळतेचा आणि सभा-समारंभांचा. राज्यकर्ते जसे वागतात तशी जनता वागते आणि त्यामुळे आजची स्थिती निर्माण होते." मुलांचे हे व्याख्यान बंद करण्यासाठी मला रेडियोचे बटण दाबावे लागले आणि रात्री ९ च्या बातम्या ऐकत ऐकत पाने वाढण्याची सूचना द्यावी लागली. अंजूने आपली भाकरी माझ्या ताटात ठेवून पोळीला हात घातला आणि मला म्हणाली, "मोठ्या माणसाने भाकरी खावी आणि लहान मुलांना तूप-साखर-पोळी द्यावी. खरे ना दादा?" यावर तिला मी काय उत्तर देणार? या उत्तराचे उत्तरदायित्व सरकारवर सोपवून मी भाकरी मोडायला सुरुवात केली.

• • •

## काल–आज–उद्या ! : ३ :

रविवार उजाडला, की मला पु. ल. देशपांडे यांच्या 'वाऱ्यावरील वरात' या नाट्याची आठवण होते आणि पु. ल. यांच्याप्रमाणेच आदल्या दिवशी मनात योजलेले सगळे कार्यक्रम उलटे-पालटे झाल्याचा अनुभव येतो. सकाळचे दैनंदिन कार्यक्रम लवकर उरकून ८॥ ला बाहेर पडायचे व ९ पर्यंत कचेरीत जायचे अशी रोजची जी घाई असते ती निदान रविवारी तरी करायची नाही, थोडे उशिरा उठायचे, प्रातर्विधी सावकाश उरकायचे व दहाच्या सुमारास ऑफिसात चक्कर मारायची असे ठरविले, तरी कचेरीत रोजच्या वेळेला गेल्याशिवाय मनाला स्वास्थ्य वाटत नाही आणि काम केल्याशिवाय भागत नाही. घरी थोडा वेळ थांबावे, मुलाबाळांबरोबर चहाच्या टेबलावर थोड्या गप्पागोष्टी कराव्यात म्हटले तर कोणीतरी काहीतरी काम घेऊन येतो, प्रसिद्धी किंवा तक्रारीचा मजकूर घरी आणून देतो आणि कौटुंबिक वातावरणात रमण्याच्या माझ्या प्रयत्नावर विरजण घालतो. या लोकांना टाळण्यासाठी मग सौ. निक्षून सांगते, "तुम्ही आपले ऑफिसला जा बरं. तुमच्या कामाच्या कटकटी घरी नकोत." पडत्या फळाची आज्ञा मानून मी झटकन् उठतो आणि कचेरीचा रस्ता धरतो. जाताना मनात म्हणतो, आज रविवार आहे. फार वेळ नाही ऑफिसात बसायचे. अकरापर्यंत काम पाहून बाहेर पडायचे, मित्र व नातेवाईकांच्या घरी जाऊन त्यांना भेटायचे, दुपारी अर्धा सुट्टी घेऊन ताणून द्यायची आणि चार-पाचला मुलांना फिरायला बाहेर न्यायचे. सायंकाळी क्लबमध्ये जायला विसरायचे नाही असा कार्यक्रम ठरवून ठेवतो. पण घडते मात्र नेमके वेगळेच. एकामागून एक अनेक रविवार गेले, पण शुक्रवार-शनिवारपेक्षा ते वेगळे गेल्याचे काही मला आठवत नाही. आपण आजारी पडणार असे वाटू लागल्यावर डॉक्टरच्या (माझा वर्गमित्र) कानावर घातले, की तो सांगतो, "माझ्याजवळ तुला औषध नाही. तू रविवारी पुणे सोडून बाहेर जाणार असशील तरच तुझ्या आजारपणाची दखल घेईन. कशाला जाऊन आलास युरोप-अमेरिकेला ! तेथील जीवन पाहूनही खुशाल अशिक्षिता-सारखा वागतो आहेस. शारीरिक, मानसिक काही विश्रांती घेशील की नाही ?" त्यावर मी डॉक्टरला म्हणतो, "बरं बाबा, तू म्हणतोस त्याप्रमाणे मी रविवारी जात जाईन पुण्याच्या बाहेर दहावीस मैलांवर आणि निसर्गाच्या सान्निध्यात काही तास घालवून येईन परत ताजातवाना होऊन." ब्रिटिश सरकारप्रमाणे माझे हे

आश्वासन अजूनही मी पूर्ण केले नसल्याने या डॉक्टरमित्राने मला औषध देणे बंद केले आहे.

आदल्या रविवारी मला रक्तदाबासारखा थोडा त्रास झाल्याने पुढच्या रविवारी मी संपूर्ण विश्रांती घ्यायचे ठरविले होते. तथापि त्या दिवशी दोन कार्यक्रम असे निघाले की, तेथे जाणे अपरिहार्य होते. माझे एक स्नेही व चाहते श्री. हरिभाऊ अभ्यंकर यांच्या वडिलांच्या एका लोकोपयोगी छंदाला ५० वर्षे व त्यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी एक घरगुती—अनौपचारिक समारंभ आखला होता व त्याला निवडक मंडळींना निमंत्रण दिले होते. श्री. नी. दा. अभ्यंकर यांचा वृत्तपत्रांची कात्रणे जमविण्याचा छंद मी ऐकला होता. तथापि त्यांचा संग्रह पाहण्याची संधी मला मिळाली नव्हती. वृत्तपत्राशी संबंध आणि घरापलीकडेच कार्यक्रम म्हणून हरिभाऊंच्या निमंत्रणाला मान देऊन त्याप्रमाणे त्यांच्या 'गंगावतरण' या निवासस्थानी ठीक ५ वाजता दाखल झालो. निवडक पाच-पंचवीस मंडळी उपस्थित होती आणि त्यात साठीच्या पुढे गेलेले बहुसंख्येने होते. त्यांचा तो छोटा मेळावा पाहिल्यावर व या मेळाव्यातील संभाषण ऐकल्यावर मला वाटले की, आपण साठी-सत्तरी गाठू का आणि गाठल्यास आपण त्या वेळी काय करू? माझ्या मनातील या प्रश्नाला त्या दिवशीचे प्रमुख पाहुणे डॉ. अप्पासाहेब परांजपे यांनी आपल्या उद्‌गारात आणि स्वतः नी. दा. अभ्यंकर यांनी आपल्या भाषणात उत्तर देऊन टाकले. समाजाला उपयोगी पडेल असे कार्य करीत रहावयाचे, त्या अनुरोधाने छंद लावून घ्यायचा असे मनाने पक्के ठरवून अभ्यंकरांनी खरोखर ५० वर्षे सतत कात्रणाचे काम करून, त्यांची जुळणी करून एक मोठी कामगिरी बजावली बजावली आहे. त्यांनी सांगितले की, "काही सेवानिवृत्त मंडळींना वेळ कसा घालवावा याची पंचाईत पडते आणि मला वेळ अधिक कसा मिळेल याची चिंता लागते." हा फरक मला तेथे लगेच जाणवला. कारण माझ्या शेजारी बसलेली चार-पाच सेवानिवृत्त मंडळी एकमेकांना प्रकृतीबद्दल, घरात मिळणाऱ्या वागणुकीबद्दल आणि वेळ कसा जातो याबद्दल विचारपूस करीत होती. प्रत्येकाची आणखी जगण्याची इच्छा आणि धडपड त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. मुलांकडून—सूनबाईकडून होणाऱ्या अवमानाचे शल्य त्यांना बोचत होते. पण जगावे, आणखी जगावे असे त्यांना मनोभावे वाटत होते. जगण्याची ही जी दुर्दम्य आशा आहे ती मोठी मजेशीर आहे. "जगण्यासारखे जोवर काही आहे तोवर मरण्यात मौज आहे" हे या मंडळींना मान्य नसून मरण येईपर्यंत जगण्याचा त्यांचा निर्धार कायम असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून आढळून आले.

नाबाद ७५ धावा काढलेल्या क्रिकेट खेळाडूला १०० धावा पूर्ण करण्याची जशी तडफ वाटते, आत्मविश्वास वाटू लागतो, तीच गोष्ट आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या माणसाच्या बाबतीतही आढळून येते. उरलेल्या २५ धावा काढताना सावधगिरी बाळगावी लागते, चौफेर नजर टाकून हालचाल करावी लागते. कारण याच वेळी धोका आणि अपघात घडण्याची शक्यता असते. माणसालाही ७५ नंतर सावधगिरीने जपून रहावे लागते, धोका–अपघात न घडण्याची खबरदारी घ्यावी लागते. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी १०० वी ओलांडल्यावर ७० च्या पुढे गेलेल्या बऱ्याच जणांना वाटू लागले की, आपणही आयुष्याच्या मैदानावर एक शतक झळकवू शकू. डॉ. अप्पासाहेब परांजपे यांनी नाबाद ८४ (नॉट आऊट एटीफोर) हे पुस्तक लिहिताना आत्मविश्वास प्रगट केला आहे की, नाबाद १०० पर्यंत पोहोचायला फारसा त्रास होणार नाही आणि अप्पासाहेबांच्या प्रकृतीकडे पाहिले, की निश्चित वाटू लागते, ते शतक झळकविणार. त्यांच्याप्रमाणेच श्री. हरिभाऊ फाटक आणि इतर काही मंडळी काळाचे आव्हान स्वीकारून नाबाद १०० फडकविण्याची उमेद बाळगून आहेत. या सर्व वृद्ध मंडळींकडे, त्यांच्या उत्साहाकडे पाहिले, की तरुणांनाही काही वेळा लाज वाटू लागते. अप्पासाहेब अजूनही खणखणीत आवाजात बोलतात, दणदणीत पावले टाकून चालतात. ती पुणेरी पगडी, ते पांढरे उपरणे आणि तो लांब कोट पाहिला, की जुना जमाना अजूनही ताठ मान करून नव्या जमान्याकडे कसा पहात आहे याची कल्पना येऊ शकते. ही कणखर, बुद्धिमान, स्वाभिमानी, सेवाभावी पिढी काळाच्या ओघात हळूहळू अंतर्धान पावल्यावर तिची जागा नवी पिढी तेवढ्याच आत्मविश्वासाने आणि निर्भयपणाने घेईल की नाही याची शंका वाटू लागते. सेवानिवृत्तांच्या मेळाव्यातून मी उठलो आणि जिमखान्यावरील एका कार्यक्रमासाठी निघून गेलो. वाटेत माझ्या मनात हेच विचार घोळत होते की, प्रौढांची पिढी, तरुणांची पिढी आणि बालकांची पिढी यांचा एकत्रितपणे विचार होतो की नाही ? त्यांच्यात विचार–आचार, कार्य–कर्तबगारीचे दुवे निर्माण केले जात आहेत की नाही ?

जिमखान्यावरील सुखवस्तूंचा तो एक घरगुती मेळावा होता. रविवारी जोडप्यांनी एकत्र येऊन चहापान करायचे, गप्पागोष्टी करायच्या, हास्यविनोदात तास-दीड तास घालवावयाचा असे त्याचे स्वरूप होते. या मेळाव्याला थोडा पाश्चात्य धाटणीचा स्पर्श होताच. ३५ ते ४५ पर्यंतचे तरुण व त्यांच्या तीस ते चाळीस वर्षांपर्यंतच्या अर्धांगी पाहिल्यावर, त्यांच्या बोलण्यातील विषयांची व्याप्ती ऐकल्यावर क्षणभर आपण युरोपात तर नाही ना, असे वाटल्यावाचून रहात नव्हते. ओठाला लाली, गालाला लाली, तोंडाला पावडरचा जाड थर व सेंटचा

भपकारा यामुळे माझ्यासारख्याचा जीव गुदमरून जायचा. त्या नायलॉनच्या पारदर्शक साड्या आणि बिनबाह्याचा ' व्ही ' कट गळ्याचा ब्लाऊझ, ब्रिटनमधील ' टॉपलेस ' ची कल्पना करून देत होता. पुरुषही सुटा-बुटात-नेकटायमध्ये. जणू काही आताच बोटीवरून किंवा विमानातून उतरलेले. बोलण्याचे विषय काय तर "नुकताच रहायला दीड लाखाचा बंगला बांधला, फ्रिजिडियर आणला, ' टेरेस गार्डन ' केली, जुनी फियाट विकून नवीन १९६३ ची अँबॅसडर गाडी विकत घेतली." स्त्रियांनी एकमेकींना विचारायचे, " तुमचा गीझर कसा काय चालतो आणि ते परवाचं गुलाबाचं कलम फुललं का, नॉयलॉनपेक्षा पॅरॅगॉन साडी चांगली आणि उंच टाचांच्या नव्या पांढऱ्या चप्पल तर हलक्या आणि मऊ. गहू दोन रुपये किलोंनी आणला आणि साखर परवा तीन रुपयांनी वीस शेर घेतली. दुकानदाराला सामानाची चिठ्ठी दिली, की तो सारं सामान पाठवून देतो. तीनशे रुपयांच्या बिलात पन्नास इकडे किंवा तिकडे. दोन पैसे गेले तरी चालेल, पण बाई, चांगलं खायला लागतं घरात. बिस्किट-बटर ( लोणी ), काजू, चिवडा नेहमी ठेवावाच लागतो घरी." हे ऐकताना मला गुदमरल्यासारखे होत होते. ना कशाचा खेद ना खंत. ना कोणाची पर्वा की काळजी. देश-समाज एकीकडे आणि ही मंडळी एकीकडे. प्रौढांची ही पिढी स्वहिताखेरीज आणि स्वकुटुंबापलीकडे पहायला तयार नव्हती. त्यांना समाजाच्या-देशाच्या विकासात किंवा प्रगतीच्या प्रयत्नात कसलाच रस नव्हता. आपली नोकरी किंवा धंदा आणि आपला बंगला व कुटुंब यातच ती रममाण होती, संतुष्ट होती. त्यांचा ' आज ' अशा प्रकारे घालविला जात होता. दीड तास संपल्यावर मी झटकन् बाहेर मोकळ्या हवेत आलो आणि ' काल'च्या, ' आज'च्या नंतर ' उद्या'चा विचार करू लागलो.

दुसरे दिवशी सोमवारी सासवडच्या पुरंदर हायस्कूलच्या गणपत्युत्सव समारोपाला जाण्याचा प्रसंग आला. मी सहसा सभा-समारंभाला जात नाही आणि अध्यक्ष किंवा वक्त्याची भूमिका स्वीकारीत नाही. ते काम पुढाऱ्यांचे-नेत्यांचे असे मानतो. पण ग्रामीण भागातील शाळा आणि विद्यार्थी म्हटल्यावर मला नाही म्हणता येईना. कारण या मंडळीबद्दल मला ओढा वाटतो. त्यांच्याबद्दल दुर्दम्य आशावाद वाटतो. हीच मंडळी उद्या देशाला मोठा करणार आहेत, त्याचे संरक्षण करणार आहेत. मी ठरलेल्या वेळेपेक्षा पाच मिनिटे लवकर पोहोचलो आणि वेळेपेक्षा पाच मिनिटे उशीरा निघालो. मुलांशी मोकळेपणाने बोललो आणि त्यांनाही त्यांचे मन मोकळे करण्याची संधी दिली. मुले खेड्यापाड्यातील, गरीब शेतकरी कुटुंबातील होती. पण त्यांच्या तोंडावर एकप्रकारचे समाधानाचे तेज आणि महत्त्वाकांक्षेची छटा दिसत होती. ' अनेक अडचणींना

तोंड देऊन मी शिकणार आणि माझ्याबरोबर माझ्या कुटुंबाला, गावाला, जिल्ह्याला, राज्याला आणि देशाला मोठा करणार ' अशी जिद्द त्यांच्या ठायी दिसत होती. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, उत्कर्ष नाही हे त्यांना पटले होते आणि म्हणूनच शिकून-समजावून घेऊन देशातील लोकशाही दृढ करावी अशी त्यांची मनोभूमिका होती. खेडोपाडी निघणारी हायस्कुले आणि कॉलेजे यांत शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचे प्रतीक माझ्यासमोर दिसत होते. मी त्यांना माझे अनुभव दिले, माझ्या अपेक्षा त्यांच्यापुढे व्यक्त केल्या आणि त्यांना त्यांच्या भावी आयुष्यात सुयश चिंतिले. खेड्यातील मुलांच्या अडचणी शहरातील मुलांना ठाऊक नाहीत. ज्या परिस्थितीत ही मुले शिक्षण घेतात त्याबद्दल त्यांचे कौतुक होणे आवश्यक आहे. हीच मुले उद्या देशाचा ७५ टक्के ग्रामीण भाग सुधारणार आहेत, देशाला पुढे नेणार आहेत, त्यांना जरूरी आहे शिक्षणाच्या संधींची आणि कर्तृत्व दाखवणाऱ्या क्षेत्राची. सासवडहून परतताना मी समाधानाने परतलो.

मंगळवारी सकाळी स. प. महाविद्यालयातील बी. ए. च्या ( दुसरे वर्ष ) 'राजकारण आणि अर्थशास्त्र' संघाच्या विद्यार्थ्यांपुढे बोलण्याचा प्रसंग आला. विषय होता, ' लोकशाही आणि वृत्तपत्रे ' प्रा. घारे यांची आग्रहाची विनंती म्हणूनच होकार दिला होता. तथापि बी. ए. च्या विद्यार्थ्यांपुढे त्यांच्या वर्गात जाऊन बोलण्याचा तो प्रसंग असल्याने कसा काय ' परफॉर्मन्स ' होतो याबद्दल साशंकता वाटत होती. तथापि कॉलेज माझेच, वर्गही माझाच आणि माझ्यापुढे बसलेले बहुसंख्य विद्यार्थीही माझ्यासारखे ग्रामीण भागातले असल्याने भाषणाचा एक तास केव्हा संपला हे कळले नाही. विद्यार्थ्यांनी भाषणात चांगलाच रस घेतल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून आले. लोकशाहीशी शिक्षण कसे निगडित आहे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी हे शिक्षण घेतल्यावर त्यांच्यावर जबाबदारी अधिक कशी पडणार आहे याचे विवेचन त्यांना मननीय वाटल्याचे नंतर मला सांगण्यात आले. शाळा-कॉलेज या जशा महत्त्वाच्या संस्था आहेत, तद्वतच वृत्त-पत्रे देखील लोकशिक्षण देणाऱ्या मोलाच्या आणि महत्त्वाच्या संस्था असल्याचे त्यांना पटले. स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचा आणि समाजवादाचा अंगीकार केलेल्या भारतात वृत्तपत्रांवरील जबाबदारी दिवसेंदिवस कशी वाढत आहे आणि या जबाबदारीशी विसंगत अशी वृत्तपत्रसृष्टीतील मक्तेदारी कशी वाढत आहे, या चिकित्सेने भारावून गेलेला एक विद्यार्थी भाषण संपल्यावर भेटून म्हणाला, "जिल्ह्याजिल्ह्यातून सहकारी पद्धतीवर वृत्तपत्रे काढली गेली तर भांडवलवाल्यांच्या मक्तेदारीला आळा नाही का बसणार ?" या विद्यार्थ्याच्या कळकळीचे कौतुक वाटले. पण त्याला काय कल्पना की, वृत्तपत्रव्यवसाय हे एक ध्येयवादी सेवाकार्य

राहिले नसून तो एक धंदा बनला आहे व त्यात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. व्याख्यानाच्या वेळी एक फरक स्पष्टपणे दिसून आला. शहरातील सुखवस्तू कुटुंबातील विद्यार्थी भाषणाऐवजी खिडकीबाहेरच्या रंगी-बेरंगी दृश्याकडे लक्ष केंद्रित करीत होते आणि खेड्यातून आलेले गरीब विद्यार्थी कान एकवटून भाषण ऐकत होते. लोणावळा ते लोणीपर्यंतच्या भागातले हे विद्यार्थी सायकल–बस–लोकल आदी वाहनाने रोज सकाळी कॉलेजला येऊन दुपारी नोकरी करीत असल्याचे प्रा. घारे यांच्याकडून समजले. पाऊस असो, ऊन असो त्यांच्या विद्यार्जनात खंड पडत नव्हता. शिकावे, खूप शिकावे आणि मोठे व्हावे ही आशा-आकांक्षा उराशी बाळगून ही तरुण मंडळी जीवनात झगडत असल्याचे दिसून आले.

स. प. महाविद्यालयाच्या वास्तूत मी जवळजवळ २२ वर्षांनी प्रवेश केला होता. देवी रमाबाई सभागृहात सभांच्या निमित्ताने मी कधी कधी जात असतो. पण वर्गात शिरून बाकावर किंवा प्राध्यापकांच्या खुर्चीवर बसण्याचा योग आला नव्हता. १९४२ च्या सप्टेंबरमध्ये पोलिसांनी अटक केल्यानंतर पुन्हा स. प. च्या वर्गात पाऊल नाही टाकता आले. त्या दिवशी ज्या वर्गात उभे राहून मी व्याख्यान दिले, त्याच वर्गात मी प्रा. एस्. के. कुलकर्णी यांच्याकडून 'गणित शिकलो होतो. ज्या जिन्याने वर जाऊन प्राध्यापकांच्या 'कॉमन रूम'मध्ये चहा घेतला, त्या जिन्याने विद्यार्थ्यांना जायची मनाई असताना कधीमधी जाऊन जर्मन भाषेचे प्राध्यापक करंदीकर यांना भेटलो होतो. कॉमनरूममध्ये त्या दिवशी माझ्याबरोबर चहा घेतलेले प्राध्यापक आणि माझ्या वेळी शिकवायला असलेले प्राध्यापक यांच्यात मला वयाचे केवढे तरी अंतर दिसून आले. प्रिन्सिपॉल करमरकरांच्या विद्यार्थ्यांना आजचे प्राध्यापक तुलनेने कितीतरी लहान वाटतील. प्रा. केरकर, प्रा. ज. नी. कर्वे, प्रा. भावे, प्रा. दबडघाव, प्रा. तुळपुळे, प्रा. कोल्हटकर, प्रा. माटे, प्रा. देवधर, प्रा. फर्नांडीस आदी नावे आणि त्यांची ती शिकविण्याची हातोटी आठवली, की मागच्या पिढीचे आजच्या पिढीशी वाढत चाललेले अंतर जाणवू लागते. वीस-पंचवीस वर्षांत केवढा फरक पडला आहे शिक्षणात. शिक्षण घेणारी मुलेही लहान आणि शिकविणारेही वयाने लहान. मात्र दोघेही हुषार. बहुश्रुत होण्याची दोघांचीही धडपड. तथापि प्राध्यापकांची ती ज्ञानसंपन्नता, ती प्रगल्भता, ती प्रौढता आणि ती करडी शिस्त विद्यमान परिस्थितीत नाही तेवढी दिसून येत. माट्यांचे मराठी आणि फर्नांडीस यांचे इंग्रजी कधी विसरले जाणार नाही. केरकरांचा आणि कर्व्यांचा तो कनवाळूपणा कधीही स्मृतीला सोडून जाणार नाही. डॉ. अप्पासाहेब परांजपे यांची पिढी, ज. नी. आणि डी. डी. कर्वे यांची पिढी आणि आजची तरुण प्राध्यापकांची पिढी यांत जसा फरक दिसून येतो, तद्वतच अभ्यंकर यांच्या घरी भेटलेल्या वृद्धांची, जिमखान्यावर भेटलेल्या प्रौढांची आणि

स. प. महाविद्यालय व सासवडच्या पुरंदर विद्यालयात भेटलेल्या विद्यार्थ्यांची तरुण पिढीही काल–आज–नि उद्याची प्रतिके असून प्रत्येक पिढीचा कस वाढून ती जुन्यांची जागा योग्य प्रकारे घेत आहे की नाही याचा विचार होणे जरूर आहे. 'Old order changeth yielding place to new म्हटले जाते. नवे जुन्यासारखेच सकस आणि समृद्ध हवे एवढेच !

● ● ●

## "व्यायामाला वेळ नाही !" : ४ :

वेळ सायंकाळी सहाची होती. सूर्य अस्ताला जाण्याच्या बेतात होता. स्वारगेट ओलांडल्यावर पुढे कात्रजमार्गाने न जाता गुलटेकडीच्या बाजूला आम्ही वळलो आणि दोन-चार मिनिटांत एका प्रशस्त मैदानानजिक येऊन पोहोचलो. रस्त्याच्या एका बाजूकडील मैदानावर मुले-मुली खेळत होती आणि दुसरीकडे लहान-मोठ्या इमारतींचे काम चालू होते. " हीच आमची पुणे व्यायामशाळा " असे शिवरामपंत ( शि. वि. दामले ) म्हणाले व आम्ही पटांगणाला घातलेल्या तारेच्या कुंपणात शिरलो. मंद सायंप्रकाश, खुली हवा, स्वच्छ व मोकळे वातावरण यामुळे मनाला आल्हाद वाटला आणि वाटले की, आपणही जरा उतरावे मैदानात खेळायला. महाराष्ट्रीय मंडळाने आपल्या व्यायामशाळेकरिता मिळविलेली ही जागा खरोखर प्रशस्त असून येथे मंडळाला पुढील काही दिवसांत खेळाच्या दृष्टीने कितीतरी सोयी करता येतील. शिवरामपंत मला आपली भावी योजना जसजसे समजावून सांगू लागले, तसतसा मी वयाने दहादहा वर्षे लहान होऊ लागलो. व्यायामशाळेनजिक इंग्रजी माध्यमाची शाळा, दवाखाना, नेमबाजीच्या प्रात्यक्षिकाची सोय आणि पोहण्याचा तलाव हे एकएक ऐकून मनाला समाधान वाटले. पुण्यातील ही व्यायामसंस्था किती भरीव कार्य करीत आहे याची नीटशी कल्पना राजकीय पक्षोपपक्षांना आणि सरकारला येत नसली तरी माझ्यासारख्या एके काळच्या व्यायामप्रेमीला येऊ शकली.

सायंकाळी मैदानात उघड्यावर खेळून शरीराला व्यायाम द्यायचा, ही कल्पना शहरी सुशिक्षित जीवनात लोप पावू लागली आहे. शाळांतील मुले आणि कॉलेजांतील तरुण सायंकाळी टिळकरोड, फर्ग्युसन कॉलेज रोड किंवा जंगली-महाराज रोडला फिरायला जातात आणि हॉटेलात चहा–चिवडा खात बसतात. रस्त्याने टवाळकी आणि सिगरेटच्या धुराचे फवारे यांत आनंद मानतात. तीच

गोष्ट नोकरी-धंद्यातील लोकांची. कचेरीतील कारकून किंवा साहेब, यंत्रज्ञ किंवा तंत्रज्ञ, वकील किंवा कारखानदार सायंकाळी घरी आला, की चहाचा एक कप घशाखाली घालणार आणि बायको-मुलांना घेऊन पेशवे पार्क किंवा संभाजी पार्क किंवा कमला नेहरू पार्कला फिरायला जाणार. यांतली काही मंडळी वेळ मिळेल तेव्हा बॅडमिंग्टन किंवा टेनिस खेळण्याचे अधूनमधून प्रदर्शन करीत असतात. बारापासून बत्तीसपर्यंतच्या वयाच्या तरुण–तरुणींची व्यायामाभावी झालेली शारीरिक अवस्था पाहिल्यावर ही मंडळी मनाने किती भक्कम असतील याची कल्पना येऊ शकते. आजच्या धकाधकीच्या काळात यांना वेळ मिळू शकत नाही किंवा त्यांची ऐपत असू शकत नाही असे नव्हे. तथापि मैदानावर खेळणे यात यांना संकोच वाटतो, कमीपणा वाटतो. म्हणून ही मंडळी मैदान टाळीत असतात आणि म्हणूनच अखिल भारतीय, आशियाई आणि जागतिक विविध सामन्यांत किंवा लष्करात आम्ही तोकडे पडतो, ठेंगू ठरतो. पाश्चात्य शिक्षणाने आमच्या डोक्यात कोणता वेडगळ विचार प्रथम शिरला असेल तर तो लाल मातीत लोळणे किंवा मैदानावर मनमुराद खेळणे हे कमीपणाचे मानण्याची वृत्ती. या पार्श्वभूमीवर क्रिकेटसाठी होणारा पैशांचा आणि वेळेचा खर्च पाहिला, की आपल्या देशाला स्वातंत्र्याची जाणीव झाली आहे की नाही, याची क्षणभर शंका वाटते.

व्यायामशाळेत प्रवेश केल्यावर तेथे चार-सहा तरुण जोर-बैठका–नमस्कार, वजन उचलणे आदी व्यायाम करीत असल्याचे दिसले. मला माझ्या कॉलेज-जीवनाची आठवण झाली. स. प. कॉलेजात असताना मी सकाळी कॉलेजच्या तालमीत जात असे व जोर–बैठका–जोडीचा व्यायाम घेत असे. लॉ कॉलेजपर्यंत मी हा व्यायाम चालू ठेवला होता. पण कॉलेज संपल्यावर व्यायामही संपला आणि उघड्या मैदानावरील खेळही संपले. नू. म. वि. मध्ये असताना आंतर-शालेय कुस्तीत आणि पोहोण्याच्या स्पर्धेत मी भाग घेत असे. पोहणे हा माझा फार आवडता व्यायाम. या शर्यतीत मला दरवर्षी बक्षिस मिळत असे. शालेय जीवनात रविवारी सकाळी कचरे पाटलांच्या विहिरीवर, शिरोळे यांच्या विहिरीवर किंवा महाराष्ट्रीय मंडळाच्या विहिरीवर पोहोण्यासाठी जाण्याचा माझा परिपाठ असे. या विहिरीवर पुढे पुढे चोरून जाण्याचे प्रसंग येत आणि काही दिवसांनी पहिल्या दोन विहिरी पोहोण्यासाठी बंद केल्यावर टिळक तलावात डुंबण्याची हौस फेडावी लागत असे. विहिरीतील तो सुटका आणि त्याचा आवाज याची सर तलावात येत नसे. लॉ कॉलेजच्या तलावात मात्र मोठी मजा येत असे. प्राचार्य नानासाहेब घारपुरे यांनी लॉच्या विद्यार्थ्यांसाठी कितीतरी चांगल्या गोष्टी करून ठेवल्या होत्या. तालीमखाना, उत्तम मैदान, पोहण्याचा तलाव आणि

कॉलेजमागची टेकडी ही नानासाहेबांची बोलकी स्मारके आहेत. पण त्या वेळी या सोयींचा उपभोग घेण्यास विद्यार्थी नसत. लॉच्या होस्टेलमधील विद्यार्थी एक नंबरचे आळशी आणि आम्ही गावातून जाणारे अभ्यासाव्यतिरिक्त सार्वजनिक कार्यात, नोकरी-धंद्यात नेहमी मग्न. तरीही मी कॉलेजच्या क्रीडास्पर्धांत भाग घेऊन कित्येक पारितोषिके पटकावली होती. एक वर्ष जनरल चँपियनशिपही मिळविली होती. ते दिवस आठवल्यावर मला माझ्या आजच्या शारीरिक स्थितीची लाज वाटल्याशिवाय रहात नाही.

महाराष्ट्रीय मंडळाच्या व्यायामशाळेच्या त्या आरशापुढे उभे राहिल्यावर पोट सुटलेला व जाडजूड झालेला माझा देह दिसला आणि मला वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचा व्यायाम आठवला. शाळेत हॉकी व फुटबॉल आणि कॉलेजमध्ये बॅडमिंग्टन–टेनिस आणि पळण्याचा व्यायाम मी सहसा चुकविला नव्हता. त्यामुळे शरीर जेथल्या तेथे ठाकठीक राहून प्रकृतीची कधी तक्रार उद्‌भवत नसे. पण तो व्यायाम एकदम सुटल्याने शरीरही सुटले व पोटही सुटले व थुलथुलीतपणा प्राप्त झाला. आता सकाळी पर्वतीवर जायचे म्हटले तर कंटाळा येतो, मग तलावात पोहोण्याचे किंवा टेनिसच्या दोन मॅचेस् खेळण्याचे बाजूलाच राहो. माजी स्थानिक–स्वराज्यमंत्री श्री. ल. मा. पाटील हे १९४६ ते १९५२ पर्यंत मंत्री असताना पुणे मुक्कामी नियमाने टेनिस खेळत, पोहोण्यास जात व सायकल-वरून गावात चक्कर मारीत. मला त्यांचे आश्चर्य आणि कौतुक वाटायचे. एकदा तर आम्ही सायकलवरून विठ्ठलवाडीपर्यंत फिरायला गेलो होतो. बरोबर नाही शिपाई की पोलिस. ते म्हणायचे, "आम्हांला साधा माणूस म्हणून वागायची व रहायची चोरी का व्हावी हे समजत नाही. एखादा सिनेमा किंवा नाटक पाहायची इच्छा झाली तर पंचाईत. लगेच मंत्री सिनेमा पहातात, गाणे ऐकतात, हॉटेलात चहा पीत बसतात अशी ओरड." श्री. पाटील मात्र मोठेपणाच्या अशा अवास्तव कल्पनांचा धिक्कार करून व्यायाम घेत, सिनेमा पहात, हॉटेल-मधील मिसळ खात. अलीकडच्या मंत्र्यांपैकी बहुतेकांना खेळाची आवड नाही, की कलाकरमणुकीची हौस नाही. जीवनातील आनंदाच्या त्यांच्या कल्पनाच साऱ्या बदलल्या आहेत. कामानिमित्त पुण्याला आलेल्या एका मित्र-मंत्र्याला म्हटले, की "चला जाऊ आज कँपात जेवायला आणि मग सिनेमाला" तर तो आढेवेढे घेतो. सिनेमा सुरू झाल्यावर गुपचूप जाऊन बसू व सिनेमा सुटण्यापूर्वी उठून जाऊ म्हणतो. का तर कोणी पाहील व बाहेर बोलेल! काय करायचे या वेडगळ समजुतींना? खेळायला येता का म्हटले तर वेळ मिळत नाही म्हणून सांगतात. कसले हे प्राणी म्हणायचे! जीवनात क्रीडेचा-करमणुकीचा आनंद ही मंडळी केव्हा उपभोगणार? वेळ नाही म्हणतात आणि दौऱ्यात

दिवसन् दिवस व लोकांच्या गाठीभेटीत तासन् तास घालवीत असतात. त्यांतला अर्धा तास वेळ नाही का काढता येणार ? पण त्याला इच्छा हवी, सक्तीचा काही उपयोग नाही.

निरोगी शरीरामुळे मन निरोगी राहते व निरोगी मनाचे विचारही निरोगी राहतात. आता पहावे तर बहुतेक मंत्र्यांजवळ कपड्यांच्या बॅगेबरोबर औषधांची एक बॅग असते आणि जेवणापूर्वी व जेवल्यानंतर गोळ्यांचा मारा सारखा चालू असतो. बरेचजण मधुमेहाने, हृदयविकाराने पछाडलेले असतात. शरीराला व्यायाम देऊन आणि आहाराबाबत नियमन करून आजार घालविण्याऐवजी ही मंडळी औषधाने आजाराचे नियमन करीत असतात. सकाळी उठून दोनतीन मैल फिरायला जातील तर शपथ ! सकाळी लवकर कोणी उठायचे ! उशिरा झोप आणि उशिरा जाग. मग चहापाणी, दाढी, आंघोळ आणि भेटणाऱ्यांशी गप्पा-गोष्टी यांतच सकाळ निघून जाते. दुपारी ऑफिस, सायंकाळी घरी. पुन्हा गाठीभेटी व रात्री थोडे वाचन व झोप. अशा दिनचर्येत प्रकृतीकडे पाहायला आणि व्यायामाकडे लक्ष द्यायला कोणाला फुरसत आहे ! शरीराची गाडी जोवर ढकलली जात आहे तोवर चालूच आहे. पुढचे पुढे पाहता येईल. परदेशात असे चित्र पहायला मिळणार नाही. तिकडची मंडळी काम खूप करतात, खूप खातात आणि पितातही भरपूर. कष्टात कमतरता नाही. खेळाबाबत, व्यायामाबाबत सरकार व स्थानिक स्वराज्यसंस्था खूपच लक्ष घालतात. लोकांची प्रकृती चांगली रहावी, तरुण पिढी निकोप असावी म्हणून विशेष दक्षता घेतली जाते. म्हणूनच त्यांना युद्धप्रसंगी हजारो निधड्या छातीचे दणकट-बळकट बुद्धिमान तरुण मिळतात. तिकडे मैदानाचा आणि मर्दांचा संबंध निकटचा असल्याने देशाला सैनिकांची आणि संरक्षणाची काळजी रहात नाही. आमच्याकडे मातीची लाज-मैदानाची लाज म्हणून मर्दांची वानवा. शिवबांनी हाक मारली, की शेकडो मर्द मावळे धावून जात. आता तगडे कमी आणि शूरही कमी कमी होऊ लागले असल्याने संरक्षणाची थोडी काळजी वाटू लागली आहे. महाराष्ट्रीय मंडळाच्या सैनिकीकरणाच्या प्रयत्नात त्यांना हा अनुभव पदोपदी येत आहे.

आमच्याकडे राष्ट्रीय शिस्त कमी आणि राष्ट्रीय कार्यक्षमताही कमी. या दोन्ही गोष्टींना प्रोत्साहन मिळावे, तरुणांच्या अंगी कार्यक्षमता निर्माण करावी म्हणून कै. जगन्नाथराव भोसले यांनी 'राष्ट्रीय शिस्त योजने'चा परिश्रमपूर्वक पाठपुरावा केला, तरुणांत शिस्तीची आवड निर्माण केली. पण त्यांच्या मृत्यूने त्या योजनेला ग्रहण लागले. महाराष्ट्रीय मंडळाने राष्ट्रीय कार्यक्षमतेकडे लक्ष देऊन मुले तयार केली आणि दर वर्षी पाचपंचवीस पारितोषिके मिळवून व्यायामशाळेची कीर्ती

द्विगुणित केली आहे. या मुलांना त्यांची पारितोषिके माझ्या हस्ते द्यावीत अशी योजना व्यायामशाळेचे दोन उत्साही तरुण कार्यकर्ते श्री. हरिहर चितळे व बाळासाहेब अनपट यांनी ठरविली व सदर कार्यक्रम माझ्या हातून घडवून आणला. या प्रसंगी श्री. शि. वि. दामले यांनी महाराष्ट्रीय मंडळाच्या स्थापनेची, कार्याची, विस्ताराची जी माहिती सांगितली ती मोठी उद्बोधक होती. श्री. दामले यांना मी गेली तीस वर्षे पहात आहे, ओळखत आहे. महाराष्ट्रीय मंडळाच्या व्यायामकार्याला त्यांनी एकदा जे वाहून घेतले ते काम सातत्याने आणि चिकाटीने ४० वर्षे चालू ठेवले आहे. 'खेळात राजकारण नको' याबद्दल ते जेवढे आग्रही आहेत तेवढेच मुलां-मुलींना, तरुण-तरुणींना व्यायाम हवा, त्यांनी रोज खेळले पाहिजे, शरीर निकोप ठेवले पाहिजे असाही त्यांचा आग्रह असतो. तिसरा आग्रह इंग्रजी शिक्षणाचा आणि चौथा सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा. या त्यांच्या आग्रहांना कोणी वेड म्हटले तरी त्यांना त्याची पर्वा नसते. या आग्रहातूनच त्यांनी महाराष्ट्रीय मंडळाचा लौकिक भारतभर पसरविला आहे आणि मंडळाची वाढ करून त्याला एक वजनदार—भारदस्त संस्थेचे रूप प्राप्त करून दिले आहे. व्यायामसंस्थेला आर्थिक अडचण नको म्हणून इमारतीच्या रूपाने दरमहा उत्पन्नाचे साधन निर्माण केले आणि वाढत्या शहरात जागा अपुरी पडू नये म्हणून गुलटेकटीकडे ३२ एकर विस्तीर्ण जागा घेऊन ती वेगवेगळ्या उपयोगाला आणली आहे. पूर्व भागातील तरुणांना संधी मिळावी हा संस्थेचा उद्देश स्तुत्य असल्याने गुलटेकडीची व्यायामशाळा अल्पावधीत लोकप्रिय झाल्याशिवाय राहणार नाही.

तरुण पिढी उत्साही, निर्व्यसनी, सशक्त, स्वावलंबी, निश्चयी, बेडर आणि स्वाभिमानी बनावी, बौद्धिक शिक्षणाबरोबर शारीरिक शिक्षणही तिला मिळावे म्हणून पारतंत्र्याच्या काळात पंचविशीतील १७ तरुणांनी सुरू केलेले महाराष्ट्रीय मंडळ आज स्वातंत्र्यात किती उपयुक्त ठरत आहे याची आज मंत्र्यांना, अधिकाऱ्यांना, पक्षोपपक्षांच्या, राजकीय नेत्यांना फारशी कल्पना नसली तरी पुण्याच्या तरुण पिढीला खास कल्पना आहे. कै. ल. ब. भोपटकरांचा पुढाकार आणि कै. तात्यासाहेब केळकरांचे प्रोत्साहन लाभलेली ही व्यायामसंस्था महाराष्ट्राला भारतात विविध क्षेत्रांत मोठा करण्यास निश्चित मदत करीत आहे. कार्याध्यक्ष र. बा. फडके, जनरल सेक्रेटरी शि. वि. दामले, जॉइंट सेक्रेटरी कॅ. शं. ग. चाफेकर आणि आठवले, करंदीकर, लागू, जेजुरीकर आदींचे विस्मरण मंडळात व्यायाम घेतलेल्या पुण्यातील शेकडो तरुणांना कदापि होणार नाही. यातील कित्येक मंडळींनी निवडुंगे हाताने तोडून जमीन साफ केली आहे. रस्त्यावर उभे

राहून तरुण मुलांना धरून व्यायामाला आणले आहे. देशी खेळांकडे दुर्लक्ष केले जाऊ नये म्हणून प्रयत्नांची शिकस्त केली आहे.

अशा या ख्यातनाम जुन्या व्यायामसंस्थेच्या अडचणींचा कॉर्पोरेशन आणि सरकारने सहानुभूतीने विचार करून त्या तावडतोब दूर का करू नयेत याचे आश्चर्य वाटते. वास्तविक तरुण आणि व्यायाम यांकडे स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाने स्वतः अधिक लक्ष द्यावयास हवे, विविध तरतुदी करायला हव्यात. तथापि त्याकडे लक्ष न देता भलत्यासलत्या गोष्टीत वेळ व पैसा खर्च करणाऱ्या या मंडळींनी व्यायामसंस्थांकडे अधिक आपुलकीने पाहणे जरूर आहे. कॉर्पोरेशनने आपला बसमार्ग स्वारगेट ते गुलटेकडीपर्यंत अद्याप का बरे नेऊ नये? तसेच संस्थेच्या मैदानातील घाण बुजविता येत नसेल तर तेथे पाण्याच्या तलावासाठी मदत दिली गेली तर केवढे काम होईल! शंकरशेट रोड हा वसाहतीतील रस्त्याशी कॅनॉलखालून रस्ता नेऊन जोडला तर व्यायामशाळा शहरातील मुलांना कितीतरी जवळ येईल. पण हे सारे नगरपित्यांच्या डोक्यात शिरले पाहिजे ना! त्यांना तर राजकारणाशिवाय आणि सत्तेशिवाय दुसरे काही दिसत नसल्याने त्यांचे व व्यायामाचे वावडे असणे साहजिक झाले आहे. व्यायामशाळेतील मुलांना प्रशस्तिपत्रके वाटून झाल्यावर मी भाषणात थोडक्यात सार सांगितले की, "देशाचे रक्षण जर समर्थपणे करायचे असेल तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे व्यायामही सक्तीचा करून नागरिकांची शरीरे आणि मने निकोप केली पाहिजेत. याची अंमलबजावणी प्रथम राज्यकर्ते, व्यापारी, कारखानदार मंडळींकडून केल्यास अधिक चांगले. खेळाडू वृत्ती प्रत्येकाने अंगी बाणविली तर आजची भांडणे पुष्कळ कमी होऊन देशाचे रूप झपाट्याने बदलल्याशिवाय राहणार नाही."

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.............................. दि: ..........................
क्रमांक .............................. नों. दि: ..........................

— ७ —

# “ भोसरीचा भोळा भाव ! ” : १ :

गेल्या रविवारी गोकुळ अष्टमीला रात्री १२ वाजता कृष्णजन्म झाला आणि उपवासाचे पारणे भाविकांनी दुसऱ्या दिवशी सोमवारी सोडले. मी काही जन्माष्टमीचा उपवास केला नव्हता. तथापि, पत्नीच्या आग्रहास्तव रात्री १२ पर्यंत जागून कृष्णजन्माचा प्रसाद खाल्ल्यानंतरच निद्रेच्या आधीन होऊ शकलो. तोवर रेडिओवर कुठल्यातरी स्टेशनने कृष्णजन्माची कथा ऐकविली तर पुणे केंद्राने ‘ वेणूसुधा ’ ही संगीतिका ऐकविली. त्या दिवशीची ही संगीतिका ना कृष्णमहात्म्य सांगू शकली ना मनरंजन करू शकली. वेगवेगळ्या बदसुरात गाण्यामागून गाणी म्हटली गेली एवढेच. त्यापेक्षा कंसाच्या कोठडीत झालेला कृष्णजन्म, नंदाचे घरी त्या बालकृष्णाच्या बाललीला, गोपीबरोबरच्या रासक्रीडा आणि कौरवपांडव युद्धाचे निमित्ताने अर्जुनाला सांगितलेले ते उदात्त जीवनविषयक तत्त्वज्ञान याच्यातला काही भाग कथन केला असता तर किती तरी चांगले झाले असते. पण आमच्या रेडिओची आणि लोकांच्या अपेक्षेची नेहमीच फारकत झालेली. कोणीतरी कार्यक्रम निवडतो, कोणीतरी ठरवितो, कोणीतरी करून दाखवितो आणि कोणाला तरी पैसे मिळून जातात. स्टेशन

ठराविक तास चालू राहिले म्हणजे झाले. राधेचा घनःश्याम हाच भगवद्गीता सांगणारा आठवा अवतार भगवान श्रीकृष्ण होता याबद्दल काही विचारवंतांचे दुमत असले तरी आमच्या पोथ्या–पुराणांतून ज्या कृष्णभक्तीचे वर्णन आहे ते रेडिओवरून ऐकवायला काय हरकत होती? 'परित्राणाय साधनाम् विनाशायच दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ।' असे सांगणाऱ्या त्या भगवंताचे भक्त महाराष्ट्रात जागजागी मोठ्या संख्येने विखुरले आहेत. ते सालोसाल जन्माष्टमी मोठ्या भक्तिभावाने साजरी करतात हे एक महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असून पुढच्या वर्षी ते वैशिष्ट्य आकाशवाणीने अवश्य पहावे.

त्यासाठी त्यांना पुण्यापासून फार दूर जायला नको. पुणे–नासिक रस्त्यावर ९–१० मैलांवर भोसरी नावाचे गाव आहे. तेथे कृष्णजन्मानिमित्त तो सप्ताह पाळण्यात येतो, अष्टमी–नवमीला जो जन्माष्टमी सोहळा होतो तो एकदा जरूर पहावा. ज्ञानदेव-तुकारामादी संतांनी जे भक्तीचे पीठ निर्माण केले त्या पीठाचे कार्य आमच्या ग्रामीण भागाने भक्तिभावाने आणि प्रामाणिकपणे पुढे चालू ठेवले आहे. आषाढी–कार्तिकीच्या आळंदी–पंढरीच्या यात्रेला कोणी हसले, कोणी नाके मुरडली, कोणी टीका केली तरी त्या यात्रात खंड पडला नाही, की त्या रोडावल्या नाहीत. भौतिक क्षेत्रात खूप प्रगती झाली, मानवाने यंत्रतंत्रावर मात केली तरी अध्यात्माचे महात्म्य आणि उपयुक्तता काही कमी नाही झाली. शिक्षणाचे नवे संस्कार झाले म्हणून काही जुने चांगले संस्कार नष्ट नाही झाले. खेडी शहराचे जवळ आली आणि खेड्याचे आसपास उद्योगधंद्यांचे जाळे पसरले गेले तरी त्या औद्योगिक बकाल जीवनाचा आमच्या ग्रामीण जीवनावर अद्याप तरी प्रतिकूल परिणाम नाही झाला. याची साक्ष भोसरी गावात पहावयास मिळते, अनुभवास येते.

भोसरी येथील ग्रामसेवाविद्यार्थी मंडळाच्या निमंत्रणावरून सोमवारी भोसरीला जाण्याचा फार दिवसांनी योग आला. विद्यार्थ्यांच्या या मंडळाच्या वाढदिवस समारंभाला गेलो खरा, पण त्या निमित्ताने मी गावातील दहीहंडीच्या आणि गोपालकाल्याच्या कार्यक्रमातही भाग घेतला. तसेच भजनी मंडळ, तरुण विकास मंडळ, तालीम मंडळ आदी संस्थांचे कामकाजही जवळून पाहू शकलो. गावातील एकी, सार्वजनिक कामाची हौस आणि तडफ पाहून समाधान वाटले. मी गावात शिरलो तेव्हा दुरूनच मला टाळ–मृदंगाचा आवाज ऐकू आला. सप्ताह समाप्तीनिमित्त भजनी दिंडी गावातून फिरून विठ्ठल-रखुमाईच्या देवळाकडे दहीहंडीचे कार्यक्रमासाठी निघाली होती. तत्पूर्वी दिंडीने भैरवनाथाच्या मंदिरात जाऊन नाथापुढे एक–दोन अभंग गायिले. टाळकरी, माळकरी आणि वारकरी यांचा तो त्रिवेणी संगम पाहिल्यावर फार बरे वाटले. चार मृदुंगाच्या साथीत म्हटलेला अभंग आणि

त्याला दिलेली चाल खरोखर श्रवणीय होती. ‘ जयजय विठोबा रखुमाई रखुमाई ’ चा ध्वनी निनादून त्याने सारे वातावरण भक्तिमय करून टाकले. आरती झाल्यावर भजनीमंडळी विठोबाच्या देवळात आली. तेथे दहीहंडी फोडल्यानंतर बुवांनी तुकाराममहाराजांच्या गाथेतील कृष्णभक्तीपर अभंग म्हटले आणि शेवटी ‘ ज्ञानियाच्या राजाची ‘ आरती ज्ञानराजा, महाकैवल्य तेजा, सेविती साधुसंत, पायी ठेवली माथा, आरती ज्ञानराजा ’ ही आरती आणि ‘ युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ’ ही आरती होऊन सप्ताहसमाप्ती झाली आणि सर्वांना प्रसाद वाटून झाल्यावर बुवांच्या पायांवर डोके ठेवून भाविक मंडळी घरोघर परतली.

गावचे श्री. माने पाटील हे चांगले गायक आहेत. अभंगाला त्यांनी दिलेली चाल व त्यांचा आवाज यांचा सुंदर मिलाफ होत होता. बुवा गावचेच एक रहिवासी. त्यांचे गाथा–ज्ञानेश्वरीचे पाठांतर चांगले वाटले. गांवकरी त्यांना चांगले मानतात. भजनी मंडळाचे लोक खादीधारी दिसले. प्रत्येकाच्या गळ्यात तुळशीची माळ आणि डोक्यावर गांधी टोपी. गावात माळकऱ्यांची संख्या अधिक दिसली. भोसरी, फुगेवाडी, दिघी, धानोरी, लोहोगाव आदी गावांच्या परिसरात भक्तिसांप्रदायाची मंडळी अधिक आहेत. कारण या भागात संतशिरोमणी तुकाराम महाराजांचे येणे–जाणे असे. या प्रत्येक गावात विठ्ठल-रखुमाईचे देऊळ व भजनी मंडळ सापडणारच. शिवाय पालखीच्या वेळी वारकऱ्यांना जेवण दिले जाणार. आळंदी आणि देहू या दोन्ही क्षेत्रांचे या गावावर अनेक वर्षांचे संस्कार असून ते अजूनही टिकवून ठेवलेले आहेत.

देवळात भजन चालू असता मलाही क्षणभर वाटले की, आपण उठावे आणि गळ्यात टाळ अडकवून अभंगाला साथ द्यावी. मृदंगाच्या स्टँडपुढे उभे राहून मृदंगवादन करावे. बुवांप्रमाणेच तुकोबांच्या अभंगांचे निरूपण करावे. ‘ आरती ज्ञानराजा, महाकैवल्य तेजा ’ मोठ्याने म्हणावे. गेल्या पंचवीस–तीस वर्षांत मी सारे विसरून चाललो आहे. लहानपणी मी गळ्यात टाळ अडकवून भजनात भाग घेतला आहे आणि मृदंगवादन शिकण्याच्या प्रयत्नात एक नवा पखवाज फोडलेला आहे. तुकोबांचे शंभरावर अभंग पाठ होते आणि ज्ञानदेवादी संतांच्या आरत्याही तोंडपाठ होत्या. माझ्या घरासमोरील मंडपात तुकारामबीजेच्या दिवशी होणाऱ्या कीर्तनात मी रममाण झालेलो आहे आणि गावातील विठ्ठल-रखुमाईच्या मंदिरात आळंदीचे ह. भ. प. मारुतीबुवा गुरव यांच्या कीर्तनात कित्येक रात्री तल्लीन झालेलो आहे. भक्तिपंथाचा एक चहाता म्हणून तुकाराम-नामदेवांचे अभंग वाचताना, ज्ञानेश्वरीतील ओव्यांचे अर्थ समजावून घेताना मी दैनंदिन जीवनाला उपयुक्त असे उदात्त तत्त्वज्ञान शिकलो आहे. तुकोबांची गाथा

म्हटली, की तिला डोक्यावर घेऊन नाचावे असे मला अजूनही वाटते. आजचे सारे उद्योग सोडावेत, दैनंदिन कटकटीतून बाहेर पडावे आणि इंद्रायणीच्या डोहावर त्या शीतल वृक्षछायेत बसून गाथेतील अभंगांत, ज्ञानेश्वरीतील ओव्यांत मनपुराद डुंबावे असे वाटते. वानप्रस्थाश्रमाची कल्पना मला मान्य असल्याने मी मनाशी ठरवून ठेवले आहे की, साठीपर्यंत पोहोचू शकलो तर देहूला इंद्रायणीकाठी डोहा-जवळ एक झोपडी बांधून तेथे अध्ययन आणि अध्यापन करावे. भागवतधर्माची पताका सतत उंचउंच फडकवीत ठेवण्यास हातभार लावावा. संत मीराबाईंनी जसे सारे पाश तोडून आपले जीवन प्रभूला अर्पण केले तसे आपणही भौतिक मोहजाल दूर सारून अध्यात्माला जवळ करावे.

श्रीकृष्ण म्हणजे आमचा विठोबा, पंढरीनाथ, रखुमाईचा पति. त्या विठोबाची भक्ती म्हणजेच कृष्णभक्ती, ही कृष्णभक्ती डोळसपणे केली तर काय कमी पडेल ? कृष्णाने दिलेले भगवत्‌गीतेचे मौलिक भांडार ज्ञानदेवांनी प्राकृतात आणल्यावर तुकोबांनी त्यावर मराठीचा साज चढविला आणि ते सर्वसामान्य माणसाला लुटण्याची संधी प्राप्त करून दिली. गेली अनेक शतके लोक ते धन लुटीत असताही संपत नाही, उलट वाढत आहे. कारण त्यामागील भक्तिभाव, भोळाभाव, देवावरील श्रद्धा. भोसरीकरांचे ते सश्रद्ध मन त्यांना काहीही कमी पडू देत नाही. दिवसभर कष्ट करावेत आणि रात्री पांडुरंगाचे नाव घेऊन दुसऱ्या दिवसाच्या स्वागताची तयारी करावी असे अनेक वर्षे चालले आहे. जमिनी गेल्या, कारखानदारी उभी राहिली, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले व्यवसाय नष्ट झाले तरी भोसरीकर डगमगले नाहीत. उलट त्यांनी गावाला पुढेपुढे नेण्याचा प्रयत्न सातत्याने चालू ठेवला. ‘ ठेविले अनंते तैसेची रहावे । चित्ती असू द्यावे समाधान ॥ यातील चित्ती समाधान ठेवून ते पुढे चालले आहेत.

गावात वीज आली आहे. रस्ते, आरोग्याची सोय झाली आहे. मुलांची संख्या वाढून शाळांची सख्याही वाढू लागली आहे. हनुमान तरुण मंडळ. जय भोले नाट्य मंडळ, फुगे–माने तालीम संघ, आदर्श वाचनालय, कॉंग्रेस कमिटी, ग्रामसेवा विद्यार्थी मंडळ आदी संघटनांनी गावाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीला चांगलाच हातभार लावला आहे गांवात लांडे, लांडगे, गव्हाणे, फुगे आदी मंडळी असून त्यांच्यातील बबनराव लांडे, रामचंद्र लांडगे, सदाशिवराव फुगे, दत्तोबा लांडगे, सोपानराव फुगे, सयाजीराव लांडगे, धोंडिबा लांडे, नारायणराव फुगे, कृष्णराव फुगे, सोमा लायगुडे, सोपानराव लांडे आदी तरुण मंडळी मोठ्या उत्साहाने गावाच्या विकासात भाग घेत आहेत. गावातील जुनी पिढी आणि नवी पिढी यांचे चांगले सामरस्य आहे. राजकीय मते थोडी भिन्न

असली तरी गावाच्या कामात ती मते आड येत नाहीत, हे मला प्रत्यक्ष अनुभवायास मिळाले. वरील सर्व मंडळींनी आग्रहाने बोलावून नेऊन माझा सत्कार केला आणि उत्तेजनाची अपेक्षा व्यक्त केली. एवढेच नव्हे तर गावाचा जुनापुराणा मोटा तलाव गाळ साचून उथळ बनला असल्याने उन्हाळ्यात जनावरांच्या पाण्याचे हाल होतात, तेव्हा तलावातील गाळ काढण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद व सरकार यांनी मदत करावी एवढा निरोप देण्याचे कामही माझ्यावर सोपविले. शक्य तो स्वावलंबनाने प्रगती करण्याचा गावाचा निर्धार असल्याने गावाने सरकारी मदत अद्यापपर्यंत घेतलेली नाही. तथापि योग्य कामासाठी त्यांना शक्य तेवढी मदत मिळणे जरूर आहे याची खात्री पटली.

ग्रामसेवा विद्यार्थी मंडळाचे काम खरोखर वाखाणण्यासारखे आहे. गरीब विद्यार्थ्यांना मदत–मार्गदर्शन करण्यासाठी ४ वर्षांपूर्वी स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाने आतापर्यंत चांगले काम केले आहे. रमेश डोळस, कृष्णा फुगे आदी विद्यार्थी कळकळीने काम करताना पाहून समाधान वाटते. शाहू मंदिर महाविद्यालयातील बाळू लांडगे हा विद्यार्थी भोसरीचाच असल्याचे मला मोठ्या अभिमानाने सांगण्यात आले. श्री. सोनवणे गुरुजी आणि काँग्रेसचे एक जुने कार्यकर्ते श्री. विठ्ठलराव गव्हाणे यांनी मी भोसरीला येऊन विद्यार्थ्यांत व गावकऱ्यांत मिसळल्याबद्दल आनंद व्यक्त केला. तीन तास केव्हा निघून गेले ते समजले नाही. गावकऱ्यांनी मला प्रेमाने निरोप दिला आणि मी रात्री ८॥ ला भोसरी गाव सोडून पुण्याकडे निघालो. भोसरीचा तो भोळा भक्तिभाव पहाण्यासारखा आहे, अनुभवण्यासारखा आहे. तुकोबांनी पांडुरंगाला म्हटल्याप्रमाणे 'वेडेवांकुडे गाइन । परि तुझे नाम घेईन' याचा प्रत्यय मला आला. भोसरीकरांची रसाळ वाणी ऐकल्यावर रेडिओवरील आदल्या रात्रीची 'वेणुसुधा' संगीतिकेतील रडगाणी विसरायला फारसा वेळ लागला नाही.

• • •

## सिद्धेश्वर सहवासात शिक्षण ! : २ :

वेताळे, सह्याद्रीच्या कुशीत वसलेले एक छोटे खेडेगाव. समोर भीमा नदी आणि पाठीमागे दूर अंतरावर भीमाशंकर. खेडहून कान्हेवाडीपर्यंत गेले, की दक्षिणेकडे वळायचे आणि नदीपार करून गावात शिरायचे. तुकारामबुवांचे टाळकरी गंगारामबुवा मवाळ यांच्या कडूस गावावरूनही वेताळ्याला जाता येते. गावाच्या वेशीशी उभे असलेले सिद्धेश्वराचे मंदिर हेच गावचे ग्रामदैवत. या देवळाजवळ उभे राहून आजूबाजूला नजर टाकली, की डोंगरांच्या रांगांनी वेढलेला रम्य परिसर दृष्टीस पडतो आणि वेताळ्याचा हेवा वाटतो. गावाला जायला मोटाररस्ता नाही म्हणून गावाची सृष्टिशोभा कायम राहिली एवढे खरे. नाहीतर त्याचे झाले असते चास किंवा वाडा गाव. मोटार-ट्रकची सारखी वर्दळ आणि धुळींचे एकामागून एक लोट. खेडी रस्त्याने जोडली गेली, की त्यांचा विकास होतो, प्रगती होते हे खरे. पण त्या प्रगतीबरोबर त्या खेड्यांचे पूर्वापार वैशिष्ट्य नाहीसे होते आणि त्यांचा चेहरा-मोहरा बदलून ती नक्कलभ्रष्ट बनतात. खेड–आंबेगाव–जुन्नरच्या मावळ भागाचे आणि त्याला लागून असलेल्या काही गावांचा चेहरा अद्याप बदललेला नाही एवढे खरे आणि म्हणूनच ती गावे आणि त्यांचा परिसर मला मनापासून आवडतो. वाडाशिरसगावहून पुढे भोरगिरीमार्गे भीमाशंकरला जाता आले तर मी तो मार्ग पसंत करीन. कारण या भागातील पर्वतराजी आणि वनराजी मनाला मोह पाडते. कधी कधी शिकारही नजरेला पडते आणि मग बंदुकीला हात घालण्याचा मोह होतो. बंदुकीचा आणि माझा आता वीस–पंचवीस वर्षे संबंध तुटला आहे. कॉलेजात यु. टी. सी. मध्ये असताना 'गुडशॉट' म्हणून माझी पाठ थोपटली जाई. फलटणनजिकच्या रानात शिवाजीराजे नाईक-निंबाळकर यांच्यासमवेत शिकारीला जाऊन काळविटावर आणि रानडुकरावर बार टाकल्याचे मला चांगले स्मरते. म्हणूनच कधीमधी भामनाथाच्या किंवा भीमाशंकरच्या बाजूला गेले, की शिकारीची इच्छा झाल्याशिवाय रहात नाही. मंचर–आंबेगाव–पोखरीच्या बाजूने गेले, की रस्त्यामुळे जनावर दिसत नाही, पण भोरगिरीच्या बाजूने हमखास पहावयास सापडते. म्हणून पुष्कळ वेळा असे वाटते, की खेड तालुक्यातील भोरगिरीहून जे निघावे ते जुन्नर तालुक्याच्या निमगिरीवर जाऊन धडकावे. भिल्ल–महादेव कोळ्यांच्या समवेत चार-दोन दिवस रहावे आणि निसर्गाशी एकरूप व्हावे !

पण एवढे भाग्य कुठले आले ! वेताळयाला पोहोचल्यापासून सारखे घड्याळाकडे लक्ष. चारला पोहोचल्यावर सातला तेथून परतायचे होते. कारण पुण्यात रात्री ९ ला परत येणे जरूर होते. रयत शिक्षणसंस्थेचे सिद्धेश्वर विद्यालय, त्या हायस्कूलचे स्नेहसंमेलन आणि प्रमुख पाहुणा म्हणून मला अगत्याचे बोलावणे म्हणून मी वेळात वेळ काढून गेलेलो. तीन-चार तास विद्यार्थ्यांच्या–गावकऱ्यांच्या समवेत काढावे, त्यांच्या अडीअडचणी, प्रश्न, जिद्द, महत्त्वाकांक्षा समजावून घ्यावी आणि आपल्याजवळची काही माहिती–अनुभव देता आले तर द्यावे ही माझी निमंत्रण स्वीकारण्यामागची भावना. जेथे शाळा-कॉलेजे आणि विद्यार्थी तेथे जावे, जेथे किसान–कामगार तेथे हजर रहावे ही माझी भूमिका. कारण समाजातील हेच घटक महत्त्वाचे–मानाचे आणि उपयुक्ततेचे. समाजाची–देशाची जिम्मेदारी या मंडळींवर नाही तर मग कोणावर ? पुण्या-सारख्या शहरात रोज पाच-पंचवीस कार्यक्रम होत असतात आणि त्यासाठी पाहुणेही डझनावरी तयार असतात. तथापि निमगिरीसारख्या–भोरगिरीसारख्या दूरच्या आडवळणी गावी कोण जाणार ! ज्याला या खेड्यत जनतेबद्दल आस्था–अभिमान असा माझ्यासारखा मुशाफिर जाणार. तीस वर्षांपूर्वीचा ग्रामीण भाग आणि आजचा ग्रामीण भाग यात केवढातरी बदल झाला आहे आणि रोज घडतच आहे. मी माझ्या गावी १९३० साली मारुतीच्या देवळातील शाळेत जमिनीवर बसून शिकत असे. आता प्राथमिक शाळांना सुरेख इमारती झाल्या आहेत, गावात दवाखाना बांधला गेला आहे, काही ठिकाणी वीजेची आणि पाण्याच्या नळाची पण सोय झाली आहे. रस्ते झाल्याने एस्. टी. मोटारी-ट्रक्स दिसू लागल्या आहेत. हा बदल ग्रामीण जीवन बदलवीत आहे. या बदलाचे दर्शन घेऊन दुसऱ्याला घडविणे जरूर आहे असे मला वाटते. जी मंडळी म्हणतात की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सतरा वर्षांत काही फारसे घडू शकले नाही, त्यांना ग्रामीण भागाचे परिवर्तन दाखविले गेले पाहिजे. खेड्यात प्राथमिक शाळेबरोबर हायस्कूलही निघून तालुक्याच्या ठिकाणी कॉलेजे सुरू झाली आहेत. सहकारी सोसायट्या आणि कारखान्यांनी शेतकरी हा व्यापारी आणि कारखानदार बनू लागला आहे. पुणे–मुंबईतील वास्तव्याने त्याने आपले घर व त्याबरोबर गाव नवे बनविण्याचा प्रयत्न चालविला आहे. या स्थित्यंतराचे योग्य मूल्यमापन करून ते नागर जनतेच्या पुढे ठेवले जाणे जरूर आहे.

गेल्या पंधरा-वीस वर्षांतील शैक्षणिक प्रसार पाहिला, की समाधान वाटू लागते. मुले शिकत आहेत आणि प्रौढही शिकत आहेत. शिक्षणसंस्थांची जागजागी शाळा आणि कॉलेजे काढण्याबाबत स्पर्धा चालू झाली आहे. रयत शिक्षण संस्थे-सारख्या संस्थेने प. महाराष्ट्रातील बरेच जिल्हे आपल्या शाळा–कॉलेजांनी व्यापले

आहेत. कै. कर्मवीर भाऊराव पाटलांनी लावलेला हा शिक्षणाचा वृक्ष एवढा मोठा झाला आहे की, त्याच्या पारंब्यांचेही मोठे वटवृक्ष बनू लागले आहेत. विवेकानंद शिक्षणसंस्थाही हळूहळू आपल्या शाखा वाढवू लागली आहे. याखेरीज जिल्ह्याच्या संस्था, स्थानिक संस्था या हायस्कुले-कॉलेजे काढीत आहेतच. हे सारे काम पाहिले, की वाटते ज्ञानाची भूक सारखी वाढत असून उपेक्षितांना संधी मिळून ती मंडळी आपला विकास साधीत आहेत. संख्यावाढीबरोबर गुणवाढी-वरही लक्ष देणे जरूर आहे, याचा विसर या संस्थांना पडलेला नाही. कारण गुण-वत्तेलाही मोठे महत्त्व आहे. ग्रामीण आणि नागर भागांतील परिस्थितीत फरक असतो हे खरे. आणि म्हणूनच दोन्ही ठिकाणच्या विद्यार्थ्यांची सारखी तुलना करणे योग्य होणार नाही. तथापि याचा अर्थ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेकडे दुर्लक्ष केले तरी चालेल असा नव्हे. हा विद्यार्थी इंजिनिअरिंगकडे, मेडिकलकडे, शेतीकडे आकर्षिला जाऊन तेथे प्रवेशाची संधी मिळून त्याचे शिक्षण संपल्यावर त्याला ग्रामीण भागांतील विकासकार्यात टाकता आले पाहिजे. कोणाही विद्यार्थ्यांची गरिबी त्याच्या शिक्षणाच्या इच्छेच्या आणि बुद्धिमत्तेच्या आड येता कामा नये. हुषार विद्यार्थी निवडून त्याची जबाबदारी सरकारने उचलून त्यांना समाजाच्या परिवर्तनाच्या कामी, उन्नतीच्या कामी लावले पाहिजे. हे कार्य आज होत नाही, पण होणे आवश्यक आहे. मी जेव्हा जेव्हा ग्रामीण भागात जातो, तेथील विद्यालये आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना या ना त्या निमित्ताने भेटतो तेव्हा मला विश्वास वाटू लागतो की, देशाचे आणि समाजाचे हे उद्याचे आधारस्तंभ. देशाला हवे तसे बनविण्याची जबाबदारी सरकारची आणि त्याचबरोबर समाजाची पण आहे. सरकार आपल्या परीने एक-एक पाऊल उचलीत आहे, पण समाज आणि समाजाने स्थापन केलेल्या संस्था मात्र आपल्या कर्तव्याबाबत तेवढ्या जागरूक दिसत नाहीत.

वेताळे येथे रयत शिक्षणसंस्थेने हायस्कूल सुरू केले म्हणून पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना विद्यालयीन शिक्षणाची संधी लाभू शकली. वाडा येथे हायस्कूल निघाले म्हणून मावळ भागातील विद्यार्थ्यांची आणि इंग्रजीची ओळख होऊ शकली. तीच गोष्ट चासची आणि दावडीची. एका खेड तालुक्यात ९ हायस्कुले ही काही लहानसहान गोष्ट नव्हे. नगर जिल्ह्याच्या श्रीरामपूर, राहुरी, रहाता, कोपरगाव भागात हायस्कुल निघणे आणि पुणे जिल्ह्याच्या वेताळे, बोरी किंवा धामणीसारख्या आडबाजूच्या छोट्या गावी हायस्कुल निघणे वेगळे. या आडगावी जाऊन राहणारे शिक्षक आणि त्यांचे विद्यादानाचे कार्य खरोखर प्रशंसनीय आहे. गावचा नाही की गावकऱ्याची ओळख नाही. पण कामच असे की, सर्वांना आकर्षित करणारे-एकत्रित आणणारे. म्हणूनच शाळा उभ्या रहात आहेत, वाढत

आहेत. गावकरी आपल्या परीने मदत करीत आहेत. ही मदत कमी लेखता येणार नाही. शिक्षणसंस्थांना त्या त्या गावाचे आणि आसपासच्या खेड्यांचे सहकार्य–सहाय्य फार आवश्यक आहे. नाहीतर संस्था सुरळित चालणे बिकट. म्हणूनच सदरची शिक्षणसंस्था गावच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनविणे जरूर आहे. संस्थेचे तोंड एकीकडे आणि गावाचे दुसरीकडे असे झाल्यास वाढ खुंटून रोवलेले बीज वाया जाण्यास वेळ लागणार नाही. ध्येय हे धंदा होऊ शकत नाही याची जाणीव सर्वांनीच मनाशी ठेवणे आवश्यक आहे. शहरात शिक्षण हा जसा धंदा होऊ पहात आहे ती अवस्था खेड्यांत येता कामा नये आणि म्हणूनच लायब्ररी आणि लॅबोरेटरीवर अधिक लक्ष दिले जाणे जरूर आहे. एकवेळ इमारत साधी असली तरी चालेल, पण ग्रंथालय आणि प्रयोगशाळा भव्य हवी आणि तिचा उपयोग विद्यार्थी मोठ्या संख्येने घेत असल्याचे दृश्य दिसावे. मी तरी जागोजागच्या शिक्षणसंस्थांना हीच आग्रहाची सूचना करीत असतो.

कोपरगाव तालुक्यात सहकारी साखर-कारखाने तीन आणि रयत शिक्षण-संस्थेची हायस्कुले चार-पाच. या कारखान्यांकडून हायस्कूल्सना चांगली मदत होत आहे. शिक्षणफंडातून दरसाल साहाय्य होत आहेच. त्याचा योग्य उपयोग या विद्यालयांनी करून घेतला पाहिजे. कारखानदारी ही त्या भागाची सर्वांगीण सुधारणा करणारी साधने बनली पाहिजेत. मग ती सामाजिक सुधारणा असो वा शैक्षणिक सुधारणा असो. शाळा-दवाखाना-रस्ता आणि वसतिगृहाच्या उभारणीस कारखान्यांनी हातभार लावला तर त्या भागाची केवढी तरी सोय होऊ शकेल. नगर जिल्ह्यात ही दृष्टी दिसून येते ही चांगली गोष्ट आहे. जी सभासद मंडळी डायरेक्टर बोर्डाच्या निवडणुकीसाठी पाच-पन्नास हजार रुपयांचा चुराडा दर दोन वर्षांनी सहज करतात, त्यांनी पाच-दहा हजार रुपये शैक्षणिक संस्थांना द्यायला काहीच हरकत नाही. कारण त्या भागातील विद्यार्थ्यांनाच शिक्षणाची संधी मिळून पुढे ती मोठी होणार आहेत आणि त्या भागाचा लौकिक वाढविणार आहेत. रहात्याच्या शारदा विद्यामंदिर स्नेहसंमेलन प्रसंगी प्रसिद्ध बागायतदार–शेतकरी रा. ब. बोरावके यांनी जे विचार मांडले ते मला कितीतरी मोलाचे वाटले. रावबहादूर बी. ए. एम्. ए. नसतील; तथापि त्यांची शिक्षणाबद्दलची आस्था फार मोठी आणि मोलाची आहे. त्यांचे ज्ञान आणि अनुभव नव्या पिढीला–तरुण पिढीला उपयुक्त आणि मार्गदर्शक आहेत. अशा मंडळींचा सामाजिक व शिक्षणसंस्थांनी जरूर उपयोग करून घ्यायला हवा. सरकारनेही वेळप्रसंगी शेतीसंबंधात या मंडळींशी सल्लामसलत करायला काही हरकत नाही. रावबहादूरांशी काही वेळ बोलत असले, की जीवनविषयक तत्त्व-

ज्ञानाचा एक खडा–बोलका भाग मिळू शकतो. त्यांच्यासारख्यांच्या पिढीपासून अनुभव घेऊन आम्ही नव्या पिढीला देण्याचा जरूर प्रयत्न केला पाहिजे.

हल्ली भारतीय जीवनात राजकारणाचे जे प्रस्थ माजले आहे ते कमी होऊन इतर क्षेत्रांकडे लक्ष दिले जाणे अत्यंत जरूर आहे. जो राजकारणात किंवा राजकीय पक्षात असेल तोच शहाणा आणि कर्तबगार असे मानून राजकारणाबाहेरच्या गुणी माणसांची जी उपेक्षा केली जाते ती हिताची नव्हे. सरकारी सल्लागार समित्या असोत, वा कमिशने असोत, त्या ठिकाणी विशिष्ट मंडळींचीच वर्णी लागते आणि लावली जाते आणि अपक्ष मंडळींची कोणी फारशी दखल घेत नाही. तीच गोष्ट शहरांची आणि खेड्यांची आहे. खेड्यातल्या गुणी, हुषार, कर्तबगार माणसाकडे लक्ष दिले जात नाही. त्याचा उपयोग करून घेतला जात नाही. कारण तो प्रसिद्धीपासून, पुढे पुढे करण्यापासून अलिप्त असतो. गुणी जनांची निवड आणि त्यांचा संग्रह ज्यांच्याजवळ नाही ते पक्ष आणि त्यांचे सरकार यांची वाढ खुंठल्याशिवाय राहणार नाही. पक्षीय राजकारणापलीकडे काही समान गोष्टी आहेत आणि तिथे सर्वांनी एकत्र येणे जरूर आहे. विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या भवितव्याचा प्रश्न सर्वांच्या सारख्या जिव्हाळ्याचा आहे. पण त्याकडे कितीजण एकत्रित येऊन विचार करीत आहेत! त्या विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम-चारित्र्यनिष्ठेचे बीज रुजविण्याचा किती प्रयत्न होत आहे? धर्म आणि संस्कृती, भौतिकता आणि अध्यात्मता यांचे किती शिक्षण दिले जाते हे पाहिले की पदरी निराशा पडते.

म्हणून माझ्यासारख्याला वाटते की, जितकी अधिक मंडळी शिक्षण-क्षेत्रात पडतील, शाळा-वसतिगृहे चालवितील तेवढी हवीत. कोणी शिक्षणाला, कोणी सहकाराला, कोणी पंचायत राज्याला वाहून घेतले पाहिजे. तरच ग्रामीण भाग आणि ग्रामीण समाज यांची खरी उन्नती आणि प्रगती होईल. खेडची पंचायत समिती आणि राहत्याचा गणेश सहकारी साखर कारखाना डोळ्यांपुढे उभा राहिला, की नव्या सुशिक्षित नेतृत्वाचे आणि कर्तृत्वाचे दर्शन घडते. पण या नेतृत्वाला सत्तेच्या अभिलाषेची आणि गटबाजीची दृष्ट न लागो असे मनोमन वाटते. वेताळ्याच्या सिद्धेश्वराला आणि रहात्याजवळच्या शिर्डीच्या श्रीसाईबाबांना हीच प्रार्थना करावीशी वाटते की, ग्रामीण भागातील नेतृत्व अधिक डोळस, प्रभावी आणि कर्तृत्ववान होऊन हा महाराष्ट्र खऱ्या अर्थाने मोठा होवो!

● ● ●

## मर्द मावळा मागे राहिला ! : ३ :

मुळशी तालुक्यातील शेरे गावचे देवराव ढमाले म्हणजे एक सत्प्रवृत्त–देवभक्त माणूस. यंदा त्यांचा ७० वा वाढदिवस त्यांच्या गावी साजरा करण्यात आला. त्यांनी चारधाम यात्रा नुकतीच पुरी केल्याबद्दल त्यांचा या प्रसंगी सत्कारही करण्यात आला. काकासाहेब ढमाले म्हणजे १९२२ च्या मुळशी सत्याग्रहापासूनच्या चळवळीचा चालताबोलता इतिहास. १९२२ ते १९४२ चे दरम्यान त्यांनी गांधीजींच्या सर्व चळवळीत मनोभावे भाग घेतला आणि गांधीजीवन पद्धतीचा प्रामाणिकपणे अंगिकार केला. काकासाहेब जसे कडवे देशभक्त तसेच हाडाचे पक्के मराठमोळे. घराण्यात देशमुखी असल्याने देशमुखीचा पीळ न कळत केव्हा तरी वर उसळून यायचा आणि तो राष्ट्रीय चळवळीत विसंगत दिसायचा. १९४२ मध्ये येरवडा तुरुंगात देवराव माझे सहवासी होते. त्यांच्यामाझ्या वयात जवळ जवळ ३० वर्षांचे अंतर. तथापि, काकासाहेब मनाने निर्मळ आणि प्रेमळ असल्याने ते माझ्याशी मोकळेपणाने बोलत, माझ्याशी विविध विषयांवर चर्चा करीत. एकदा असेच नात्यावरून आणि घराण्यावरून निघाले असता देवराव बोलून गेले की, " आम्ही देशमुख आहोत, पाटील नाही, समजलात का. आमच्यात नाही असे बेटीव्यवहार होत !" त्यावर मी म्हटले, " काकासाहेब, पुरे झाली तुमची देशमुखी. तुम्हा देशमुखांच्या बायका पुण्यात दुसऱ्यांची भांडी–कुंडी करून मोलकरणीचं जीवन जगत आहेत आणि तुम्ही शहाण्णव कुळीच्या आणि पंचकुळीच्या गप्पा मारीत आहांत. तुमची देशमुखी तुमचं पोट भरणार नाही की तुमच्या मुलाबाळांना पुढे नेणार नाही. फेकून द्या तुमचा गोषा आणि मिसळा साऱ्या समाजात. देशमुख–पाटील वाद कोणालाच पुढे नाही नेणार ! "

या वादविवादाला आज २२ वर्षे होऊन गेली. त्या वेळी मी असेन २० वर्षांचा आणि काकासाहेब पन्नाशीचे आसपास. या २२ वर्षांत सर्वत्र किती तरी बदल झाला पण मावळचा मराठा काही फारसा नाही बदलला. त्याच्या प्रश्नांना गती नाही मिळू शकली, की त्याचा विकास झपाट्याने नाही होऊ शकला. देवरावांचे चिरंजीव चंद्रराव आणि पुतणे शंकरराव शिकून-सवरून शहाणे झाले, पुढारी झाले, त्यांनी मान–मान्यता मिळविली. पण मावळचा बहुसंख्य शेतकरी अजूनही होता तेथेच राहिलेला आहे. या शेतकऱ्याला पुढे आणावयाची, त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणावयाची जबाबदारी या ढमाले आणि इतर देशमुख मंडळींनी

उचलावयाची आहे. पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हे, मुळशी, मावळ या भागातील आणि खेड–आंबेगाव–जुन्नर भागातील आदिवासी यांना सामाजिक–शैक्षणिक–आर्थिक दृष्ट्या पुढे आणावयाचे आहे. या भागाचा भूगोल आणि इतिहास वैशिष्ट्यपूर्ण असला तरी त्याची सांप्रतची स्थिती केविलवाणी आहे. प्यायला पाणी नाही, पुरेशी शेती नाही, असेल त्या शेतीत फारसे पिकत नाही, रस्ते नाहीत, उद्योगधंदे नाहीत. अशा स्थितीत मावळा कसाबसा जगत आहे. एका पिढीमागून एक पिढी पूर्वपरंपरेनुसार जीवन कंठीत आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे तोरण बांधणारे शूर मावळे आज स्वातंत्र्याचे वैभव उपभोगण्यास असमर्थ ठरले आहेत. मुळशीच्या धरणाखाली ज्यांच्या जमिनी जाऊन टाटांची वीजनिर्मिती झाली, त्या विजेचा उजेड ना मावळाला अद्याप पुरेसा मिळाला, की नाही एखादी कारखानदारी मावळात निघाली. फायदा घेतला तो सारा मुंबईच्या लोकांनी. आता जेथे जेथे वीज जाऊ लागली आहे तेथे तेथे लोकांच्या डोक्यात उजेड पडून ते आपल्या भवितव्याचा गंभीरपणे विचार करू लागले आहेत.

स्वातंत्र्य मिळून १७ वर्षे झाली आणि या काळात तीन सार्वत्रिक निवडणुका पण झाल्या. मावळभागाने आपले प्रतिनिधी निवडून देण्याचे कर्तव्य पार पाडले, पण या भागाचे दैन्य हटविण्याचे कसोशीचे प्रयत्न काही कोणी नाही केले. १९६२ पासून मात्र या प्रयत्नांना तड लागली असून मुळशी-मावळचे आमदार श्री. मामासाहेब मोहोळ आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत. त्यांनी मावळ विकास परिषद घडवून आणली आणि डोंगरी मावळ भागासाठी चौथ्या योजनेत विशेष वा खास तरतुदीची मागणी केली. महाराष्ट्र सरकारच्या मागे ससेमिरा लावून जिल्हा परिषदांद्वारे मावळसाठी जेवढे काही देता येईल तेवढे देण्याचा आग्रह धरला. त्यांचे म्हणणे की, शिवबांचा मावळा मागास राहता कामा नये. त्याचा आर्थिक विकास झाला पाहिजे. तो इतरांच्या बरोबर आला पाहिजे. मामांना या प्रश्नाची निकड वाटण्याचे कारण ते स्वतः मावळातील मुठ्याचे. त्यांनी मावळी मागास जीवन पाहिले आहे, अनुभवले आहे. म्हणूनच त्यांचा पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि सरकार यांच्यामागे लकडा असतो की, मागे राहिलेल्यांना पुढे नेण्यासाठी जादा पैसे द्या, जादा मदत द्या, जादा सवलती द्या. मुंबई–पुणे रस्त्यावरील थंड हवेचे ठिकाण लोणावळा म्हणजे काही मावळ नव्हे. तसेच वडगाव–तळेगावावरून काही मावळची कल्पना येऊ शकत नाही. त्यासाठी नाणे-मावळ, पवन मावळ, अंदर मावळ आदी बारा मावळांतील दऱ्याखोऱ्यात आणि डोंगरकपारीत जायला हवे. तेथे पोहोचायला नाही रस्ता, की वर्षभर पोटभर प्यायला पाणी. पाऊस १००-२०० इंच. तथापि उन्हाळ्यांत पाण्याची हाकाटी. जमीन निकृष्ट आणि पाण्याखाली नसल्याने भात–वरई–नाचणीशिवाय दुसरे धान्य

नाही. अशा स्थितीत शेतकरी सुधारणार कसा आणि त्याचे आर्थिक बळ वाढून तो पुढे येणार कसा ?

सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे मावळच्या मनात थोडी आशा निर्माण झाली आहे व ती आशा फलद्रूप होऊ लागली आहे एवढे खरे. भोर, वेल्हे, मुळशी, मावळ या तालुक्यांचे सभापती शिकलेले आणि जाणकार असलेले. त्यांनी मावळचे खडतर जीवन अनुभवलेले असल्याने त्यांच्याकडून विहिरी, रस्ते, जोडधंदे यांसाठी प्रयत्नांची शिकस्त होत आहे. शंकरराव शिवदारे, श्री. निवृत्ती शेंडकर, श्री. शंकरराव ढमाले आणि डॉ. सुमन खेर यांनी गेल्या दोन वर्षांत आपापल्या भागांत जागृती करून लोकांना त्यांच्या विकासाची जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून दिली आहे. समिती आणि जिल्हा परिषद यांमुळे मावळ भागातील अनेक लोक बोलके झाले असून त्यांनी आपला आवाज उठविण्यास, तक्रारी जोराने मांडण्यास सुरुवात केली आहे. मावळ भाग मागास असल्याने, या भागात महादेव, कोळी, ठाकर आदी आदिवासी राहत असल्याने त्यांचेकरिता सरकारने विशेष मदत केली पाहिजे असे सांगू लागले आहेत.

त्याचे प्रत्यंतर गेल्या दोन आठवड्यांत पुणे जिल्हा परिषदेतर्फे तालुक्या–तालुक्यात घेण्यात आलेल्या सरपंच–ग्रामसेवक–सोसायट्यांचे पदाधिकारी यांच्या संयुक्त सभेत दिसून आले. या सभांचा जिल्हा परिषदेचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना चांगला उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाही. लोक मोकळेपणाने बोलले आणि त्यांनी आपल्या तक्रारी व अडचणी स्पष्ट शब्दांत सांगितल्या. अशा सभांपैकी एका सभेला हजर रहाण्याचे मी ठरविले असता मावळ सभेला मुद्दाम हजर राहिलो आणि आमच्या मावळच्या मित्रांची कहाणी चार–साडेचार तास ऐकली. मावळी गड्यांचे भाषण ऐकताना ही मंडळी शिकलेली कमी असली, आर्थिक दृष्ट्या गरीब असली, तरी विचाराने–आचाराने मागे नसलेली मला आढळून आले. वडगाव येथे एका शनिवारी सायंकाळी ५ ला सुरू झालेली ही सभा रात्री ९॥ चे सुमारास संपल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बढे यांनी सभापतीजवळ प्रशस्तिपत्रक देऊन टाकले की, मावळ मागास आहे हे काही खरे नाही. आर्थिकदृष्ट्या तो अविकसित आहे आणि त्याचा हा विकास झपाट्याने झाला पाहिजे हे खरे. त्यासाठी शेती सुधारली पाहिजे, शेतीला कोंबड्या-म्हशींचा जोडधंदा दिला पाहिजे आणि काही छोटी कारखानदारी देता आली तर ती दिली पाहिजे. श्री. बढे यांनी धुळे जिल्ह्यात काम केले असल्याने त्यांना धुळ्याचा आदिवासी भाग आणि पुण्याचा मावळ भाग यांतला फरक चटकन दिसून आला. मावळचा शेतकरी हुषार आहे, जागृत आहे, व्यवहारी आहे असे सर्टिफिकेट देऊन श्री. बढे यांनी सभापतींना त्यांच्या कामाबद्दल धन्यवाद दिले.

वडगावची ती सभा खरोखरच चांगली झाली आणि गाजली. परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री. शिवाजीराव काळे, साहेबराव सातकर, विठ्ठलराव सातव आदी पदाधिकारी यांच्यापुढे लोकांनी आपल्या अडचणी आणि तक्रारी निर्भीडपणे मांडल्या आणि गरजा तातडीने पूर्ण करण्याबद्दल विनंती केली. श्री. वढे यांनी शेतीबद्दल केलेल्या उपयुक्त सूचनांना योग्य तो प्रतिसाद दिला आणि निव्वळ शेतीवर शेतकरी जगू शकणार नाही असा आपला अनुभवही सांगितला. मावळचा आर्थिक विकास करावयाचा असेल तर खरोखरच त्याला जोडधंदे, छोटे कारखाने देणे जरूर आहे. गवत भरपूर असल्याने 'डेअरी' व शेतीत काम कमी असल्याने 'पोल्ट्री' व 'पिगरी' चा व्यवसाय या भागात उत्तम चालण्यासारखा आहे. मावळला पुणे व मुंबई या दोन्ही मोठ्या शहरांचा दूध व अंडी यांसाठी उपयोग होण्यासारखा आहे. तथापि हे धंदे निर्धाराने व चिकाटीने केले पाहिजेत, त्यांना सहकारी स्वरूप द्यायला हवे. मावळची शेती काय किंवा डेअरी काय एकेकट्याला झेपणारी नाही. काटकसरीची होणारी नाही. सबंध गावाने एकत्र येऊन हे दोन्ही उद्योग केले तरच गावाचे भागण्यासारखे आहे. नाही तर आहेत पुण्यात मोलमजुरीची कामे आणि त्यावर चालण्यासारखा आहे आमच्या शूर मावळ्यांचा, देशमुख-मराठ्यांचा उदरनिर्वाह.

मावळची स्थिती मोठी चमत्कृतिजन्य आहे. पावसाळ्यात या भागात हिंडले, की निसर्गशोभा पाहून मन हरखून जाते. लोहगड–विशाळगड, राजगड, तोरणा, तुंगी–तिकोना आदी किल्ल्यांच्या डोंगरांच्या रांगा आणि त्याला लागून असलेला पठाराचा व डोंगरउतरणीचा भाग पाहिला, की मावळ्यांच्या काटक आणि खडतर जीवनाची कल्पना येऊ शकते. कॅलिफोर्नियात अशा डोंगराळ भागाचा जसा डेअरी–पोल्ट्री–हॉर्टिकल्चर ( फळबागा ) साठी उपयोग करून घेतला आहे, तसा येथे करता येईल का असा विचार मनात येऊन जातो. पाऊस फार, त्यामुळे झाडे जगणे, जनावरांची निगा नीट राखणे कठीण जाईल हे खरे. पण प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे. मावळची मंडळी प्रयत्नवादी आहेत, उद्योगप्रिय आहेत, कष्टाळू आहेत. त्यांना हवी आहे सरकारी मदत आणि मार्गदर्शन. जिल्हा परिषदेने या भागाकडे विशेष लक्ष द्यायला हवे आणि पंचायत समितीने योजनांच्या अंमलबजावणीची पराकाष्ठा करायला हवी. सभापती डॉ. सुमन खेर या तळमळीच्या कार्यकर्त्या आहेत. त्यांनी मावळ भागाला आपल्या कामाने आपलेसे केलेले आहे. उपसभापती श्री. रघुनाथराव सातकर हे तर मावळच्या भूमीचे पुत्र. तेथेच जन्मलेले व वाढलेले, त्यांनी मावळची सुखदुःखे अनुभवलेली. या दोघांनी मावळचे प्रश्न सोडवून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर त्यांची पंचायत समिती सबंध राज्यात अग्रेसर राहिल्याशिवाय राहणार नाही.

जिल्हा परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची मावळाबद्दल सहानुभूती आहे आणि ही सर्व मंडळी शक्य तेवढ्या मदतीला तयार आहेत. मंत्रिमंडळही मावळसाठी जादा रक्कम देण्याच्या भूमिकेचे आहे. आता गरज जर कशाची असेल तर मावळमधील ऐक्याची आणि एकमताने योजना आखून त्या राबविण्याची. या कामात काँग्रेस एकीकडे आणि जनसंघ दुसरीकडे असे दृश्य नको. मावळच्या शेतकऱ्यात जोशी–लिमये–कर्वे यांच्यासारखे हाडाचे शेतकरी आहेत व ते सहकारापासून शेतीपर्यंत प्रत्येक गोष्टीत रस घेत आहेत. गावोगाव गुजर–मारवाडी, व्यापारी–दुकानदार आहेत. शेतकऱ्यांचे पुढारपण करणाऱ्या मंडळींनी मावळच्या विकासाच्या कार्यात पक्षीयता येऊ न देता काम करायचे ठरविले तर मावळ मागास राहणे शक्य नाही. जरूरी आहे ती प्रयत्नांची–प्रामाणिक प्रयत्नांची. देवराव देशमुखांची पिढी आता सेवानिवृत्त झाली असून मामासाहेब मोहोळ, शंकरराव भेलके, शंकरराव ढमाले यांच्या पिढीने प्रगतीची जिम्मेदारी उचलायला हवी. या कामी त्यांना शिवदरे–शेंडकर–खेर–सातकर यांची साथ मिळाल्याशिवाय राहणार नाही.

● ● ●

## 'ज्ञानदेव डोळा पाहू !' : ४ :

"बोला पुंडलि ऽऽक वरदा हरि विठ्ठल, श्रीज्ञानदे ऽऽव तुकाराम, ज्ञानेश्वर महाराजकी ऽऽ जय" या जयघोषांनी सारी आळंदी दुमदुमली होती. रात्रीचे दहा वाजून गेले होते आणि थंडीचा कडाका पण वाढत होता. तथापि ज्ञानदेवांच्या दर्शनाची गर्दी काही हटत नव्हती. त्या दिवशी पहाटेपासून देवळासमोर भक्तजनांची लांबच लांब रांग मंदिरात प्रवेश मिळवून ज्ञानदेवांच्या समाधीवर डोके ठेवण्यासाठी भाविकपणे उभी होती. सारे रस्ते आळंदीकडे आणि नंतर देहूकडे वळत होते. मिळेल त्या वाहनाने भाविक मंडळी आळंदी गाठीत होते. दिंड्या–पताकांनी आळंदी–देहू आणि या दोन क्षेत्रांचा परिसर गजबजून गेला होता. 'चला आळंदीला जाऊ। ज्ञानदेव डोळा पाहू ॥' म्हणत ऊन-तहान यांची पर्वा न करता स्त्री-पुरुष, मुले, वृद्ध, तरुण आळंदीकडे जात होते. तो नेम न चुकविण्याची प्रत्येकजण खबरदारी घेत होता. तो एक महत्त्वाचा आणि अगत्याचा कार्यक्रम होता. कॉलऱ्याच्या सांथीचा धोका किंवा म्युनिसिपालटीच्या यात्राकर यांची अडचण न मानता कोकणातला, मुंबईतला, घाटावरला, मराठवाडा–

विदर्भातला वारकरी आणि धारकरी पंढरी केल्यानंतर आळंदीला जाऊन संतश्रेष्ठ ज्ञानराजांचे दर्शन घेत होता.

आळंदीहून परतताना देहूस जाऊन संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या चरणी माथा ठेवीत होता. विठ्ठलपीठाचा, भागवतसंप्रदायाचा, वारकरी पंथाचा, एक चहाता-अभिमानी म्हणून मीही या सोहोळ्यात सामील झालो होतो आणि भक्ति-पीठाचा पाया रचणाऱ्या त्या शिल्पकाराच्या दर्शनाने पावन झालो होतो. रात्री दहाच्या सुमारास ज्ञानेश्वरांच्या समाधीवर जेव्हा मी डोके ठेवले, तेव्हा मला एका वेगळ्याच सुखाचा—समाधानाचा अनुभव आला. भक्तीतून मला ज्ञान मिळाले आणि ज्ञानातून मुक्तीचा सोपानमार्ग सापडला. निवृत्ती—ज्ञानदेव—सोपान—मुक्ताबाई या भावंडांच्या नावांतच एवढा अर्थ, एवढी जादू, एवढे सुख विसावले आहे की मोक्षासाठी ‘ न लागे जावे वनांतरी ’ असे जे संत तुकोबांनी म्हटले आहे, त्याचा प्रत्यय येत होता. योगीराज चांगदेवांचा अहंकार क्षणात नाहीसा करणाऱ्या ज्ञानराजांनी ज्ञानेश्वरीच्या द्वारे आम्हांला एवढे मोठे धन दिले आहे की, ते पिढ्यान् पिढ्या नुसते पुरणार नाही, तर त्यात वाढ होत जाणार आहे. तथापि, आम्ही ते ज्ञानभांडार लुटण्याची तयारी ठेवली पाहिजे. ‘ तुझे आहे तुजपाशी, परि तू जागा विसरलासी ’ असे आमचे होत असल्याने आम्ही सुखाचे, समाधानाचे, शांतीचे आणि मुक्तीचे वेगळे मार्ग शोधीत आहोत. भक्ती-सांप्रदायाची, भागवत सांप्रदायाची हेटाळणी करून, ‘ टाळकुटे ’ अशी अव-हेलना करून एका मोठ्या संघटनेचा अवमान करीत आहोत. ह्या संस्थेनेच आमचा धर्म, आमचा समाज जागेवर ठेवला आहे, याचे विस्मरण आम्हांला पडत असले तरी लाखो विठ्ठलभक्तांना पडलेले नाही, हे पंढरपूर, आळंदी, देहूची दरवर्षीची यात्रा दर्शवीत आहे.

भक्ती कशालाही भीत नाही म्हणतात, ते अगदी खरे आहे. त्या दिवशी सकाळीच देहूला जाण्याचा प्रसंग आला होता. माझ्या आत्याच्या निधनाचा दहावा दिवस होता म्हणून आम्ही गोपाळपूरच्या घाटावर सकाळी अकराच्या सुमारास धार्मिक विधीसाठी जमलो होतो. ज्या स्मशानात आत्याला दहा दिवसां-पूर्वी अग्नी दिला होता, त्या स्मशानाच्या दगडावर बसून काही यात्रेकरूमंडळी सकाळचा फराळ करीत होती. नदीत आंघोळ केल्यानंतर त्यांनी आपले कपडे स्मशानभूमीतच वाळत घातले होते, लहान मुलेही तेथेच खेळत होती. आम्हांला ते चमत्कारिक वाटले. क्षणभर वाटले की जाऊन सांगावे, की ते स्मशान आहे. पण कशाला त्यांच्या मनात अकारण संशय निर्माण करायचा म्हणून स्वस्थ बसलो.

परगावच्या लोकांना माहीत नव्हते म्हणून ते स्मशानात विश्रांतीला बसले होते. पण आम्ही लहानपणी माहीत असूनही त्या राखेशी आणि मडक्याशी खेळत असू. मोठी माणसे हे दृश्य पाहून घाबरायची, पण आमच्या मनात भीतीचा लवलेश नसायचा. लहान मुलांना कसली भीती! स्मशानात गाडगी-मडकी कशासाठी हे मोठे झाल्यावर समजू लागले. तुकोबारायांचे वैकुंठस्थान व गावाचे स्मशान यांच्या सान्निध्यात वाढलेला पिंड भक्तिप्रधान तसाच बेडर असल्यास वावगे नाही. दहाव्याचे ते विधी पाहता पाहता जवळच गाथा आणि ज्ञानेश्वरी वाचणाऱ्या दोघा वारकऱ्यांकडे लक्ष गेल्याशिवाय राहिले नाही. तो दिवस एकादशीचा होता म्हणून सदर वारकरी एकादशी महात्म्य गात होता.

•

माझी आत्या पुण्यवान् म्हणूनच एकादशीचा दिवशी पिंडदानाचा दिवस आला. वरईचा भात आणि वरईच्या दशम्या. कितीतरी कावळे अगोदरपासूनच झाडावर येऊन बसले होते. कावळा लवकर शिवतो की नाही, अशी काहींच्या मनात धाकधुक होती. पण पिंड जागेवर ठेवले गेले नाहीत तोच कावळ्यांनी झडप मारून त्यांना स्पर्श केला आणि ते घेऊन गेले. आत्याची कसलीही आशा उरली नव्हती. अगदी समाधानाने तिने प्राण सोडला होता. आयुष्यभर तिने सगळ्यांचे चांगले चिंतिले आणि केले. मुलगा, मुली, भाचे, नातू, नाती-सगळ्यांची माया जोडली, सगळ्यांना मोठे व्हायला हातभार लावला. शेवटपर्यंत कष्ट केले, देह झिजवला. वयाच्या ७६ वर्षापर्यंत आयते बसून कधी खाल्ले नाही. करारी तितकीच तडफदार. अभिमानी तितकीच प्रेमळ. म्हणूनच आजारी पडल्याचे समजताच सारे धावून आले, जवळ बसले, अखेरचे डोळे भरून दर्शन घेतले. माझ्यावर तिचा फार जीव. मी खूप शिकावे, खूप मोठे व्हावे म्हणून तिने जास्तीत जास्त कष्ट घेतले. पंधरा-वीस वर्षे माझ्यासाठी जेवढे काही करता येईल तेवढे केले. आईने मला जन्म दिला, पण माझ्या आत्याने मला वाढविले, शिकविले, मोठे केले. म्हणूनच तिच्या शेवटच्या आजाराने आणि निधनाने मला अतिशय दुःख झाले. माणसाचे मोल मेल्यानंतर अधिक कळते असे म्हणतात ते खोटे नाही. आत्याचा मी उतराई होऊ शकलो नाही, म्हणून अजूनही मला खेद वाटतो. तिची मूर्ती डोळ्यांपुढे आणून क्षमा मागतो. 'दया क्षमा शांती। तेथे देवाची वसती ॥' असे तुकाराम महाराजांनीच म्हटले आहे.

आत्मा आणि मोक्ष यांसंबंधी मतभेद असले, वाद असले तरी आत्मा प्राण सोडून जातो आणि पुण्यवान माणसाला सद्‌गती मिळते एवढे निश्चित्. ज्ञानदेवांनी जिवंत समाधी कशी घेतली, तुकोबाराय सदेह वैकुंठाला कसे गेले यांबद्दल अनेकांच्या मनात शंका असल्या तरी या दोन संतश्रेष्ठांनी मुक्ती मिळ-

विली यात शंका नाही. त्यांचे देह नाहीसे झाले असले तरी त्यांच्या कार्याचा, त्यांच्या स्मृतीचा सुगंध सदैव दरवळत आहे. माणूस आपल्या कामाने, गुणाने, पुण्याने मागे रहात असतो. " मरावे परि कीर्तिरूपे उरावे " हे प्रत्येकाला माहीत असले तरी त्या कीर्तीचा कित्येकांना विसर पडतो व मेल्यानंतर ते विसरून जातात. सत्प्रवृत्त माणसे, पुण्यवान माणसे कधीच मरत नाहीत, त्यांची इच्छा अतृप्त रहात नाही, ते कोणाला कधी त्रास देत नाहीत. एकादशीच्या दिवशी मरण येणे फार चांगले असे म्हणतात. तसेच अंतकाळी सारे नातेवाईक-स्नेही जवळ असणे भाग्याचे मानले जाते. फारसे आजारी न पडता, आजाराचा दुसऱ्याला उपद्रव न देता जी माणसे वृद्धापकाळी एके दिवशी शांतपणे डोळे मिटतात ते भाग्यवान नाही म्हणायचे तर काय ! तसेच कावळा लवकर शिवण्यासाठी त्याची आराधना करावी न लागता त्याने तावडतोब झडप घालून पिंडाला स्पर्श करावा हे कशाचे लक्षण म्हणायचे ? कावळा शिवण्याचे व न शिवण्याचे हे एक गूढ आहे एवढे खास ! काही ठिकाणी मी समक्ष पाहिले की, कावळे पिंडाच्या जवळ जाऊनही शिवत नाहीत. उडून जातात, परत येतात, भोवती फेऱ्या मारतात पण पिंडाला स्पर्श करण्याचे नाकारतात. मग नातेवाईकाने मृतात्म्याला उद्देशून काही म्हटले, त्याची अपुरी इच्छा पूर्ण करण्याचे आश्वासन दिले की कावळा चटकन् शिवतो. विसाव्या शतकाच्या अणुयुगात हे हास्यास्पद वाटण्यासारखे आहे. पण अद्याप चालू आहे. त्याची प्रचीती येत आहे. विश्वास आणि श्रद्धेचा मात्र तो प्रश्न आहे.

टाळ कुटल्याने का देव पावतो असे म्हणणारे कितीतरी आहेत. भक्ति-संप्रदायाची थट्टा करणारे आणि पंढरपूर-आळंदीच्या वारकऱ्यांची टर उडविणारे कितीतरी आहेत. तथापि या चेष्टेने काही भागवतसंप्रदायाला धक्का बसू शकलेला नाही, की पंढरीच्या वारीत घट झालेली नाही. " पंढरीसी जारे आल्यानो संसारा ! दीनांचा सोयरा पांडुरंग " म्हणत त्या पंढरीरायाची भक्ती अखंडपणे चालूच आहे. ' आम्ही जातो आमुच्या गावा । आमुचा राम राम घ्यावा ' म्हणेपर्यंत हरिनामाचा जप चालू असतो आणि त्या सावळ्या विठोबाचे दर्शन घेण्याकरिता शेकडो मैलांवरून अनेक अडचणींना तोंड देऊन लोक पंढरीला जातच असतात. आषाढी-कार्तिकीचा पंढरी–आळंदी–देहूचा नेम न चुकविणारे शेकडो कुटुंब-वत्सल भक्तीचा झेंडा दरसाल उंचउंच फडकावीत असतात. भक्तीचे भागवत भाविकाला तारल्याशिवाय कधी रहात नाही. " ज्ञानदेवे रचिला पाया...तुका झालासे कळस " अशा या भक्तिपीठाचे दामाजी, चोखा महार, नरहरी सोनार, गोराकुंभार, सावता माळी हे पदवीधर एकामागून एक झाले आणि त्यांनी या पीठाचा प्रभाव वाढविला. देवाच्या घरी जात-पात काही नाही. देवाच्या कृपेसाठी

घोर तपश्चर्येची वा अघोरी साधनाची जरूरी नाही. "नामसंकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्मांतरीची" म्हणत नामाच्या सहाय्याने या मंडळींनी असे काही पुण्य जोडले आहे की त्याचे नाव पिढ्यान्‌पिढ्या मागे राहील.

आमचा वारकरी पंथ ही एक महाराष्ट्राची मोठी शक्ती आहे. या शक्तीची उपेक्षा करण्यात येत असली तरी या शक्तीने भक्तीची उपेक्षा कधी केलेली नाही. आणि म्हणूनच आळंदी-पंढरी सालोसाल विठ्ठलाच्या गजराने दुमदुमून जात आहे. 'पुंडलिक वरदे हरि विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम' हा जयघोष जोवर ऐकू येत आहे तोवर महाराष्ट्राला संतांनी दिलेला ठेवा कायम आहे. हा ठेवाच महाराष्ट्राला अनेक दृष्टीने उपयोगी पडणारा आहे. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा भक्तीसाठी म्हणून नव्हे तर ज्ञानासाठी, माहितीसाठी जरी वाचली तरी माणसाला त्याच्या दैनंदिन जीवनात आणि व्यवहारात केवढा तरी फायदा होऊ शकणार आहे. जीवनाचे फार मोठे अमोल असे तत्त्वज्ञान या ग्रंथात साठविलेले आहे. म्हणूनच माझे मन देहू-आळंदीकडे दुहेरी दृष्टीने धाव घेत असते. कार्तिकी एकादशीला या दोन संतश्रेष्ठींचे घडलेले दर्शन मला पुढील वर्षभर उत्तेजन, मार्ग-दर्शन करण्यास सहाय्यभूत ठरेल अशा श्रद्धेने मी त्या रात्री पुण्याला परतलो. भक्ती आणि अदृश्य शक्ती माणसाचे जीवन घडवीत असते, त्याला वळण देत असते असे मानणाऱ्यांपैकी मी एक असल्याने पंढरीच्या पीठाचा मी सतत अभि-मान बाळगत असतो.

• • •

## – ९ –

# " दिल्ली दूर चली है ! " : १ :

१९४७ नंतर दिल्ली झपाट्याने बदलली आणि गेल्या १६ वर्षांच्या अवधीत तिला अगदी वेगळे स्वरूप प्राप्त झाले. जुनी-पुराणी दिल्ली लुप्त झाली आणि नव्या रंगाची, नव्या ढंगाची, नव्या विचार–आचारांची दिल्ली भरभर वर आली. एखादी बालिका झपाट्याने वाढून उफाड्याची षोडशा बनावी, आणि तिने सर्वांचे लक्ष वेधून घ्यावे तसे दिल्लीचे झाले. आणि ती दिल्ली बाहेरच्यांना आत शिरताना सांगू लागली, " यह दिल्ली है, भारत की राजधानी पुरानी नहीं, बिलकुल नई । " माझ्यासारखा एखादा छोटा महाराष्ट्रीय कधीतरी दिल्लीत गेला तर त्याला दिपवून टाकणाऱ्या कितीतरी गोष्टी दिल्लीत घडत आहेत. परिस्थिती त्या घडवीत आहे. १९४७ नंतर १९५२, नंतर १९५७, नंतर १९६२ याप्रमाणे पाच वर्षांच्या अंतराने मी चार वेळा दिल्लीला जाऊन आलो आणि या चारही वेळेला दिल्ली मला वेगवेगळी दिसली, भासली आणि अनुभवास आली.

" चलो दिल्ली " या घोषणेने सबंध भारताचे लक्ष वेधून घेणारा आझाद हिंद सेनेतील सेनाधिकाऱ्यांवरील खटला याच दिल्लीत चालला आणि गाजला.

सेहगल, धीलन, शहानवाज आणि जनरल जगन्नाथराव भोसले या नावांनी दिल्ली दुमदुमली व या नावांना अल्पकाळात विसरलीही. यांपैकी भोसलेसाहेब आणि शहानवाजखान यांनी मुक्ततेनंतर दिल्लीत राहून देशाची सेवा केली आणि सुभाषबाबूंची शिकवण आचरणात आणली. शहानवाजखान अजूनही दिल्लीत आहेत. पण जगन्नाथराव आणि त्यांचा बचाव करणारे भुलाभाई देसाई स्वर्गात देवादिकांशी हितगुज करीत आहेत. दिल्ली या दोघांनाही विसरत चालली आहे. १९४७ च्या फाळणीपूर्वी दिल्ली बाहेरून शांत होती पण आतून खदखदत होती. जुन्या दिल्लीचे महत्त्व आणि माहात्म्य नवी दिल्ली हिरावून घेऊ शकली नव्हती. जुन्या दिल्ली स्टेशनचा रुबाब कायम होता आणि प्रवाशांना हॉटेलवाल्यांपासून होणारा उपद्रव आणि दगा कमी झालेला नव्हता. चांदणी चौकातील हालचाली दिल्लीत कोणाचे वर्चस्व आहे हे स्पष्ट दाखवीत होत्या. फाळणीनंतर दिल्लीही तंग झाली व जातीय दंगलींनी पेटली आणि निर्वासितांच्या लोंढ्यांनी गजबजून आणि गंजून गेली. यमुनेच्या पाण्याने दिल्लीला एकदा दगा दिला आणि काविळीच्या साथीने राजधानी पिवळी पडली. त्यातूनही झपाट्याने बाहेर पडलेली दिल्ली झपझप वाढू लागली, फुलू लागली आणि दिल्लीत भारतीय लोकांबरोबर परदेशी लोकांची निवासस्थाने उभी राहून या शहराला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त होऊ लागले. दिल्लीत परदेशातून पैसा येऊ लागला, विचार येऊ लागले, संस्कार येऊ लागले आणि दिल्लीचे दिल्लीपण जाऊन ती लंडन, वॉशिंग्टन, शिकागो, टोकियो, हाँगकाँगचे स्वरूप धारण करू लागली. अशोक हॉटेल, जनपथ हॉटेल आणि इतर उंची हॉटेल्स उभी राहून नव्या दिल्लीच्या विशिष्ट भागात जायला सर्वसामान्य माणूस बिचकू लागला. प्रासादतुल्य बंगले आणि भारी किंमतीच्या ऐषारामी मोटारी पाहून दिङ्मूढ होऊ लागला. १९५२ नंतर ५७ मध्ये तर दिल्ली मला परकीय देशातील एखादे शहर असल्यासारखी भासली आणि १९६२ मध्ये तर एखाद्या खेडवळासारखा दिल्लीत फसतो की काय असे मला वाटू लागले. म्हणूनच ६४ मध्ये दिल्लीला जावे की नाही याचा विचार चार महिने मी करीत होतो.

१९५२ मधील गोष्ट आहे. नेपाळला जाण्याकरिता मी दिल्लीला गेलो होतो. मला उतरून घेण्यासाठी नवी दिल्ली स्टेशनवर एक पत्रकार स्नेही आला होता. मद्रासकडचा हा तामीळभाषीय तरुण एवढा पुढे गेला असेल याची कल्पना नव्हती. त्याने मोटार आणली होती आणि बरोबर एक तरुणी पण होती. मोटारीत बसताना त्याने मला चक्क सांगितले की, ती मुलगी त्याची मैत्रीण असून मी संकोच बाळगण्याचे काही कारण नाही. त्या मुलीला मी नमस्कार करू लागताच तिने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला आणि तिच्या हस्तस्पर्शाबरोबर माझ्या शरीरात वीज चमकून ती पायातून जमिनीत निघून गेली. नंतर आम्ही तिघे एका

केंद्रीय मंत्र्याच्या " आऊट हाऊस "मध्ये आलो. ह्या ठिकाणी या मद्रदेशीय तरुणाने आपला मुक्काम ठोकलेला होता. मोटारीतून उतरल्यावर तरुणीने आम्हांला प्रथम चहा करून दिला आणि नंतर गड्याने बाहेरून डबा आणल्यावर आम्ही तिघेजण जेवलो. तोवर साडेदहा वाजून गेले होते. नंतर मला वाटले की, ती उत्तर-प्रदेशीय कन्या आपल्या घरी जाईल. पण मित्राने माझी झोपायची खोली दाखवून मला म्हटले की, " पुष्पा रात्री येथे राहिली तर तुमची काही हरकत नाही ना? सकाळी लवकर उठून तिला ऑल इंडिया रेडिओ स्टेशनवर जायचे असते. तेथे ती अनाउन्सर आहे. " माझ्या अंगाला दरदरून घाम फुटला. पुष्पा येथे राहणार म्हणजे कोठे? दोन खोल्या आणि एक व्हरांडा एवढीच ती जागा होती. त्यात एक खोली चहाजेवणासाठी व दुसरी बसण्या-झोपण्यासाठी. अखेर मी माझी खाट बाहेर व्हरांड्यात टाकायला सांगून त्या जोडीला खोली खाली करून दिली आणि ती रात्र छातीतील धडधड दाबीत कशीबशी काढली.

दुसरे दिवशी दुपारपर्यंत पुढील तिकिटाचे रिझर्व्हेशन, काही बड्या मंड-ळींच्या गांठीभेटी यात वेळ गेल्यावर सायंकाळी आम्ही दोघे फिरायला बाहेर पडलो. माझी गाडी रात्रीची होती. त्यामुळे गडबड, गर्दी नव्हती. कॅनॉट प्लेसवर हिंडताना एका दुकानासमोर आम्हांला एक नेपाळी युवती भेटली. मित्राचा तिचा बराच परिचय असावा असे दिसले. त्याने लाडालाडाने माझी तिच्याशी ओळख करून दिली व सांगितले की, हे नेपाळला चालले असून त्यांना काही ' टिप्स ' देता आल्या तर द्याव्यात. या ' टिप्स ' शब्दाचा तिने कोणता अर्थ घेतला कोणास ठाऊक! पण ती मित्राला म्हणाली की, मग शेजारच्या एखाद्या हॉटेलात बसून जरा गप्पा मारू या ना! तेवढाच तुमच्या पाहुण्यांच्या सहवासाचा लाभ. ते नेपाळला जातात म्हणजे आमचे भाग्यच म्हणायचे. मी तेथे असते तर त्यांचा उत्तम पाहु-णचार केला असता. पण आता येथे दिल्लीत निदान चहा तरी देणे जरूर आहे. एवढे बोलणे होईपर्यंत माझे पाय लटपटू लागले होते. ती युवती माझ्याभोवती जाळे विणू लागली होती व माझा मित्र तिच्या मधुर वाणीने बेहोष होत चालला होता. मनाशी निर्धार करून मी महाराष्ट्रीय धसमुसळेपणाचा अवलंब केला आणि त्या दोघांना म्हटले, " माफ करा. मला दिल्लीतील महाराष्ट्रीय पत्रकारांनी चहाला बोलावले असून त्यांनी दिलेली वेळ होऊन गेली आहे. नेपाळहून परत आल्यावर तुमचा चहा घेऊ " असे म्हणत म्हणत मी यॉर्क हॉटेलचा रस्ता पकडला आणि झपझप पावले टाकीत यॉर्क हॉटेल गाठले. मित्राला माझ्या या वागण्याचा बहुधा राग आला असावा. तो त्या युवतीबरोबर चहाला गेला आणि त्याच्या बिऱ्हाडी लवकर परतण्याबद्दल मला त्याने बजावले.

१९५७ मध्ये जेव्हा त्याचीमाझी दिल्लीत गाठ पडली तेव्हा तो त्या पुष्पा मुलीशी विवाहबद्ध होऊन त्याला दोन मुले झाल्याचेही समजले, मात्र ते पूर्वीचे मंत्री मंत्रिपदावर राहू न शकल्याने त्या आऊट हाऊसला तो मुकला होता आणि नव्या दिल्लीत दोन खोल्या कशावशा मिळवून त्याने संसार थाटला होता. पुष्पाने आकाशवाणीवरील नोकरी पुढे चालू ठेवली होती आणि तीच या प्रेमवीराचे पोट भरीत होती. या खेपेला त्या मद्रदेशीय मित्राकडे जाऊ न देता एका महाराष्ट्रीय अवलिया पत्रकाराने मला त्याच्याकडे उतरून घेतले होते. हा खडाफटिंग एके दिवशी कोल्हापूर जिल्ह्यातून जो निघाला तो त्याने एकदम दिल्ली गाठली. जवळ पैसा नाही, शिक्षण फारसे नाही, अंगी कला नाही. पण जिद्द—महत्त्वाकांक्षा असल्याने तो पाचदहा वर्षांत दिल्लीत चांगलाच स्थायिक झाला होता. वृत्तपत्रीय क्षेत्रात त्याने आपले वस्तान बसविले होते. "फ्री लान्सर" म्हणून केंद्र सरकारात आणि परदेशी वकिलातीत त्याने आपले नाव निघण्याइतकी करामत केलेली होती. पत्र्याने मंत्र्यांच्या ओळखीने आणि वशिल्याने काही परदेशांचा दौरा पण फुकट केला होता. यॉर्क हॉटेल इमारतीतील त्याच्या त्या दोन खोल्यांवरील अर्धा डझन पाट्या वाचल्यावर 'कल्पकते तुझे नाव जीवन' असे म्हटल्यावाचून राहवले नाही. "सौ. सुहासिनी" अस्तित्वात नसताना तिच्या नावाची एक पाटी दारावर लावून तिला त्याने एका वृत्तसंस्थेची प्रतिनिधी बनविली होती. प्रथम मला वाटले की, त्याची पत्नी माहेरी गेली असावी. पण पहिल्याच दिवशी त्याने चक्क सांगितले की, "ही सुहासिनी तुम्हांला कधी दिसरणार नाही, पण सुहास्यवदना लागेल तेवढ्या दिसतील. "यह दिल्ली है, और यहाँ चाहे जो मिलता है।" परदेशी वकिलातीशी घसट निर्माण केली की, रम—रमा; वाईन—वुमन सारे काही मिळते. मात्र त्यांचेशी मोकळेपणाने बोलयला हवे, वागायला हवे. दिल्लीतील कितीतरी पत्रकार असे विनाकष्ट चरत आहेत, जगत आहेत, मात्र त्याची देशाला फार मोठी किंमत द्यावी लागत आहे.

१९६२ मध्ये चीनच्या आक्रमणापूर्वीची आणि १९६३ ची चीनी आक्रमणानंतरची दिल्ली खूपच बदलली आहे. १९६२ च्या मेमध्ये अशोक हॉटेलमध्ये रात्री जी बडी बडी मंडळी तासन् तास गप्पा मारीत बसायची आणि त्यात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यासह काही मंत्री जे भाग घ्यायचे ते पाहिले, की आम्ही राज्यकारभार चालवीत आहोत की हॉटेल चालवीत आहोत असे वाटायचे. चाणक्यपुरीतील दिवसाच्या हालचाली आणि कॅनॉट प्लेसमधील उंची हॉटेलमधल्या रात्रीच्या हालचाली दिल्लीबाहेरच्या प्रवाशांना थक्क केल्याशिवाय रहात नसत. एका खासदार मित्राबरोबर एका हॉटेलमध्ये रात्री 'डिनर' ला गेलो असता तेथे परदेशी वकीलातीची काही माणसे, आमचे दिल्लीतील काही अधिकारी, सिनेमात

शोभण्यासारख्या काही तरुणी व पत्रकार पाहिल्यावर मी चाटच पडलो. ही सारी मंडळी कुठेतरी 'ड्रिंक'चा कार्यक्रम करून तेथे जेवायला आली होती आणि टेबलावर बसल्या बसल्या हिंदच्या परराष्ट्र धोरणाबद्दल आणि संरक्षणाबद्दल मोकळे-पणाने बोलत होती. परदेशी दारूने आमच्या काही अधिकाऱ्यांना व काही पत्र-कारांना विकत घेतले असल्याचे खासदार मित्र मला सांगत होता. मदिरेने नाही भागले तर मदिराक्षींचा सर्रास उपयोग केला जात असल्याचे तो म्हणत होता. दिल्लीत कितीतरी 'माताहारी' पहावयास सापडत असून दिल्ली थोड्या दिवसात कोणाकडे गहाण तर पडणार नाही ना अशी भीती तो व्यक्त करीत होता.

१९६३ च्या मार्चमध्ये वृत्तपत्रीय कागदासाठी अगदी उभ्या उभ्या दिल्लीला जाण्याचा प्रसंग आला असता केंद्रीय कचेऱ्यांतून जे दृश्य पहावयास मिळाले ते मी जन्मात कधी विसरणे शक्य नाही. 'उद्योग-भवन' म्हणजे दिल्लीची प्रतिसृष्टी आहे. या उद्योगभवनात सरकारी दैनंदिन कामकाजाखेरीज जे इतर उद्योग चालतात ते अंगावर शहारे आणणारे आहेत. आयात-निर्यातीचे परवाने आणि इतर परवाने यांसाठी उद्योग-भवनात दिल्लीबाहेरच्या माणसांची रीघ लागलेली असते. काम लवकर उरकून गावाला तातडीने परतता यावे म्हणून माणूस आतूर झालेला असतो. अशा स्थितीत कारकुनापासून अधिकाऱ्यापर्यंत साऱ्यांनी त्याला नाही पिळला तरच आश्चर्य! प्रथम काही दादच द्यायची नाही, मग दुसरे दिवशी यायला सांगायचे. माणूस उठून जाऊ लागला, की त्याला विशिष्ट हॉटेलमध्ये सारा बंदोबस्त ठेवायला सांगायचे. ज्यांना अर्थ कळतो त्यांची कामे झटपट होतात. इतर बसतात खेटे घालीत. लाचलुचपत कशाला म्हणतात आणि ती किती प्रकारची असू शकते हे जर पहावयाचे असेल तर दिल्लीचे सचिवालय हे आदर्श उदाहरण ठरेल. साहेबाचे घरी परस्पर साहेबिणीकडे जाणाऱ्या वस्तू व पैसा, चपराशाकरवी खाण्यापिण्याचा केला जाणारा बंदोबस्त आणि कारकुनाकरवी मन रिझविण्याची केली जाणारी तरतूद पाहिली, की दिल्लीचा उबग येऊ लागतो आणि काम तसेच सोडून पुण्याला परतावे असे वाटू लागते.

पंजाबी, सिंधी आणि इतर प्रांतीयांनी दिल्लीला खूपखूप दूरदूर नेले आहे. पैसा आणि फॅशन, चैन आणि मौज यांनी दिल्ली पार बदलून टाकली आहे. या दिल्लीत महाराष्ट्रीय दूर बाजूला रहातात आणि तेथील जीवन एखाद्या बघ्यासारखे पहातात. कारण महाराष्ट्राजवळ नाही पैसा, नाही चैन करायला वेळ. त्याची महाराष्ट्रीय परंपरा व महाराष्ट्रीय संस्कृती त्याला नाही सोडवत. म्हणूनच तेथे तो एक आदराचे स्थान मिळवू शकला आहे आणि त्या आदरात दिवसेंदिवस भर टाकीत आहे. तो दिल्लीला आपल्या जवळ आणू पहात

आहे. पण दिल्ली दूरदूर चालली आहे. दिल्लीला आपले दिल्लीपण विसरून लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क, टोकियो, हाँगकाँग व्हायचे आहे. हा बदल होताना दिल्ली ही भारताची राजधानी, याचा विसर पडला तर भारताचे भवितव्य काय राहील हे सांगणे मोठे मुष्किल होऊन बसेल.

● ● ●

## ' नेहरुविण सुनी दिल्ली ' : २ :

दिल्लीचा तो ' संसदपथ ' कसा सुना वाटत होता. ' त्रिमूर्ती-सदन ' कसे ओके ओके वाटत होते. केंद्रीय मंत्रालयातील पंतप्रधानांची ती कचेरी कशी भकास वाटत होती. " रामाविण सुनी अयोध्या ! " प्रमाणे " पंडितजींच्यावाचून दिल्ली " अगदी निर्जीव, निष्प्राण वाटत होती. सोमवार ता. ८ जूनला पंडितजींची रक्षा अलाहाबादच्या संगमात विसर्जित होत होती आणि दिल्लीतही यमुनेच्या पाण्यात तिचे विसर्जन करण्यात येत होते. त्या तेराव्या दिवशीही दिल्ली यमुनेच्या तीरावर लोटली होती आणि आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून देत होती. जवाहरलालजींच्याशिवाय आपल्याला दैनंदिन जीवनात रस वाटत नाही, जोश वाटत नाही असे ती त्या रक्षेला स्मरून सांगत होती. तिकडे हा रक्षाविसर्जनाचा गंभीर सोहळा चालला असता त्रिमूर्ती-सदनातील तो वृक्ष, ती फुलझाडे, ती हिरवळ, ती कारंजी सारी कशी स्तब्ध, निःशब्द, निस्तेज स्थितीत आपले दुःख व्यक्त करीत होती. दिल्लीला आणि दुनियेला ती सांगत होती की, आमचा चाहता गेला, आमचा पालक गेला, आमचा ' राम ' गेला. आता कोण आमचे कौतुक करणार, आणि कोण आमच्या छायेचा आश्रय, फुलांचा आस्वाद आणि हिरव्या गालिच्याचा उपभोग घेणार ? तो रसिक कवी गेला, तो थोर साहित्यिक गेला, प्रेमाचा सागर गेला, तो शांतीचा उपासक गेला. जगाचा आधार आणि दुनियेला दीवाना करणारा नेता गेला. बालकांचा प्रेमी आणि देशभक्तांचा मेरुमणी गेला. ' झाले बहु, होतिल बहु, ' पण ' जवाहरलालसम ' होणे महाकठीण ! दिल्लीचे रस्ते, दिल्लीच्या वास्तू, दिल्लीच्या कचेऱ्या व दिल्लीचे निवासी या साऱ्यांना त्या गोड आठवणी, त्या स्मृती विसरायला तयार नाहीत. त्यांना ते दर्शन पुन्हा हवे, तो आवाज पुन्हा ऐकायला हवा आहे. ते चैतन्य पुन्हा पहायला हवे, ते नेतृत्व पुन्हा अनुभवायला हवे. पण ते कसे मिळणार ! ते दूर दूर गेले आहे, परत न येण्यासाठी गेले आहे, दृष्टीपलीकडे अनंतात विलीन झाले आहे.

दिल्ली त्या दिवशी स्मशानवत् भासत होती. सारे कसे शांत-शांत होते. दुकाने बंद, हॉटेले बंद, सिनेमा बंद, कचेऱ्या बंद. सगळीकडे कुलपे. सारे व्यवहार पूर्णपणे बंद. दिल्लीचे हे चित्र अनेक वर्षे स्मरणातून जाणार नाही. लोकांच्या लाडक्या जवाहरलालजींनी जनमानसात असे काही स्थान मिळविलेले होते की, प्रत्येकाला वाटत होते आपले काहीतरी हरवले, आपण कशाला तरी मुकलो. अलाहाबादच्या 'रक्षाविसर्जन' कार्यक्रमाचा आकाशवाणीवरील धावता वृत्तान्त ऐकताना जवाहरलालजींची ती प्रसन्न, शांत, हसरी, गंभीर, रागावलेली, अशी वेगवेगळी मूर्ती डोळ्यांपुढे दिसायची, त्यांचा तो रेडिओवरील आवाज कानात घुमू लागायचा आणि वाटायचे आपण त्यांनाच पाहात आहोत, ऐकत आहोत. पंडितजींचे रेडियोवर भाषण असले, की घरातील अगदी लहान मुलेही रेडियो-जवळ घोळका करून एकचित्ताने इंग्रजी-हिंदी भाषण ऐकायची. नेहरूंचा तो आवाज शिकलेले, बिनशिकलेले, वृद्ध-बाल, स्त्री-पुरुष सारेजण चटकन् ओळखायचे. 'लेकिन', 'मगर', 'परंतु', 'कश्मकश', 'केवल नारे लगानेसे नहीं होगा', 'गांधीजीने हमें सिखाया है' आदी शब्द आणि शब्द-प्रयोग ऐकायची एवढी सवय झाली होती की, आता कोणाच्या भाषणातून हे ऐकायला मिळणार नाही, याची खात्री वाटू लागली आहे. मुंबईचे ते भाषण आणि त्या भाषणात नेहमीच्या 'जोश'चा अभाव अखेरचा ठरला. मुंबईला जाण्यापूर्वी एक-दोघा मित्रांना मी सहज म्हटले होते, "पंडितजी मुंबईला येत आहेत. चला त्यांना पाहू, त्यांचे भाषण ऐकू. त्यांची तब्येत फारच खंगत चालली आहे. देशाचे दुर्दैव ओढवले असेल तर एखादे वेळी पंडितजी पुन्हा पहायलाही नाही मिळायचे. एक मित्र बरोबर आला आणि दुसरा नाही येऊ शकला. ता. २७ मे रोजी रात्री त्याने सांगितले, "अभागी आम्ही. त्या महापुरुषाचे अखेरचे दर्शन घ्यायचे नव्हते आमच्या नशिबात."

पंडितजींना आपले मरण आधी समजले होते काय? हो. समजले होते. म्हणूनच ते डेहराडूनवरून वेळेवर परतले. रात्री सर्व महत्त्वाच्या फायली पाहून त्यांनी काम संपविले व सकाळी प्रातर्विधी उरकून पुन्हा बिछान्यावर स्वस्थ पडले. घटका जवळ आल्याचे त्यांना समजले, पण बेशुद्ध होईपर्यंत त्यांनी आपल्या लाडक्या 'इंदू'ला नाही सांगितले. 'इंदू' म्हणजे त्यांचे पंचप्राण. इंदू दिसली नाही, भेटली नाही, की पंडितजी बेचैन होत. 'इंदू कहाँ है?', 'इंदू अभी तक नहीं आयी?' आदी प्रश्नांचा भडिमार करणाऱ्या पंडितजींना 'इंदू'ला सोडून जाताना केवढे दुःख झाले असेल! पण मन घट्ट करून त्यांनी ते दुःख गिळले व आपले मरण इंदूला कळू न देता आपल्या स्वतःच्या डोळ्यांनी ते पाहिले. त्यांनी शांतपणे आपला प्राण सोडला आणि या जगाचा समाधानाने

निरोप घेतला. पित्याच्या मनाचा खंबीरपणा, संकटातही निश्चल राहण्याचा निर्भयपणा इंदिराजींनी पुरेपूर उचललेला असल्याने त्यांनी आपला शोक मोठ्या धैर्याने आवरला आणि साऱ्या देशाला व जगाला दाखवून दिले की, वडिलांच्या विशाल व्यक्तिमत्त्वाची छाया आपल्यावरही पडलेली असून आपण त्यांच्या थोर कीर्तीला कसलाही उणेपणा आणू देणार नाही. त्या तेरा दिवसांत आणि नंतरही इंदिराजींचे वागणे ज्यांनी ज्यांनी दुरून—जवळून पाहिले त्यांनी त्यांनी त्यांची वाखाणणी केली. 'थोर पित्याची थोर पुत्री!' असे उद्‌गार एका परदेशी पंत-प्रधानाने काढले. मन मोठे, विचार मोठे. ध्येयवाद मोठा, दृष्टी मोठी. म्हणूनच त्रिमूर्ती-सदनात येणाऱ्या-जाणारांची विचारपूस करून, त्यांच्या भावनांची योग्य कदर करून इंदिराजींनी आपल्या लौकिकात आणखी खूप खूप भर घातली. 'त्रिमूर्ती-सदन' पंडितजींच्यावाचून भकास झाले असले तरी त्या घरात राहून त्यांनी तेरा दिवस आपल्यावरील साऱ्या जबाबदाऱ्या शांतपणे—धीराने—गांभीर्याने पार पाडल्या.

तीन मूर्ती निवासस्थानासमोरील सैनिकांच्या त्या तीन मूर्तीही सचिंत उभ्या असल्यासारख्या वाटतात. प्रवेशद्वारावरील ते पहारेकरी, इतर नोकरही ती सतेज मूर्ती आता पुन्हा दिसणार नाही म्हणून खिन्नावस्थेत बसलेले व उभे असलेले दिसतात. आत शिरल्याबरोबर हिरवा गालिचा पसरल्यागत दिसणारी ती हिरवळ कानात हळूच कुजबुजू लागते की, नोव्हेंबर १४ ला लहान मुलांबरोबर खेळणारे—बागडणारे—हसणारे पंडितजी, होळीच्या दिवशी रंग-गुलाल खेळणारे पंडितजी यापुढे नाही दिसणार. निवासस्थानामागील त्या वृक्षाखाली ठेवलेली ती खुर्ची सांगू लागली की, पंडितजींच्या सहवासाला मी कायमची अंतरले असून त्यांच्या या प्रतिमेला जवळ करून मी त्या भाग्यविधात्याची स्मृती जवळ बाळगीत आहे. ती विस्तीर्ण बाग आणि ती हिरवळ सांगू लागते की, यापुढे येथे परदेशी पाहु-ण्यांना मेजवान्या देण्याचा कार्यक्रम नाही होऊ शकणार. कारण त्या आगळ्या आणि वेगळ्या यजमानाने मृत्युलोकाचा निरोप घेऊन आता स्वर्गात वास्तव्य केले आहे. ऊन आणि पावसापासून संरक्षण करणारी ती मोठी छत्री बोलू लागते की, यापुढे मी कोणावर सावली धरू, कोणाचे पावसापासून रक्षण करू! मलाही पंडितजींनी बरोबर का नाही नेलं? डाव्या हाताची ती वृक्षराजी सांगते की, याच ठिकाणी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पंडितजींनी भेट देऊन त्यांच्यासमवेत फोटो काढून घेतले होते. त्या मोठमोठ्या सतरंज्या, खुर्च्या, बाके, कोच सारे काही निवासस्थानाच्या एका कोपऱ्यात निरुपयोगी बनून पडले आहे. आता त्यांच्यावर कोण बसणार? पंडितजींच्या वस्तू म्हणून त्या त्यांच्या स्मारकाचा एक भाग बनणार.

तीन मूर्ती निवासस्थानातून बाहेर पडताना मागे वळून पुन्हा एकदा त्या प्रासादाकडे दृष्टी टाकली, की गेल्या १७ वर्षांचा इतिहास डोळ्यांपुढे उभा राहतो आणि साऱ्या देशाचे नव्हे तर जगाचे आशास्थान बनून राहिलेल्या या वास्तूला एवढ्या लौकर राष्ट्रीय स्मारकाचे स्वरूप लाभणार म्हणून वाईट वाटते. परदेशी वकील, परदेशी पाहुणे, मंत्री, अधिकारी, पुढारी, शास्त्रज्ञ, साहित्यिक, शिक्षण-तज्ज्ञ, कलावंत आदींनी गजबजून जाणारा हा प्रासाद आता एक ऐतिहासिक स्थळ म्हणून अनंतकालपर्यंत उभा राहणार. दरवाज्यावरील त्या जुन्या दारवानाकडे पाहिले की, त्याचे डोळे सांगू लागतात, " एका साधूने पंडितजींच्या रूपाने जन्म घेतला होता. तो साधू या जगाचा त्याग करून दुसऱ्या जगात गेला आहे. एवढा त्याग, एवढी सेवा, एवढी फकिरी वृत्ती, प्रेम-दया आणि शांती व थोडी-फार लहरी व तामसी वृत्ती साधूशिवाय दुसऱ्या कोणात आढळणार! बुद्धाचा अवतार, विष्णु-शंकराचा अंश लुप्त झाला. एक युगपुरुष अंतर्धान पावला!" त्या दारवानाकडे पाहात पाहात मी साउथ ॲव्हेन्यूच्या फूटपाथने पुढे पुढे जात जात एका मंत्र्याच्या बंगल्यात शिरलो आणि एका वेगळ्या वातावरणाचा अनुभव घेऊ लागलो.

काही मंत्री–उपमंत्र्यांच्या निवासस्थानी त्या दिवशी ( सोमवार ता. ८ जून ) सायंकाळी एक वेगळेच दृश्य पहावयास मिळत होते. त्यांचे निजसहाय्यक टेलिफोनजवळ बसून पंतप्रधान शास्त्री हे राष्ट्राध्यक्षांना भेटावयास गेले की नाहीत याच्या तपासात होते. कारण त्या दिवशी सायंकाळी मंत्र्यांची यादी जाहीर केली जाईल अशी अपेक्षा होती. अनेकांच्या मनात साशंकता आणि धागधुगी होती. काही म्हणाले देखील, की पंडितजी होते तेव्हा काळजी वाटत नसे. ते स्वतः निर्णय घेऊन अल्पावधीत आपले मंत्रिमंडळ बनवीत. कित्येकांना ते जवळ करून कामाची संधी देत. दोषांची कल्पना असूनही गुणांना प्राधान्य देत. म्हणूनच त्यांच्या मंत्रिमंडळात पाच-पंचवीस नवीन तरुण मंडळींचा भरणा असे व पंडितजींचा कामाबद्दल त्यांच्यावर विश्वास असे. शास्त्रीजींना हे सारेच नवीन होते. त्यांची कामराजांच्या निवासस्थानी सारखी ये-जा चालू होती. निर्णय घेणे त्यांना अवघड जात होते.

दुपारी त्यांनी अलाहाबादच्या भाषणात म्हटल्याप्रमाणे त्यांचे खांदे ही मोठी जबाबदारी पेलण्यास लहान आहेत की काय अशी शंका वाटत होती. त्या दिवशी रात्री १२–१ वाजेपर्यंत पुष्कळांना शांती–स्वस्थता व झोप मिळू शकली नाही. आपले पुढे काय? मंत्रिपद गेले तर पुढे काय करावयाचे हा एकच प्रश्न त्यांना उद्विग्न करून टाकीत होता. काहींनी तर आपले सामान बांधून गावी

परत जाण्याची तयारी केली होती. काहींच्या वतीने गाठीभेटी सुरू झाल्या होत्या. पत्रकारांची धावपळ आणि मंत्र्यांना दिलासा देण्याची गडबड पाहण्यासारखी होती. दोन हप्त्यांतील तफावत जाणवल्याशिवाय रहात नव्हती. तिकडे पंडितजींच्या निवासस्थानी सारी शांतता व स्तब्धता आणि इकडे मंत्र्यांच्या घरी गडबड–धावपळ आणि मानसिक अस्वस्थता. ती रात्र तशीच गेली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी यादी जाहीर झाल्यावर अनेकांना हायसे वाटले. पण त्यातही शास्त्रींनी काहींना टांगत ठेवले. उपमंत्र्यांची नावे गुलदस्तात ठेवून त्यांना चिंतेच्या चिमट्यात अडकविले.

कालचा मंत्री आज राहिला नाही आणि आजचा उद्या राहील की नाही याची शाश्वती राहिली नाही. उद्योगमंत्र्यांचे अन्नमंत्री झाले आणि अन्नमंत्र्यांचे रेल्वेमंत्री झाले. शेतकीमंत्री सुरक्षामंत्री झाले आणि माहितीमंत्री नागरी वाहतुकमंत्री बनले. कित्येक नाराज झाले आणि काहींनी वैतागाने उद्गार काढले की आपल्याला नकोच हे खाते. त्यांचे शिपाई–पट्टेवाले मात्र म्हणत राहिले की, "याला जीवन ऐसे नाव !" जे आज आहे ते उद्या नाही आणि उद्याचे परवा नाही. मनुष्यमात्राचे सारेच काही अनिश्चित आहे. पंडितजी पंधरा दिवसांपूर्वी होते आणि आज नाहीत. आजची काही बडी मंडळी उद्या दिसणार नाहीत. जगाचे हे चक्र फिरतच राहणार. पण या कालचक्रावर पंडितजींनी जो प्रभाव पाडला तो कधीही स्मरणातून जाणार नाही. या देशाला अनेक पंतप्रधान मिळतील, पण पंडितजींसारखा पंतप्रधान मिळणार नाही. त्यांचे सारेच काही और, वेगळे आणि निराळे. राजा-महाराजांनी नव्हे तर देवादिकांनी हेवा करण्यासारखे त्यांचे जीवन प्रेमाने सदा बहरलेले असे. लोकप्रियतेच्या लाटेवर ते सदैव आरूढ असत. अशा या थोर भाग्यवान माणसालाही आपल्याबरोबर नेणाऱ्या काळाला 'कालाय तस्मै नमः।' करण्याशिवाय आपल्याजवळ काय आहे ? या दिल्लीने पुष्कळ राज्ये, साम्राज्ये पाहिली–अनुभवली पण पंडितजींचे लोकशाही शासन अनुभवलेली दिल्ली पंडितजींना कधीही विसरणार नाही, दिल्लीवरील ठसा कधीही पुसला जाणार नाही. राजघाटानजिकचा तो शांतिघाट आणि त्या शांतिघाटावरील नियोजित 'शांतिवन' जगाला अनंतकाळपर्यंत सांगत राहील की, भारताचा पहिला पंतप्रधान एक वैरागी राजपुरुष होता आणि त्याने केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील मानवांचीही हृदये जिंकून त्यांना आपले बनविले. त्याच्या महानिर्वाणानंतर जगावर फार मोठी जबाबदारी पडली असून ती पेलण्यासाठी जगाने फार मोठी तयारी करावयाला हवी.

• • •

# मंत्री दौऱ्यावर जातात ! : ३ :

अगदी पूरवाची गोष्ट. मुख्यमंत्र्याचे बंगल्यावर त्यांचे पी. ए. ला फोन करावयाचा होता म्हणून मित्राच्या ओळखीच्या एका पारशी कुटुंबाचे बिऱ्हाडी जाण्याचा प्रसंग आला होता. मित्र वरच्या मजल्यावर आणि हे कामा नावाचे पारशी कुटुंब त्या खालच्या मजल्यावर. दारावरील बेलचे बटन दाबताच एका वृद्ध पारशी स्त्रीने दार उघडले आणि " साहेबजी " म्हणून आमचे स्वागत केले. मुंबईतील हे पारशी कुटुंब भाड्याच्या जागेत जरी रहात असले तरी अत्यंत व्यवस्थितपणे टापटिपीने आणि हौसेने त्यांनी आपला फ्लॅट सजविलेला आहे. आत शिरतांच रेडिओतून अभिजात गायनांतील भीमसेन जोशी याचा मंजूळ आवाज ऐकायला आला आणि कामा कुटुंबाचे संगीतप्रेम चटकन मनात भरले. मी फोन करीपर्यंत बाईनी विजेच्या किटलीत कॉफी तयार केली आणि त्यांच्या सुनेने टेबलावर कप–बशा व्यवस्थित मांडून ठेवल्या. कॉफी पिता पिता त्या वृद्ध स्त्रीने जी माहिती सांगितली, जे उद्वेगाचे उद्गार काढले, ते अजूनही माझ्या कानात घुमत आहेत. बाई सत्तरीच्या आसपास असावी. एडनमध्ये जन्मलेली आणि वाढलेली. मुंबईत ५० हून अधिक वर्षे काढलेली. टिळकांपासून गांधीजींच्या चळवळीपर्यंत अनेक चळवळी पाहिलेली. सार्वजनिक संस्थांत काम करून जनतासंकर्प साधलेली. गुजराथी–इंग्रजीबरोबरच हिंदी भाषा चांगली समजणारी ती वृद्धा जेव्हा काँग्रेस आणि शासन यावर कडवट टीका करू लागली तेव्हा मला आम्ही कोठे चाललो आहोत याचा चांगला बोध होऊ शकला.

बाई म्हणाली, " गांधीजी म्हणत होते तेव्हाच काँग्रेसचे विसर्जन करून दुसरा पक्ष काढला असता तर आजचे दिवस आले नसते. आज सगळीकडे काय चालले आहे ? काँग्रेस पक्ष बदनाम होत असून काँग्रेस सरकार वशिलेबाजी, लाचलुचपत, सत्तेचा लोभ आणि त्यासाठी कारवाया यांनी पोखरून गेले आहे. ज्या नेहरूंना लोकांनी प्राणाच्यापलीकडे मानले त्यांना 'नेहरू राजीनामा देऊन बाजूला व्हा ' असे लोक म्हणू लागले आहेत. शेख अबदुल्लाला सोडला काय आणि आता त्याला आवरण्यासाठी धडपड चालली काय ? कम्युनिस्टांनी देश पोखरला तरी त्याचा पत्ता नाही. काँग्रेसवाले सत्तेच्या मागे लागल्याने शासनाने सत्ताधीशावर कुरघोडी केली असून अधिकारी खरे राज्यकर्ते बनले आहेत. मंत्र्यांना उपजत काही समजत नाही आणि ते समजूनही घेत नाहीत. दौरे आणि समारंभात

मशगुल असलेल्या मंत्र्यांना त्यांचे सचीव हातोहात बनवीत नसल्यास नवल! गावात तलाठी, तालुक्यात मामलेदार, जिल्ह्यात कलेक्टर आणि मुंबईत सेक्रेटरी राजा बनला आहे. 'आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते' अशी या काँग्रेस राज्याची अवस्था झाली आहे."

बाईंची ही विचारसरणी सगळीच बरोबर आहे असे नाही. पण ती ज्या अनुभवाने आणि अधिकाराने बोलत होती त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. काँग्रेसला आयुष्यभर तन–मन–धनाने मदत केलेल्या या पारशी कुटुंबाला अखेर काँग्रेस पक्षाचा आणि काँग्रेस सरकारचा उबग वाटावा याला फार गंभीर अर्थ आहे. ही प्रतिक्रिया केवळ सर्वसामान्य माणसाची नसून सुशिक्षित–विचारी–प्रगत समाजाची आहे हे लक्षात घ्यायला हवे. सामान्य माणूस तर आतां स्पष्ट म्हणू लागला आहे की, "काँग्रेसच्या राज्यात खायला अन्न नाही आणि रहायला निवारा नाही" अशी स्थिती झाली आहे. महागाई वाढत आहे आणि टंचाईने हैराण केले आहे. पण दाद कोण घेतो आणि फिर्याद कोण ऐकतो? आहे कोणाला येथे वेळ! मंत्र्याचा तपास करावा लागतो आणि शोध घ्यावा लागतो. एकएक दिवस जात आहे आणि काँग्रेसची शक्ती वाढण्याऐवजी कमी कमी होत आहे. विरोधकांची आणि विशेषतः कम्युनिस्टांची शक्ती काँग्रेसच आपल्या कृतीने वाढवीत आहे. गरिबी काही हटत नाही आणि श्रीमंती काही कमी होत नाही. सामान्य माणूस होता तेथेच आहे.

मंत्र्यांच्या दौऱ्याबद्दल आणि समारंभाबद्दल बाईंनी जसे कटू उद्गार काढले तसे उद्गार अनेक जणांकडून ऐकायला मिळतात. हॉटेलमध्ये, बसमध्ये, रेल्वे-प्रवासात, विमानात दौऱ्याचा विषय ऐकायला मिळाला नाही असे सहसा कधी होत नाही. जनता-संपर्काचे नावाखाली केल्या जाणाऱ्या या दौऱ्याचा हिशेब मांडला तर कितीतरी वेळ, पैसा आणि शक्ती नाहक खर्ची पडत असल्याचे आढळून येते. पायाभरणी आणि कोनशिला, प्रकाशन आणि उद्घाटन यासाठी शेकडो मैलाचा प्रवास, त्यासाठी अनेकांना दगदग, त्यात कित्येक तासांची उधळपट्टी हे या मागास देशाला परवडणारे आहे का? शनिवारी–रविवारी राजधान्यातून मोटारी सुटतात आणि कित्येक जिल्ह्यांतून आणि तालुक्यांतून संचार करीत असतात. या संचारात कितीतरी सरकारी अधिकारी आणि कार्यकर्ते सामील होऊन आपलाही वेळ दवडतात. वेळेची किंमत आणि पैशाचे मोल आम्हांला अजूनही उमगत नसल्याने या दोन्हींचा बेरेमाप खर्च आमच्या हातून चालू आहे. गावातल्या कोणातरी सधन गृहस्थाकडे जेवण, विश्रांती, ठराविक मंडळींना भेटी व गप्पा–गोष्टी आणि ठरलेला कार्यक्रम पार पाडला की मंत्री निघाले दुसऱ्या

गावाला. बरे, कार्यक्रम वेळच्या वेळी पार पाडले जातातच असेही नाही. मंत्र्याचे उशीरा आगमन आणि त्यामुळे उशीरा कार्यक्रम. लोकांनी आपले तासन्तास निष्ठत बसावे. ‘ बोइंग युगात ’ वेळेची ही नासधूस पाहिली की अप्रगत–मागास देश झपाट्याने पुढे कसा जाणार याची विवंचना वाटू लागते. पाश्चात्य देशात वेळेला आणि माणसाच्या श्रमाला फार मोठी किंमत दिली जाते. एक–एक क्षण मोलाचा मानला जातो. अधिक काम, अधिक उत्पादन, अधिक अर्थार्जन आणि अधिक सौख्य हे तिकडचे जीवनविषयक तत्त्वज्ञान. तर आमच्याकडे कमी उत्पादन, कमी उत्पन्न आणि कमी सुख हे जीवनाचे सूत्र. महत्त्वाकांक्षा नाही म्हणून कार्यक्षमता नाही. एकएक दिवस कसाबसा ढकलायचा. जेथे राजकारण कमी आणि अर्थकारण अधिक हवे तेथे अर्थकारण नावापुरते आणि सारेच राजकारण अशी अवस्था. मग माणूस कसा सुधारणार आणि देश कसा पुढे जाणार !

श्रीमती कामा सहज म्हणाल्या होत्या, गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी चळवळीचे शिक्षण दिले आणि त्या शिक्षणाचा स्वातंत्र्यप्राप्तीसाठी उपयोगही झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र गांधीजी आवर्जुन म्हणाले होते की, चळवळीऐवजी आता विधायक कार्याची जरूरी आहे. मंत्र्यांनी--कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी साधी रहाणी व उच्च विचारसरणीने सार्वजनिक कामकाज केले पाहिजे. तथापि आजचे दृष्य अगदी उलट दिसत आहे. मंत्र्यावर भरमसाट पैसे खर्च होत असून त्याचा मोबदला नाममात्र मिळत आहे. उच्च विचारसरणी औषधालाही सापडत नाही. कृतींच्या बाबतीत तर विचारायला नको. अशा पद्धतीने देश कोठे जाणार आहे ? कामाबाई कळकळीने बोलत होत्या. त्यांनी गांधीजींना जवळून पाहिले होते, त्या वेळच्या कॉंग्रेस पुढाऱ्यांचा आदर्श अनुभवला होता. आज मंत्र्यांकडून आदर्श दुर्मिळ झाला आहे. मंत्र्याचे बोलणे–चालणे–वागणे आदर निर्माण करण्याऐवजी ‘ घृणा ’ निर्माण करीत आहे. कोणी किती पैसे केले आणि कोणी कोणाकोणाच्या नावाने काय काय धंदे केले याचे वृत्तपत्रातून आलेले वृत्त वाचले की धक्का बसल्याशिवाय रहात नाही. ‘ कोणी वंदो अथवा निंदो आमचा स्वहिताचा धंदो ’ असे चालले आहे. श्रीमती तारकेश्वरी सिन्हा काय किंवा कै. दातार काय सर्वत्र चर्चा चालू आहे आणि या चर्चेचे पडसाद वाईट उमटत आहेत. मंत्र्यांची शान आणि मंत्र्यांचा खर्च पाहिला की, आपण भारतासारख्या गरीब देशात आहोत की अमेरिकेसारख्या श्रीमंत असा संभ्रम पडतो. केरळमध्ये कम्युनिस्ट अधिकारावर आल्याबरोबर त्यांनी मोठ्या मोटारी काढून छोट्या मोटारी घेतल्या व पगारभत्तेही कमी करून घेतले. लोकांना वाटले की हे खरे गरिबाचे कनवाळू. पण याही मंत्र्यांनी स्वतःच्या नातेवाइकांकरिता आणि पक्षाकरिता अशा काही गोष्टी केल्या की त्यांनाही लवकरच सत्तेवरून खाली उतरावे लागले. तीच गोष्ट प्रजासमाज-

वाद्यांबाबतही घडली. सत्ता सर्वांनाच चढते, कोणी अपवाद होऊ शकत नाही हे त्यावरून सिद्ध झाले आहे.

एकदा एकादा कार्यकर्ता मंत्री झाला की तो आपणास सर्वज्ञ समजू लागतो व पाठीशी असलेली सत्ता ही आपल्या कर्तृत्वाची निशाणी मानू लागतो. त्याची अभ्यासूवृत्ती संपते व तो ठोकळेबाज बनायला लागतो. त्याला आपल्या बौद्धिक वाढीची गरज वाटण्याऐवजी त्याच्या इतर गरजाच वाढू लागतात. तो शालीन होण्याऐवजी मलीन होऊ लागतो व लीनतेऐवजी अहंकाराचा दर्प त्याला येऊ लागतो. तो जुने स्नेही-हितचिंतक आणि सहाध्यायींना विसरतो व नवी नवी मंडळी जवळ करतो. यांत विविध क्षेत्रांत काम करणारी बुद्धिमान, चारित्र्यवान, कर्तृत्ववान मंडळी असतातच असे नाही. तर तोंडपुजेपणा करणारी भाट मंडळीच अधिक दिसतात. मंत्रीमहाशयांना काय आवडते हे बरोबर हेरून त्याबद्दल ते सतत काळजी वहात असतात. याला केंद्रीय मंत्रिमंडळ किंवा राज्यातील मंत्रिमंडळे अपवाद आहे अशातला भाग नाही. त्यातल्यात्यात महाराष्ट्र राज्यातील स्थिती पुष्कळच बरी आहे. येथील मंत्रिगण आणि शासनातले गणंग गुणी आहेत, राज्यप्रेमी आणि कल्याणकारी पण आहेत. तथापि गेल्या काही वर्षांशी तुलना करून अंशात्मक बोलायचे झाल्यास उतरती भांजणी सुरू आहे की काय अशी शंका वाटू लागते. सालोसाल मंत्र्यांची उंची वाढल्याचे किंवा त्यांनी आपली उंची वाढविल्याचे फारसे दिसून येत नाही. मंत्रिमंडळाचा एकूण विचार केला तर ते चांगले आहे, कार्यक्षम आहे यांत शंका नाही. पण एकएका व्यक्तीचा विचार करता वाचनात, अभ्यासात, निर्णयात आणि अंमलबजावणीत आणखी कितीतरी सुधारणा व्हायला हवी हे स्पष्ट दिसून येते. संधी मिळाल्यावर तिचा पुरेपूर उपयोग करून मंत्र्यांनी आपली आणि मंत्रिमंडळाची उंची वाढवायला हवी.

वरील कामाबाई बोलताना म्हणाल्या चव्हाणसाहेब फार हुषार आहेत. त्यांनी आपल्या बोलण्या-चालण्याने मुंबई जिंकलीच पण दिल्लीही जिंकली. त्यांचेपासून मंत्र्यांनी पुष्कळ शिकण्यासारखे आहे. चव्हाणसाहेब दिल्लीस गेले आणि तेथेही चमकले. अशी चमक सगळ्यांनी दाखवायला हवी. नाईकसाहेबांनी चव्हाणांचे बरेच गुण आणि कामाची पद्धत उचलल्याचे शिफारसपत्र कमाबाईंनी दिल्यावर "He is shaping very well" असे जे इंग्रजीत म्हणतात तसा अनुभव येऊ लागल्याचेही त्या म्हणाल्या. नाईकसाहेबही वरचेवर दौऱ्यावर जातात. पण त्यांची दौऱ्याची पद्धत थोडी आगळी वाटते. वेळेचा, शक्तीचा, पैशाचा कमीतकमी अपव्यय करून ते लोकांची कामे झटपट कशी उरकतील याकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते. भेटणाऱ्यांची तोबा गर्दी होऊ

द्यायची नाही व उगाच त्याचेबरोबर शिळोप्याच्या गप्पा मारायच्या नाहीत. सर्वांना भेट पण भरभर उरक, भरपूर काम आणि जरूर तेवढी विश्रांती याबद्दल ते जी काळजी घेतात ती वाखाणण्यासारखी आहे. दौऱ्यात सर्व थरांतील लोकांना भेटून त्यांची विचारपूस करून त्यांच्या अडचणी जाणून घेऊन श्री. नाईक यांनी तेथल्या तेथे निर्णयाचा आणि त्या निर्णयाचे अंमलबजावणीचा जो पायंडा पाडला आहे तो अतिशय उपयुक्त ठरत आहे. नाईक यांच्या एका दौऱ्याबरोबर जाण्याची संधी मला मिळाली असता मी त्यांच्या बोलण्या–वागण्याचे जे बारकाईने निरीक्षण केले त्यात मला त्यांचा वेगळेपणा चटकन् आढळून आला. या वेगळेपणात लोकांबद्दलची आस्था स्पष्ट दिसून आल्याशिवाय राहिली नाही.

मंत्री जेव्हा दौऱ्यावर जातात तेव्हा सचिवालयातील आणि जेथे जातील त्या गावातील परिस्थिती मोठी अवलोकनीय असते. सचिवालयाच्या सहाव्या मजल्यावर दुपारी सहज फेरफटका मारला की मोठे मजेशीर दृश्य पहावयास मिळते. जे मंत्रिमहाशय मुंबईबाहेर गेलेले असतात त्यांच्या कचेरीपुढे शिपायांचा अड्डा जमून पानतंबाखूचा बार भरीत असतात. ही मंडळी गप्पा–गोष्टीत आणि थट्टा-मस्करीत दंग झालेली असतात. मंत्र्याचे कार्यालयात त्याचे निजी साहाय्यक बहुधा जागेवर नसतात. कोणी चहाला खाली गेलेला असतो अथवा घरी लवकर परतलेला असतो. खात्याच्या सचिवाची किंवा उपसचिवाची चौकशी केली तर साहेब एक दिवसाच्या रजेवर असल्याचे समजते. मंत्रालयातील मंडळी गप्पात आणि हास्य–विनोदात गर्क असलेली पहावयास मिळतात. कॉरिडॉरमधील जाण्या–येण्याच्या रस्त्यावर कारकून मंडळी घोळक्याघोळक्यांनी उभी असलेली व साहेबाबद्दल कटु बोलत असलेली दिसतात. मुली उगाचच इकडे तिकडे मुरडत–लचकत चाललेल्या आढळतात. कँटिन तर सदैव फुललेले पहावयास मिळते. राज्यसरकारची ही मुख्य कचेरी आहे की एखादे कॉलेज आहे असा काही वेळा भास होतो. या अवाढव्य कचेरीतील नोकरांची संख्या, त्यांचे कामाचे तास आणि कामाचा उरक यांचा हिशेब मांडला तर वेळेची आणि पैशाची मोठी नासधूस चाललेली दिसून येते. एका दिवसाच्या सात तासात फार तर चार-साडेचार तास काम केले जाते. बाकीचा वेळ असाच इकडे तिकडे जातो. कचेऱ्यातील हा विसविशीतपणा घालवून शिस्त व जरब बसविली गेल्याशिवाय फायली टेबलावरून झटपट हालणार नाहीत आणि लालफीत कार्यक्षम होणार नाही. त्यासाठी मंत्र्यांनी कचेरीत बसून फाइलीमध्ये वेळच्यावेळी लक्ष घालणे अत्यंत जरूर आहे. फायलींचा मोठा गठ्ठा रोज मोटारीत ठेवून घरी नेला किंवा घरून परत कचेरीत आणला तरी त्यावर नोटिंग झालेले असतेच असे नाही. कारण ती सवय लावून घेतलेली नसते. लोकांच्या गाठी–भेटीत व इतर गोष्टींतच मंत्र्यांचा रोजचा बराच वेळ जात

असतो. लोकांचेही मंत्र्याचे भेटीसाठी तासन् तास वाया जात असतात. परगावाहून आलेल्या माणसांची यामुळे फार मोठी कुचंबणा होते व मग त्याचे तोंडून मंत्र्याच्या कामाचे पद्धतीबद्दल नाराजी व्यक्त होते.

दौऱ्यावरील मंत्र्याचेबाबतही कार्यकर्त्यांत व अधिकाऱ्यांत नाराजी दिसून येते. सर्किट हाऊसवरील मुक्कामात कोणीतरी जवळचा माणूस एकदा आत गेला की लवकर बाहेर येत नाही आणि मग अधिकाऱ्यांना व जरूरीचे काम असलेले कार्यकर्ते यांना तासन्तास बाहेर तिष्ठत बसावे लागते. कित्येक वेळा अधिकाऱ्याकडे लक्षही दिले जात नाही. पुण्यासारख्या शहारातील मुक्कामात मंत्रीमहाशय वेगवेगळ्या क्षेत्रातील विद्वान व ख्यातनाम व्यक्तींना भेटीला बोलावून त्यांचेशी चर्चा कर किंवा मुद्दाम त्यांचेकडे जाऊन प्रश्न समजावून घेतील असे दृश्य सहसा पहावयास मिळत नाही. विद्वज्जनांना जवळ करावे, त्यांचेशी चर्चा करावी यापासून जेवढे अलिप्त रहाता येईल तेवढे रहाण्याचा प्रयत्न मंत्री करतात. या उलट विशिष्ट मंडळींचा त्यांचेभोवती सदैव गराडा पडलेला दिसतो. कार्यक्रम कोणते घ्यावेत, कोणाचे घ्यावेत याचा फारसा धरबंध असल्याचे काही आढळून येत नाही. एखाद्या कार्यकर्त्याने भीड घातली की मंत्री निमंत्रण स्वीकारतात आणि मग अधिकाऱ्यांची मोठी त्रेधातिरपीट उडते. चार तासात सहा कार्यक्रम पार कसे पडणार ? पण त्याचा विचार कोणी करायचा ? काही वेळा अशा व्यक्तीच्या घरी जेवणाचा कार्यक्रम असतो की तेथे जाणे इतरांना अवघड होऊन बसते. अशा बाबतीत मंत्र्यांचे पी. ए. स्थानिक काँग्रेस श्रेष्ठींचा सल्ला किंवा अधिकाऱ्याकडून आगाऊ माहिती का घेत नाहीत याचे आश्चर्य वाटते. मंत्री दारात यायचा म्हणजे पोलीस-बंदोबस्त, फोटोग्राफर, सारी काही व्यवस्था आपोआप होते आणि मग तीन–चार दिवसांनी मंत्र्यासमवेत घेतलेले फोटो घराच्या भिंतीवर मोठ्या दिमाखाने लावलेले पहावयास मिळतात. या भांडवलावर ती व्यक्ती काय काम करते याची कल्पनाच केलेली बरी.

मंत्र्याची दौऱ्याची ही कहाणी फार मोठी असल्याने लवकर संपता संपणार नाही. कारण त्याना हिताचे बोललेले रुचत नाही आणि काही चांगले सांगितले तर सहन होत नाही. त्यांना हवी असते स्तुती, तोंडभर खोटी स्तुती. कामाबाईच्या सारख्या महिलांचे बोल वाऱ्यावर जातात, त्याचा उपयोग होत नाही हे खरे आहे. पण तेवढ्या 'ता' वरून 'ताक-भात' न समजण्याइतके आम्ही दुधखुळे राहिलो तर राज्य कोठे चालले आहे याचा अंदाज बांधणे कठीण होईल. मंत्र्याची सत्ता किंवा शान–डामडौलपणाबद्दल हेवा वाटण्याचे कोणाला कारण नाही. पण ती सत्ता लोकांच्या कल्याणाकरिता वापरली जात आहे व शान राज्याची शोभा

वाढविण्यास कारणीभूत होत आहे याचा प्रत्यय लोकांना यायला पाहिजे. मंत्री वरचेवर दौऱ्यावर गेला म्हणून पोट दुखण्याचे काही कारण नाही. पण तो दौरा खऱ्या अर्थाने लोकांच्या अडचणी समजावून घेऊन त्या दूर करण्यासाठी उपयोगी पडला पाहिजे. दौऱ्यामुळे सचिवालयातील कामकाजाला ढिलाई प्राप्त न होता ते लवकर कसे उरकले जाईल याची खबरदारी घेतली गेली पाहिजे. प्रकरणांचा, प्रश्नांचा अभ्यास करून वाढले पाहिजे आणि शासनावर आपल्या कर्तृत्वाने जरब बसविली पाहिजे. तरच शासनाचे घोडे योग्य मार्गाने जलद पुढे जाईल. नाहीतर मांड ढिली म्हणून ते कोठे उधळेल याचा नेम राहणार नाही. केंद्राचे आणि काही राज्यांचे तसे होऊ लागल्यानेच लिहिण्याचा एवढा प्रपंच करावा लागतो !

● ● ●

## सचिवालयाची कहाणी : ४ :

नारळी पौर्णिमा होती त्या दिवशी. शनिवार होता म्हणून मी १०॥ च्या सुमारास सचिवालयात गेलो. पहिले दोन मजले हिंडून पाहिले, काही कचेऱ्यांत शिरून पाहिले, पण सगळीकडे शुकशुकाट दिसला. मला शंका आली, की नारळी पौर्णिमेची सुट्टी तर नाही ना ! सुट्टी असली तर मग आपला हेलपाटा फुकट म्हणायचा. मुंबईत लवकर पोहोचावे म्हणून मी सकाळी लवकर उठून जनता एक्स्प्रेस गाठली होती. पाच रुपये पंचवीस पैशांत पुण्याहून मुंबईला पोहोचल्यावर सव्वा रुपयाची टॅक्सी करून सरळ सचिवालय गाठले होते. प्रवेशद्वारातील स्वागत आणि माहितीचे टेबल मोकळे, संपर्काधिकाऱ्याची खुर्ची मोकळी, दुसऱ्या मजल्यावरील काही अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्याच. शेवटी मला सुट्टीची शंका आली आणि नव्या जोडइमारतीचा ( Annexe ) जिना उतरून मागच्या बाजूने मी आमदारनिवासाकडे कूच केले. मी आवाराबाहेर पडतो नाही तोच शे-दोनशे कर्मचाऱ्यांचा घोळका चर्चगेट स्टेशनच्या बाजूने घाईघाईने येताना दिसला. त्यांतल्या एक-दोघांनी सुट्टी नसल्याचे तथापि सेक्शनल हॉलिडे असल्याचे सांगताच माझा जीव भांड्यात पडला. कपभर चहा घ्यावा म्हणून मी आमदारनिवासाच्या कँटिनमध्ये शिरलो.

कँटिन जवळ जवळ रिकामेच होते. एका कोपऱ्यात मात्र प्रसिद्धी संचालनालयात काम करणारी एक मुलगी आणि एक मुलगा चहा पीत, गप्पा मारीत बसल्याचे दिसले. मला पाहिल्यावर अर्धा क्षण ती चमकली. पण लगेच तिने स्वतःला सावरून घेतले. तिच्या विभागाच्या अधिकाऱ्यांकडे मी कधी कधी

येत असतो हे तिला माहीत होते. 'कचेरीला सरळ वेळेवर न जाता वाटेत हॉटेलात एका तरुणाबरोबर चहा पीत बसणे' ते माझ्यासारख्याने पाहणे तिला कसेसेच वाटले. मी खुर्चीवर बसताच ती जोडी उठली आणि सचिवालयाकडे झपझप पावले टाकीत निघून गेली. सचिवालयातील स्त्री-पुरुष नोकरांची ही दृश्ये मला नवीन नव्हती. मुंबईच्या बहुरंगी जीवनाचा तो एक भाग होता.

फोरशोअररोडवरील सचिवालयाच्या त्या अवाढव्य व अजागळ इमारतीकडे पाहिले, की हिंदी स्थापत्यशास्त्राच्या दिवाळखोरी कल्पकतेची माझ्यासारख्याला कीव वाटू लागते. प्रचंड खर्च करून बांधलेली ही इमारत डोळ्यात कधी भरत नाही की डोळ्यांना सुखदायक—आकर्षक वाटत नाही. सिमेंट कॉंक्रीटची नासधूस करून एक ओबडधोबड पहाड उभा केल्यासारखे वाटते. त्यात ना कलाकुसर, ना सोयी, ना सवलती. मागची लिव्हर ब्रदर्सची इमारत, 'एस्सो'ची इमारत, 'दुगल हाऊस', 'एल्. आय्. सी.'ची इमारत पाहिल्यावर सचिवालयाचे काम कसे बेढब झाले आहे याची कल्पना येते. सचिवालयात कधी कामानिमित्त शिरले तर तेथे थोडा अधिक वेळ थांबावेसे वाटत नाही. आतील वागणेही इमारतीप्रमाणेच अस्ताव्यस्त, अजागळ आणि अप्रिय वाटू लागते. दोन गोष्टींचा उलगडा तर मला अजूनही होऊ शकलेला नाही. सचिवालयातील कामात मुलींची व शिपायांची ( प्यून्स ) मोठ्या प्रमाणात जरुरी आहे का ? कोणत्याही मजल्याच्या व्हरांड्यात तुम्हांला मुलींचा ताफा आणि शिपायांचा तांडा भेटल्याशिवाय राहणार नाही. फायली हातात घेऊन इकडे-तिकडे फिरणारे शिपाई, मंत्री-उपमंत्री यांच्या दारात तासन् तास उभे असलेले किंवा बसलेले एकापेक्षा अधिक शिपाई आणि कँटिनच्या दिशेने जाणाऱ्या-येणाऱ्या किंवा व्हरांड्यात उगाचच फेऱ्या घालणाऱ्या मुली पाहिल्या, की वेळेचा आणि पैशांचा केवढा नाहक खर्च होतो याची कल्पना येते. खरोखर इतक्या मुली आणि एवढे शिपाई आवश्यक आहेत का ? काम आणि कर्मचाऱ्यांची संख्या यांचा हिशेब कोणी कधी मांडला आहे का ? टंकलेखक, लघुलेखक किंवा कारकुनी यासाठी मुलींची भरती होते आणि साहेबाच्या घरी-दारी आणि कचेरी-कामासाठी शिपाई नेमले जातात. त्यांच्यावर ना साहेबाचे लक्ष ना ऑफिस-सुपरिंटेंडेंटचे. जरुरीपेक्षा मुली व शिपाई दुप्पट असल्याचे जुन्या अनुभवी—कळकळीच्या सेवकाने जेव्हा सांगितले तेव्हा मी सर्दच झालो.

मला जर एखाद्या स्नेही मंत्र्याने विचारले की, तुम्ही मुंबईला येऊन भेटत का नाही ? तर मी त्यांना स्पष्ट सांगतो की, तुमच्या सचिवालयात आपल्याला शिपाई आणि मुली या दोन सेवकांचा फार संकोच वाटतो. या दोहोंना तोंड

कसे द्यायचे कळत नाही. शिपाई बाहेर कोचावर दीर्घकाळ बसायला लावतो आणि मंत्रिमहाशयांचे बोलावणे येईपर्यंत पाच-पंचवीस मुली समोरून उगाचच येरझारा घालून डोळ्यास ताण देतात. एवढा वेळ घालवायला आणि डोळ्याला आणि डोक्याला त्रास द्यायला आपल्याला नाही परवडत. सचिवालय ही वास्तू आणि सनदी नोकरांपासून तो टंकलेखिकेपर्यंतची नोकरसंघटना आपल्याला सचिवालया-पासून दूर दूर जायला लावते एवढे खरे. सारेच काही अजब. एका अधिकाऱ्याने मला चहाचा फारच आग्रह केला. मी म्हटले, "नको, उशीर होईल आणि आपला वेळ जाईल." तथापि त्याने शिपायाला बोलावले आणि दोन कप चहाची ऑर्डर दिली. शिपाई आदबीने म्हणाला, "साहेब, मी तुमची ऑर्डर कँटिनला नेऊन देतो, मी स्वतः काही ट्रे घेऊन येणार नाही. शिपायांनी चहा आणण्याचे काम करू नये असे आमच्या संघटनेने ठरविले आहे." साहेब आणि मी, आम्ही दोघेही त्या शिपायाकडे पहात राहिलो. पण करणार काय! कामगार-संघटना आणि कामगार शक्तीपुढे वाकायलाच हवे. त्यानंतर मात्र मी सचिवालयात चहा घ्यायचे यशस्वीपणे टाळू लागलो. फारच कोणी आग्रह केला तर कँटिनमध्ये जायचे. पण तेथेही बसायला जागा मिळण्याची मारामार. या कँटिनचे मला नेहमी आश्चर्य वाटते. ते दुपारी १२ पासून सदैव भरलेलेच असते. कारकून आणि छोटी अधिकारी मंडळी कँटिनमध्येच अधिक दिसतात. चहाशिवाय त्यांना कामाला स्फूर्तीच येत नाही. 'खारी बुंदी' आणि चहा घेतला की तास-दीड तास कामाला दम टिकतो. दोन तासाने हाच कार्यक्रम करणार काय ही मंडळी? सकाळी कसेबसे दोन घास पोटात ढकलून लोकल गाठायची असते आणि रात्री घरी पोहोचेपर्यंत ८-९ वाजलेले असतात. मधल्या वेळी हॉटेलात खाण्याशिवाय गत्यंतर नाही. चहाने भूक भागवावयाची आणि सिगरेटने डोक्याचा शीण घालवावयाचा. म्हणूनच चहा-सिगरेटची सचिवालयात सदैव चलती असते.

सहाव्या मजल्यावरील मंत्र्याचे वास्तव्य आणि पाचव्या मजल्यावरील उपमंत्री व सचिवांचे वास्तव्य यांमुळे हे दोन मजले गजबजलेले असतात. या मजल्यापर्यंत लिफ्ट चालविणारे लिफ्टमनही ऐटीत असतात. लिफ्टमनची ऐट पाहून शिपाईही रुबाबात असतात. त्यातल्या त्यात मंत्र्यांच्या स्थानानुसार आणि खात्यानुसार त्यांचे शिपाई एकमेकांना दाबात ठेवीत असतात. काही मंत्र्यांचे दारापुढील शिपायाचा तर एवढा रुबाब आणि दबाब असतो की साहेबाला भेटा-यला त्याच्याजवळ वशिला लावावा लागतो. तो शिपाई पी. ए. वगैरेंना फारसा जुमानीत नाही. कारण मंत्र्यांनी पी. ए. ची स्थितीच तशी करून ठेवलेली असते. पी. ए. म्हणजे एक कारकून एवढेच त्याला महत्त्व दिले जात असल्याने शिपाई पी. ए. ला कारकुनाएवढेच महत्त्व देत असतात. काही शिपाई तर साहेबाच्या

एवढ्या मर्जीत असतात की, ते पी. ए. पेक्षाही साहेबाला अधिक विश्वासू आणि जवळचे वाटतात. गेल्या काही वर्षांत पी. ए. ही व्यक्ती चढत चढत वरती गेली व तिने नाव काढले असे क्वचितच पहावयास मिळते. मोरारजीभाईंचे पी. ए. श्री. टोणपे सोडले तर इतरांना त्या दर्जाने वागविल्याचे किंवा ते स्वतः आपल्या कर्तृत्वाचे जोरावर वागल्याचे पहावयास सापडत नाही. पी. ए. च्या स्थानाला आजच्यापेक्षा अधिक महत्त्व दिले जाणे जरूर आहे. कारण साहेबाचे बरेच काम या व्यक्तीच्या मदतीने हलके–सोपे होत असते. एका पी. ए. मित्राने मला काही दिवसांपूर्वी स्पष्ट शब्दात सांगितले की, ज्या अपेक्षेने आणि धोरणाने मी पी. ए. ची जागा स्वीकारली त्या अपेक्षा फोल ठरल्या आहेत. येथे हुषार–कर्तृत्ववान माणसाला वाव कमी. तोंडपुजे व हांजीहांजीखोर लोकच मंत्र्यांची मर्जी संपादू शकतात. डायऱ्या लिहिण्याच्या कारकुनीपेक्षा एकादा उद्योगधंदा बरा.

मंत्री–उपमंत्री यांच्याकडे भेटण्यासाठी येणाऱ्या लोकांची मोठी संख्या आणि मंत्र्यांच्या दारापुढे तासन् तास बसून रहाण्याची त्यांची स्थिरता पाहिल्यावर व्यर्थ जाणाऱ्या वेळेबद्दल आणि शक्तीबद्दल अनुकंपा वाटू लागते. एखादा जवळचा माणूस आत गेला, की तो इतर लोक बाहेर आहेत याची जाणीव ठेवीत नाही आणि गप्पा रंगवून तो मंत्रिमहाशयांचा आणि बाहेरच्या लोकांचा वेळ नाहक खर्च करीत असतो. काही कार्यकर्त्यांना ही सवयच लागून गेली आहे. सचिवालयात चक्कर मारताना उगाच या मंत्र्याचे खोलीत डोकाव, त्या उपमंत्र्याचे खोलीत चकाट्या पिटीत बस. मंत्रीही त्यांना आता पुरे गप्पा, कृपया काम करू द्या, असे सांगत नाहीत. समोर फायलींचा ढीग आणि दिवसभर गप्पांचे पीक असेच दृश्य बऱ्याच वेळा पहावयास मिळते. एखाद्या सेक्रेटरीला किंवा डेप्युटी सेक्रेटरीला चर्चेसाठी बोलावले तर त्या चर्चेत आपला अभ्यास आणि मत यांचा प्रभाव पाडण्याऐवजी सनदी नोकरांचेच ऐकून घेण्याचा कल अनेक वेळा दिसून येतो. बरे, हे सनदी नोकर (आय. ए. एस. आय. सी. एस्.) आता एवढे तयार झाले आहेत की, साहेबाला नेमके काय पाहिजे व काय नको हे हेरून ते चर्चा करीत असतात. नियम–कानूंची अडचण सांगत असतात. काही मंत्रि–उपमंत्री सचिवाला सांगायला धजत नाहीत की मलाही फाईल समजते आणि कायदा–कानू समजतो. लोकांच्यासाठी कायदे आहेत, कायद्यासाठी लोक नाहीत. पण असे फारसे घडत नाही. कारण जनतासंपर्काच्या महत्त्वाच्या कामान्वये लोकप्रतिनिधींना आपल्या फायली पहायला व निर्णय घ्यायला वेळ मिळत नाही व मग नोकरशाहीचे नेमके फावते.

ती पोलादी चौकट फारशी बदलल्याचा अनुभव काही येत नाही. स्वाराला जोखून जसा घोडा चालत असतो, तसेच नोकरशाहीचे आहे. ज्याची मांड घट्ट

त्याच्यापुढे फारशी कुरकुर चालत नाही. तथापि लगाम सोडून घोडा चालविणाऱ्याला हा घोडा कधी दगा देईल याचा नेम नाही. सचिव, नायब सचिव, उपसचिव अशा पाऱ्या वाचीत चालले, की एकूण कारभाराची भीती वाटू लागते. त्यात सुपरिंटेंडेंट, सिनिअर क्लार्क, क्लार्क यांचे जाळे आहेच. कोणी एक महिला नोकर अल्पावधीत कारकुनाची सुपरिंटेंडेंट झाल्याची कथा ऐकायला मिळते. एवढेच नव्हे तर प्रमोशनसाठी कोण कशा युक्त्या योजून यशस्वी झाल्याचे रसभरीत वर्णन पण ऐकायला मिळते. काम किती चालू आहे आणि कोण किती करतो आहे, याची जोवर पहाणी नाही व मोजदाद नाही तोवर फायलींचा आणि कागदपत्रांचा किती बट्ट्याबोळ होईल व त्या ढिगात पडून राहतील याचा नेम नाही. 'फाईल सापडत नाही', 'अजून आलेली नाही', 'नोटिंग झालेली नाही' ही उत्तरे सदैव ऐकायला मिळतात आणि पाचव्या–सहाव्या मजल्यावरील मंडळींना चूप बसावे लागते.

सचिवालयात सर्वांत अधिक काम कोणाला असेल तर ते टेलिफोनला आणि 'बेल'ला. टेलिफोन नेहमीच गुंतलेला (एंगेज) आणि बेल सदा खणखणत असलेली ऐकायला मिळते. साहेबाच्या खोलीतील बेल वाजली, की मग शिपाई जागा होतो आणि जागेवरून हालतो. मग तो साहेब अधिकारी असो वा निजिसहाय्यक असो वा मंत्री–उपमंत्री असो. आपली तंबाखू चोळून व एक 'पिक' टाकून मगच शिपाई आत जाणार. ती बेल मंत्र्याची असेल तर लगेच, पी. ए. ची असेल तर जरा दमाने आणि अधिकाऱ्यांची असेल तर थोड्या वेळाने तो आत प्रवेश करतो. शिपायांनी अशी उतरती भांजणी लावून ठेवली आहे. एकेका दारासमोर पाच पाच शिपायांचा तांडा कशाकरिता असतो तेच समजत नाही. राजकारणापासून तो वृत्तपत्रांत मंत्र्याबद्दल आलेल्या बातम्यांपर्यंत तो सर्रास चर्चा करीत असतो. त्यातल्या त्यात 'मराठा'तील बातम्या तो चविष्टपणे चघळत असतो. एखादा अधिकारी किंवा दुसरा मंत्री समोरून गेला तरी अदबीने उभा रहाण्याची किंवा नमस्काराची दखल घेत नाही. आदर आणि शिस्त त्याच्या नावी–गावी नसते. अशा या शिपायावर टेलिफोनच्या मुली जेव्हा ताण करतात तेव्हा कमाल वाटते. टेलिफोनची घंटा घणाणली तरी त्या रिसिव्हर उचलीत नाहीत आणि उचलला तर नंबर एंगेज्ड म्हणून सांगून नामानिराळ्या होतात. बऱ्याच वेळा त्या फोनवरून कुणाशी तरी चकाट्या पिटत बसल्याचे आढळून येते. कारकून मुली आणि टेलिफोनमधील मुली म्हणजे सचिवालयाचे एक भूषण बनले आहे. 'हे भूषण नसले तर सचिवालयाला शोभा कशी येणार' असे एका कळकळीच्या पण सनातनी अधिकाऱ्याने काढलेले उद्‌गार मोठे सूचक वाटल्याशिवाय राहिले नाहीत.

नारळी पौर्णिमेच्या ' सेक्शनल हॉलिडे' या नावाखाली गैरहजर राहिलेला नोकरवर्ग त्या दिवशी समुद्रावर नारळ टाकायला गेला असेलच असे नाही. तर तो कोठें तरी दुपारी सिनेमाला व सायंकाळी हॉटेलात सापडल्याशिवाय राहिला नसेल. या दिवशी माझे काम दोनपूर्वीच मला संपवावे लागले. जाताजाता जुन्या सचिवालयात डोकावून मी एका जुन्या मित्राला भेटलो आणि पुण्याची गाडी पकडली. जुन्या सचिवालयाची ती दगडी सॉलिड इमारत आणि तेथील तो दरारा—कडक शिस्त यांची नव्याशी तुलना करू लागल्यावर आपण कोठें चाललो आहोत असे वाटल्यावाचून राहिले नाही.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५०८३
REFBK-0015043
REFBK-0015043